
# लैंगिक नीती आणि समाज

लेखक
श्री. के. क्षीरसागर

संकलन
शकुंतला क्षीरसागर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका



श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचा जीवनपट
जन्म ६ नोव्हेंबर, १९०१ □ मृत्यु २९ एप्रिल, १९८०

सातारा जिल्ह्यातील खंडोबाची पाल येथे जन्म, मराठी शिक्षण तेथेच, हायस्कूलचे शिक्षण सातारा गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये, १९१८ मध्ये मॅट्रिक, कॉलेज शिक्षण १९१९ मध्ये कर्नाटक कॉलेज, धारवाड व फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून. १९२२ मध्ये बी. ए., १९४५ मध्ये पुण्याच्या एम. ई. एस. कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक. १९६२ मध्ये त्याच कॉलेजमधून सेवानिवृत्त, १९८० मध्ये पुणे येथे निधन.

त्यांची एक कादंबरी व एक कथासंग्रह प्रकाशित झाला असला तरी टीकाकार व निबंधकार म्हणूनच ते विख्यात.

अनुक्रमणिका

# लैंगिक नीती आणि समाज

अनुक्रमणिका

# लैंगिक नीती आणि समाज

## श्रीकृष्ण के. क्षीरसागर

संकलन
शकुंतला क्षीरसागर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : २००३

प्रकाशक : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
कोल्हापूर

किंमत रु. १४५/-

अनुक्रमणिका

# निवेदन

"लैंगिक नीती आणि समाज" हा श्री. के. क्षीरसागर यांच्या लेखांचा संग्रह.

श्री. के. क्षीरसागर यांनी १९७६ पर्यंत लिहिलेले व विविध नियतकालिकांतून प्रकाशित झालेले लेख या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत. या पुस्तकाला नामवंत विचारवंत व मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची "रसडोळस" प्रस्तावना लाभली आहे. ज्या काळात लैंगिक हा शब्द उच्चारणे अवघड होते त्या काळात "लैंगिक नीती आणि समाज" यासारख्या विषयावर श्री. के. क्षीरसागर यांनी लिहावे हा जसा डॉ. निर्मलकुमार फडकुले यांना चमत्कार वाटतो त्याहीपेक्षा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हे पुस्तक प्रसिद्ध करावे, हा काही लोकांना चमत्कार वाटण्याचा संभव आहे. केवळ हा लेखच नव्हे तर या पुस्तकातील सर्व लेख वाङ्मयीन व सांस्कृतिकदृष्ट्या मोलाचे असल्यामुळे तसे वाटणे गैर आहे.

या पुस्तकातील लेख २५ वर्षापूर्वी लिहिलेले आहेत आणि तरीही ते आजच्या काळातही विचारप्रवर्तक व उद्‌बोधक वाटतात. यावरुन श्री. के. क्षीरसागर यांचे विचार किती प्रगत व प्रगल्भ होते हे त्यावरुन स्पष्ट होते.

मुंबई
२५ जून, २००२.

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

# प्रस्तावना

मराठी साहित्याच्या क्षेत्रातले एक रसडोळस वृत्तीचे समीक्षक म्हणून श्री. के. क्षीरसागरांचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. ते केवळ साहित्याची समीक्षा करीत नाहीत. त्याच्या अनुषंगानं जीवनाचीही मीमांसा करतात. त्यांचं समीक्षालेखन वाचताना वाचकाच्या मनात विचारांची अनेक वर्तुळं निर्माण होतात आणि तो अंतर्मुख होतो. साहित्याची प्रगल्भ आणि परिपक्व जाण असलेल्या एका सौंदर्यनिष्ठ रसिकाचं बोट धरून आपण साहित्यकृतीची अंगोपांगं न्याहाळीत आहोत असं वाचकाला जाणवतं. समीक्षक क्षीरसागर हे मूलतः रसिक आणि विचारवंत आहेत. पौरस्त्य आणि पाश्चात्य टीकाशास्त्राचा त्यांचा सखोल व्यासंग असला तरी त्यांच्या टीकालेखनात शास्त्रदृष्टीपेक्षाही रसदृष्टीचाच प्रत्यय येतो. साहित्याकडं शोधक रसिकतेनं कसं पाहावं आणि त्या साहित्याच्या गाभ्याला कसा स्पर्श करावा याचा वस्तुपाठ त्यांच्या टीकालेखनातून मिळतो असं म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. मूळ साहित्यकृतीपेक्षाही त्यांची आस्वादात्मक काव्यात्म टीका अधिक आकर्षक वाटते. टीकालेखन म्हणजे पुस्तकावरचं पुस्तक हा गैरसमज इथं गळून पडतो. वाङ्मयीन आणि वैचारिक टीका ही एक स्वतंत्र निर्मिती असते. तिच्या मुळाशी प्रतिभेचे नवोन्मेष असावे लागतात. अन्यथा तंत्रशरण टीका नीरस वाटते. साहित्यकृतीच्या विविधांगांचं आत्मिक दृष्टीने दर्शन घेऊन नवा दृष्टिकोन देण्याची क्षमता असलेल्या सर्जनशील समीक्षकांत क्षीरसागरांचा समावेश केला जातो. आज त्यांच्या निधनाला पंचवीस वर्षांचा अवधी उलटून गेला तरी त्यांच्या रसपूर्ण, मर्मग्राही आणि विचाराला गती देणाऱ्या समीक्षेची विस्मृती होत नाही. 'A critic is a failed poet' असं मानण्याची प्रथा आहे. पण श्री. के. क्षींच्या बाबतीत ही प्रथा अल्पांशानंही लागू पडणार नाही. काव्यात्मकता आणि विचारशक्ती यांच्या संमीलनातून त्यांचं बहुतांश लेखन सिद्ध झालेलं आहे. या अभिजात टीकाकाराचं प्रस्तुत पुस्तक वाचकांना काही अंशी वैचारिक धक्के देणारं ठरेल असं मला वाटतं. एका वाचकानं तर पुस्तकाचं केवळ शीर्षक वाचून आश्चर्यानं उद्गार काढले, 'लैंगिक नीती आणि समाज' यासारख्या विषयावर श्री. के. क्षींनी लिहावं! याचाच मला चमत्कार वाटतो.

पण त्या वाचकाची ही भावना अनाठायी होती. श्री. के. क्षी. हे केवळ ललित साहित्याचीच चिकित्सा करणारे विचारवंत नाहीत. त्यांचं विचारविश्व व्यापक आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या अनेक अंगांसंबंधी त्यांनी चिंतन केलं होतं. धर्म, शिक्षण, संस्कृती, परंपरा हे विषय त्यांच्या लेखनात आणि भाषणात अनेकवेळा येऊन गेले आहेत. महाविद्यालय आणि विद्यापीठ यात अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या चिंतन विषयांना कित्येक वेळा एक प्रकारची मर्यादा पडलेली जाणवते. अध्यापनाशी संबंधित असलेल्या विषयांपलीकडे अनेक अभ्यासक पाहात नाहीत. क्षीरसागरांची जातकुळी याहून निराळी आहे. समाजजीवनातल्या अनेक रंगरेषांचं त्यानी सूक्ष्मदृष्टीनं अवलोकन केलं होतं. एका अर्थानं समाज हाच त्यांच्या विचाराचा विषय होता. त्यामुळंच अनेक ललित लेखकांपेक्षा त्यांना लोकहितवादी, लो. टिळक, अहिताग्नि राजवाडे, डॉ. केतकर हे लेखक अधिक आवडायचे. 'सुवर्णतुला' यासारख्या पुस्तकातून त्यांनी ज्या व्यक्तींचा शोध घेतला आहे त्या साऱ्या व्यक्ती सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाशी अधिकांशानं निगडित होत्या. म्हणूनच साहित्याची समीक्षा करणारा एक रसज्ञ लेखक इतकीच क्षीरसागरांची ओळख करून घेणं चुकीचं ठरेल.

'लैंगिक नीती आणि समाज' या पुस्तकातल्या लेखांची शीर्षकं वाचली तरी लेखकाच्या चिंतनाची दिशा कळू शकते. 'पावित्र्य आणि स्त्रीपुरुष संबंध', 'यंत्रयुगातील लैंगिक नीती', 'या बहुपत्नीकत्वाचे मूळ

आहे तरी कशात?' 'प्रेयसी, पत्नी आणि स्फूर्ती', 'कॅमेरे नृत्य व भारतीय स्त्री', 'स्त्री-संभोगाची मानसिक बाजू–अर्थात प्रेम आणि काम' इत्यादी लेखांतून क्षीरसागरांनी आपले विचार मुक्तपणानं पण तर्कशुद्ध रीतीनं मांडले आहेत. कधी ते पारंपारिक विचाराला विरोध करतात. तर कधी परंपरेची पाठराखणही करतात. समाजाच्या लैंगिक जीवनाचा, अभिरुचीचा आणि दृष्टिकोनाचा साधक—बाधक परामर्श घेणारे हे लेख वाचकाला या विषयीचं गांभीर्य पटवून देतात. आपल्या लिंगविषयक (Sexual) संकल्पनांचा पुनर्विचार केला पाहिजे याची जाणीव या लेखांमुळं निश्चित होऊ शकेल. समाजाची कामविषयक विचार आणि आचारपद्धती त्याच्या समग्र जीवनावर प्रभाव टाकू शकते. याची कल्पना फारच थोड्या लोकांना असते. या पुस्तकातले लेख हे लेखकानं वेळोवेळी नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रीय सदरातून लिहिलेले आहेत. ज्यावेळी ते प्रकाशित झाले त्यावेळी अनेक वाचकांनी आपल्या अनुकूल व प्रतिकूल प्रतिक्रिया नोंदवल्या होत्या असं मला स्मरतं. अशा विषयांवर वैचारिक लेखन मराठीत तरी अगदीच अल्प प्रमाणात झालेलं आहे. जे झालं त्यातही सांकेतिकता किंवा प्रचलित नैतिक समजुती गृहीत धरुन लेखन केलेल आढळतं. 'समाज स्वास्थ्य'कार र. धों. कर्वे यांच्या लेखनात मात्र नवा दृष्टिकोन आणि शास्त्रप्रामाण्य या गोष्टी आढळत असतात. काम आणि नीती या विषयाकडं पाहाण्याची शास्त्रदृष्टी प्रा. र. धों. कर्वे यांनीच मुख्यतः दिली असं म्हणता येईल. पण या विशिष्ट विषयांचा विचार करताना क्षीरसागरांनी समाजाची मानसिकता, सामाजिक व धार्मिक परिस्थिती, सार्वजनिक आरोग्य, संस्कृती आणि अभिरुची, स्त्री-पुरुषांच्या मनोवृत्तीतील अंतर असे अनेक घटक गृहीत धरुन विचार व्यक्त केले आहेत. त्यामुळं विचारात कुठंही एकदेशीयता आली आहे असं वाटत नाही. क्षीरसागरांच्या विचाराबद्दल कदाचित मतभेद होऊ शकतील. त्यांनी काढलेले निष्कर्ष सर्वांना सारखेच मान्य होणार नाहीत. पण प्रत्येक लेखातली मध्यवर्ती विचारधारा त्यांनी अनेकांगी दृष्टीकोनातून प्रकट केली आहे. त्यामुळंच प्रत्येक लेख विचारांना चालना देतो. एखाद्या ठिकाणी तो विवाद्यही वाटतो. त्याचं उत्तर त्याच लेखातून क्षीरसागर देत आहेत याचीही जाणीव होते. 'स्त्री-संभोगाची मानसिक बाजू, अर्थात प्रेम आणि काम' या दीर्घ लेखांचा समारोप करताना त्यांनी म्हटलं आहे.

'जुन्या धार्मिकांनी आणि नव्या स्वातंत्र्यवाद्यांनी दोघांनीही कामव्यवस्थेकरिता शोधून काढलेले मार्ग यशस्वी होणारे नसल्याने त्यामुळे समाजस्वास्थ्याहून अस्वास्थ्याचाच संभव अधिक आहे. .................. प्रेमामुळे कामाची शांतीही होते व उन्नतीही होते. किंबहुना काम ही अशी वासना आहे की, जी उन्नत केल्याखेरीज खरी तृप्त होऊच शकत नाही. 'कामाची' तृप्ती कामाच्याच भूमिकेवर करण्याचा प्रयत्न म्हणजे फुटका रांजण भरण्याचा अथवा तेलाने आग विझविण्याचा प्रयत्न होय. उलट कामाचे प्रेमात रुपांतर झाल्यास कामाची शांती होईल एवढेच नव्हे तर व्यक्तीच्या उर्वरित जीवनक्रमाची उन्नती होईल.'

हा लेख क्षीरसागरांनी १९४२ मध्ये लिहिलेला आहे. प्रस्तुत संग्रहात १९७६ पर्यंतचे लेख निवडलेले आहेत, याचा अर्थ काम, प्रेम, लिंगविषयक नीती –अनीती, अशा विषयांचा लेखक दीर्घकाळ विचार करीत होते. काम आणि प्रेम यापैकी कोणतीही भावना त्यांनी गौण मानलेली नाही. पण प्रेमामुळंच कामभावनेला सुंदरता आणि सुखदता व शांती प्राप्त होते हा महत्त्वाचा सिद्धांत ते इथं मांडतात. प्रेमशून्य काम व्यक्तीला मानसिक शांती देऊ शकत नाही. या विचारातलं सत्य क्षीरसागरांनी विवरुन सांगीतले आहे. केवळ शरीराची गरज इतकंच कामाला मूल्य नाही. तो एक पुरुषार्थ आहे. जीवनाची आणि मनाची उन्नती त्यामुळं होऊ शकते. पण त्याला प्रेमाचं अधिष्टान नसेल तर स्वैर झालेली कामभावना व्यक्तीच्या आणि समाजाच्या स्वास्थ्याला बाधक ठरते. लेखकानं केलेलं हे विश्लेषण मानसशास्त्रदृष्ट्या निश्चितच समर्थनीय आहे.

अनुक्रमणिका

शरीरसुखसुद्धा मनाच्या तृप्तीशिवाय खऱ्या अर्थानं सुखकारक होऊ शकत नाही. प्रस्तुत लेखात श्री. र. धों. कर्वे यांच्या विचारांचं क्षीरसागरांनी केलेलं खंडन संयुक्तिकच आहे.

'प्रेयसी, पत्नी आणि स्फूर्ती' या लेखातली क्षीरसागरांची मतसरणी काहींना विवाद्य आणि अप्रिय वाटेल. प्रेयसी आणि पत्नी यांच्या भूमिका वेगळ्या असतात असं प्रतिपादन करून स्फूर्तीसाठी पत्नीपेक्षा प्रेयसीच अधिक प्रेरक असते असं ते म्हणतात. 'अनेक कर्तृत्ववान पुरुषाच्या विवाहबाह्य प्रेमाचा विचार करताना आपणाला या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. स्त्रीसुखाचे किंवा अन्य कोणत्याही सुखाचे उद्दिष्ट जर श्रमाची किंवा चिंतांची विस्मृती हे असेल तर पत्नीपेक्षा विवाहबाह्य प्रेयसीच ते कार्य अधिक परिणामकारकरीतीने करू शकेल असे मानसशास्त्राचे निःसंदिग्ध उत्तर येईल' हे मत सर्वमान्य होईल किंवा काय याबद्दल शंका घेता येईल. बाजीराव आणि मस्तानी यांच्या संबंधाविषयी क्षीरसागरांनी अशाच आशयाचं विश्लेषण केलं आहे. बाजीरावाच्या पराक्रमाचं स्फूर्तिस्थान मस्तानीचा सहवास आणि प्रेम हेच असावं असा निष्कर्ष लेखक काढतात. लेखाच्या शेवटी ते म्हणतात, 'माझ्या या विवेचनाचा उद्देश जुन्या वा नव्या विवाहबाह्य प्रेयसीचे समर्थन करण्याचा नसून केवळ मानसशास्त्रीय स्पष्टीकरण करण्याचा आहे.'

श्री. के. क्षीं. चे हे निर्भीड लेख वाचून कुणीतरी प्रश्न विचारण्याचा संभव आहे. 'क्षीरसागर हे पुराणमतवादी की नवमतवादी?' काही ठिकाणी त्यांनी बहुपत्नीत्वाचा पुरस्कार केला आहे. अंगवस्त्र बाळगण्याची जुनी प्रथाही समर्थनीय मानली आहे. पण मुक्त स्त्री-पुरुष संबंधावर ते टीका करतात. चित्रपटातील चुंबनदृश्येही त्यांना समर्थनीय वाटत नाहीत. प्रेयसी आणि पत्नी या द्वंद्वात ते प्रेयसीच्या बाजूनं साक्ष नोंदवतात. ही विसंगती पाहून ते पुरोगामी की प्रतिगामी हा प्रश्न एखादा वाचक विचारू शकतो. हे लेख वृत्तपत्रांतून आले तेव्हाही या प्रकारची चर्चा झाली होती. या पुस्तकातले समग्र लेख एकत्रीतपणे वाचल्यावर मला जाणवले ते हे की, पुरोगामी आणि प्रतिगामी ही सांकेतिक लेबलं क्षीरसागरांवर चिकटवण्यात काहीच स्वारस्य नाही. कारण अशा विषयाकडं पाहण्याची त्यांची दृष्टी संतुलित आहे. बाजीराव–मस्तानी प्रकरण त्यांच्या दृष्टीनं नैतिकही नाही आणि अनैतिकही नाही. एका पराक्रमी पुरुषाच्या काव्यात्म सुखदुःखांना साथ देणारी कलावती प्रेयसी हीच दृष्टी त्यांच्या संबंधाचे विश्लेषण करताना त्यांनी ठेवली आहे. कित्येक श्रेष्ठ व्यक्तींचं वैयक्तिक आचरण काटेकोर नैतिक चौकटीत बसत नाही याची कारणमीमांसा स्थूल व्यावहारिक दृष्टीनं न करता उदारवृत्तीनं मानसशास्त्रीय पातळीवरुन क्षीरसागर करतात तिथं पुरोगामित्वाचा अथवा प्रतिगामित्वाचा प्रश्न नसतोच.

दारूबंदी' मागोमाग 'वेश्याबंदी' या लेखातील लेखकाची दृष्टी वास्तविक परिस्थितीचा वेध घेणारी आहे. ती मागासलेली नाही किंवा स्त्रीवर्गावर अथवा समाजावर अन्याय करणारीही नाही. 'वेश्यावर्ग म्हणजे एक घाणेरडे पण अपरिहार्य असे समाजांग आहे, असे प्रथम मान्य करुनच आजच्या स्थितीत तरी सुधारकांनी पाऊल टाकावयास हवे.' असा विचार लेखक मांडतात. अलेक्झांडर क्युप्रिनचं मत त्यांनी उद्धृत केलं आहे. Prostitution will last as long as marriage lasts उथळ नीतीवाद्यांच्या मताहून हे अधिक वास्तववादी मत म्हणून क्षीरसागरांनी उल्लेखिले आहे. वेश्याव्यवसायाचं ते समर्थन करीत नाहीत. पण प्राचीन काळापासून सामाजिक स्वास्थतेसाठी वेश्यावर्ग अपरिहार्यपणानं अस्तित्वात आहे हे स्पष्ट करून सामाजिक गरजेचा मुद्दा मांडतात. केवळ दुर्व्यसनावर कायद्यानं बंदी घातली तरी ती व्यसनं नष्ट होत नाहीत. दारूबंदीच्याबाबतीत हा अनुभव अनेक देशांनी घेतला आहे. माणसाचं जीवन उत्तरोत्तर अधिक यांत्रिक, संस्कारहीन आणि बकाल होत चाललेलं आहे. संस्कार देणाऱ्या शक्ती आणि साधनं क्षीण होत चालली आहेत. माणसाच्या विकारवशतेला, स्वैरतेला नियंत्रित करणारी मूल्यव्यवस्था उद्ध्वस्त होत

आहे. अशा परिस्थितीत दारूबंदी आणि वेश्याबंदीचे कायदे निष्प्रभ ठरल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या समाजसुधारकांना कर्मठ नैतिकतेपेक्षा सहृदयतेची आणि कागदी नियोजनापेक्षा कल्पकतेची आज अधिक गरज आहे.' श्री. के. क्षीं. च्या जीवनदृष्टीवर या विधानातून प्रकाश पडतो.

मानवी जीवनात सौंदर्याचे, सुखाचे आणि कृतार्थतेचे क्षण उत्पन्न करणाऱ्या काम या भावनेची विविध पातळ्यांवरुन या पुस्तकात केलेली चर्चा केवळ वाचनीय नाही, ती चिंतनीय आहे. एका सौंदर्यनिष्ठ रसज्ञ विचारवंतानं लैंगिक विषयांची केलेली ही तत्त्वचर्चा जितकी गंभीर तितकीच आनंददायक आहे. कोणत्याही अर्थानं हे लेखन सवंगपणाच्या जवळ जात नाही. स्त्री-पुरुषांच्या कामजीवनाशी निगडित असलेल्या अनेक प्रश्नांची चिकित्सा सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टीनं लेखकानं केली आहे. त्याच्या संवेबद्द रसिकतेचं प्रसन्न दर्शन अनेक स्थळी घडतं. आणि आपलं मन सुखावतं. खर तर हे वैचारिक लेख आहेत. ललित लेख नव्हेत. पण या विचारगंभीर लेखनातूनही लेखकाच्या तरल अभिरुचीचं सुसंस्कृतपणाचं आणि त्याच्या सौंदर्यप्रेमाचं जे चित्र उमटलं आहे ते पाहून क्षीरसागरांच्या भावप्रकृतीचे अनेक रंग जाणवतात. क्षीरसागर हे असे समीक्षक आहेत की विचारांची समीक्षा करताना त्यांच्या वृत्तीतलं काव्य उचंबळून येतं. भावनांच्या, विचारांच्या आणि जीवनाच्या सौंदर्याची हळूवार मनानं जपणूक करणाऱ्या चिंतनशील लेखकाचं हे लेखन आनंद देऊन गेलं. बहुसंख्य लोकांच्या हिशेबी काम ही भावना केवळ शरीरजन्य विकाररुप आहे. पण या भावनेचे भिन्न भिन्न पदर व त्यातून उद्‌भवणारी सुखदुःखं किती चमत्कृतिपूर्ण आहेत. या विकाराचे व्यक्तिगत आणि सामाजिक परिणाम कसे चित्रविचित्र असू शकतात याचं लेखकानं केलेलं विश्लेषण मर्मग्राही आहे. चांगला लेखक जेव्हा कोणत्याही विषयावर लिहितो तेव्हा काही अंशी तो स्वतःसंबंधीही लिहितो. याचा अर्थ त्याचा भाव, त्याचा दृष्टिकोन त्यातून अपरिहार्यपणानं व्यक्त होतो. यातला प्रत्येक लेख या विधानाची साक्ष देईल.

ही प्रस्तावना थोडी लांबत चालली. प्रस्तावना म्हणजे लेखकाची पाठराखण नव्हे किंवा परीक्षणही नव्हे. यातले लेख कित्येक वर्षांपूर्वी दैनिक, साप्ताहिक वृत्तपत्रात प्रकाशित झाले. काही लेख वार्षिक दिवाळी अंकातून आलेले आहेत. पण अनेक वर्षं उलटून गेली तरी या विषयाच्या आणि या लेखनाच्या ताजेपणाला बाधा आलेली नाही. दुर्दैवानं स्वतः लेखकही राहिलेला नाही. पण त्यानं व्यक्त केलेल्या निकोप विचारांचं दर्शन आजच्या पिढीला झालं पाहिजे. या उद्देशानं साहित्य संस्कृती मंडळानं श्रीमती शकुंतला क्षीरसागर यांना लेख संकलित करण्याविषयी सुचवलं. हे सर्व लेख सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेतच. पण ते वाङ्‌मयीन गुणांनीही वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. समाजजीवनात उद्‌भवणाऱ्या अनेकविध वाऱ्या-वादळांची आपल्या वैचारिक दृष्टीनं दखल घेणाऱ्या एका जागरुक विचारवंताचं हे लेखन वाचकांच्या पदरात काहीतरी निश्चितच मोलाचं टाकू शकेल. अर्थात मतभेदाची स्थळं असू शकतील. श्री. के. क्षीरसागरांच्या एका अवतरणाचा उल्लेख करून ही प्रस्तावना संपवतो. आपल्या पहिल्याच लेखाचा समारोप करताना, त्यांनी म्हटलं आहे,

'सुख आणि नीती यात मूलतः विरोध नाही. कारण त्यांची एकमेकांस आवश्यकता आहे. सुख आणि नीती या दोहोंचाही उन्नतीसाधन म्हणून उपयोग करून घेणे शक्य आहे. ती एक कला आहे. किंबहुना जीवनाची कला ती हीच पण ती जुन्या किंवा नव्या तर्कटी पंथास मात्र साध्य होणारी नाही. निसर्गाचे नियम नव्हेत तर, निसर्गाचे काव्य पाहणाऱ्यासच ती कला साधेल.'

'विवेक' **निर्मलकुमार फडकुले**

अनुक्रमणिका

१०, विद्यासागर,
उत्तम सदर बाजार,
सोलापूर- ४१३ ०३३.

अनुक्रमणिका

# ऋणनिर्देश

माझे पती आणि प्रसिद्ध टीकाकार श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांची दोन पुस्तके महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने यापूर्वी प्रकाशित केली. आता प्रकाशित होत असलेले 'लैंगिक नीती आणि समाज' हे पुस्तक मी मंडळाकडे १९९६ साली पाठवले होते. श्री. विद्याधर गोखले हे त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष होते. मंडळाचे एक मान्यवर सभासद प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या शिफारसीवरून मंडळाने ते पुस्तक प्रकाशनार्थ स्वीकारले. आता प्रा. डॉ. फडकुले यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. कै. विद्याधर गोखले आणि प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची मी ऋणी आहे.

सन १९४२ ते १९७७ या पस्तीस वर्षाच्या काळात श्री. के. क्षी. यांच्या चिंतनात "लैंगिक नीती आणि समाज" या विषयाचे जे वेगवेगळे पैलू आले ते या प्रकट संवादांमधून त्यांनी वाचकांसमोर आणले आहेत. प्रसंगविशेषी लिहिलेल्या या लहानमोठ्या पंचवीस लेखांचे संकलन वाचताना एक सौंदर्यवादी टीकाकार या नाजूक सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याची स्वच्छ दृष्टी कशी देतो हे समजते. तरुण पिढीने या पुस्तकातील विचार समजून घेतले तर व्यसनाधीनता आणि स्त्रियांकडे पाहण्याची विकृत वृत्ती यांच्यात स्वागतार्ह बदल घडेल असा मला विश्वास वाटतो.

या पुस्तकातील एका लेखाच्या समावेशाबद्दल माझ्या मनात संदेह निर्माण झाला होता. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष मा. प्रा. द. मा. मिरासदार यांच्याशी त्याबाबतीत बोलले. त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेऊन तात्काळ निर्णय दिला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

पुस्तकाची मुद्रिते तपासताना माझे बन्धू श्री. विलास शंकर रानडे यांचे फार मोलाचे साहाय्य झाले. त्यांची मी आभारी आहे.

साहित्य संस्कृती मंडळाचे विद्यमान अध्यक्ष मा. प्रा. रा. रं. बोराडे, प्रभारी सचिव श्री. उ. बा. सूर्यवंशी आणि कोल्हापूर येथील शासकीय मुद्रणालयाचे संबंधित सेवक यांचेही मनःपूर्वक आभार

**- शकुंतला क्षीरसागर**

२९/४१८ लोकमान्यनगर
पुणे—४११०३०
जानेवारी २००२

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

१ स्त्री-संभोगाची मानसिक बाजू अर्थात प्रेम आणि काम
२ अनैतिकता, ग्राम्यता आणि सरकार
३ मत्सर आणि कामस्वातंत्र्य
४ दारूबंदी मागोमाग वेश्याबंदी
५ निर्विकार सौंदर्य विरुद्ध सविकार सौंदर्य
६ शील आणि अब्रू
७ नवी नीती कोण स्थापू शकेल?
८ चित्रपटांतील चुंबन
९ या बहुपत्नीकत्वाचे मूळ आहे तरी कशात?
१० पावित्र्य आणि स्त्री-पुरुष संबंध
११ चित्रपटांतील चुंबन
१२ लैंगिक नीती आणि समाज
१३ लैंगिक स्वातंत्र्याचा ‘बंडखोर’ प्रयोग
१४ कॅबरे नृत्य व भारतीय स्त्री
१५ नवलकथा की शोककथा?
१६ हे कसले रोमिओ?
१७ मंत्र्यांच्या शीलाचा प्रश्न
१८ यंत्रयुगातील लैंगिक नीती
१९ इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे प्रेमजीवन!
२० बाजीराव मस्तानी आणि ढोंगी युरोपीय एकपत्नीत्व
२१ प्रेयसी, पत्नी आणि स्फूर्ती
२२ गाडीखाना दवाखान्यातले आकडे काय कामाचे?
२३ लैंगिक वास्तववाद आणि अंगवस्त्र परंपरा
२४ आधुनिक ‘लंदन-रहस्य’
२५ ‘पाप’ : वासना आणि कृती

१

# स्त्री-संभोगाची मानसिक बाजू
# अर्थात प्रेम आणि काम

**जी**वनाच्या हरएक अंगाचा शास्त्रशुद्ध दृष्टीने विचार करणे हे आधुनिक युगाचे वैशिष्ट्य होय. 'काम' हाही चतुर्विध पुरुषार्थांपैकी एक असल्याने त्याजकडेही आधुनिक युगाची दृष्टी वळणे अपरिहार्यच होते. सदर अनुपेक्षणीय आणि प्राणिमात्रास साधारण अशा पुरुषार्थाच्या साधनात कोणत्याही कारणाने व्यत्यय उत्पन्न झाल्यास व्यक्तीच्या आणि समाजाच्या स्वास्थ्यात बिघाड झाल्याखेरीज रहात नाही; या गोष्टीची जाणीव आधुनिक दृष्टीसही झाल्याखेरीज राहिली नाही. आणि म्हणूनच काम साधनेच्या आड येणारे जे जे घटक दूर करणे शक्य आहे ते ते त्यांनी दूर करण्याचे ठरविले. कित्येक रूढ समजुती–औचित्यविषयक, धर्मविषयक व नीतिविषयक–टाकून दिल्यास अतृप्तीमुळे उत्पन्न होणारे अस्वास्थ्य बरेच कमी करता येईल असे आधुनिक शास्त्रज्ञ प्रतिपादीत आहेत. नीती–अनीतीच्या कल्पना संभोगाच्या क्षेत्रातच केंद्रित झालेल्या दिसतात. त्यांचे तेथून उच्चाटन करून, दोन व्यक्तींची खुषी असल्यास कोणताही संभोग समाजाने मान्य ठरवावा; म्हणजे खंडीत कामवासनेमुळे उद्भवणाऱ्या अनेक विकृती दुरुस्त होतील आणि मनुष्यमात्र नव्या जोमाने धर्मार्थमोक्षादी इतर पुरुषार्थांकडे वळेल असे कित्येक आधुनिकांचे मत आहे.

'काम' हा केवळ उपेक्षणीय वा निदान गोपनीय विषय समजणाऱ्या 'सोवळ्या संभावितां'करिता प्रथम हे सांगितले की, हा 'सोवळे'पणा जुना नसून 'नवा' आहे. इंग्रजी शिक्षितांपूर्वीच्या पिढ्या हा विषय उपेक्षणीयही समजत नसत, की गोपनीयही समजत नसत. वयात आलेल्या मुलामुलींच्या लग्नाची घाई, बहुपत्नीकत्वाचा मोठ्या प्रमाणावर प्रघात आणि वेश्यागमनास देण्यात आलेला प्रतिष्ठितपणा या प्राचीन रिवाजांवरून कामवासनेचे प्राबल्य आपल्या वाडवडिलांनी—अर्थात पुरुषापुरतेच (?) ओळखले होते असे दिसून येईल.

आधुनिक लोक कामविषयक अस्वास्थ्य नाहीसे करण्यास हेच इलाज स्वीकारणार आहेत असे अर्थातच नाही. तथापि वैवाहिक आणि स्त्रीपुरुषविषयक नीतीच्या रूढ कल्पना सोडल्यास जुन्या कामस्वातंत्र्याहूनही अधिक स्वातंत्र्य आपणास लाभेल असे आधुनिकांचे म्हणणे आहे. बालविवाह, बहुपत्नीकत्व आणि वेश्यागमन यांस गौणत्व देण्यात इंग्रजी शिक्षितांनी उच्चतर मनोवृत्ती दाखविली हे जितके खरे तितकेच या तीन रूढींत प्राचीनांनी कामप्राबल्य मान्य करून अधिक वास्तवनिष्ठा दाखविली हेही खरे. नवनीतिप्रणीत संभोगस्वातंत्र्य स्वीकारल्यास सदर जीर्ण रूढी आहेत तशा चालू न करताही मानसिक स्वास्थ्य लाभेल असे आधुनिकांचे म्हणणे आहे.

आधुनिक संभोगस्वातंत्र्य आणि जुनी संभोगव्यवस्था या दोहोंसही साधारण अशी कल्पना म्हणजे, संभोग सुलभ केला म्हणजे मानसिक किंवा शारीरिक विकृतींची भीती उरली नाही ही होय. एकदा संभोगाच्या मार्गातील अडचणी काढून टाकल्या की, इतर उच्चतर पुरुषार्थांच्या वाटेत कामासारख्या प्रबल आणि मायावी मनोविकाराची अडचण उरली नाही. अर्थात सुलभ संभोग म्हणजे काय आणि संभोग सुलभ झाल्याने चतुर्विध पुरुषार्थांतील अडचणी खऱ्याच दूर होतात की काय हा प्रश्न फार महत्त्वाचा ठरेल.

अनुक्रमणिका

नवनीती ही रूढनीतिविरुद्ध म्हणून दर्शनीच बहुतांस भयंकर वाटते हे साहजिकच आहे. पण जुन्या नीतीत तरी 'कामव्यवस्था' इतकीशी निर्वेध झाली होती की काय हे प्रथम पाहिले पाहिजे. जुन्या कामव्यवस्थेवर आधुनिकांचा येणारा पहिला आक्षेप म्हणजे त्या व्यवस्थेत फक्त पुरुषांच्या काम— स्वातंत्र्याची व्यवस्था झाली होती हा होय. पण क्षणभर फक्त पुरुषांच्या दृष्टीने पहावयाचे झाले तरी बालविवाह, बहुपत्नीकत्व आणि वेश्यागमन या तीन व्यवस्था, निदान उत्तरोक्त दोन तरी पुरुष पक्षपाती तर आहेतच पण एरव्ही दोषरहित आहेत असेही म्हणता येणार नाही. एकपत्नीकाचे घर हे अनेकपत्नीकाच्या घराइतके स्वास्थ्यसंपन्न अशू शकत नाही हे जुन्या मंडळींनीही कबूल केले असते. आणि म्हणूनच बहुपत्नीकत्व धनिकांपुरतेच मर्यादित राहिले. आणि धनाढ्यांस 'घर' असे नसतेच हे आधुनिक 'क्लब लाइफ' पत्करणाऱ्या भांडवलवाल्यांइतकेच प्राचीन बाहेरख्याली सावकारांनी आणि सरदारांनीही आपल्या जीवनाने सिद्ध करून दिले असते. तीच गोष्ट वेश्यागमनाची. जुने चारही वर्ण वेश्यागमन करणारास वर्णच्युत समजत नसले तरी, वेश्येस वर्णशून्य आणि पतितच समजत असल्याने वेश्यागमन करणारास पर्यायाने पतित समागमच पत्करावा लागे. अर्थात या सामाजिक परिस्थितीची मानसिक प्रतिक्रिया झाल्याखेरीज राहणेच शक्य नव्हते. या दोन कामव्यवस्थेप्रमाणे गौण नसलेली जी धर्मप्रणीत विवाहाची व्यवस्था ती त्या काळी, अर्थातच बालविवाहाची व्यवस्था असल्याने, अनुनयशून्य आणि प्रेमशून्य विवाहाने कामजीवनात येणारी नीरसता तीतही वाट्यास येई. सारांश कामतृप्ती ही जर मानसिक आरोग्याकरिता जरूर असेल तर प्राचीनांनी पुरुषवर्गास दिलेल्या पक्षपाती मुभेनेही त्या आरोग्याची निश्चिती केलेली होती असे म्हणता येत नाही. फार तर एवढेच म्हणता येईल की, आधुनिकांत जेवढे मानसिक दौर्बल्याचे प्रमाण दिसून येते तेवढे प्राचीनांत मानसिक संस्कारशून्यतेचे प्रमाण दिसत असेल. तथापि न्यरॉटिक काय की स्टॉलिड काय दोघेही नैसर्गिक मानवी विकासाचे नमुने नव्हत. म्हणून जुन्या संभोगस्वातंत्र्यातही मानसिक विकासाची वा आरोग्याची व्यवस्था होती असे म्हणता येत नाही.

नव्या संभोगस्वातंत्र्यात विवाहसंस्थेच्या किंवा वेश्यावर्गासारख्या विशिष्ट वर्गाच्याही मर्यादा शिल्लक रहात नाहीत. मुळीच विवाह न झालेली, दुसऱ्याशी विवाह झालेली, कुलीन, अकुलीन कोणत्याही स्त्रीशी झालेला संबंध जोपर्यंत तिच्या अनुमतीने झालेला आहे तोवर तो नैतिक समजावा, अशी या नवनीतीची व्याख्या आहे. यात अशाच स्वातंत्र्याचा हक्क स्त्रियांसही दिला जातो हे वेगळे सांगावयास नकोच. म्हणजे स्त्रियांनीही विवाहित, अविवाहित, कुलीन, अकुलीन कोणाशीही संबंध ठेवणे हे नीतिबाह्य समजले जात नाही. या नवनीतीने संभोग्य सहचरसहचरीचे क्षेत्र निष्कंटक झाल्याने वासनेला लागलेल्या काचण्या कापल्या जाऊन मानसिक स्वास्थ्याचा व उल्हासाचा लाभ होईल असे काहींचे मत आहे.

या नवीन स्वातंत्र्यात जुन्या नीतीची किती पायमल्ली होते, हे पाहण्याचे कारणच नाही. कारण नव्या नीतीची शक्यता गृहीत धरूनच या नव्या आचार–धर्माचा विचार केला पाहिजे. शिवाय संभोगविषयक जुना आचार–धर्मही पूर्ण नैतिक होता असे नाही. स्त्रीपुरुषांना दोघांनाही 'काम' सारखाच असून (स्त्रियांत तो पुरुषांहूनही प्रबळ असून!) जुन्या नीतीने पुरुषांच्याच कामतृप्तीची सोय केली होती हा एक अन्याय (म्हणजेच ही एक अनीती), तर स्वतःची स्त्री असल्यास तिच्या अनुमतीखेरीज तिजशी केलेल्या समागमास जुना आचार–धर्म व्यभिचार समजत नसे, ही जुन्या नीतीतील दुसरी अनीती होय. अशाप्रकारे काही बाबतीत नवी नीती ही जुन्या नीतीहून श्रेष्ठ आहे हे उघड असले तरी ती जे संभोगस्वातंत्र्य आपण मिळवून दिले असे म्हणते, त्या स्वातंत्र्याचा व तज्जन्य इतर मानसिक लाभांचा थोडा अधिक खोल विचार होणे जरूर आहे.

अनुक्रमणिका

विवाह आणि वैवाहिक नीती यांचे अडथळे दूर होताच संभोगस्वातंत्र्य मिळेल म्हणजे काय? आणि त्या स्वातंत्र्यामुळे मानसिक शक्ती मुक्त होतील म्हणजे काय, हे पाहिले पाहिजे. पण स्वतंत्र, सुखद आणि आरोग्यप्रद संभोग कोणता हे ठरविण्यास संभोग म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. कित्येक आधुनिकांचीही अशी समजूत दिसते की, संभोग म्हणजे एक शारीरिक आवेग होय व त्या आवेगाला वाट करून देताच आपण इतर कर्तव्यांस मोकळे होतो; उलट त्या आवेगास वाट करून न दिल्यास तो आपल्या इतर कार्यांत आडवा येऊन चारी पुरुषार्थांचा चुथडा करतो. ही आवेग–कल्पना सिद्ध करण्यास ते इतर शारीरिक आवेगांची अथवा urges ची उदाहरणे देतात. खोकला आल्यावर खोकणे, मलमूत्रादींच्या विसर्जनाचा आवेग जाणवताच त्यांचे विसर्जन करून शरीरास स्वस्थता प्राप्त करून देणे, यासारखीच लैंगिक आवेगाचीही ते उपपत्ती बसवितात. ही आवेग–कल्पना मान्य केल्यास कामवासनेची तृप्ती ही आरोग्यदायक व त्या वासनेची अतृप्ती ही आरोग्यविघातक, हे क्रमानेच मान्य करावे लागते.

सदरहू सादृश्य–कल्पना ही शास्त्रीय क्षेत्रातील अनेक सादृश्य–कल्पनांप्रमाणेच काही मर्यादेपर्यंन्त सत्य आहे. परंतु त्या मर्यादेपलीकडे कामवासना म्हणजे केवळ उत्सर्गेच्छा नसते असे दिसून येईल. या दोहोतील साम्यभेदाच्या तपशिलात अधिक न शिरता स्थूल मानाने असे म्हणता येईल की, कामेच्छेत जेथपासून आणि जेवढ्या प्रमाणात अन्यव्यक्तीची अपेक्षा प्रवेश करते तेथून व तेवढ्या प्रमाणात कामेच्छेचे केवळ आवेगतृप्तीचे स्वरुप बदलून ते संमिश्र व सूक्ष्म बनते. या संमिश्र स्वरूपाच्या दृष्टीने पाहता कामवासना दुसऱ्या व्यक्तीच्या आकर्षणात उगम पावते व त्या वासनेची तृप्ती दुसऱ्या व्यक्तीच्या प्रत्याकर्षाणावर, अनुकूलतेवर व उत्सुकतेवर अवलंबून राहते, म्हणजे या विशिष्ट वासनातृप्तीस परस्पराकर्षणाची व सहकार्याची अत्यंत आवश्यकता असते. स्त्रीपुरुष समागमातील हे सहकार्य इतर व्यावहारिक सहकार्याप्रमाणे नफ्यातोट्याच्या कल्पनेने, आगाऊ केलेल्या कराराच्या जाणिवेने किंवा धार्मिक कर्तव्यकल्पनेने देखील शक्य होत नाही. या दृष्टीने पाहता पितरांना पिंड मिळावे म्हणून समागम करणारे जुने स्त्रीपुरुष हे निसर्गापासून जितके दूर होते तितकेच माझ्या शास्त्रीय संशोधनात व सामाजिक कर्तव्यांत या लैंगिक ब्यादीमुळे व्यत्यय येतो म्हणून समागम उरकू पाहणारे आधुनिक 'शास्त्रीय' ऋषीही दूर होत! समागमातील सहकार्य समान कामत्वामुळे व परस्पराकर्षणामुळे उत्पन्न होते; तसेच ते क्रीडाप्रवृत्तीमुळेच काय ते वाढविता येते. समागमात सौंदर्यदृष्टी व क्रीडाप्रवृत्ती यांस महत्त्वाचे स्थान आहे. या दोन वृत्तीतून उत्पन्न होणारे आकर्षण केवळ विशिष्ट समागम-प्रसंग सुखद व यशस्वी करून लुप्त होत नाही. अशा आकर्षणास मनःकोषात फार महत्त्वाचे स्थान असल्याने ते दीर्घकाल टिकते, व आकर्षणविषय झालेल्या व्यक्तीच्याच समागमाची अपेक्षा करते. त्या व्यक्तीची मैत्री इतर क्षेत्रांतही इच्छिते; त्या व्यक्तीच्या सुखाची तरतूद करू लागते व त्या व्यक्तीच्या सुखात सुख मानू लागते.

अशाप्रकारे प्रिय व आपलीशी वाटू लागलेली व्यक्ती आपणास अंतरू नये, अशी प्रबल इच्छा उत्पन्न होते. त्या व्यक्तीने मनाची व शरीराची जी अंगे आपणापुढे व्यक्त केली ती इतरांपुढे व्यक्त होऊ नयेत, इतर कोणीही त्या गुप्तदानाचा अधिकारी नाही असेही हे विशिष्ट गूढ व प्रबल आकर्षणच वाटावयास लावते. ज्यात दोन व्यक्तींची संमती असली म्हणजे बस असे आधुनिक म्हणतात, आणि ज्यात कुलधर्माखेरीज इतर भावनांस महत्त्व नाही असे प्राचीन म्हणत, तो हा स्त्री-पुरुषसंबंध असा खोल आणि तर्कविरोधी असतो. दोन माणसांखेरीज तिसऱ्याचा संबंध त्यात इतर कोणी आणला नसून ती दोन माणसेच आणतात! प्रिय व्यक्ती दुरावण्याच्या भीतीच्या रूपाने तिसऱ्या माणसाची छाया प्रियेच्या आणि प्रियकराच्या मानसमूर्तीमागेच उभी असते. परस्परानुक्त स्त्री-पुरुषावर बाहेरून कोणी बंधने लादीत नसून ते स्वतःच ती लादून घेतात. स्त्री-पुरूषविषयक नीतीचा उगम धार्मिक किंवा आर्थिक बंधनात नसून परस्परांच्या प्रेमबंधनात आहे. स्त्रीसमागम

हा क्षणाचा खेळ असला तरी त्यातून उद्‌भवणारी बंधने आणि अपेक्षा दीर्घतर असतात; व त्यामुळेच जुनी नीती झुगारूनही स्त्रीपुरुषसंबंध, कित्येक आधुनिक समजतात तितका सुटसुटीत आणि सोयीस्कर होऊ शकत नाही.

सर्वच आधुनिक, सर्वच नवनीतिवादी लोक, स्त्री-पुरुषसंबंध म्हणजे क्षणिक क्षुधासंबंध असे समजत नाहीत. त्यातील कित्येक प्रेमभावनेचा दूरगामी प्रभाव मान्यही करतात आणि तरीही संभोग ही फक्त दोघांची बाब आहे, त्यात तिसऱ्याचा संबंध नाही व अर्थात नीतीचा संबंध नाही असे प्रतिपादितात हे आश्चर्य होय. अर्थात् जुन्या लैंगिक नीतीचे अजिबात उच्चाटन झाले तरी प्रस्तुत लेखकास खेद होणार नाही. कारण ती नीती व्यक्तीच्या विकासाची पर्वा न करता काही तत्कालीन सामाजिक सोयीच्या दृष्टीने सांगितली गेलेली दिसते. तथापि संभोग ही दोघांचीच बाब म्हणून तिला नीतिमुक्त करणारे लोक अनेक चुकीची आधुनिक मते प्रमाण मानतात, ही खेदाची गोष्ट होय. खरे पाहिल्यास तिचा प्रारंभ समाजसंबंधातून नव्हे, तर दोघांच्या संबंधातून, किंबहुना एकट्या व्यक्तीच्या भावनांतून होतो, हे आधुनिक बहुधा नाकारतात आणि म्हणूनच लैंगिक नीतीतील अनेक कल्पनांस ते समाजनिर्मित समजून झुगारून देण्याची आशा बाळगतात. एकनिष्ठेची कल्पना स्त्रीस मत्ता समजण्याच्या कल्पनेतून निघाली आहे, ही आधुनिकांची हाकाटी अशाच चुकीच्या समजाचे उदाहरण होय. पुरुषच फक्त स्त्रियांकडून एकनिष्ठेची अपेक्षा करीत असेल तर ही मालकीहक्काची कल्पना कदाचित सयुक्तिक ठरली असती; परंतु अंगावरील दागिन्यांवरही नावापुरताच हक्क सांगणारी हिंदुपत्नी देखील नवऱ्याकडून एकनिष्ठेची अपेक्षा करते. लैंगिक नीतीचा उगम मालकीच्या भावनेत किंवा वारसाहक्काच्या भानगडीत नसून परस्पराकर्षित व्यक्तींच्या एकमेकासंबंधीच्या अपेक्षांत आहे. परस्पराकर्षणात जी अभिमानाची व धन्यतेची भावना उद्‌भूत होते तिजमध्येच स्त्री-पुरुषासंबंधाच्या पावित्र्याची कल्पना जन्म पावते. ज्यांना एकनिष्ठेची भावना जुनाट उपाधी म्हणून झुगारावयाची असेल त्यांस परस्पराकर्षणही मूर्खपणा म्हणून त्याज्य ठरवावे लागेल. कारण आकर्षण म्हणजेच परस्परास बिनमोल समजून कवटाळणे व जतन करणे. जतन करणे म्हणजे विशिष्ट स्त्री देह किंवा पुरुष देह केवळ घरी बाळगणे नव्हे तर तिची स्वतःविषयी अनन्य भावना टिकविणे. म्हणून जेथे जेथे उत्कट आकर्षण असेल तेथे तेथे नीतीची बंधने व्यक्तीच उत्पन्न करील; धार्मिक रूढींची किंवा आर्थिक कायद्यांची वाट पहात बसणार नाही. स्त्री-पुरुषांची या प्रकारची मनोभूमिका लक्षात घेतल्यास संभोगमुख नीतिनिरपेक्ष आणि सुटसुटीत करण्याचा आधुनिकांचा प्रयत्न संभोगसुखाशीच विरोधी असल्याचे दिसून येईल. कारण संभोगसुख हे आकर्षणाच्या उत्कटत्वावर अवलंबून असते हे नीतिनिरपेक्ष शास्त्रांनाही मान्य करावे लागते.

लैंगिक नीती हे एक आर्थिक व धार्मिक रूढींनी लादलेली बाब आहे असा ग्रह झाल्यास अनेक सामाजिक घटनांची भलतीच उपपत्ती बसविण्याची चूक विद्वानही कशी करतात याचे उदाहरण पातिव्रत्यासंबंधीचे व वेश्याव्यवसायासंबंधीचे आधुनिकांचे लिखाण पाहिल्यास दिसून येईल. आधुनिक काळात लैंगिक विषयावर लिहिणाऱ्या कोणत्याही महाराष्ट्रीय लेखकाहून प्रो. र. धों. कर्वे हे अधिक बुद्धिमान, विद्वान, तर्कनिष्ठ, व निःस्पृह आहेत, हे कोणासही कबूल होईल. त्यांच्या समाजहितबुद्धीबद्दल तर कोणीच शंका घेणार नाही. सामाजिक प्रश्नांचा उपाधिरहित शुद्धबुद्धीने विचार करण्याचे बाबतीत तर महाराष्ट्रात त्यांची बरोबरी डॉ. केतकरांसारखा एखादाच करू शकेल. तथापि अशा पहिल्या प्रतीच्या शास्त्रज्ञाच्या लिहिण्यातही 'नीती ही चीज केवळ समाजनिर्मित होय' या कल्पनेमुळे अनेक ठिकाणी सदोष उपपत्ती सांगितल्या गेल्याचे आढळेल. 'स्त्रीच्या अगर पुरुषाच्या व्यभिचारात समाजाचे मुळीच नुकसान नाही आणि पतीचे वा पत्नीचे नुकसानही केवळ काल्पनिक होय' हे त्यांचे मत प्रसिद्धच आहे. समाजाचे नुकसान नाही ही गोष्ट एक वेळ मान्य करता येईल (आणि समाजाची अशा बाबतीतील नजर बहुधा नीतीच्या

आवडीपेक्षा अनीतीच्या आवडीमुळेच तीव्र बनलेली आढळेल!) पण पतीच्या व्यभिचाराने पत्नीचे, किंवा पत्नीच्या व्यभिचाराने पतीचे वास्तविक नुकसान नाही हे म्हणणे लैंगिक आकर्षणाच्या स्वरूपाशीच विसंगत आहे. प्रस्तुत लेखक तर यापुढे जाऊन असे म्हणेल की, पतीच्या व्यभिचारात पत्नीचे तर आहेच पण पतीचे स्वतःचेही नुकसान आहे. कारण अन्य व्यक्तीविषयी वाटणाऱ्या आकर्षणात अनन्य स्वामित्वाइतकीच अनन्यार्पणाचीही जाणीव असते. अन्यत्र वाटणाऱ्या क्षणिक आकर्षणाने पहिल्या दीर्घतर व प्रभावी आकर्षणाच्या सौंदर्याची हानी होत आहे. हे ज्याचे त्यासच जाणवल्याखेरीज रहात नाही.

अर्थातच ही सुंदर व सौंदर्यनिर्मित नीती म्हणजे रुक्ष समाजनिर्मित नीती नव्हे हेही तितकेच खरे. परस्परांच्या आकर्षणाने बांधून काढलेली नीतिबंधने म्हणजे कुत्सित आणि रिकामटेकड्या समाजाच्या भीतीमुळे राखलेली 'अब्रू' नव्हे.

प्रो. कर्वे यांची वेश्या-व्यवसासंबंधीची मतेही अशीच सदोष वाटतात. स्वतःच्या पापी वासनेकरिता वेश्यांना जन्मतःच वेगळ्या काढावयाच्या व पापेच्छेची तृप्ती करून बाहेर पडताच त्यांना पतित समजावयाचे ही जुन्या नीतीतील ढोंगी विसंगती कोणीही कबूलच करील. वेश्यागमन करणारा मनुष्य त्या कृत्यापुरता वेश्येहूनही पतित होत असतो असेच समजणे प्राप्त आहे. तथापि स्वतःच्या पतनशीलतेमुळे घाबरट बनलेला पुरुषसमाज आणि पतीच्या वा बंधूच्या स्खलनशीलतेमुळे भीतीग्रस्त झालेला स्त्रीसमाज आत्मरक्षणाखातर वेश्यावर्गास बहिकृत न समजेल तर तिकडूनही पंचाईतच होईल! पण समाजाच्या कल्पनेपलीकडे या व्यवसायात वाईट असे काहीच नाही; शिक्षक, वकील, डॉक्टर, लग्न करून पोटाचा प्रश्न सोडविणारी गर्ती बायको 'या सर्वांप्रमाणेच वेश्याही प्रामाणिकपणेच पोटाचा धंदा करते' असे प्रो. कर्वे मानतात ते आम्हास पटत नाही. इतर 'प्रतिष्ठित' लोक मानतात त्या अर्थाने नसेल, पण वेश्या आपल्या व्यवसायामुळे पतित होतच नाहीत हे प्रो. कर्वे यांचे मत लैंगिक नीतीच्या सुटसुटीत पण अनैसर्गिक कल्पनांतूनच उगम पावले आहे शंका नाही.

वेश्याव्यवसाय नीतीचे उल्लंघन होत नाही असे म्हणताना प्रो. कर्वे यांच्या विचारसरणीच्या लोकांचे म्हणणे असे असते की, वेश्या आणि तिचे गिऱ्हाईक हे आपल्या समागमामुळे समाजाचे काहीच नुकसान करीत नाहीत. आणि ज्यात दुसऱ्याचे नफा-नुकसान नाही अशा कृत्यात नीतीचा प्रश्न उद्भवत नाही; कारण नीती ही सामाजिक होय. व्यक्तीने आपला कितीही अधःपात केला तरी त्यात अनैतिक काही नाही! नीती, अनीती केवळ समाजाशीच संबद्ध आहे, या आधुनिक कल्पनेमुळे केवढे अपसिद्धान्त पचवावे लागतात हे यावरून दिसेल! आकर्षणमूलक संभोग हा जर अधिक सुखप्रद असेल तर तो वेश्यांनाही हवासा वाटेल हे प्रो. कर्वे यांस तरी खासच मान्य होईल. (कारण ते, जुन्या धार्मिकाप्रमाणे, वेश्या म्हणजे जन्मतःच पतित असे समजणार नाहीत!) तसेच पोटाकरिता संभोग पत्करावा लागणे हे नैसर्गिक मनोविकाराशी सुसंगत नाही हेही त्यास मान्य होण्यास हरकत नाही. अशा स्थितीत पोटाकरिता संभोग विक्रय करण्यात अनैतिक काहीच नाही असे त्यांस वाटण्याचे कारण, नीतीचा निकष व्यक्तिविकासात न पाहता ते सामाजिक उपयुक्ततेत पाहतात हे होय. बहुतेक वेश्या आपला व्यवसाय उत्साहाने चालविताना दिसतात यावरून त्यांना संभोग संबंधातील उच्च-नीच भावाची जाणीवच नसते असे प्रो. कर्वे यांसारखे सूक्ष्म दृष्टीचे विद्वान तरी खास म्हणणार नाहीत. बहुतेक स्त्रिया वडील माणसांनी आणून दिलेल्या नवऱ्याबरोबर गुण्यागोविंदाने राहतात यावरून रूढ विवाह हाच प्रेमविवाह असे म्हणणाऱ्या खांडेकरांचे इतका वैचारिक गबाळपणा कोणीही आधुनिक विद्वान दाखविणार नाही अशी आम्हास आशा आहे! सिनेमात काम करणारी एक वेश्या शूटिंगपूर्वी संपूर्ण वेशभूषा करून स्वतःच्या रूपावर मोहित होऊन आरशात पहात असता तिच्या सुविद्य व

रसिक डायरेक्टरने तिला प्रश्न केला, 'आज तुझे रूप पाहून तुझ्या मनात कोणता विचार आला?' वेश्येने उत्तर केले 'साहेब! खरं सांगू? माझे अगदी पहिले शेट जे "" ते आज मला पाहायला हवे होते, असं आता माझ्या मनात येऊन गेलं!'

सदर कथा काल्पनिक नाही की इंग्लंड-अमेरिकेतीलही नाही. अशिक्षित गोवेकरणीसंबंधी एका सिनेमा डायरेक्टरने प्रस्तुत लेखकास सांगितलेली ही हकीकत आहे. सदर वेश्या इतर सामान्य वेश्यांप्रमाणेच जीवन व्यतीत करीत होती; म्हणजे पैशाकरिता तिने अनेकांस शरीरार्पण केलेले होते. तथापि, तिलाही उच्च आकर्षण आणि हीन संभोगविक्रय यातील तफावत अंतर्मनात अवगत होती. कदाचित ज्या पहिल्या सहचराची स्मृती तिला आज अनेक वर्षांनंतर व अनेक पुरुषांनंतर झाली होती त्यास तिने पैशाच्या आशेमुळे आपण होऊनही सोडले असेल! तथापि खऱ्या आकर्षणाचे सुख पैशा-आडक्याच्या सुखाहून खोल असते, हेच या असंस्कृत वेश्येच्या सहजोद्‌गारावरून दिसून येते. ज्या संभोगसंबंधाची मुळे मनःकोषात इतकी खोल रुजलेली असतात त्याचा उच्च-नीच भाव ठरविताना 'दुसऱ्याचे नुकसान झाले नाही म्हणजे झाले' ही निकृष्ट व निषेधप्रधान (निगेटिव्ह) कसोटी लावणे म्हणजे नीतिकल्पनांचे रहस्यच गमावणे होय.

सारांश, संभोगसंबंध नीतिनिरपेक्ष, निर्विघ्न आणि अनिर्बंध करणे हा समाजात संभोगसुख वाढविण्याचा मार्ग नव्हे. कोणाही दोन स्त्रीपुरुषातील संबंध खुषीचा आहे तोवर समाजाने सम्मत ठरविला की संभोगमूलक अस्वास्थ्य पार नाहीसे होईल ही कल्पना चुकीची आहे. वांच्छित संभोग लब्ध न झाल्यास वाटणारा असंतोष, वांच्छित व्यक्ती दुसऱ्यावर प्रेम करू लागल्यास (व दुसऱ्यास प्रिय झाल्यासही) वाटणारा असंतोष, वांछित संभोग लब्ध झाल्यावरही इतर सांस्कृतिक वैधर्म्यामुळे होणारे मानसिक त्रास व तोटे या सर्व अडचणींचा विचार संभोग सुलभ व सुटसुटीत करू पाहणारांनी करावयास हवा. कामवासनेतून उद्‌भवणारी ही सुखदुःखे इतकी परिचित आहेत की त्यांची परिगणना व स्पष्टीकरण करीत बसण्याचे कारणच नाही. तथापि संभोग सुलभ करताच मनोविकृतीचा निरास होऊन मानसिक आरोग्याचा त्वरित लाभ होईल या आधुनिक भ्रमामुळेच ही साधी गोष्ट समजून देण्याची पाळी आली आहे. ज्या समाजात रूढ अर्थाने वैवाहिक नीती अजिबात अस्तित्वात नाही त्या समाजातही वांछित व्यक्ती प्राप्त न झाल्यास कामी मनावर घडणारे अनिष्ट परिणाम घडतच राहणार. प्रिय व्यक्तीची प्राप्ती होऊन पुनः तिचा वियोग (मृत्यूमुळे अगर हृदयसंक्रमणामुळे) झाल्यास होणारा अनिष्ट मानसिक परिणामही अटळच राहणार.

खंडित कामातील या आपत्तीशिवाय यशस्वी कामातही आपत्ती आहेतच. उच्च संस्कृतींच्या व आकांक्षांच्या व्यक्तीचा काम कुसंस्कारयुक्त व्यक्तीचे बाबतीत उदित झाल्यास शारीरिक तृप्तीबरोबर मानसिक असंतोष व जुगुप्सा पदरी येतील. सुस्वरुप, सुसंस्कृत व सुशील व्यक्तीच्या साहचर्याची व संभोगाची प्राप्ती झालेल्या व्यक्तीसही कुसंस्कृत पण सुस्वरूप (कदाचित कुसंस्कृत व कुरूपही) व्यक्तीबद्दल क्षणिक काम उत्पन्न होणे अशक्य नाही. अशा कामतृप्तीत, पहिल्या सहचराचे काहीच नुकसान नाही या नवनीतितत्त्वाप्रमाणे पाहता, नैतिक अडचण कोणतीच उरत नाही. पण उच्च मानसिक आकांक्षा व हीन मानसिक ओढ यामुळे उत्पन्न होणारा मानसिक झगडा (कॉन्फ्लिक्ट) नवनीती पाळून देखील पत्करावा लागेलच. कुलीन स्त्रीच्या सहवासास सरावलेल्या पुरुषाने कामस्वातंत्र्याखातर वेश्या गमन केले तर कामवासना अतृप्त ठेवण्याने होणारा मानसिक त्रास टळेल; पण वेश्येचे असंस्कृत मन, ग्राम्यशृंगार, हेंगाडी भाषा, विकृत आवाज, धूम्रपानादिकाच्या योगे उत्पन्न होणारा मुख-दुर्गंध वगैरेची तुलना कुलीन स्त्रीच्या सहवासातील सोज्वळ वातावरणाशी मनातल्या मनात होत राहील; आणि शारीरिक शान्तीबरोबरच

एक मानसिक अशान्ती उत्पन्न झाल्याखेरीज रहाणार नाही. प्रो. र. धों. कर्वे यांनी किर्लोस्कर मासिकात सांगितलेले जीवनविषयक तत्त्वज्ञान कामजीवनासही लागू करावयाचे म्हटल्यास, अशा ठिकाणी कामस्वातंत्र्याचे मिळालेले अधिकार परत करून संयमाचे जुनेपुराणे सुखच कवटाळावे लागणार नाही काय? ज्या योगे आपल्या मताबद्दल आपलेच मत वाईट होईल असे कोणतेही कृत्य करू नये हे प्रो. कर्वे यांनी आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हणून सांगितले आहे. कर्वे यांचे हे तत्त्वज्ञान उपयुक्ततावादी आणि उथळ नवनीतीहून किती खोल व उच्च आहे. याची त्यांची त्यांना तरी कल्पना आहे की नाही याची शंका आहे. कर्वे म्हणतात तशा प्रकारचे उच्चतर व अविनाशी मनःस्वास्थ हेच सर्व धर्मांचे व ध्येयवादांचे साध्य आहे. पण अशा मनःस्वास्थ्याचा संबंध कामस्वातंत्र्याहून संयमाशी अधिक आहे हे प्रो. कर्वे यांस दिसू नये याचे सखेदाश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

कामस्वातंत्र्यामुळे प्राप्त होणाऱ्या मानसिक लाभासंबंधी कित्येक सच्छिल आधुनिकांत शोचनीय भ्रम आढळून येतात. ते सर्वच प्रो. कर्वे यांजसारख्या कट्टया वास्तववाद्यांचेही ठायी वास करीत असतील असे म्हणवत नाही. तरी इतर संभोग स्वातंत्र्यवाद्यांनी संभोगसुखाच्या मानसिक बाजूकडे पुरेसे लक्ष दिले आहे असे वाटत नाही. उलट, क्षणिक आकर्षणापासून तो उत्कट प्रेमापर्यंत सर्वच शुद्ध शारीरिक विकार आहेत व शारीरिक तृप्तीपलीकडे या विकारांच्या मागण्या असण्याचे कारण नाही. असे म्हणणे म्हणजे आधुनिकपणा होय अशी कित्येक स्वतःस पुरोगामी म्हणविणाऱ्या लेखकांची समजूत आहे. प्रेमाचे आणि रूढ नीतीचे स्तोम न माजविल्यास समाजात संभोग सुखाचा सुकाळ होऊन मानसिक विकृतींचा लय होईल असे हे लेखक प्रतिपादित सुटले आहेत. नवनीती ही वास्तविक नैतिक वास्तववादाकरिता सज्ज असावयास हवी, पण तीच अनेक नूतन भ्रम (इल्यूझनस्) निर्माण करून रोमॅन्टिसिझमला आणि धार्मिक भाबडेपणालाही मागे टाकीत आहे.

काही सत्प्रवृत्त व बुद्धिवादी आधुनिकांत दिसून येणारा एक करुणास्पद भ्रम या बाबतीत वाढत्या ‘अवास्तववादाचे’ उदाहरण म्हणून चिंतनीय आहे. पाहिलेल्या कित्येक उदाहरणांवरून बनविलेला असा एक काल्पनिक नमुना मी येथे देतो.

‘क्ष’ हे एक इतर सामान्य स्थितीतील पदवीधरांच्याच पद्धतीने, साधारण सुशिक्षित व मध्यम रूपाच्या स्त्रीशी विवाह झालेले गृहस्थ आहेत. ते बौद्धिक व्यवसाय करणारे व विद्याव्यासंगी आहेत. शास्त्रीय संशोधन व शास्त्रीय लेखन यातही त्यांनी बरेच काम केले आहे व अधिक काम करण्याची त्यांस उमेद आहे. त्यांचे व त्यांच्या बायकोचे वाकडे नाही (यालाच वाटले तर कित्येक सुशिक्षित म्हणतात त्याप्रमाणे सुखी विवाह म्हटल्यासही माझी हरकत नाही! पण वस्तुस्थिती या हकिकतीवरून लक्षात येईलच!) तथापि त्यांच्या आकांक्षात व भावनात भागीदार होण्याचेही तिला साधलेले नाही. सदर गृहस्थ अत्यंत सरळ आहेत. महत्त्वाकांक्षा धरण्याइतपत गुण त्यांचे अंगी असूनही सरळ माणसाच्या वाट्यास येणारे अपयश त्यांच्या वाट्यास अनेकदा येते. उच्च ध्येयात येणारे अपयश व हीन माणसांशी येणारा व्यावहारिक संबंध यातून क्षणभर विसर म्हणून विवाहबाह्य संबंधाचा इलाज यशस्वी होईल अशी आशा ते अनेकदा व्यक्त करतात. त्यांच्या स्थितीतील इतर सद्‌गृहस्थांप्रमाणे त्यांचाही अनेक स्त्रियांशी परिचय आहे व संबंध येतो. तरी त्या सबंधाचा ते अशा प्रकारचा उपयोग करून घेताना मात्र कधीच दिसत नाहीत. तोंडाने मात्र ते परस्त्रीसंबंध किंवा वेश्यागमनच काय ते आपणास मनःस्वास्थ्य देऊ शकेल असे म्हणताना दिसतात. त्यांच्या मनःस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करणाऱ्या सुज्ञ मित्रास ज्या व्यसनात दुसऱ्या व्यक्तीच्या सहकार्याची आवश्यकता नाही अशा एखाद्या व्यसनात हे गृहस्थ पडतील अशी दृढ शंका येते.

अनुक्रमणिका

सदरहू गृहस्थाच्या मनाचे सूक्ष्म पृथक्करण केल्यास असे दिसून येईल की, संभोग म्हणजे ते दुःख आणि अन्याय यांच्या विस्मृतीचे एक साधन असे समजतात. असे म्हणतात की स्वामी विवेकानंद यांचे वडील एखाद्या दारूबाजास दारूला पैसे देणे हा देखील एक दयाधर्मच समजत; कारण जोवर आपण त्याचे दारूचे व्यसन घालविण्याकरिता उपाय योजला नाही किंवा ते घालविण्यात यश मिळविले नाही तोवर दुःख निवृत्ती एवढेच आपले काम, असे ते म्हणत. मीही वरील विद्वान गृहस्थाबद्दलच्या सहानुभूतीखातर इतर गोष्टींकडे क्षणभर डोळेझाक करून त्यास स्वैरसंभोगाच्या दारूचा आस्वाद घेण्यास परवानगी दिली असती; पण संभोग ही गोष्ट सदर गृहस्थ किंवा त्यांचे अनेक आधुनिक युग-बांधव समजतात तितकी यांत्रिक नाही. संभोगसुखाचा उपयोग (डिसिपेशन) केवळ विस्मृतिखातर अंगिकारलेले विषयसेवन म्हणून करता येणार नाही. एकाद्या व्यक्तीच्या संभोगाची इच्छा करणे म्हणजे त्या वेळेपुरते तरी त्या व्यक्तीला प्रिय समजणे होय. दारू, चहा यासारखा उत्तेजक पदार्थ अगर खुर्ची, सायकल यासारखी वापरण्याची वस्तू प्रिय होणे आणि एखादी मानवी व्यक्ती प्रिय होणे यात अंतर आहे. स्त्री किंवा पुरुष प्रिय होणे म्हणजे कामनीय शरीराबरोबरच त्या शरीरातील मनालाही स्वीकारणे होय. कामाच्या ओढीमुळे मनुष्याने हीन मनाशी संबंध जोडल्यास एक तर तो संबंध अधिकाधिक दृढ होऊन मनुष्य स्वतःच त्या हीन अवस्थेतेप्रत पोहोचेल. नाही तर संभोगातील सहचराच्या वा सहचरीच्या मनाविषयी तिरस्कार असूनही शरीरेच्छा तृप्त केल्यास तृप्तीनंतर त्या संभोगाबद्दल व स्वतःबद्दलही तिरस्कार मनात आल्यावाचून राहणार नाही. प्रो. कर्वे यांनी किर्लोस्कर मासिकात सांगितलेल्या जीवनतत्त्वज्ञानाप्रमाणे पाहताही, ज्या संभोगामुळे स्वतःविषयी तिरस्कार उत्पन्न होणार नाही असा संबंध म्हणजे प्रेमयुक्त संबंधच काय तो होऊ शकेल. जेव्हा कित्येक नवनीतिवादी लेखक संभोग वैचित्र्याच्या योजना मांडतात तेव्हा ते नकळत सुसंस्कृत मनाला असंस्कृत अथवा (coarse) करण्याच्या योजना सांगत असतात. कित्येक सुसंस्कृत माणसेही अशा योजना सांगतात याचे कारण, ते जे सांगत आहेत त्याचे परिणाम पाहण्यास त्याचेजवळ अनुभवाचे, आत्मनिरीक्षणाचे किंवा कल्पनाशक्तीचे साधन नसते हेच असावे. सारांश, जीवनातील इतर अडचणीतून क्षणभर सुटका म्हणून संभोगाकडे वळण्याने संभोगाला एक भयावह स्वरूप येईल व त्याचे पर्यवसान मानसिक अधःपातात झाल्यावाचून रहाणार नाही. संभोगविषयक अडचणीतून (वैवाहिक निराशा, वैषयिक अतृप्ती इ.) सुटका म्हणून स्वैरसंभोगाकडे वळले तरीही खरोखरी प्रिय नसलेला सहवास केवळ शारीरिक आवेगामुळे कवटाळावा लागल्याने होणारी मानसिक कुचंबणा व तोच सहवास सवयीने स्वीकार्य वाटू लागल्यास होणारा मानसिक अधःपात पत्करावा लागेल.

जुन्या धार्मिकांनी आणि नव्या स्वातंत्र्यवाद्यांनी दोघांनीही कामव्यवस्थेकरिता शोधून काढलेले मार्ग यशस्वी होणारे नसल्याने त्यामुळे समाजस्वास्थ्याहून अस्वास्थ्याचाच संभव अधिक आहे. वंशवृद्धीच्या, पिंडप्रदानाच्या तरतुदीसाठी विवाहदत्त स्त्रीशी गमन करणे काय, की क्षणिक काम भागविण्याकरिता हव्या त्या स्त्रीशी संभोग करणे काय दोन्हीही अंतिम मनःस्वास्थ्यास सारखीच निरुपयोगी होत. काम—वासनेच्या परस्परविरोधी (सेल्फ कॉनफ्लिक्टिंग) आणि दुराराध्य मागण्या आटोक्यात आणण्याचा व तृप्त करण्याचा मार्ग एकच व तो म्हणजे प्रेमयुक्त संभोग. प्रेमामुळे कामाची शांतीही होते व उन्नतीही होते. किंबहुना काम ही अशी वासना आहे की, जी उन्नत केल्याखेरीज खरी तृप्तच होऊ शकत नाही. 'कामाची' तृप्ती कामाच्याच भूमिकेवर करण्याचा प्रयत्न म्हणजे फुटका रांजण भरण्याचा, अथवा तेलाने आग विझविण्याचा प्रयत्न होय, उलट कामाचे प्रेमात रूपांतर झाल्यास कामाची शांती होईल एवढेच नव्हे तर व्यक्तीच्या उर्वरित जीवनक्रमाची उन्नती होईल.

अनुक्रमणिका

कामवासनेची यांत्रिक व्यवस्था लावून देण्याचे प्राचीन ऋषींचे वा आधुनिक शास्त्रज्ञांचे यत्न म्हणजे एका प्राणभूत प्रवृत्तीस सुसंस्कृत न करताच बाकीच्या प्रवृत्ती उच्चतर बनविण्याची धडपड होय. ज्यास प्रेमाची कला साध्य झालेली नाही त्याचे अखिल जीवनच अनेक दृष्टींनी निरस, अनैसर्गिक व खंडित होणार. उलट ज्यास प्रेमाची कला साध्य आहे त्याचा काम खंडित झाला तरीही बाकीचे जीवन खंडित न होता सफलितच होते.

धार्मिकतेमुळे असो की अधार्मिकतेमुळे असो, मनुष्य जेव्हा जेव्हा संभोग हा एक यांत्रिक उत्सर्गविधी बनवून सुख मिळविण्याचा यत्न करतो तेव्हा तेव्हा तो अपेशी होतो, इतकेच नव्हे तर अधोगत होतो. कामवासनेसंबंधीच्या यांत्रिक दृष्टिकोनामुळे जुने धार्मिक खऱ्या नीतीपर्यंत पोहोचू शकत नाहीत आणि नवे अधार्मिक खऱ्या सुखापर्यंत पोहोचू शकत नाहीत.

सुख आणि नीती यांत मूलतः विरोध नाही, कारण त्यांची एकमेकांस आवश्यकता आहे. सुख आणि नीती या दोहोंचाही उन्नतिसाधन म्हणून उपयोग करून घेणे शक्य आहे. ती एक कला आहे. किंबहुना जीवनाची कला ती हीच. पण ती जुन्या किंवा नव्या तर्कटी पंथास मात्र साध्य होणारी नाही; निसर्गाचे नियम नव्हेत तर निसर्गाचे काव्य पाहणाऱ्यासच ती कला साधेल!

यशवंत,
नोव्हेंबर १९४२, पृ. ४४ ते ५२˙

---

### संदर्भ

प्रस्तुत लेखामध्ये प्रा. र. धों. कर्वे यांच्या 'किर्लोस्कर' मधील लेखाचा उल्लेख केला आहे. परंतु १९४२ सालातील अंक उपलब्ध न झाल्याने ती नोंद देता आली नाही. शं. ग. दाते, काळे व बर्वे संपादित 'मराठी नियतकालिकांची सूची' या ग्रंथात र. धों. कर्वे यांच्या नावाखाली 'किर्लोस्कर' मधील लेखाची नोंद आहे. पण तो लेख या विषयावरचा वाटत नाही १९४२ मधील अंक उपलब्ध न झाल्याने नोंद पडताळून पाहता आली नाही.

१ कर्वे, र. धों.

वेश्या समाजाचे भूषण की दूषण? नवयुग दिवाळी १९४० पृ. २१-२२

अनुक्रमणिका

## २
## अनैतिकता, ग्राम्यता आणि सरकार

**आ**धुनिक शासनसंस्था सार्वजनिक नीतिमत्तेच्या रक्षणातही लक्ष घालते. वाङ्मय, रंगभूमी, चित्रपट वगैरेतील दृश्यासंबंधीचे कायदे, हे अशा 'सरकारी' नीतिरक्षणाचेच द्योतक होत. नग्नतेसंबंधीचे व वेश्याव्यवसायासंबंधीचे कायदे, हेही याच प्रकारचे कायदे होत. तथापि नीतिरक्षण व नीतिशिक्षण ही कार्ये, शासनसंस्थेची प्रमुख कार्ये होत, असे सामान्यतः कुणी म्हणू धजणार नाही. ही कार्ये धर्मोपदेशक, शिक्षक व लेखक यांचीच अधिक आहेत, हे उघड आहे. तथापि वाङ्मय, रंगभूमी व सार्वजनिक आचार यांच्या क्षेत्रात कायद्याने पाऊल टाकूच नये असे म्हणणाऱ्यापैकी मी नाही. "वस्त्र नेसण्याची रूढी पाळणे अगर नग्न फिरणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे". "अश्लीलता वाङ्मयात अगर चित्रपटात नसून, वाचकाच्या आणि प्रेक्षकाच्या मनात असते", वगैरे आत्यंतिक व्यक्तिस्वातंत्र्यवादी मतेही मला मान्य नाहीत. मला जर कोणती गोष्ट आज विशेष जाणवत असेल, तर ती म्हणजे अनैतिकता आणि ग्राम्यता या दोन विकृतीत, केला जाणारा गोंधळ ही होय.

आधुनिक शासनसंस्थेचे कर्तव्यक्षेत्र 'नीतिरक्षणा'पर्यंत पोहचते की, 'ग्राम्यता-निवारणा'पर्यंत पोहोचते, हा माझ्या मते अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण या बाबतीत आजचे सरकार व आजचे पुढारी यांच्याही विचारात मला गोंधळ दिसून येत आहे.

आजचे सरकार आपल्या रयतेला, संस्कृत महाकाव्यातील अर्थाने खरीखुरी 'प्रजा' समजते की काय, अशी मला कधी कधी शंका येते. मुंबई सरकारचा एकपत्नीत्वाचा कायदा; दारूबंदीचा कायदा वगैरेकडे पाहता, ही शंका अधिकच दृढ होते. चित्रपट-परीक्षणाचे सरकारी कामही कित्येकदा याच भूमिकेवरूनं चालत असावेसे वाटते. पण अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या वार्तेवरून तर हा प्रश्न अधिकच मनात येतो. ती वार्ता म्हणजे दिल्ली येथे भरलेल्या 'नैतिक आरोग्य परिषदे' संबंधीची होय. या परिषदेत स्वतंत्र भारताचे अध्यक्ष श्रीयुत राजेंद्रप्रसाद व आरोग्यमंत्री नामदार श्री. अमृतकौर यांनी भाग घेतल्याचे प्रसिद्ध झाले आहे. डॉक्टर राजेंद्रप्रसाद व नामदार अमृतकौर यांच्या भाषणात वेश्याव्यवसाय, कामुक चित्रपट वगैरेंच्या परिणामासंबंधी विवेचन होते. हे दोघेही पुढारी आपल्या उच्च स्थानाला साजेशा तळमळीने व जबाबदारीनेच बोलले. आजच्या समाजात वाढू लागलेल्या नैतिक विकृतीसंबंधी त्यांना वाटणाऱ्या चिंतेत सर्वच जबाबदार समाजनिरीक्षक सहभागी होतील, यात शंका नाही. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आधुनिक समाजात स्त्रिया व पुरुष वाजवीपेक्षा अधिक एकत्र येतात, त्यातही नीतिमत्तेला धोका आहे असे सूचित केले, हे वाचून तर कित्येक 'पुरोगामी' मंडळींना कसेसेच झाले. तथापि डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या या मतातही सत्याचाच भाग अधिक आहे, असे मी तरी म्हणेन. पण या सर्व सार्वजनिक विकृतीसंबंधी, 'सरकार' या नात्याने आमचे परमपूज्य राष्ट्राध्यक्ष आणि नामदार आरोग्यमंत्री काय करू शकतील हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

आधुनिक समाजात काही विकृती अधिक वाढत आहेत, ही गोष्ट खरी. पण आजचा समाज लैंगिक स्वैराचाराच्या बाबतीत जुन्या समाजाहून अधिक बिघडलेला आहे की काय हा देखील एक प्रश्नच आहे. राजरोसपणे अंगवस्त्र (रखेली) वाळगणे ही जुन्या समाजात आढळणारी एक विख्यात विकृती होती आज ही विकृती फारच अल्प प्रमाणात दिसून येते. अल्पवयस्क पत्नीवर समागमाची सक्ती करणे, हा सामाजिक

रोगही प्रतिष्ठित समाजातून लुप्तप्राय झाला आहे. कालिदासादि उत्तरकालीन संस्कृत कवींच्या मानाने आधुनिक कवीही कमी कामुक आहेत, असेच म्हणावे लागेल. देवालये, राजदरबार व धार्मिक उत्सव यांमधील नर्तकींचे प्रस्थही आधुनिक नैतिक दृष्टिकोनामुळे पुष्कळच कमी आहे. मुंबई प्रांतासारखे पुढारलेले प्रांत आपल्या प्रजेला सक्तीने मद्यपानही सोडायला लावीत आहेत; इतकेच नव्हे तर सक्तीने एकपत्नीत्वही पाळायला लावीत आहेत! अशा स्थितीत वाढत्या अनीतीची भीती का वाटावी हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे.

आजच्या स्त्री-पुरुष संबंधात आणि नाट्यवाङ्मयादी कलांत. कामुकतेची वाढ झालेली नसूनही ती झाल्यासारखी वाटते, याचे खरे कारण आजच्या विलासात सामाजिक जबाबदारी आणि नागरवृत्ती यांचा लोप झालेला आहे. पूर्वीचेच सुखोपभोग आणि पूर्वीचेच कलाविलास आज अधिक डोळ्यावर येण्याला कारण त्यातील जबाबदारीचा आणि सभ्येतेचा लोप हेच होय. सोवळेपणाच्या स्तोमाखातर सुखोपभोगावर बहिष्कार घालणे आणि सुखोपभोगाला व्यक्तिस्वातंत्र्याचे नावाखाली ताळतंत्र न ठेवणे ही दोन परस्परविरुद्ध पण आत्यंतिक टोके होत. या दोन अतिरेकांच्या मधलाही एक मार्ग आहे. व तो म्हणजे सामाजिक जबाबदारी न विसरता सुखपभोग भोगणे. या मधल्या मार्गावर समाजाला ठेवणे हेच सांस्कृतिक नेत्यांचे काम आहे. फाजील सोवळे लोक आणि फाजील स्वातंत्र्यवादी लोक हे दोघेही या अर्थाने समाजाचे सांस्कृतिक नेते होण्यास नालायक असतात.

आरोग्याकरिता अगर अन्य भौतिक कारणाकरता नग्नतेची मोहीम काढणारे जितके अव्यवहारी आणि अतिरेकी, तितकेच कायद्याने झग्यांची अगर पदरांची लांबी-रुंदी ठरविणारे लोकही अव्यवहारीच होत. "वेश्यागमनात मनुष्य कोणाचे नुकसान करीत नसल्याने त्याला अनीतीचा दोष लागत नाही; (वेश्येला तर परोपकाराचे पुण्यच लागते!) असे प्रतिपादणारे लोक आणि कायद्याने वेश्यावर्ग नष्ट करता येईल, असे समजणारे लोक हे दोघेही सारखेच अतिरेकी होत.

वेश्यावर्ग ज्या काळात अस्तित्वात नव्हता असा काळच इतिहासात दाखविता येणार नाही असे म्हटले तरी चालेल. आजच्या युगातही वेश्या व्यवसाय वाढला आहे ही मुख्य सामाजिक विकृती नसून वेश्याव्यवसाय पूर्वीहून अधिक बकाली व बेजबाबदार झाला आहे ही नवीन सामाजिक विकृती हे. पूर्वी वेश्यांतील निदान काही वर्ग तरी ठराविक देवालयात नृत्य करणारा व त्याकरिता वतने भोगणारा होता. राजदरबारातही नृत्याच्या निमित्ताने नर्तकींना हक्काचे स्थान असे. अर्थात प्रत्येक नर्तकी दरबारात अगर देवालयात नृत्य करणारीच असे असे नाही; तसेच हे समाजमान्य वतन भोगणाऱ्या कलावंतिणी देखील एवढ्याच सामाजिक कामगिरीवर जगत असेही नाही. त्या वारयोषितांचेच जीवन कंठीत, तथापि राजाच्या आणि देवाच्या दरबारात वर्षातून एकदा हजेरी लावायची म्हटले, तरी या स्त्रियांना एक विशिष्ट दर्जा राखावा लागे. व ज्याना दरबारात प्रवेश नसे, त्याही त्यांच्या वर्गातल्या या दरबारी कलावंतिणींहून आपण कमी नाही हे दाखविण्याकरिता अब्रुदारपणे राहण्याचा यत्न करीत.

'अब्रुदारपणा' हा शब्द वेश्यांच्या संदर्भात मी वापरलेला पाहून कित्येक 'आधुनिकां'ना थोडे चमत्कारिक वाटेल. आधुनिकांपैकी काही, आपल्या 'तर्कटी' वृत्तीला अनुसरून शील आणि अब्रू यात फरकच करायला तयार नसतील! आणि तसा फरक कोणी केलाच तर शील शुद्ध नसतानाही अब्रू संभाळण्याचा यत्न करणे हा शुद्ध ढोंगीपणा आहे असेही ते म्हणतील! ढोंगीपणाचा तिटकारा हे आधुनिकांचे जसे एक वैशिष्ट्य आहे, तसेच ते त्यांचे वैगुण्यही आहे. लहान मुले आणि समाज यांना ताळ्यावर

ठेवण्याकरता कित्येक बाबतीत 'फसवणूक' करावीच लागते. ज्याला आपण संस्कृती म्हणून म्हणतो, तिजमध्ये फसवणुकीचा अगर दुहेरी वागणुकीचा भाग पुष्कळच असतो. फार काय, शरीराच्छादन हाही नग्नतेच्या मानाने एक ढोंगीपणाचाच प्रकार मानावा लागेल. पण या आवरणाचाही सामाजिक उपयोग आहे. प्रामाणिकपणाच्या तर्कटी प्रेमाखातर ही आवरणे झुगारून द्यायची म्हटल्यास, समाज सुधारण्याऐवजी 'नंगा' होण्याचाच संभव अधिक आहे.

देवालये आणि दरबार यांमधून नर्तकींचे उच्चाटन करणारांनी देवालये शुद्ध केली पण नर्तकींस अधिक बहिष्कृत आणि बेजबाबदार बनविल्या, त्यातच आजची बाजारी आणि बकाली शहरे ! की ज्यांतील न्याय मिळवून देणारा वर्ग (वकील), ज्यांतील आरोग्य मिळवून देणारा वर्ग (डॉक्टर), ज्यांतील ज्ञान मिळवून देणारा वर्ग (प्रोफेसर, लेखक, संपादक) हाही अधिकाधिक 'पण्यांगनासदृश' होत चालला आहे अशी ओरडू ऐकू येते! ज्या आधुनिक बकाली शहरात समाज-नेतेही सामाजिक दृष्ट्या बेजबाबदार आणि बाजारी होत आहेत, त्या समाजात कलावंतिणी आणि 'बाजारबसव्या' यांत फरक न राहिल्यास आश्चर्य नाही.

जुन्या संस्कृतीत वेश्यांना सामाजिक दर्जा देण्याचा ढोंगीपणा उर्फ दुटप्पीपणा होता असा आरोप करता आला, तरी त्या चालीत एक प्रामाणिकपणाही होता हे कबूल केले पाहिजे. देवालयातच काय पण देवकार्यात (पूजाअर्चेत) स्थान असणाऱ्या वारयोषितांनाही, 'तुम्ही कुलीन म्हणा' असा आग्रह त्यांचे उद्धारक धरीत नसत, की त्या स्वतःही धरीत नसत, व त्यामुळे, त्या थोड्या फार अब्रुदारपणे राहण्याची धडपड करीत असल्या तरी कुलीन स्त्रियांना त्यांच्यात मिसळण्याची लालूच अगर संधी नसे.

उलट आज, मात्र ज्या व्यवसायांत कुलीन स्त्रियांहून अकुलीन स्त्रियांचीच संख्या अधिक असणे स्वाभाविक आहे, अशा व्यवसायातील स्त्रियांना म्हणजे धंदेवाईक नर्तकी, नटी वगैरेंना, सर्रास कुलीन लेखण्याची किंबहुना वृत्तपत्रांतील स्तुतिलेख, फोटोग्राफ वगैरेच्या द्वारे कुलीन स्त्रियांच्याहीपुढे आदर्श म्हणून धरण्याची अहमहमिका दिसून येते! कुलीन स्त्रियांनी या भयावाह व्यवसायात अधिकाधिक शिरावे अशी शिफारसही करण्यात येते! नर्तकींना देवालयात नाचू देणे अधिक भयावह, की गृहिणीच्या पंक्तीला बसविणे भयावह, हा विचार जुन्या नीतीला विरोध करणाऱ्या आधुनिकांनीच करावयाचा आहे.

दिल्ली येथील 'नैतिक आरोग्य' परिषदेत राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांनी स्वचरित्रातील एक आठवण निवेदन केली. एकेकाळी त्यांच्या मनात काही वेश्यांचा पूर्वेतिहास त्यांच्याच तोंडून मिळवून तो प्रसिद्ध करण्याचे होते. असा इतिहास प्रसिद्ध केल्यास समाजाला या वर्गासंबंधी यथार्थ ज्ञान होईल व त्या वर्गाच्या उद्धारासंबंधी तळमळही लागेल, असे म्हणण्याचा राजेंद्रबाबूंचा रोख होता, खोटा संभावितपणा अगर संकोच आड येऊन न देता, वेश्यांची पूर्वचरित्रे समाजापुढे ठेवल्यास त्यांच्या संबंधीच्या उथळ तुच्छतेच्या भावना सोडाव्या लागतील, हे तर खरेच. भूतदयेमुळे जे काम हाती घेण्याचे राजेंद्रबाबूंच्या मनात आले, पण जे अखेर त्यांच्या उच्चकुलीनत्वामुळेच त्यांना हाती घेता आले नाही ते धाडसी साहस पाश्चात्य साहित्यिकांनी करून ठेवले आहे. प्रख्यात रशियन लेखक अलेक्झँडर क्यूप्रिन याने अखिल युरोपच्या राजधान्यांतील वेश्यागृहे धुंडाळून मिळवलेले अनुभव व निष्कर्ष वाचकांपुढे ठेवले आहेत. महात्मा गांधींना अगर राजेंद्रबाबूंना या दुर्दैवी वर्गाबद्दल जेवढी हळहळ वाटते तितकीच या रशियन लेखकालाही वाटते, व ती त्याने आपल्या करुण आणि काव्यमय अशा 'यामा' या कादंबरीच्याद्वारे जगजाहीरही केली आहे. पण त्या बरोबरच एक दारुण शोधही त्याने निर्भयपणे जाहीर केला आहे. "As long as marriage lasts,

prostitution will last" (जोपर्यंत विवाह संस्था आहे, तोपर्यंत वेश्यावर्ग राहणारच) हा अप्रिय निर्णय त्याला जाहीर करावा लागला! आणि हा त्याचा निर्णय खरा असेल तर वेश्यावर्गाचा विचार, केवळ भूतदयेच्या अगर सोवळेपणाच्या एकाक्ष चष्म्यातून न करता विचाररूपी सांस्कृतिक तडजोडीची दुसरी बाजू म्हणूनच करावा लागेल व अशा दृष्टीने विचार करताना, वेश्यावर्ग नष्ट कसा करायचा, हा प्रश्नच चुकीचा म्हणून सोडून द्यावा लागेल; व वेश्यावर्ग कमी बकाली व कमी बाजारी कसा करायचा, त्या पतित आणि अप्रिय वर्गालाही समाजस्थापत्त्यात स्थैर्यवर्धक स्थान कसे द्यायचे, हाच शास्त्रशुद्ध प्रश्न सोडविण्याकरिता घ्यावा लागेल.

जी गोष्ट वेश्यावर्गाची तीच नाटकचित्रपटादी कलांची. आज कलेच्या क्षेत्रातही ग्राम्यता बोकाळण्याचे कारण, कला दरबारात व देवालयात उभी नसून बाजारात उभी आहे हेच आहे. कलेच्या क्षेत्रातही अनैतिकतेपेक्षा ग्राम्यतेचाच धोका अधिक आहे, असे मी म्हणतो. तसे पाहिल्यास आपले चित्रपट, आपली नाटके व आपले नाच पाश्चात्यांच्या चित्रपटांपेक्षा, नाटकांपेक्षा व नाचांपेक्षा कितीतरी सोवळे असतात आपल्या चित्रपटांत चुंबनाला अद्यापही मज्जाव आहे. आपल्या आजवरच्या राजमान्य नृत्यात एका नर्तकीचा अंगावर जेवढी अघळपघळ वस्त्रे असत, तेवढी एखाद्या युरोपीयन 'डान्सिंग पार्टी' तील सर्व नर्तिकांची वस्त्रे एकत्र गोळा केली तरी भरणार नाहीत! (अलीकडे मात्र प्राचीन मूर्तिकलेतील व चित्रकलेतील पोषाखासारखा पोषाख करण्याचे निमित्त करून सुशिक्षित नर्तकी अंग अधिकाधिक उघडे ठेवू लागल्या आहेत!) नृत्याभिनयातही विरहाच्या आणि लज्जेच्या अभिनयालाच आपल्याकडे अधिक स्थान असे व याला कारण आपल्या कलेला धार्मिक उत्सवात आणि राजदरबारात स्थान असे हेच आहे.

याच्या उलट बकाली शहरातील हपीसातून व गिरण्यातून, आठवडाभर काम करून सुटलेल्या लेखणीवाल्या आणि ओझेवाल्या मजुरांना, एकाच अंधाऱ्या नाटकगृहात कोंडून लुटण्याकरता तयार केलेल्या आजच्या चित्रनाट्यातील सुरापासूनच ग्राम्यतेला सुरवात होते! त्यातच दररोज नवे कथानक, नवे सूर, नवे ताल ऐकविण्याचा अस्वाभाविक व पोरकट अट्टाहास! यामुळे उथळपणा, उत्तानपणा यांचे अतोनात फावते! नटनटी अगर नर्तकी, प्रतिष्ठित रसिकांच्या समोर साक्षात उभ्या असण्याने त्यांच्यावर प्रेक्षकांच्या अभिरुचीचा, प्रशंसेचा आणि सभ्यतेचा जो संस्कार होतो, तो आजच्या निर्जीव आणि छापील छायानाट्यावर कसा होणार! आजच्या कलावैभवाचे मापनयंत्र म्हणजे आठ आठ आणे फेकून गोळा झालेला गल्ला! आजच्या कलेचे अमरत्व म्हणजे ओळीने बावन्न आठवडे टिकणे, व त्रेपन्नाव्या आठवड्यात मरून जाणे! अनेक पिढ्यांना व अनेक शतकांना उद्देशून केलेल्या हृदयाविष्कारात नकळत जी उदात्तता येते, ती एका हंगामाकरता जन्मलेल्या, आणि जाहिरातींनी जगविलेल्या कलेत कशी येणार?

गरीब आणि अशिक्षित प्रेक्षकांमुळे आजची कला हीन होत आहे असे मला मुळीच म्हणायचे नाही. अज्ञ प्रेक्षकही जर एखाद्या कलाकृतीचा सुज्ञाच्या सान्निध्यात, राजदरबाराच्या अगर देवालयाच्या वातावरणात, अगर एखाद्या प्राचीन महोत्सवाच्या वातावरणात एकत्र रसास्वाद घेतील, तर अज्ञ देखील आजच्या बकाली थिएटरांहून अधिक उच्च वातावरण खास निर्माण करतील. सामान्य लोकांपुढे आल्याने कला हीन झालेली नाही, तर गल्ला गोळा करण्याच्या प्रवृत्तीने कला हीन झाली आहे. ती हीन झाली आहे असे जेव्हा मी म्हणतो. तेव्हा अधिक शृंगारप्रचुर झाली आहे असाही माझा अर्थ नाही, तिजमधील शृंगाररस असो, वीररस असो की करुणरस असो — सर्वच उथळ. सवंग आणि बाजारी झाले आहे!

समाजातील कलावंतिणीना व कलांना बाजारी स्वरूप येण्याचे जे कारण, तेच स्त्रीपुरुष मिश्रित सामाजिक समारंभांना हीन रूप येण्याचेही कारण आहे. स्त्रीपुरुष एकत्र येण्यात नैतिक हानी नाही, की ते आवर्जून विभक्त ठेवण्यात नीतिरक्षणाची हमी नाही. ज्या समाजात सक्त गोषाची चाल आहे, त्यात स्त्रीपुरुषांचे अनैतिक आकर्षण व संबंध कमी आहेत असे दिसत नाही. आधुनिक समाजातील स्त्रीपुरुषांच्या मिश्रणात अनीतीचा धोका आहे हे राजेंद्रबाबूंचे म्हणणे खोटे नाही. पण याला कारण आजचा मिश्रसमाज केवळ श्रीमंतीच्या आधारावर पाश्चात्यांचे अर्थशून्य अनुकरण करणारा आहे, हे आहे. स्त्रिया व पुरुष कोणत्या निमित्ताने एकत्र येतात, यावर त्यांच्या संमेलनाचे नैतिक परिणाम काय हे अवलंबून असणार.

वैषयिक सुखाच्या व कलास्वादाच्या क्षेत्रातील ग्राम्यत कमी करणे गांधीवादी राजकर्त्यांस इतराहून अधिक शक्य आहे. कारण जीवनातील पाशवीवृत्तींना उन्नत करून सौम्यतर आणि चारुतर बनविणे हे त्या समाजसेवामय आणि प्रेममय संप्रदायाला अधिक जवळचे आहे. परंतु कायद्यांनी आचारशुद्धता आणण्याचा मार्ग हा खरा गांधीमार्ग नव्हे. 'सेन्सॉर बोर्ड' नेमून नाट्यनृत्यादिकातील कामुकता काढून टाकणे हा मार्ग केवळ गौणच नव्हे तर विफलही आहे. शिवाय सेन्सॉर मंडळ हे केवळ स्थूल गर्ह्यतास्थूल वैषयिकताच काढून दाखवू शकेल. एखाद्या चित्रपटात नग्न शरीरदर्शन, अगर प्रत्यक्ष चुंबन असेल तर ते निषिद्ध ठरविणे सोपे आहे. पण या खेरीज इतर अनेक दृष्ये व अनेक तालसूरही हीन वृत्तींना पोषक आहेत. त्यांना सेन्सॉर बोर्ड बंद करू शकणार नाही; तर उच्च अभिरुचीचा श्रोतृसमाजच बंद करू शकेल. जे थिल्लर आणि ग्राम्य सिनेमा—संगीत आपण सहकुटुंब ऐकतो. जे संगीत 'आपकी फर्माईश' म्हणून रेडिओवर नित्यनियमाने लावले जाते, त्यातील बऱ्याच संगीताला आपले सेनापती जनरल करिअप्पा यांनी लष्करी समारंभाच्यावेळी बँडवर वाजविण्यास बंदी केली आहे. संगीताचा आणि मनोविकारांचा निकट संबंध आहे ही गोष्ट 'हडेलहप्पी' वृत्तीच्या गणल्या गेलेल्या आमच्या लष्कराला जितकी ठाऊक आहे, तितकी साहित्य संगीतात दंग असलेल्या रसिकांनाही ठाऊन नाही असा याचा अर्थ होतो! आमच्या विवाह समारंभात, आमच्या शैक्षणिक संस्थात, आमच्या राजदरबारात 'गल्लाभरू' सिनेमा कंपन्यांनी गोळा केलेले कोणतेही उत्तान सूर चालू शकतात! आमच्या रोडिओ खात्यावरील विद्वान अधिकारीही नफेबाज आणि निर्बुद्ध अशा सिनेमा निर्मात्यांच्या ओंजळीने संगीत—पान करण्यास व करविण्यास तयार आहेत!

या क्षेत्राचे शुद्धीकरण कायदा अगर सेन्सॉर मंडळ करू शकणार नाही. कायदा आणि सेन्सॉर उघड उघड वैषयिकता अगर अनिती असेल तेवढीच दाखवू शकेल. पण कुरूपता आणि ग्राम्यता खपवून घेणे ही गोष्ट वैषयिकता खपवून घेण्याहूनही अधिक असंस्कृतपणाची आणि अनार्यपणाची आहे. हा असंस्कृतपणा नाहीसा करण्याकरता वारांगनेप्रमाणेच आज बाजारात उभ्या असलेल्या कलेला, कुलीनांच्या समाजात, राजदरबारात आणि देवालयात आणून उभी केली पाहिजे.

आजच्या जगातील शासनसंस्थांवर हृदयशून्य भांडवलवाल्यांची आणि तर्कटी क्रांतिवाल्यांची रुक्ष छाया पडलेली आहे. व या दृष्टीने जुन्या सरंजामसाही शासनसंस्थांहूनही आजची शासनसंस्था अधिक निर्जीव, निर्दय आणि निरस आहे. ज्याच्या कारकीर्दीत संगीताची जाहीर प्रेतयात्रा निघाली, त्या संगदिल औरंगजेबाच्याही दरबारात, संगीताला हक्काचे आणि नित्याचे स्थान होते. तत्कालीन युरोपियन प्रवाशांनी लिहून ठेवले आहे की, दिवाणांचे सरकारी कामकाज चालू असता, अगर परराष्ट्रीय प्रतिनीधीशी बातचीत चालू असता, औरंगजेबाच्या दरबारात अखंड संगीत स्त्रवत असे! आजच्या लोकशाही दरबारात मात्र संगीताशी संबंध, सेन्सॉरबोर्ड नेमण्यापलीकडे फारच थोडा असतो !

अनुक्रमणिका

कायदे करणे अगर सेन्सॉरबोर्ड नेमणे एवढेच कलेच्या क्षेत्रातील सरकारचे कर्तव्य अशी आधुनिक लोकशाही युगातील कल्पना आहे. परंतु कुलीन समाज व कुलीन उभिरूची (Aristocracy आणि Aristocratic taste) निर्माण करणे हेही आपल्या कर्तव्यक्षेत्रात येते, असे जुन्या सरंजामशाही शासनसंस्था समजत असत.

आधुनिक शासनसंस्था निवडणुकी जिंकणे आणि बजेट तयार करणे यात इतक्या मग्न असतात, की त्यांना रुक्ष म्हणून ख्यात असलेल्या औरंगजेबाइतपतही संगीताचा आदर करण्याचे जमत नाही.

समाजात एक उच्च अभिरुचीचा मार्ग निर्माण करणे हे सांस्कृतिक कार्य जुन्या शासनसंस्था करीत असत. हे कार्य केवळ कायदे करण्याने, विद्यापीठे स्थापन करण्याने, अगर कलावंतांना मामुली ग्रँट देण्याने होण्यासारखे नाही. सोवळेपणाच्या आग्रहाने तर होणारे नाहीच नाही. शासनसंस्थांचे आजचे रुक्ष आणि निर्जीव स्वरूप बदलल्याखेरीज त्यांना समाजाच्या नैतिक उन्नतीत हात घालता येणार नाही.

मातृभूमी
दिवाळी १९५०, पृ. १३३-१३७

अनुक्रमणिका

## ३
# मत्सर आणि कामस्वातंत्र्य

**प्रो**. र. धों. कर्वे यांच्या सत्कारासंबंधी लिहिताना मागील सुखसंवादात मी त्यांच्या तत्त्वज्ञानावर काही आक्षेप घेतले होते व त्यांचा खुलासा सत्कार समारंभाच्या निमित्ताने होणे जरुर आहे, असे म्हटले होते. माझा मुख्य आक्षेप त्यांच्या कामस्वातंत्र्याच्या भूमिकेवर होता व तो घेताना, मी संभोगाच्या मानसिक बाजूचा थोडा विचार केला होता. प्रो. कर्वे यांनी मला एक वैयक्तिक पत्र लिहून या मुद्यांचा खुलासा केला होताच. पण त्यानंतर ता. ११ शुक्रवारच्या लोकसत्तेत त्यांनी लेखही लिहिला आहे. तसेच अलीकडेच समाजस्वास्थ मासिकाच्या संपादकीय लिखाणात त्यांनी 'मत्सरा' संबंधी जे दोन लेख लिहिले होते तेही मजकडे धाडले आहेत त्यांच्या या तत्परतेबद्दल व प्रांजलपणाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

स्वैरसंभोगाच्या सिद्धांतावर मी घेतलेल्या आक्षेपाला त्यांनी उत्तर दिलेच आहे; पण शिवाय वेश्यावर्गासंबंधी मी जी काही विधाने त्यांच्या मते केली आहेत. त्यावर त्यांनी आपल्या पत्रात व लेखात उलट आक्षेप घेतले आहेत. प्रो. कर्वे यांच्या प्रतिपादनाचा मुख्य भर त्यांच्या मत्सरासंबंधी सिद्धान्तावर आहे. त्यांच्या मते मत्सर हा एक अत्यंत घातुक विकार आहे. पण 'मत्सर सोडणे' या शब्दांचा अर्थ सापेक्ष आहे! अहिंसा वादात ज्याप्रमाणे 'हिंसा सोडणे' हे भेकडपणामुळे घडत आहे, की प्रेमयुक्त शौर्यामुळे घडत आहे, हे पाहणे जरुर असते, त्याप्रमाणेच मत्सर सोडण्यासंबंधीही आहे. कामक्रोधादी विकारांना सहा 'रिपु' मानणारे साधुसंतही मत्सर हा शत्रू मानतात, आणि कर्वेही तो शत्रूच मानतात! पण मत्सर सोडायचा तो कामुकतेच्या आहारी न जाण्याकरता की कामुकतेत अडथळा नको म्हणून? या प्रश्नाच्या उत्तरावर मत्सर चांगला की वाईट हे ठरणार आहे. कर्वे यांचे म्हणणे असे की, मनुष्याला अंध बनविणारा हा विकार सोडल्यास अनेक मनस्ताप टळतील आणि संभोगवैचित्र्याचे सुख निर्वेधपणे सर्व स्त्री-पुरुषांस घेता येतील.

कामक्रोधावर विजय मिळवून निर्मत्सर होणारांची गोष्ट वेगळी, पण कामविकारावर विजय न मिळवता मत्सरावर विजय मिळवणे कितपत शक्य आहे? 'मत्सर' हा स्वाभाविक विकार आहे हे प्रो. कर्वे यांनाही मान्य आहे. ता. १५ जानेवारी १९५२ च्या 'समाजस्वास्थ्या'त त्यांनी "बुद्धिवाद्याच्याही मनात हा केवळ विकार उत्पन्न होत नाही असे नाही,"... "तेव्हा केवळ बुद्धिवादाने हा विकार मनातून काढून टाकणे कठीण असते यांत शंका नाही आणि सामान्य माणसाला ते अशक्य होते यात नवल नाही" हे कबूल केले आहे. अशा स्थितीतही ते कामस्वातंत्र्याचा पुरस्कार करतात, हे तर्कदृष्ट्या कदाचित विसंगत नसेल, पण व्यावहारिक परिणामाच्या दृष्टीने ते कितपत इष्ट आहे? त्यांच्या या प्रचारामुळे विचारी लोक मत्सराच्या पलीकडे पोहचण्याची मुष्किल आहे. पण अविचारी लोक मात्र बंधनाच्या पलीकडे पोहोचतील.

पण यावर प्रो. कर्वे म्हणतील की बिघडले काय? अविचारी लोक तरी बिचारे आपल्या जीवनात सुखाचा — म्हणजेच संभोगाचा! सुकाळ करतील! आता हे म्हणणे कितपत वास्तव आणि व्यवहार्य आहे, ते पाहिले पाहिजे. कर्व्यांच्यासारखा बुद्धिमान मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ जेव्हा असे म्हणतो, तेव्हा 'संभोग ही क्षणिक क्रिया आहे'; 'त्या क्रियेच्या मागे टिकणाऱ्या शारीरिक परिणामांची खबरदारी घेतली म्हणजे झाले' या सारखीच प्रायः त्यांची भूमिका असते, आणि कदाचित मानसिक परिणामही मागे राहिलेच, तर ते गोड आठवणींच्याच स्वरूपाचे राहणार, असेही त्यांचे म्हणणे असते.

कर्वे यांच्या शास्त्रीय ज्ञानासंबंधी आदर असूनही संभोगाच्या मानसशास्त्रासंबंधी ते येथे मोठीच भूल करीत आहेत, असे म्हटले पाहिजे. समागमेच्छेत अथवा समागमक्रियेत गुरफटणारे हरएक दर्जाचे व अधिकारांचे स्त्रीपुरुष कर्व्यांच्या इतक्याच अलिप्त आणि निर्मळ बुद्धिने त्या उन्मादकारी व्यवहाराकडे पाहू शकतील असे मला तरी वाटत नाही! उन्माद आणि भ्रम हे तर कामविकाराचे अट्टल साथीदार! जी व्यक्ती शरीरदृष्ट्या जवळ झाली, ती मनानेही जवळ वाटणे; जी शरीराने चांगली वाटली ती मनानेही चांगली वाटणे; क्षणमात्र का होईना तिच्या आहारी जाणे; एकदा आहारी गेल्यानंतर गतानुभवाच्या ओढीने पुन्हा आहारी जावेसे वाटणे, हे तर स्त्रीपुरुषसंबंधाचे सर्वश्रुत खेळ आहेत. आणि अशा प्रकारे आपल्या पतीला (किंवा पत्नीला) अन्य व्यक्तीची ओढ वाटू लागली, की आपल्या प्रेमाला आणि प्रेममूलक अधिकाराला सुरुंग लागेल, हीच भीती मत्सराच्या मुळाशी असते. प्रेम नसताही मत्सर असू शकतो, हे प्रो. कर्वे यांचे म्हणणे बरोबर आहे. पण खऱ्या प्रेमातही मत्सर असू शकतो एवढे तरी त्यांनी कबूल केलेलेच आहे. (समाजस्वास्थ्य—जानेवारी १९५२) आणि आततायी मत्सराचा बंदोबस्त करून कामस्वातंत्र्याची सोय करण्याच्याही आधी, खऱ्या प्रेमाच्या रास्त शंकांचा आणि भीतीचा त्यांनी विचार करायला हवा. पण त्यांना समागमस्वातंत्र्यापासून प्रेमाला धोकाच वाटत नाही! आणि याचे कारण ते वास्तववादी नसून केवळ बुद्धिवादी आहेत, हेच असावे! दुसरे काय?

प्रत्येक विवाहात 'सख्य भावना' असतेच असे नाही, या गोष्टीची प्रो. कर्वे मला जाणीव देत आहेत. पण प्रत्येक संभोगातून क्षणिक सख्य निर्माण होण्याचा संभव असतो, याची तो जाणीव ठेवतातसे दिसत नाही. तसेच, आकर्षण शिळे झाल्यावर ते क्षणिक सख्यही संपले; आणि अनेक ठिकाणी असे क्षणिक रहस्य (Intimacy) उत्पन्न झाले, तर त्यांतून काहीच घोटाळे निर्माण (Complications) होणार नाहीत. असे कर्वे मानतात तेही बुद्धिवाद्यांच्या सुटसुटीत तत्त्वज्ञानाचे फळ होय! स्त्रीपुरुषसंबंध हा खोल आणि गंभीर संबंध आहे. त्याची वासलात इतक्या सहज लावता येईल ही कल्पनाच कृत्रिम, पुस्तकी आणि तर्कटी आहे. त्यासंबंधावरील अतिक्रमणाने मत्सर वाटतो, हाही त्या संबंधाच्या खोलवर गेलेल्या मुळांचाच पुरावा आहे. स्त्रीपुरुषांना एकमेकांविषयी मालकीची भावना वाटते की काय, हा प्रश्न वेगळा. मालकीची भावना नसून ती मानाची (Privilege) भावना असते, असे मी म्हणेन, एखादी व्यक्ती फक्त आपल्याजवळच पूर्ण निःसंकोच आणि मोकळी होऊ शकते, या कल्पनेत मनुष्याला थोडा गर्व वाटला, तर त्यांत अनैसर्गिक किंवा विकृत असे काय आहे. (जडवाद्यांचा आवडता प्राचीन तत्त्ववेत्ता एपिक्युरस हा तरी मानवी मैत्री हेच मर्त्यलोकांचे श्रेष्ठ सुख असे मानीत असे) मग या मैत्रीतील विशेष स्थानाचा अभिमान वाटला.... तो एक (Privilege) वाटला........ तर त्यांत वावगे ते काय? आणि मी म्हणतो, ''मालकी'ची भावना वाटली. तरी त्यात बिघडले कुठे? निदान, 'मत्सर हा मालकीच्या भावनेतून होतो' व एवढे म्हटल्याने त्या विकाराचे अस्तित्व संपत नाही खास! आणि संभोगस्वातंत्र्य हा मत्सरावर रामबाण इलाज तर खासच ठरत नाही!

अगदी प्राथमिक अवस्थेत असलेल्या जमातींचा अभ्यास करणारे संशोधक श्री. जे. जी. फ्रेझर यांच्या मते एस्किमो लोक आणि (दक्षिण हिंदुस्तानातील) टोड लोक, हे दोन समाज सर्व जगात अधिक शान्ततावादी आहेत. या गोष्टीचा उल्लेख करून प्रो. कर्वे लिहितात, "परंतु हेच दोन गट जगात अनैतिक म्हणून प्रसिद्ध आहेत. कारण नीती या शब्दाचा अर्थ कामविषयक एकनिष्ठता असा झाला आहे. या दोन्ही लोकांत कामविषयक निर्बंध नाहीत आणि त्यामुळे मत्सरही नाही." (समाजस्वास्थ्य जानेवारी १९५२). या दोन जगप्रसिद्ध "शान्तताप्रिय" जमातीत कामविषयक मत्सर नसेल, परंतु मत्सराबरोबरच त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या आणि शौर्याचाही लोप झाला आहे की काय, हे कर्वे आणि फ्रेझर यांच्याकडून जाणून घेण्याची वाचकांना उत्कंठा लागेल यात शंका नाही!

अनुक्रमणिका

संभोगात शरीराइतकाच-किंबहुना अधिकच मनाचाही संबंध असल्याने, हीन वृत्तीच्या व्यक्तीशी संबंध आल्यास होणारे मानसिक परिणामही ध्यानी घेतले पाहिजेत; केवळ संसर्गजन्य शारीरिक रोगावर इलाज काढून भागणार नाही, असे ही म्हटले होते. असे म्हणताना, केवळ वेश्याच काय त्या हीन वृत्तीच्या असतात. असा माझा अर्थ नव्हता आणि सर्वच वेश्या हीन वृत्तीच्या असतात असा तर अर्थ नव्हताच. स्वैर समागमाला विरोध करणारे तेवढे सर्व ख्रिस्ती विवाह नीती (जिला कर्वे 'क्लीबनीती' म्हणतात व मी सन्याशांची नीती म्हणतो!) मानणारेच असणार, ही प्रो. कर्वे यांची कल्पना बरोबर नाही. आमच्या 'सुधारक' मंडळीत ख्रिस्तीनीतीने मोठे बंड आहे, ही गोष्टी खरी आणि त्यामुळेच कर्व्यांच्या सारख्या स्वतंत्र बुद्धीच्या समाजस्वास्थ्यवाद्याला आणि डॉ. केतकरांसारख्या अस्सल समाजशास्त्रज्ञाला, ख्रिस्ती नीतीविरुद्ध शस्त्र उगारावे लागले, हेही खरे. पण मला ख्रिस्ती नीतिवाद्यांच्या वर्गात ढकलण्यात कर्वे यांची चूक होत आहे. एकपत्नीत्वाच्या कायद्यासारख्या ख्रिस्ती सुधारणांना मी माझ्या लिखाणात स्पष्ट विरोध केल्याचे त्यांस आढळेल.

पण वेश्यावर्ग जन्मजात हीन असो की नसो, आजच्या आपल्या समाजात वेश्यांच्या हीन वृत्तीचाच समाजाला संपर्क होण्याचा संभव अधिक, हे प्रो. कर्वे यांनीही कबूल केले आहे. पूर्वीच्या आपल्या समाजात व प्राचीन ग्रीक समाजात वेश्यांना कायदेशीर (Legitimate) व मानाचे स्थान होते, व या व्यवस्थेचा, समाजाच्या (आणि वेश्यांच्याही) सुस्थितीस उपयोग होता, या गोष्टीचाही निर्देश मी माझ्या संस्कृतिविषयक लेखात अनेक जागी केला आहे. (उदाहणार्थ 'वसंत' 'तरुण विशेषांक') पण आजच्या व्यापारी आणि बाजारी समाजात, कलेबरोबरच, कलावन्तिणींनाही बाजारात वास्तव्य करावे लागत आहे. ही वस्तुस्थिती दुर्लक्षून वेश्यावर्गासंबंधी आणि वेश्यागमनासंबंधी लिहिण्याची चूक कर्वे न कळत करीत आहेत, असे मला वाटते. 'जोपर्यंत विवाहसंस्था टिकेल, तोपर्यंत वेश्यावर्ग टिकणारच.' हे अलेक्झांडर क्यूप्रिनचे मत मला मान्य आहे. तसेच, विवाहसंस्था शाबूत राहण्याकरिताही वेश्यावर्ग आवश्यक होय, ही त्यातून निघणारी (Corrollary) देखील मला मान्य आहे. आणखीही एक दोन बाबतीत प्रो. कर्वे यांनी गैरसमजुतीने नसती मते माझ्या अंगी चिकटविली आहेत. 'पती व पत्नी यांना एकमेकांच्या सख्यभावात अनन्य स्थान मिळालेले असते' असे मी म्हटलेले नाही. मला जे म्हणावयाचे होते, ते एवढेच की जे लोक प्रेममूलक मत्सर नैसर्गिक अगर अशास्त्रीय मानतात, त्यांना या अनन्यभावाचे (तो भाव जेथे वसत असेल तेथेही) स्वरूप व महत्त्व कळत नाही. (अर्थात अनन्य स्थान मिळालेले नसूनही पतीला अगर पत्नीला मत्सर वाटू शकेल) पण निदान अशा अनन्य स्थानाला तरी एकनिष्ठेची मागणी करण्याचा हक्क पोहोचतो; पण तेवढाही संभोग स्वातंत्र्यवादी लोक मान्य करीत नाहीत.

"प्रेम असल्याशिवाय संभोग होऊ नये" असे माझे मत असल्याची प्रो. कर्वे यांची समजूत झाली आहे. मी तसे म्हणत नाही, म्हटलेले नाही. कारण क्षणिक आकर्षणानेही संभोग शक्य होईल. मी तर उलट म्हणतो. जेथे जेथे समागम घडेल, तेथे एक प्रकारचे तात्पुरते प्रेमच जडते; व त्या तात्पुरत्या आपुलकीचे अथवा Intimacy चे मानसिक व सामाजिक परिणाम अटळ असतात, आणि म्हणूनच, 'मत्सर'रूपी काल्पनिक आणि असमर्थनीय अडचण बाजूला केल्यास स्वैरसंभोगात दुसरी अडचण उरत नाही, हे कर्वे यांचे व काही पाश्चात्य स्वैरतावाद्यांचे म्हणणे अवास्तव आहे.

हा धर्माचा, नीतीचा अगर पापपुण्याचाच केवळ प्रश्न आहे असे मी मानीत नाही. पापपुण्याचा प्रश्न बाजूला सोडला, तरीही मानवी मनाची आणि मानवी आकांक्षांची ठेवण लक्षात घेतल्यास, कर्वे व इतर काही

बुद्धिवादी मानतात तितके संभोगस्वातंत्र्य निर्वेध नाही. मानवी मनाच्या आकांक्षा परस्पर विरोधीही असतील; परंतु त्या विसंगत ठरविल्याने लगेच नाहीशा होतील, ही बुद्धिवाद्यांची आशा अतिरेकी आहे. या मानसिक आन्तरविरोधाचा निरास सर्व प्राणिमात्राला सामान्य, अशा आकांक्षांना स्वातंत्र्य देऊन होणार नाही; तर केवळ मानवालाच लाभलेल्या अशा 'विशेष' आकांक्षांना प्राधान्य देऊनच होईल.

रविवारची लोकसत्ता
२० जानेवारी १९५२, पृ. ४

---

## संदर्भ

या लेखामध्ये श्री. के. क्षी. यांनी त्यांच्या दोन लेखांचा आणि र. धों. कर्वे यांच्या तीन लेखांचा उल्लेख केला आहे. त्यांची नोंद खाली देत आहे.

**कर्वे र. धों.**

(१) मानसिक व शारीरिक प्रेम लेखांक १ 'समाजस्वास्थ्य,' वर्ष २५ ....... अंक ६, १५ डिसेंबर १९५१, पृष्ठ १०१-१०६
(२) [श्री. के. क्षी. यांच्या लोकसत्ते मधील ६ जानेवारी १९५२ च्या लेखाला उत्तर] 'लोकसत्ता', ११ जानेवारी १९५२
(३) मानसिक व शारीरिक प्रेम लेखांक २ 'समाजस्वस्थ्य', वर्ष २५...... अंक ७, १५ जानेवारी १९५२, पृष्ठ १२१-१२६

**क्षीरसागर, श्री. के.**

(१) तरुण तरुणींचे सामुदायिक जीवन 'वसंत', मे १९५१, पृष्ठ २९-३३
(२) 'समाजस्वास्थ्य'कार सत्कार 'लोकसत्ता', ६ जानेवारी १९५२, पृष्ठ ४

अनुक्रमणिका

४

# दारूबंदी मागोमाग वेश्याबंदी

**ना**गरिकांच्या खाजगी वर्तनात, एखाद्या अवाढव्य प्रदेशाचा कारभार हाकणाऱ्या सरकारने किती लक्ष घालावे हा प्रश्न आपल्या देशात तरी फार जिकिरीचा होऊ लागला आहे. मुंबई राज्यात तर एक-दोन फार नाजूक बाबतीत सरकारने निश्चयपूर्वक हस्तक्षेप केला आहे. त्याचे यश व फायदे तोटे अद्याप वादातच आहेत. तेवढ्यातच कौन्सिल ऑफ स्टेट्स्च्या एक स्त्री सभासद श्रीमती सावित्री निगम यांनी आणखी चार वर्षांत वेश्याव्यवसाय नाहीसा करण्याची योजना आखली आहे!

वास्तविक दारूबंदी हा टिळकांच्या काळी राष्ट्रीय पक्षाचा एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय कार्यक्रम होता. गांधीजींच्या सामाजिक कार्यक्रमात कायाशुद्धी व चित्तशुद्धी यांना फारच मोठे महत्त्व असल्याने त्यांच्या अनुयायांनाही दारूबंदीचा कार्यक्रम प्रियच होणार हे उघड आहे. तथापि, सरकारी कायद्याने या राज्यात दारूबंदी केल्यावर ती मोठी यशस्वी अगर लोकप्रिय झाली असे मात्र दिसत नाही.

द्विभार्या-प्रतिबंधक कायद्याची बाब तर याहूनही नाजूक आहे. मुंबई सरकारने हा कायदा केला व लोकानीच निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी तो पत्करला, तेव्हा आपण कशाला हात वर करीत आहोत, याची तरी त्यांना कल्पना होती की नाही कोण जाणे! मद्यपान आणि बहुपत्नीकत्व यांच्या पोटी अन्याय आणि अनीती यांचा शिरकाव समाजात होत नाही असे नाही, पण त्यातील घातुक भागालाच तेवढा आळा घालण्यासारखे कायदे करणे अशक्य नव्हते. अन्याय नाहीसा करणे एवढेच 'सरकार' या संस्थेचे काम होय. लोकांना जितेंद्रिय मुनी बनविण्याचा उद्योग 'सरकारने' हाती घेण्यात हशील नाही. हे तत्त्व आजच्या सरकारला मान्य नाहीसे दिसते. उलट जे अन्याय दूर करा म्हणून लोक ओरडत आहेत, ते दूर करणे सरकारला जमत नाही. आणि ज्या खाजगी जमिनीच्या बाबतीत बाप मुलावर अगर बायको नवऱ्यावरही यशस्वीपणे बंदी घालू शकत नाही ती निवारण करण्याचा खुळेपणाचा उद्योग हे सरकार पुनः पुनः हाती घेत आहे!

दारूच्या नशेत केलेल्या गुन्हाला 'गुन्हेगार नशेत होता' हे समर्थन चालू न देता दुप्पट शिक्षा ठेवणे, भर वस्तीत दारूची दुकाने ठेवण्यास बंदी करणे; दारुवर भारी कर ठेवून मद्यपानाच्या मार्गात आर्थिक अडथळा निर्माण करणे वगैरे गोष्टी तूर्त बस्स होत्या. किंबहुना फक्त दारू विक्री हा गुन्हा ठरवून 'मद्यपान' या विषयाकडे दुर्लक्ष करणेही युक्त ठरले असते. पण या सरकारची दृष्टी 'सरकार' सारखी नसून धर्मोपदेशकासारखी आहे!

विवाहविषयक कायद्यातही तीच भूमिका नडत आहे. नवऱ्याने दुसरी बायको केली या कारणाच्या जोरावर पहिल्या बायकोला फारकत, पोटगी, अगर घटस्फोट मिळण्याची कायदेशीर सोय करणे तूर्त बस्स होते. फार काय पाश्चात्य ख्रिस्ती राष्ट्रातील एक-पत्नीत्वाच्या कायद्यातदेखील या स्वरूपाची सुधारणा होणे जरुर आहे, असे म्हणता येईल, पण नागरिकांना कायदेशीर व शांततामय जीवनाचा लाभ घडवून देण्यापेक्षा नैतिक वळण लावण्याची भूमिका मुंबई सरकारने आपल्याकडे घेतल्याने, एक अव्यवहार्य व अनावश्यक कायदा मुंबई राज्यातील लोकांच्या गळ्यात अडकविला गेला! फार तर, दुसऱ्या, तिसऱ्या, व त्याहून पुढच्या लग्नावर चक्रवाढीने कर बसवून त्या उत्पन्नातून स्त्रियांच्या संस्थाना मदत करावयाची होती.

अनुक्रमणिका

पण लोकांना इंद्रियदमन करायला लावण्याची आमच्या सरकारला इतकी त्वरा झाली आहे की मधली पायरी त्यांना दिसत नाही.

याच कर्मठ नीतीच्या उत्साहात आता वेश्याबंदीची योजना हाती घेतल्यास, वेश्याव्यवसाय बंद केल्याचाही देखावा करता येईल. पण प्रत्यक्षात मात्र नीतीऐवजी अनीतीचीच वाढ होईल.

या देशात मद्यपानाहूनही वेश्यागमनाची रूढी अधिक मोठी आहे व फार खोलवर रुजलेली आहे. ती इतकी की, उपस्त्रिया, अंगवस्त्र, ही जुन्या राजेरजवाड्यात व श्रीमंतात एक मामुली विलासाची बाब गणली जात होती. कुलीन स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य बेताचेच असल्याने, व मर्यादशीलपणा हा कुलस्त्रीचा पहिला सदगुण मानला जात असल्याने, आणि ज्या व्यवसायात अघळपघळ वर्तनाची जरुर असले त्यात —उदाहरणार्थ गायन, नर्तन, परिचर्या यात वारांगना किंवा तत्सदृश दर्जाच्या स्त्रियाच पूर्वी शिरत. म्हणजे त्या काळात वेश्यावर्ग हा केवळ अनैतिक संबंधावर जगत नसे, तर त्याबरोबरच समाजाच्या कित्येक कला व व्यवसाय तो वर्ग जगवीत असे.

आज काळ बदलला आहे; पण म्हणून वेश्याव्यवसाय बंद करण्यासारखी समाजरचना झाली आहे असे मात्र नाही. आधुनिक व्यापारी युगात राहाण्याच्या जागेची मुष्कील व बकाली वस्तीची वाढ यांचे संकट मोठाल्या शहरातून किती वाढत आहे, हे प्रसिद्धच आहे. अशा स्थितीत वेश्याव्यवसायाचे निर्मूलन करण्याची भाषा इतर गोष्टींच्या आधी करणे म्हणजे शुद्ध थट्टा होय! अन्न, वस्त्र आणि जागा यांच्या दुर्भिक्ष्यामुळे उलट स्त्रियांना अनीतीच्या व्यवसायात ओढण्याला आज अधिक अनुकूल वातावरण निर्माण होऊन बसले आहे. देशाच्या फाळणीमुळे स्त्रियांच्या अपहाराचा आणि पुरुषांच्या देशत्यागाचा प्रश्न राक्षसी स्वरूप धारण करून बसला आहे. वृद्ध मातापितरांच्या समक्ष तरुण मुलींना गुंडांनी ओढल्याच्या वार्ता पूर्व-पाकिस्तानातून अद्यापही येत आहेत. पळविलेल्या अगर बेपत्ता झालेल्या स्त्रियांचे देशाच्या दोन्ही तुकड्यांतील आकडे हजारांनी सांगितले जात आहेत. अशा स्थितीत कौन्सिल ऑफ स्टेट्स्‌मध्ये बसणाऱ्या प्रतिष्ठित स्त्रियांनी आईबापांना मुकलेल्या, नवऱ्यापासून छिनून नेलेल्या स्त्रियांचा, देशाला लाज आणणारा प्रश्न हाती घेण्याचे सोडून मनुष्य-स्वभावानुसार जगाच्या आरंभापासून चालत आलेल्या वाईट चाली धुवून काढण्याची मनीषा धरावी हे चालू रंगसफेतीच्या जमान्याला शोभेसेच आहे!

तथापि "Prostitution will last as long as marriage lasts", हे अलेक्झांडर क्यूप्रिन सारख्या विख्यात समाज संशोधकाचे मत, उथळ नीतिवाद्यांच्या मताहून अधिक वास्तववादी आहे. वेश्यावर्ग म्हणजे एक घाणेरडे पण अपरिहार्य असे समाजांग आहे, असे प्रथम मान्य करूनच आजच्या स्थितीत तरी सुधारकांनी पाऊल टाकावयास हवे. आणि मग या क्षेत्रातही करण्यासारख्या गोष्टी नाहीत असे नाही. एखाद्या स्त्रीला त्या व्यवसायाकडे वळविणे, तिच्या इच्छेविरुद्ध त्या व्यवसायात राहण्यास भाग पाडणे, तिच्या अनैतिक व्यवसायावर अन्य माणसांनी पैसा करणे हे मला वाटते, आजच्या कायद्यानेही गुन्हे आहेत. त्यांचीच अंमलबजावणी अधिक कडकपणे केली तरी आज या क्षेत्रात मोठीच मजल मारल्यासारखे होईल. पण आजच्या शहरांची रचना आणि आजच्या समाजाची आर्थिक स्थिती लक्षात घेतल्यास या बाबतीत आहे त्या कायद्यांची अंमलबजावणी करणेही सोपे आहे असे नाही.

आज देशातील एकाही मोठ्या शहरात कुलीन, कुटुंबवत्सल आणि रोजगार धंदा करणाऱ्या माणसाला वर्ष-वर्ष हिंडल्याखेरीज राहायला दोन खोल्या मिळण्यासही मारामार पडते. अशा स्थितीत

निराधार एकटी-दुकटी तरणीताठी स्त्री काम-धंद्याकरिता शहरात येऊन दाखल झाल्यास तिची स्थिती काय होत असेल, तिला वाट कोण दाखवीत असेल, व आधार देण्यास पुढे कोण सरसावत असेल याची कल्पना श्रीमती सावित्री निगम सारख्या नामदार स्त्रियांना आहे की नाही अशी शंका वाटू लागते! निर्ढावलेल्या वेश्यांना त्या व्यवसायातून सक्तीने काढून त्यांच्या लग्नकार्याची जिम्मेदारी घेण्यापेक्षा आजच्या बकाली समाजातील निर्दयतेला आणि बेजबाबदारपणाला कंटाळून, वेश्यागृहातील गुंडांचे बोट धरून कुमार्ग चालू लागणाऱ्या भावी वेश्यांना परतविण्याची प्रतिज्ञा आज या समाजसुधारक स्त्रियांनी केली तरी पुरे आहे. पण अनुभव असा येईल की, व्यासपीठावरून व्याख्यान देणाऱ्या दहा विदुषींपैकी नऊजणींना अडाणी, पिडलेल्या अगर नाडलेल्या अबलेशी दोन सहानुभूतीचे शब्द बोलण्याचेही धारिष्ट होत नाही. मग प्रत्यक्ष काही करण्याची गोष्ट दूरच राहिली! अशा स्त्रियांची वास्तपुस्त करणारी स्त्री ही आजच्या सुशिक्षित स्त्रियांच्या उपहासाचा विषय झाल्याची उदाहरणे दाखविता येतील.

पण नुसत्या जागेच्या दुर्भिक्ष्यामुळे उद्‌भवलेली अनाचार परंपराच तपासायची म्हटली तरी त्यात अनेक दुर्निवार सामाजिक दोष उघडकीला येतील. वेश्याव्यवसाय जुना आहे, वेश्या उद्धरण्याची भाषा नवी आहे, पण जुन्या काळात हा व्यवसाय आजच्या इतका गलिच्छ आणि भयावह नव्हता. कारण जुन्या काळात आजच्या सारखी बकाली वस्ती नव्हती. आज मोठ्या शहरातील वेश्या या वेश्याही असतात आणि गुलामही असतात. त्यांची गुलामगिरी प्रायः स्वतंत्र जागेच्या अभावी वज्रलेप झालेली असते. शरीरविक्रय करून पैसा मिळविणे तर वाईटच; पण तो शरीरविक्रयही एखाद्या मवाली मालकाला अगर मालकिणीला पैसा नेऊन देण्याच्या कराराने होत असल्यास आधी कोणते पाप धुवून काढायचे हा समाजसुधारकांपुढे प्रश्नच पडेल. आणि वेश्यावृत्ती अधिक वाईट की वेश्यांना विकत अगर खंडाने घेऊन गुलाम बनविणे अधिक वाईट, या प्रश्नाचे उत्तर कोणीही एकच देईल. आणि जर स्वतःच्या शरीरोपभोगावर पैसा मिळवण्याहून, दुसऱ्याला गुलाम करणे अधिक मोठे पाप असेल, तर ते पाप, आजची बाजारी आणि बकाली राहणी सुधारल्याखेरीज केस धुवून काढता येणार? मद्यपान आणि शरीरविक्रय या दोन सामाजिक रोगांना पूर्ण मुभा देणे, किंवा एकदम बंदी घालणे, या दोन टोकाच्या मध्ये काही पर्याय खासच आहेत. या दोन्ही पापांचा संबंध श्रीमंतांच्या चैनबाजीशी जितका आहे, त्याहूनही अधिक गरीबांच्या विपन्नावस्थेशी आहे. विद्या आणि कला यांचा ज्यांना संपर्क नाही अशा लोकांना विपन्नावस्थेतील खिन्नता घालविण्यास आजच्या युगात मद्याखेरीज दुसरे साधन कोणते? ज्यांना स्वास्थ्य नाही, संस्कृतता नाही; गृहसौख्य नाही व गृहही नाही, ते श्रीमंताप्रमाणे चैनीखातर नव्हे, तर दुर्दैव्याप्रमाणे विस्मृतीच्या शोधार्थ वेश्यागृहाकडे वळण्याचा संभव असतो. हा प्रश्न केवळ नीती अनीतीचा नसून, सहस्रपाद, सहस्राक्ष समाजाच्या सहस्रदुःखांचा आहे. उच्च सुखांचा मार्ग खुला करणे, हा एकच हीन सुखांचा मार्ग रोखण्याला उपाय आहे.

जोपर्यंत समाजातील स्वास्थ्य, सुस्थिती आणि सुसंस्कृतपणा यांची वाढ होत नाही, तोपर्यंत नुसत्या दुर्व्यसनावर बंदी घालणे म्हणजे निर्घृण (unscrupulous), जाहिरातबाजी होय. शहरातील घाण नाहीशी करण्याकरता गटारे बुजवून टाकण्याचा उपाय करण्यातलाच हा प्रकार होय! घरोघरची घाण गटारातून वाहताना दिसते, पण याचा अर्थ ती गटारातच तयार होते असा नव्हे.

सहृदयता व कल्पनाशक्ती यांच्या अभावी नुसत्या नैतिकतेची पंचवार्षिक योजना आखणे निष्फळ होय. रुक्ष नीतीच्या पोटीही निर्दयता आणि जाहिरातबाजी यांचा जन्म होऊ शकतो. आमच्या समाजसुधारकांना कर्मठ नैतिकतेपेक्षा सहृदयतेची आणि कागदी नियोजनापेक्षा कल्पकतेची आज अधिक गरज आहे.

अनुक्रमणिका

रविवारची लोकसत्ता
२९ जून, १९५२. पृ. ६

अनुक्रमणिका

# ५
# निर्विकार सौंदर्य विरुद्ध सविकार सौंदर्य

The great disaster of our civilization is the morbid hatred of sex. What for example, could show a more poisoned hatred of sex than Freudian Psycho-analysis. which carries with it a morbid fear of beauty, 'alive' beauty......?

D. H. Lawrence

आजच्या संस्कृतीतील महान आपत्ती जर कोणती असेल तर ती म्हणजे विकृत कामविद्वेष ही होय. उदाहरणार्थ, फ्रॉइडप्रणीत मनोविश्लेषणात जेवढा विषारी कामविद्वेष आहे, तेवढा दुसऱ्या कशात असू शकेल? त्या मतप्रणालीत सौंदर्यासंबंधी-'सचेतन' सौंदर्यासंबंधी—रोगट भीती लपलेली आढळते.

माझ्या विषयाचा मथळा पाहून मी सौंदर्यासंबंधी मर्ढेकरी चर्चा करणार आहे, असे वाटून तुमच्यापैकी काही वाचक पाने उलटून पुढे जातील अशी शंका आल्यानेच, मी डी. एच्. लॉरेन्सची काही वाक्ये आरंभी उद्‌धृत केली आहेत! मला आज तुमच्यापाशी कलेतील सौंदर्यासंबंधी बातचीत करायची नसून, मानवी प्राण्यांतील परस्पराकर्षणासंबंधी चर्चा करायची आहे, अन् ती देखील डी. एच्. लॉरेन्स् यांच्या काही मतांच्या निमित्ताने करायची आहे. अर्थात लेखक स्वतः स्त्री नसल्याने, या लेखात पुरुषांच्या आकर्षणापेक्षा स्त्रियांच्या आकर्षणासंबंधीच अधिक चर्चा येईल हे उघड आहे.

स्त्रियांत नुसता रेखीवपणा असून भागणार नाही; कारण 'सुरेख' स्त्री म्हणजे तरी काय? "चांगले नाकडोळे आणि जसे हवेत तसे केस", पण खरी सुंदर, मोहक, स्त्री म्हणजे केवळ नाकडोळे आणि केस नव्हेत. सुंदर स्त्री म्हणजे विशिष्ट आकर्षणाचा आणि विशिष्ट उत्साहाचा प्रत्यक्ष अनुभव होय. लॉरेन्सच्या भाषेत म्हणजे सौंदर्य म्हणजे नुसता 'देखणे'पणाचा-नुसत्या 'दिसण्या'चा प्रश्न नाही;-एका हृदयातील आग दुसऱ्या हृदयात लागण्याचा प्रश्न आहे! (It is a question of communicated fire. It is a question of 'sex-appeal' in our poor dilapilated modern phraseology.)

पण निसर्गसौंदर्य आणि कलात्मक सौंदर्य यांचा वेगळा विचार करायला हवा, हे देखील पाश्चात्य सौंदर्यशास्त्राने बऱ्याच उशिरा ओळखले, नदीही सुंदर, दरीही सुंदर आणि या दोहोंची चित्रेही सुंदर! इतकेच नव्हे तर आधी एखादी मनोमूर्ती कल्पून कारागिराने उभा केलेला ताजमहालही पण 'सुंदर'च! एडमंड बर्क या तत्वज्ञ मुत्सद्याने प्रथमच सौंदर्य आणि भव्यता यात भेद केला. त्याच्या नंतरच्या सौंदर्य तत्त्ववेत्त्यांनी निसर्गसौंदर्य आणि कलानिर्मित सौंदर्य, यात भेद केला. पण लॉरेन्स्सारख्या कामतत्त्वचिंतकाला, 'देखणे'पणा आणि 'कामाकर्षण' यातही भेद करणे अगत्याचे वाटत आहे. कित्येक तत्त्ववेत्ते निर्विकार, निर्हेतुक रूपदर्शन म्हणजे सौंदर्य-दर्शन असे मानतात. उदाहरणार्थ शोपेनहौर याच्या कलामीमांसेत या सिद्धांतालाच प्राधान्य आहे. पण लॉरेन्सचे मत असे आहेसे दिसते की, मानवी सौंदर्यात विकार-प्रेरकता हेही रूपाचे, सौंदर्याचे-निदान मोहकतेचे एक प्रधान अंग मानले पाहिजे. तो स्पष्टच म्हणतो की, जेव्हा कामरूप अग्नीची सतेज आणि निर्मळ ज्योत एखाद्या स्त्रीच्या चर्चेवर चमकून, माझ्या अंतरंगातील

अनुक्रमणिका

अग्नीला स्पर्श करते, तेव्हाच मुळची नुसती देखणी असलेली स्त्री खरीखुरी सुंदर, खरीखुरी मोहक बनते. अन् मग ती नुसती तसबीर राहात नाही, तर सचेतन हाडामासाची सुंदर बनते.

लॉरेन्सला येथे फक्त आकृति-सौंदर्य आणि विभ्रमसौंदर्य यांतील भेद दाखवायचा आहे, असे नाही, मला वाटत! कारण तो भेद अनेकांनी केलेला आहे. सौंदर्यवर्धनातले काम-विकाराचे स्थान इथे त्याला अभिप्रेत आहे. म्हणजे शोपेनहौरच्या अगदी विरुद्ध टोकाला तो जात आहे! "लेडी चॅटर्लीचा प्रियकर" ही काहींना अश्लील वाटलेली कादंबरी लिहिणारा लॉरेन्स, काममीमांसेच्या बाबतीत गूढवादी होता, हे पुष्कळ लोकांना माहीत नसते. तो म्हणतो, 'काम' म्हणजे काय, हे आपण सांगू शकत नाही; पण काम हा एक प्रकारचा अग्नी असला पाहिजे खास. कारण त्यापासून आपणाला ऊब मिळाल्यासारखे वाटते, एक प्रकारची दीप्ती मिळाल्यासारखे वाटते, (For it always communicates a sence of warmth of glow). या निर्मळ ज्योतीला, या अंतरस्थ दीप्तीला आजच्या भिकार, मोडक्या तोडक्या भाषेत 'सेक्स अपील' म्हणतात, याचीही लॉरेनसला खंत वाटते. पुस्तकी सौंदर्यमीमांसकाप्रमाणे त्याला अचेतन आकृतीची चर्चा करायची नसून सचेतन आकर्षणाची चर्चा करायची आहे, पण त्या आकर्षणाचे नुसते चित्र काढणाऱ्या चित्रकाराची आणि लॉरेन्सची भूमिका एक आहे असेही नाही. सकाम सौंदर्याच्या दीप्तीतून त्याला तेज आणि उत्साह मिळवायचा आहे. त्याला एकट्याला वैयक्तिक उन्माद लुटायचा आहे, असेही नव्हे तर फ्रॉइडला शंकराचार्य बनविणारी आजची मूर्ख संस्कृती याच मनोहर कामदीपाला आग समजून त्याचा द्वेष करते, ते बंद करायचे आहे.

आधुनिक पाश्चात्य समाजाला 'सेक्स् अपील' (लैंगिक आवाहन) समजू शकत नाही असे नव्हे; पण त्या आवाहनाची त्या समाजाला भीती वाटते! जुन्याकाळी सुखवस्तु लोक, राजेरजवाडे उघडपणे आणि बिनविरोध कामुक स्त्रियांच्या आहारी जाऊन राज्याला मुकत. आधुनिक मनुष्य त्या मानाने खबरदार आहे. पण तो स्त्रियांच्या बाबतीत सावध आणि व्यवहारी आहे; ही गोष्ट लॉरेन्सला तितकी बरी वाटत नाही! कारण लॉरेन्स लैंगिक आकर्षणाला धोका किंवा घाण मानीत नसून, पवित्र 'जीवनज्योत' मानतो!

हे तत्त्वज्ञान आहे तरी काय? लॉरेन्सला जो आनंद हवा आहे आणि जो आधुनिक संस्कृतीतून नष्ट झाला आहे, अशी त्याची तक्रार आहे तो स्वैराचाराचा, अनिर्बंध विषयोपभोगाचा आनंद आहे काय? कारण स्वैराचाराचाही एक संप्रदाय आहेच. स्त्रीपुरुष-संबंधावर कोणत्याच प्रकारचा निर्बंध असण्याचे कारण नाही, हे मत आपल्याकडे कै. डॉ. र. धों. प्रतिपादीत असत; इंग्लंडमधील जगप्रसिद्ध महर्षी रसेल् यांची लैंगिक नीतीबद्दलची मते याच प्रकारची आहेत, असे म्हणता येईल. पण लॉरेन्स याची वर उद्धृत केलेली मते आणि रसेल-कर्वे संप्रदायी मते एक नव्हेत. कर्वे आणि रसेल यांना कामुक आकर्षणाचे 'सौंदर्य' वाढवायचे नाही; तर कामविषयक 'स्वातंत्र्य' वाढवायचे आहे. आधुनिक कामविषयक दृष्टिकोनाने 'सौंदर्या'ची हानी होते, ही त्यांची तक्रार नव्हती; तर स्वातंत्र्याची हानी होते. ही त्याची तक्रार होती. सारांश हे दोघे तर्कवादी होते, तर लॉरेन्स सौंदर्यवादी आहे. यातील एक संप्रदाय, 'सेक्स' (लैंगिक प्रवृत्ति) ही एक 'भूक' आहे, असा निकाल लावून त्या क्षुधेच्या तृप्त्यर्थ उपाहारगृह चालवायला देखील मंजुरी देतो! तर दुसरा, म्हणजे लॉरेन्स-संप्रदाय काम प्रवृत्तीला क्षुधा किंवा appetite मानणे हे मूर्खपणाचे समजतो व उघडपणे "काम म्हणजे सौंदर्यानुभव होय" आणि "सौंदर्य म्हणजे काय हे सांगता येत नाही, कारण ते एक स्वसंवेद्य असे रहस्य आहे" असे पुकारतो. लॉरेन्स म्हणतो, "Sex and beauty are one thing" आणि "Beauty is a mystery" आणि अखेर, विज्ञान व सौंदर्य याचे जन्मजात वैर आहे. असे जाहीर करून तर या विषयात लॉरेन्स् कडेलोटच करतो. या वैरांचे कारण, विज्ञानाचे एक पाऊलही कार्यकारणभावाचा आधार

घेतल्याशिवाय पुढे पडत नाही; तर उलट दिव्याच्या ज्योतीसारखे अचपल असलेले 'सौंदर्य' कार्यकारणभावाच्या दोरखंडाने बांधता येत नाही! "ब्युटी इज् ए मिस्टरी".

सोवळे लोक या दोन्ही संप्रदायांना स्वैराचारी म्हणतील-म्हणतात, हे मला माहीत आहे. पण दोघांची मूल्ये वेगळी आहेत. रसेल यांना स्वातंत्र्याच्या हवेत जगायचे आहे; तर लॉरेन्स याला सौंदर्याच्या दीप्तीत जगायचे होते. कामाकर्षणातच स्त्रीपुरुषांचे खरे सौंदर्य आहे. हे काममूलक सौंदर्य नुसत्या रेखीव ठोकळ्याच्या सौंदर्यापेक्षा अधिक जिवंत आहे. या कामसौंदर्याच्या आस्वादात जी दीप्ती (glow) किंवा 'दीपन' आहे, हे नुसत्या निर्जीव सौंदर्यात नाही, हे लॉरेन्स्चे पालूपद आहे.

लॉरेन्सच्या या कामसूत्राच्या मागे आणखी काही तत्त्वज्ञान आहे. आधुनिक मानव उथळ कल्पनामय, तर्कमय पातळीवर जगतो; तो अन्तःप्रेरणेच्या जीवनाला पारखा झाला आहे, असा पुकारा लॉरेन्स याने जागजागी केला आहे. ही ओरड मात्र त्याची एकट्याची नसून विख्यात फ्रेंच तत्त्वज्ञ बर्गसॉ, भारतीय साक्षात्कारी सत्पुरुष कृष्णमूर्ती, हे व इतर अनेक, त्याच्या पाठीशी आहेत. कृत्रिम तार्किक, काल्पनिक जीवनांत आधुनिक मानव इतका रुतला आहे, की तत्त्ववेत्त्यांना हवे असलेले प्राकृतिक जीवन कोणते याची त्याला कल्पनाही नीटशी होत नाही. पण आजच्या कृत्रिम आणि वरवरच्या जीवनापेक्षा, एक स्वाभाविक व सखोल असे अन्तःप्रवृत्तीचे जीवन आहे, असे जर आपण या थोर तत्त्ववेत्त्यांच्या आप्तवाक्यावरून गृहीत धरले, तर लॉरेन्स याला कोणते जीवन हवे होते हे आपल्या ध्यानात येईल. पण 'लॉरेन्स संप्रदाय' तो याच्या पुढेच आहे! लॉरेन्सची अशी धारणा होती की, आजचे कार्यकारणपूजक व विज्ञानपूजक जग, काम आणि सौंदर्य यांच्या जिवावर उठले आहे! अन यामुळे, ते अंतःप्रवृत्तीच्या (Intuition) च्या प्राकृतिक जीवनाला आणि आनंदाला पारखे झाले आहे! ज्या दिवसापासून युरोपमध्ये कामप्रवृत्ती म्हणजे, 'सौंदर्य नव्हे तर घाण' असे मानायला आरंभ झाला, त्या दिवसापासून आपण आंतरिक दृष्ट्या मृत झालो. ("Intuitionly we are dead to one another, we have all gone cold "....." We have become 'ideal beings, creatures that exist in idea to one another, rather than flesh and blood kind.")

लॉरेन्सच्या या मताचा जसा सांस्कृतिक जीवनाशी संबंध आहे, तसाच चित्रकलेच्या मीमांसेशीही संबंध आहे. त्याने आपल्या चित्रसंग्रहाच्या प्रस्तावनेतच यातील काही सिद्धांत मांडले आहेत. परंतु मला या लेखात चित्रकलेची चर्चा करायची नसून जीवनकलेची म्हणजेच संस्कृतीची चर्चा करायची आहे. आधुनिक संकृतीत विकारसौंदर्याने येणारी ऊब आणि दीप्ती नाही; ती संस्कृती निर्जीव आणि गारठलेली आहे, असे जेव्हा लॉरेन्स म्हणतो, तेव्हा त्याचे दुःख, त्याचे दुखणे नेमके कोणते आहे?

आपण सर्वजण स्त्रीपुरुषमिश्र समाजात वावरतो. याचाच अर्थ आकर्षणाच्या विविध कक्षांत वावरतो, असे असूनही आपले विज्ञानशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ आणि नीतिशास्त्रज्ञ या आकर्षणाचा विचार आणि विकास करण्याऐवजी, त्याची जणू कशीतरी वाट लावण्याकरताच आचारधर्म सांगत असतात! रसेलसारखे व्यक्ति-स्वातंत्र्यपूजक लोक आचारनियम सांगण्याऐवजी आचारस्वातंत्र्य पुकारून मोकळे होतात. पण त्यानाही काम हा 'पुरुषार्थ' वाटत नसून ज्याला वाट करून दिली पाहिजे, ज्याचा 'निचरा' केला पाहिजे, असा एक लोंढा, किंवा स्त्राव वाटतो, असे दिसून येईल! या रुक्ष मंडळीच्या दृष्टीने कामप्रवृत्तीचा उपयोग खरा एकच आणि तो म्हणजे प्रजोत्पादन! आपल्या प्राचीन धर्मशास्त्रांनीही बऱ्याच ठिकाणी या रानटी (Primitive) भूमिकेवरूनच लिहिलेले आढळेल. जणू काही कोणीही मनुष्य स्वस्त्रीकडून किंवा परस्त्रीकडून

आकर्षिला जातो तो अपत्यलाभाच्या इच्छेने! उलट रसेल किंवा फ्रॉइडसारखे तर्कवादी, विज्ञानवादी शास्त्रज्ञ जेव्हा कामप्रवत्तीसंबंधी आचारधर्म सांगू लागतात, तेव्हा भूक भागविण्याची किंवा विकृती निवारण्याची भाषाच अधिक बोलतात. कामप्रवृत्तीतून सौंदर्यवर्धन होईल, झाले पाहिजे, ही या दोघांचीही दृष्टी नाही. कारण यातील कुणीच सौंदर्यवादी वा रहस्यवादी नाही. 'सेक्स'संबंधीची सौंदर्यदृष्टी लॉरेन्सला प्राप्त झाली होती. आधुनिक जगाची कामविषयक दृष्टी रुक्ष आहे, अशी त्याची हाकाटी आहे, तो खेद करतो :-

"If only our civilization had taught us how to let sex-appeal flow properly and subtly ..... we might, all of us, have lived all our-lives on love........... "

(अरेरे! आमच्या (पाश्चात्य) संस्कृतीने जर आम्हाला, कामाकर्षण योग्य तऱ्हेने आणि सूक्ष्मपणे समाजात कसे पसरू द्यायचे, ते शिकवले असते..... तर आम्ही मानवप्राणी आमचा जन्मच्याजन्म प्रेममय करू शकलो असतो!")

प्रेममय जीवन म्हणजे बालकवीचा वेदान्ती गोपाळकाला मात्र नव्हे! बालकवी म्हणतो :

दिव्यरसी विरणे जीव।
जीवित हे याचे नाव।

लॉरेन्सच्या भाषेत, 'प्रेममय' म्हणजे काममय; आणि काममय म्हणजे उत्साहमय. कारण त्याच लांब वाक्यात तो पुढे म्हणतो-

"Which means we should be kindled and full of zest in all kinds of ways and for all kinds of things.........."

काममय जीवन जगणे म्हणजे सदैव प्रज्वलित आणि उत्साही असणे! "अशा धगधगीत जीवनाऐवजी"लॉरेन्स पुढे म्हणतो "आपल्या आधुनिक जीवनात राखराखुंडीच किती भरून किती भरून राहिली आहे!"

मानवी जीवन पुन्हा धगधगीत आणि चैतन्यमय कसे होईल? स्त्री-पुरुषांच्या सामाजिक संबंधाकडे 'शास्त्रीय' दृष्टीने पहावयाचे बंद करून सौंदर्यमय आणि काव्यमय दृष्टीने पाहिले, तरच जीवन पुन्हा प्रज्वलित, दीप्तिमान होईल. पण आज आपले काय चालले आहे? आकर्षणाची ही धग आणि रग विझवण्याचे कार्य चालले आहे! या विझवण्याच्या कार्यक्रमातला सर्वात मोठा भाग म्हणजे स्त्रीला पुरुषसदृश्य बनवणे. शिक्षणाने स्वातंत्र्याने, व्यवसायाने स्त्रिया आज इतक्या पुरुषसदृश्य बनत आहेत की, त्याचा उपयोग आकर्षणापेक्षा नोकरीधंद्यालाच अधिक होऊ लागला आहे. धर्मशास्त्रकारांनी स्त्रीला प्रजोत्पादनाचे 'उपकरण' मानण्याचा रुक्षपणा केला; तर आजचे विज्ञानशास्त्री तिला 'द्रव्योत्पादनाचे उपकरण' मानण्याचा सवाई रुक्षपणा करीत आहेत. पुरुषाला दीपन आणि उत्साह, स्फूर्ती आणि शक्ती देण्याचा जो तिचा विशेष अधिकार, त्याची आजच्या रुक्ष विज्ञानवाद्यांना खबरच नाही! पुरुष स्त्रीच्या प्रेमावर

जगत असतो; स्त्री पुरुषाच्या प्रेमावर जगत असेत, हेच दोघांच्या जीवनाचे रहस्य आणि सार्थक आहे, याची शास्त्रज्ञांना दखल नाही.

या श्रेष्ठ आणि जीवनव्यापी आकर्षणाला संस्कृतीत, समाजबंधनात केवढे स्थान आहे, याची कल्पना, बुद्धिवाद्यांना नाही. कारण त्यांना स्वातंत्र्याची महती कळत असली, तरी बंधनाची आणि बंधनातून उभारलेल्या रचनासौष्ठवाची महती कळत नाही. त्यांना बौद्धिक प्रकाशाची महती कळते; पण बुद्धीवर सौंदर्याने टाकलेल्या सुंदर पटलाची मौज कळत नाही. बौद्धिकता आणि स्वातंत्र्य याच्याप्रमाणेच मोहकता आणि पारतंत्र्य यांनाही जीवनात मानाचे स्थान आहे, याची कल्पना नाही. अलिप्त आणि सावध राहण्यात जेवढे बळ आहे, त्याहूनही आसक्त आणि बेभान होण्यात अधिक बळ आहे—अधिक स्फूर्ती आहे, याची रुक्ष विज्ञानवाद्यांना कल्पना नाही! लॉरेन्सला हा मोहाचा आनंद आणि ही बेहोषीची 'एनर्जी' हवी होती. तो केवळ एकेका जोडप्याच्या सांसारिक सहजीवनाबद्दलच बोलत नव्हता; अखिल मानवी समाजाच्या परस्पर कार्याबद्दल, परस्पर प्रेरकतेबद्दल बोलत होता. त्याला स्त्री-पुरुषात कोणते नाते हवे होते? अन् आजच्या सुधारलेल्या स्त्री-पुरुषात कोणते नाते आहे?

लॉरेन्सला परस्पर आकर्षणाचे आणि परस्पर प्रेरणेचे नाते हवे होते. केवळ दोन स्त्री-पुरुषांनी लग्न करून मोकळे झाले, म्हणजे नैसर्गिक आकर्षणाचा प्रश्न सुटला, असे समजून काही लोक डोळे मिटून घेतात. तर उलट काही लोक डोळे उघडे ठेवतात; पण जेव्हा त्यांना इतर स्त्री-पुरुषात नव्हे सर्वच स्त्री-पुरुषात आकर्षण आहे, असे दिसून येते, तेव्हा ते आग लागलेली पाहून फायरब्रिगेडकरता धावणाऱ्याप्रमाणे धावपळ करतात! त्यांना वाटते स्त्री-पुरुष आकर्षणाची ठिणगी म्हणजे विझवून टाकण्याची एक गोष्ट होय. बौद्ध किंवा ख्रिस्ती संन्यासी चाहतात त्याप्रमाणे, ती पूर्ण विझवणे शक्य नसेल, तर 'इन्सेन्डियरी बॉम्ब' जसा अलगद उचलून नेतात तशी ती उचलून विवाहाच्या अग्निशामक खोलीत नेऊन ठेवणे तरी शक्य आहे! स्वस्त्रीखेरीज इतर सर्व स्त्रिया मायबहिणी समजण्याचा फतवा काढला की, हा प्रश्न सुटला, असेही काही अतिरेकी लोक मानतात!

लैंगिक आकर्षण ही विझवून टाकण्याची आग नसून सर्व समाजभर खेळवण्याची 'रोशनी' आहे, असे लॉरेन्स समजतो. अन् म्हणूनच तो आधुनिक संस्कृतीच्या रुक्षपणासंबंधी तक्रार करून म्हणतो "If only our civilization had taught us how to let sex-appeal flow properly and subtly......" आधुनिक संस्कृतीने जे शिकवले नाही, ते त्याच्या सर्व ग्रंथांची पारायण केलेले लोकच सांगू शकतील; मी सांगू शकणार नाही. अनिर्बंध समागम हे, 'सेक्स्-अपील' समाजभर खेळवण्याचे साधन खासच नव्हे; समागमाचे लॉरेन्स याने आपल्या कादंबऱ्यात जागोजागी केलेल उघड वर्णन हेही 'सेक्स अपील' (कामाकर्षण) कौशल्याने ("properly and subtly") खेळवण्याचे साधन खास नव्हे. लॉरेन्सच्या अनावृत्त समागमचित्रणाने, कामप्रवृत्ती ही मारून टाकण्याची वस्तु नव्हे हे आधुनिक जगाला जाहीर केले एवढेच काय ते. पण ती कौशल्याने समाजभर खेळवणे म्हणजे काय, हे मात्र लॉरेन्सने सांगितल्याचे माझ्या पहाण्यात नाही.

पण लॉरेन्स म्हणजे कोणी स्मृतिकार आचार्य नव्हता; की नव्या परंपरा पाडू शकणारा अकबरासारखा सम्राट नव्हता. कामरूप शक्ती (energy) खेळवण्याचे कार्य सांस्कृतिक परंपराच करू शकतील. सामाजिक समारंभ, सणवार, समाजात स्त्री-पुरुषांनी एकमेकांशी वागण्याच्या रूढी, सुसंस्कृत घरात आप्तांच्या आणि स्नेह्यांच्या स्त्रियांशी वागण्याचे शिष्टाचार म्हणजेच लॉरेन्सला हवा असलेला

अनुक्रमणिका

कामप्रवृत्तीचा योग्य आणि नाजूक विलास नव्हे का? स्त्री-पुरुषांच्या परस्पराकर्षणाचा सामाजिक आविष्कार जर औचित्याने आणि नाजुकपणाने व्हायचा असेल तर त्याचा मार्ग कोणता? संपूर्ण कामस्वातंत्र्य? की संपूर्ण कामनाश? कामस्वातंत्र्याने लॉरेन्सचे उद्दिष्ट साध्य होईल असा प्रथम दर्शनी भास होतो. लॉरेन्सलाही कदाचित तसा भ्रम असेल. असे त्याच्या कादंबऱ्यावरून वाटणे शक्य आहे. पण त्याच्या कादंबऱ्या फक्त कामप्रवृत्तीचे महत्त्व आणि सौंदर्य सांगतात. ती प्रवृत्ती, 'औचित्याने आणि नाजुकपणाने समाजात खेळवणारी' संस्कृती कशी असावी. ते सांगत नाहीत. त्याचे स्फुट लेख मात्र असे स्पष्ट सांगतात की आधुनिक विज्ञानप्रधान संस्कृतीला हा नाजूक खेळ साधलेला नाही. कारण सौंदर्य आणि विज्ञान याचे वाकडे आहे.

लॉरेन्सच्या मनातला लैंगिकतेचा अर्थ कोणता ते शोधून काढणे मोठे मजेचे होईल. तो म्हणतो, अगदी रूपहीन स्त्रीही सुंदर दिसू शकेल. तिच्या मुखावर कामुकतेची धग Sex glow नाजुकपणे धगधगू द्या, की ती सुंदर दिसू लागेल! आता इथे उघड आहे की, लॉरेन्सच्या 'सेक्सचा' अर्थ कामविकार हा नसून एकप्रकारचा लैंगिक उत्साह हा आहे, तो उलटपक्षी असे प्रतिपादतो की जर Sex glow (कामप्रभा) तेवढी उणी असेल तर "No one can be as acutely ugly as a pretty women" (तर देखण्या स्त्रीचे रूप जितके कुरुप भासेल तितके कुणाचेच भासणार नाही!). सौंदर्याचा आणि 'रूपाचा' (form चा) संबंध नाही असा काहीसा विलक्षण (पण रूपहीन माणसांना दिलासा देणारा!) सिद्धांत लॉरेन्स प्रतिपादीत आहे!

पण लॉरेन्सचा हा गूढवाद क्षणभर दृष्टीआड करून हरएकाला सुंदर बनवणारा हा Sex glow (कामप्रकाश) म्हणजे आहे तरी काय, तो असतो तरी कुठच्या तिजोरीत, याचा थोडा विचार केला पाहिजे. अन् त्याच्याकरता विज्ञान आणि शास्त्रज्ञ बाजूला ठेवून आपण अनुभव आणि कल्पनाशक्ती ही दोन साधीसुधी हत्यारे हाती घेतली पाहिजेत. त्याकरता आजच्या उपयुक्ततावादी समाजातून आपण जुन्या भाबड्या समाजात क्षणभर कल्पनेने शिरले पाहिजे.

चाळीस पन्नास वर्षापूर्वीचे चारपाच हजार वस्तीचे गाव डोळ्यापुढे आणा. 'आणा' कशाला?..... माझ्या डोळ्यापुढे चाळीस वर्षापूर्वीचा एक प्रसंगच येत आहे. त्यावेळच्या खाजगी बस सर्विसची लॉरी, मला जायचे होते त्या गावापासून चार मैलावर थांबत होती. वेळ दिवेलागणीची होती. मी पायीच झपाट्याने गाव गाठण्याचा यत्न करीत होतो. एका लहानशा खेड्यातून माझी वाट जात होती. एक देऊळ वाटेतच असल्याने त्या दिवेलागणाच्या वेळी मी देवळात शिरलो. शेजारच्या पिंपळावर कावळे ओरडत होते. देवळात गोड्या तेलाचे दिवे मिणमिणत होते. एक दोन बायका देवाच्या दर्शनापेक्षाही, घरची कर्मकटकट टाळण्याकरिता इतक्या तिन्हीसांजच्या त्या देवळाच्या कठड्यावर बसल्या होत्या. सर्व वातावरणात उदासपणा, कंटाळवाणेपणा भरून राहिला होता. या बायका वर्षानुवर्षे मुक्या जनावराचे जिणे कसे जगत असतील? ......तरुण वयातच त्या जगण्याला कंटाळलेल्या दिसत आहेत."...... असा विचार माझ्या मनात आल्याखेरीज राहिला नाही. थोड्याच वेळात मी माझे मुक्कामाचे गाव गाठले. ज्या दूरच्या आप्तांच्या घरी मला जायचे होते, त्यांचा गावही असाच लहान, पडक्या घरांचा, अंधाऱ्या बोळांचा होता. त्यांच्या घरीही अशाच तरुण स्त्रिया होत्या. अवेळी आलेल्या पाहुण्यामुळे बिचाऱ्याचे कष्ट वाढणार अर्थात वैतागही वाढणार, अशी माझी कल्पना परंतु त्यांचा तो उत्साह त्यांच्या चेहऱ्यावरचे ते सलज्ज औत्सुक्य पाहून मी आश्चर्यचकित झालो. माझ्याप्रमाणेच आणखीनही दोनतीन पाहुणे आधी येऊन दाखल झाले होते. वृद्धही होते तरुणही होते. पाहुण्यांच्या सरबराईत पडणाऱ्या कष्टामुळे घरातल्या स्त्रिया चिडखोर बनण्याऐवजी उत्सुक आणि उत्साही बनलेल्या दिसत होत्या. नवीन माणूस दिसण्याची मारामार असलेल्या त्या खेड्यात,

त्या स्त्रिया नावीन्याला आणि कौतुकाला तर भुकलेल्या नसतील? त्या खेड्यात कुठल्या वक्तृत्वस्पर्धा अन् कुठल्या नाट्यवाचनस्पर्धा! मिणमिणत्या उजेडात आडवा पदर खोऊन पाहुण्यांची सरबराई करतानाच त्यांना जणू स्टेजवर काम करीत असल्याचा उत्साह वाटायचा! वृद्धांची मितभाषी प्रशंसा, अर्थात आमटी चांगली झाल्याबद्दल व तरुणांचे मूक कुतूहल यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जी प्रभा झळकत होती, तोच लॉरेन्सला हवा असलेला कामप्रकाश अथवा Sex glow नसेल ना? त्या पाहुण्यात एकही पुरुष नसता, सर्वच स्त्रिया असत्या, तर त्या तरुण सुनांना एवढा उत्साह वाटला असता का? त्यांच्या मुखावर एवढी सलज्ज लाली दिसली असती का? देवळात दिसलेल्या त्या जिवंत 'सती' देखील तसे पाहिले तर, रूपाने आणि वयाने या स्त्रियांच्या एवढ्याच होत्या. देवळातल्या स्त्रियांच्या चेहऱ्यावर विशिष्ट भाव नव्हता; आणि या स्त्रियांच्या चेहऱ्यावर तो होता, हाच फरक!

लॉरेन्सला जे 'सेक्स अपील' हवे आहे, अन् जे आधुनिक तर्कटी, उपयुक्ततावादी फ्रॉइडपूजक युगातून नाहीसे झाले आहे ते हेच, असे मला वाटते. पण ते जर हेच असेल, तर जुन्या जमान्यात आजच्या जमान्यापेक्षा स्त्री-पुरुष आकर्षण अधिक होते हे कबूल करावे लागेल.

स्त्रियांचे जीवन, जितके उघड, निर्भीड आणि पुरुषसदृश होत आहे तितके त्यांचे आकर्षण (Sex appeal) कमी कमी होत आहे, असा याचा सरळ अर्थ आहे. स्त्री-पुरुषांचे संबंध जितके जितके व्यवहारी होतील. तितके तितके ते रुक्ष आणि सौंदर्यविहीन होतील. फार कशाला, स्त्रिया जर मुद्दाम आकर्षून घेण्याचा प्रयत्न करतील, तरीही त्या कमी आकर्षण बनतील. पाश्चात्य पद्धतीच्या 'क्लबलाइफ्' मध्ये स्त्रियांचा पुरुषांवर जितपत प्रभाव पडतो, त्यापेक्षा आपल्याकडील लग्नकार्यात अधिक पडतो, असे मला वाटते.

स्त्रीपुरुष आकर्षणाचे लॉरेन्सने जे विश्लेषण केले आहे, त्याचा अर्थ लक्षात घेण्यासारखा आहे. आधुनिक अर्थाच्या 'सेक्स-अपील' प्रमाणे हे नैसर्गिक आकर्षण, मुद्दाम घुलवण्याचा किंवा नादी लावण्याचा यत्न करीत नाही. लॉरेन्सच्या सिद्धांतातल्या स्त्री-पुरुषात भक्ष्य-भक्षक संबंध नाही; फारशी, उर्दू काव्यातले प्रख्यात सैयाद आणि बुलबुल (पारधी आणि पक्षी) हेही नाते नाही, तो अगदी साध्या शब्दात सांगतो की प्रत्येक स्त्रीला पुरुषाच्या उपयोगी पडण्याची (पुरुषाची सेवा करण्याची म्हणा हवे तर!) नैसर्गिक इच्छा असते. प्रत्येक पुरुषालाही स्त्रीच्या बाबतीत तशीच काहीशी इच्छा असते. या इच्छेने रूपांतर पुरुषांच्या स्त्रीदाक्षिण्यात होते, आणि स्त्रियांच्या लज्जाविनयादी भावविष्कारात होते. "ज्या स्त्रिया खोटे नखरे करतात त्या कामुक असतात", आणि "ज्या लाजतात त्या कामुक नसतात", या कल्पनेइतकी खुळी कल्पना दुसरी कोणतीच नाही! पण आधुनिक स्त्री-पुरुषांनी तशी खुळी कल्पना करून घेतलेली दिसेल.

आजचे विज्ञानपंडित जग अशा साध्या चुका कशा करील अशी शंका येणे शक्य आहे. पण विज्ञानपांडित्याने मनुष्य बहिर्मुख बनतो. बहिर्मुखतेमुळे तो स्थूलबुद्धीचा बनतो; आणि स्थूल दृष्टीच्या माणसाला कामविकारासारख्या नाजूक, आणि नाटकी विकाराचे गुप्त आणि चोरटे चाळे कसे कळणार?

लैंगिक प्रवृत्ती झाकण्यातच तिचा उत्कर्ष आहे; स्त्री-पुरुषांच्या लज्जाविनयातच कामाकर्षणाचा आणि कामविलासाला अधिक आवाहन आणि अवसर आहे, हे आजच्या नागड्या आणि ढोबळ विज्ञानयुगाला कसे कळणार? लज्जेत, विनयात आणि दूरतेत परस्पराकर्षणाची जी ओढ आणि लज्जत आहे ती तर लॉरेन्सच्या Sex glow मध्ये अभिप्रेत नाही?

अनुक्रमणिका

निदान आजच्या विशेषज्ञ युगाला जी लज्जत ठाऊक नाही आणि जुन्या अज्ञ युगाला जी पुरती माहीत होती, ती लज्जाभावातली आणि गूढतेतली लज्जत होती खास! ती आजच्या युगातल्या खुल्या व्यापारात राहिली नाही हेही खास!

लोकसत्ता, दिवाळी-१९६२
पृ. २०-२४, २६, २८

---

**संदर्भ**

प्रस्तुत लेखातील अवतरणे डी. एच. लॉरेन्स यांच्या 'सेक्स व्हर्सेस लव्हलिनेस' या निबंधातील आहेत. तो निबंध त्यांच्या Selected Essays, Harmondsworth, Middlesex, penguin, 1950, या संग्रहामध्ये समाविष्ट आहे. पृष्ठ १३-१८

अनुक्रमणिका

# ६
# शील आणि अब्रू

**इं**ग्रजांचे या देशावर राज्य झाल्यावर आपल्यातील पुरोगामी लोकांनी स्वीकारलेल्या इंग्रजांच्या कित्येक नीतिकल्पना आणि औचित्यकल्पना, शिष्टाचार व फॅशन याचीं यादी द्यायची म्हटली तर ती फारच मोठी होईल. शिवाय शिष्टाचारांचा सभ्यतेशी संबंध नसल्याने, मी त्यांचा येथे विस्तार करणार नाही. तरी पण इंग्रजांना 'महाजन' समजून आपण ते ज्या मार्गाने जातीत 'तोच मार्ग' (स पन्थाः) कसा गिरवीत होतो व अद्याप गिरवीत आहोत हे दाखविण्यापुरताच उल्लेख करतो. इंग्रज येण्यापूर्वी रस्त्यातूनही केवळ उपरणे घेऊन (सदरा बंडी न घालता) जाणाऱ्या महाराष्ट्रीय पुरुषांना, इंग्रज येताच, पावले आणि पिंढऱ्या उघड्या टाकण्यात असभ्यता आहे हे पटले! अन् लगेच वर्षातील आठ महिने ज्या मुंबईसारख्या शहरात घामाच्या धारा लागतात, त्यातही पायमोजे घालून हिंडणारे लोक दिसू लागले. स्त्रियांनी कासोटा घालण्याला फाटा दिला, यालाही कारण अंशतः कासोट्याच्या नेसण्यात पिंढऱ्या गार्टर घातल्यावरही, उघड्या पडतात हेच. पण अशा प्रकारे परक्यांच्या औचित्य-कल्पना घेण्याने आपण अधिक सुधारलो म्हणून आनंद मानावा तो छातीच्या बाबतीत आमच्या स्त्रियांनी आपल्या विनयकल्पना बऱ्याच सढळ आणि सैल केल्या. स्त्रियांची छाती केवळ तंग वस्त्रांनी झाकणे पौर्वात्य औचित्यकल्पनांप्रमाणे पुरेसे नाही. कारण अशा तंग वस्त्रांनी स्त्रीच्या वक्षःस्थलाच्या आकाराकडे अधिक लक्ष वेधते व पौर्वात्य स्त्रीला त्यामुळे संकोचल्यासारखे होते. म्हणून पदराने किंवा ओढणीने तो भाग पुन्हा झाकण्याची पद्धत आहे. अगदी परवा परवा पूर्व-पाकिस्तानातून आलेली एक वार्ता या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. डाक्का शहरात दोन-तीन तरुण मुसलमान स्त्रिया तंग पोषाख करून रस्त्याने जाऊ लागल्यामुळे लोकक्षोभ होऊन पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला. स्त्रियांच्या छातीच्या आवरणाला आपल्या पौर्वात्य सभ्यतेत इतके खोल स्थान असतो, अलीकडे पदराला उपरण्यासारखे एका खांद्यावर स्थान देण्याचे जे 'धैर्य' आमच्या स्त्रिया दाखवित आहेत. त्याला कारणही इंग्रजी औचित्यकल्पना शिरोधार्य मानणे हेच आहे! पिंढऱ्या उघड्या पडल्या तर आपण अस्वस्थ व्हायचे, की छाती उघडी पडली तर अस्वस्थ व्हायचे, हे देखील आमच्या स्त्रिया इंग्रजांकडून शिकू लागल्या!

अर्थात् लैंगिक नीतिविषयक कल्पनांतही आपण इंग्रजांकडे 'महाजन' अथवा 'गुरुजन' म्हणून पाहू लागलो. दारू पिणाऱ्या माणसाला आपण प्रायः 'मवाली' तरी, नाही तर अगदी 'कामातून गेलेला' तरी, समजत असू. अद्यापही आपल्या देशात उघडपणे दारू पिणे सभ्यपणाचे समजले जात नाही. मेजवानीनंतर ज्याप्रमाणे पानाचे तबक किंवा सिगारेटच्या पेट्या फिरविल्या जातील, तशा दारूच्या बाटल्या हिंदू-मुसलमान दोन्हीही समाजात फिरविलेल्या दिसणार नाहीत. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निघालेल्या वाङ्मयात परदेशात का होईना आपण अमुक अमुक जातीची मद्ये चाखली, असे उल्लेख प्रवासवर्णनाच्या निमित्ताने करणारे वीर आढळतात! हिंदुस्तानाच्या ज्या प्रांतात अलीकडे कायदाने दारूबंदी आहे, त्या प्रांतातही सैन्याला दारूबंदी नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. म्हणजे जे व्यसन पूर्वीच्या काळात उघडकीला आले तर प्रतिष्ठित भारतीय माणसाची बेअब्रू होत असे, त्याला स्वराज्यात कायदेशीर 'स्टेटस' मिळाले आहे!

पण या नव्या पातकाचे प्रायश्चित आपण काही नवे सोवळेपण पत्करून घेऊ पाहात आहोत. हिंदू धर्माप्रमाणे बहुपत्नीकत्व हे पाप नव्हे. तो धर्माने मंजूर केलेला एक रिवाज आहे. जुन्या काळी ज्याचे एकच लग्न झाले आहे असा पुरुष राजेरजवाड्यात तर मिळणेच अशक्य होते. सरदार लोकांचीही अनेक लग्ने

अनुक्रमणिका

झालेली असत. किंबहुना एकाहून अधिक लग्ने होणे हे सुखवस्तूपणाचे एक लक्षणच असे. समाज त्यात काही 'गौण' मानत नसे. अत्यंत नीतिमान म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींनाही अनेक भार्या असत. शिवाजी महाराजांचे एकच उदाहरण या बाबतीत पुरेसे आहे. अर्थात 'एकपत्नी' राजाचे आपण कौतुक करीत होतो हेही खरे आहे. पण एकपत्नीत्वाचे कौतुक होत असे, याचाच अर्थ बहुपत्नीकत्व सार्वत्रिक होते असा आहे.

या बाबतीत धर्माची सम्मती-आणि विशिष्ट परिस्थितीत आज्ञा असूनही आपण स्वराज्यात बहुपत्नीकत्व हा कायद्याने गुन्हा ठरविला. हा कायदा अर्थातच प्रथम आमच्या पुरोगामी मुंबई राज्यात झाला. आणि नंतर तसाच अखिल हिंदुस्तानकरताही करण्यात आला, हा कायदा करताना आपण एका प्राचीन समाजाच्या धार्मिक स्वातंत्र्यात हात घालीत आहोत याची जाणीव आमच्या स्वराज्याला होती. म्हणून भारतातील जो समाज ख्रिस्ती नीतिकल्पना भारतीय नीतिकल्पनांपेक्षा श्रेष्ठ समजत होता, त्याच्या पुरताच हा कायदा केला आणि तो मुसलमान समाज आपले धर्मशास्त्र वा 'शरीयत' ख्रिस्ती धर्माशास्त्रापेक्षा कुठल्याही प्रकारे कमी मानायला तयार नव्हता, त्या स्वाभिमानी मुसलमान समाजाला हा कायदा लागू नाही. पण ते कांहीही असले, तरी एका अत्यंत महत्त्वाच्या कौटुंबिक नीतिकल्पनेत आम्ही इंग्रज 'महाजनां'चे अनुयायित्व पत्करून आमच्या घसरत्या सोवळेपणाची भरपाई केली.

आणखीही एक सामाजिक नीतिकल्पना आम्ही इंग्रजांपासून उचलू पाहात आहोत. ती कल्पना म्हणजे वेश्याव्यवसायाचे उच्चाटन. आज पाश्चात देशात वेश्याव्यवसायाची स्थिती कायद्याने काय आहे व प्रत्यक्षात काय आहे, हे परदेशात जाऊन आलेले लोकच सांगू शकतील. तथापि वेश्याव्यवसायाचे उच्चाटन हे तिकडील पुरोगामी शासनसंस्थांचे अंतिम ध्येय आहे एवढे तरी खास, आपणही पुढारलेल्या पाश्चात्य देशाचे अनुचर व्हायचे ठरविले असल्याने, या बाबतीत अधूनमधून हालचाल, निदान जाहीर संकल्प करीत असतो. आज आपण वेश्याव्यवसायनिर्दालनाच्या कार्यक्रमात पाश्चात्यांच्या पुढे आहोत का मागे आहोत, कोण जाणे! पण असेही एक मत आहे की जिला 'prostitute street walker' किंवा 'बाजारबसवी' हे नाव देता येईल, अशा स्त्रीचा वर्ग हिंदुस्तानात ब्रिटिश येण्यापूर्वी नव्हता. अर्थात या मताचा खरेखोटेपणा इतिहासतज्ज्ञ आणि समाजशास्त्रज्ञच पडताळून पाहू शकतील. पण माझ्या अल्पमतीला, हे मत खरे असणे संभवनीय वाटते. मुंबईसारख्या शहरात त्या तऱ्हेचा वेश्यावर्ग हिंदुस्थानात ब्रिटिश अंमलापूर्वी असण्याचा संभव कमी होता. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात गणिकांचे व त्यांच्या व्यावसायिक कायद्यांचे उल्लेख केलेले आहेत. परंतु त्या गणिकाही आजच्या औद्योगिक व बकाली शहरातील वेश्यांच्या दर्जाच्या असतीलसे वाटत नाही. मराठी रियासतीत तर आजच्या सारखी वा कौटिल्याच्या काळच्या सारखी प्रचंड शहरे नव्हतीच. पुण्याच्या ऐन वैभवकाळी—नाना फडणविसाच्या काळी—पुण्याचा उल्लेख एका इंग्रज वकीलाने 'A big Village' (एक मोठे खेडे) या शब्दांनीच केलेला आहे. अशा खेड्यात श्रीमंतांच्या उदार आश्रयाला पात्र झालेल्या — रमण, चिमण, साळू, मैना बकुळा— अनेक असल्या तरी पुण्यात मुंबईसारखी कांदेवाडी, फोरस रोड वसण्याएवढी अनोळखी बकाली वस्ती असणे शक्य नव्हते. मुंबईसारखे कारखानदारीचे आणि आंतरराष्ट्रीय दलालीचे शहर इंग्रजांनी वाढीला लावल्याबरोबर प्रांतोप्रांतीच्या हरहुन्नरी लोकांप्रमाणेच कलावंतिणी आणि वेश्याही येऊन दाखल झाल्या.

पण वेश्याव्यवसायाच्या उच्चाटनाच्या—वा उच्चाटन—संकल्पाच्या, आजच्या 'पुरोगामी' काळात कलावंतिणी, रक्षा आणि वेश्या यातील फरकही स्पष्ट करून सांगितला पाहिजे!

लग्न न करता गाणे, नाचणे इ. कला शिकणाऱ्या व एखाद्या धनिकाच्या आश्रयाने राहणाऱ्या स्त्रियांचा एक वर्ग हिंदुस्तानात प्राचीन काळापासून आहे. अशा स्त्रियांना कुलीन लोकांच्या कित्येक समारंभात व प्रत्यक्ष देवाच्या देवळातही परंपरागत आणि समाजसम्मत असे स्थान आहे. त्यांचा 'उद्धार' करण्याची भाषा ब्रिटिश काळापूर्वी तर निघणे अशक्यच होते. इतिहासकाळातील दुसरा समाजमान्य वर्ग म्हणजे 'रक्षां'चा अथवा 'रखेल्यांचा' शहाजी राजे यांचा 'रक्षापुत्र', बाजीराव साहेबांचा 'रक्षापुत्र', यासारखे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात लाजत लपत, शरमिंदेपणाने येत नसून राजरोस येत असतात. शहाजी राजांचा रक्षापुत्र हिरोजी फर्जद विश्वासू सेवक म्हणून शिवाजी महाराजांबरोबर औरंगजेबाच्या दरबारात गेला होता. आणि मुद्रासादृश्यामुळे त्यांचा 'Double' 'सदृशाकृती' म्हणून संकटकाली शिवाजीच्या संरक्षणाला त्याचा उपयोगही झालेला दिसतो. बाजीरावाचा रक्षापुत्र समशेर बहाद्दर पेशवेकुलीन श्रीमंत पुत्रांबरोबर पानिपतच्या रणांगणावर गिलच्यांविरुद्ध लढला, हे प्रसिद्धच आहे. मस्तानीच्या जिवंतपणी तिचा व बाजीरावाचा शनिवारवाड्याने कितीही दुस्वास केला असला, तरी तिच्या पश्चात तिचे हिरण्यश्राद्धही होत असे व सुवासिनीला चोळीबांगडी दिली जात असे, असा उल्लेख सापडतो. तिला पेशवे—कुटुंबातील मंडळींनी अटकेत ठेवली, तेव्हा 'समन्वयवाद्यां'चे जणू आद्य—पुरुष जे थोरले शाहू महाराज, त्यांनी दिलेला फैसला नमुनेदार आहे. ते म्हणाले, "ज्याचे माणूस त्याच्या स्वाधीन करा!" त्या काळात अशा 'रक्षाबंधना'ला राजमान्यता होती, हेच या ऐतिहासिक फैसल्यात नमूद झाले आहे, असे म्हणता येईल. शाहू महाराजांच्या या उदार धोरणाचे नवल करण्याचे कारण नाही. शाहू महाराजांच्या पश्चात त्यांच्या रक्षा खुषीने सती गेल्या; तर त्यांच्या राणीवर राजकीय आणि धार्मिक 'प्रेशर' आणावे लागले! हो! आणखी एका मुक्या जीवाने सहगमन केले!—महाराजांच्या त्या इमानी कुत्र्याची समाधी आजही माहुली येथे कृष्णातीरी पाहावयास सापडेल.

पण रक्षांच्या (अथवा रखेल्यांच्या) राजमान्यतेवरून आणि एकनिष्ठेवरून या सर्व ऐतिहासिक हकीकती आठवल्या व थोडे विषयांतर झाले. मुख्य गोष्ट ती ही की, या रक्षा म्हणजे एका अर्थी उपस्त्रिया किंवा लग्नविधिविहीन भार्याच असत. चिनी साहित्यिक—तत्त्ववेत्ता लिन यूटांग, याने या संबंधात एक गमतीदार अभिप्राय व्यक्त केला आहे. तो म्हणतो, "A wife without children is a mistress and a mistress who has children is a wife" (ठेवलेल्या स्त्रीला अपत्यप्राप्ती झाली की, तिला पत्नीच म्हटले पाहिजे; आणि लग्नाच्या बायकोला मुले झाली नाहीत—वा टाळले!—की तिच्यात आणि रखेलीत फरक नाही!) लिन युटांग यांच्या अभिप्रायाशी मी सहमत नाही. तथापि भारत आणि चीन या दोन्ही पौर्वात्य देशात 'रक्षा' अथवा Concubine या संस्थेला प्रायः सारखाच दर्जा होता, हे चीनसंबंधीचे वाङ्मय वाचणाराना सांगावयास नकोच. इंग्लंड आणि फ्रान्स या दोन देशाच्या इतिहासात कित्येक राजांच्या रक्षांची नावे आणि ऐश्वर्य नमूद झालेली आढळतील. अर्थात पाश्चात्य ख्रिस्ती राजांच्या वैवाहिक जीवनाची ही दुसरी बाजू लक्षात घेतली, म्हणजे त्यांच्या एकपत्नीकत्वाच्या प्रखरतेने दिपून जाण्यासारखी स्थिती नाही हे लक्षात येते. जी स्थिती राजेलोकांची तीच कमी—अधिक प्रमाणात सरदारदरकदारांची आणि अर्थात आधुनिक लक्षाधीशांची! सत्ता आणि संपत्ती या दोन नगांच्या आड ज्यांचे जीवन सुरक्षित आहे, त्यांच्या एकपत्नीकत्वाचा अर्थ कोणत्याही देशात बराच अघळपघळ असतो. पूर्वीच्या युगात श्रीमंतीबरोबर अथवा खानदानीबरोबर मनुष्याला समाजात आणि राजदरबारात मान्यता येई. अर्थात या मान्यतेमुळे कित्येक जबाबदाऱ्याही येत. आजच्या युगातील एक नवा चमत्कार अथवा Phenomenon असा आहे की, येथे खानदानीशिवाय श्रीमंती नजरेस पडते! अर्थात जुन्या युगातले श्रीमंत सत्तेच्या जोरावर जेवढी अनीती पचवीत, तेवढीच आजच्या भांडवलशाही युगातले श्रीमंत, उपरेपणाच्या अथवा कुलहीनतेच्या जोरावर पचवू शकतात!

मुख्य मुद्दा हा आहे की, अशा स्थितीत एकपत्नीत्वाचा कायदा आणि वेश्यांच्या उच्चाटनाचा संकल्प, यांना अर्थ कितपत आहे? आणि या दोहोनाही, पुढच्या दारी 'छीः थूः' करून मागच्या दाराने आत घेणे एवढाच अर्थ असेल, तर जुनी नीती आणि नवी नीती, जुने जनानखानेवाले राजे, आणि नवे नाइटक्लबवाले लखपती यांत फरक काय? आणि नव्या कायद्यांनी वर्तमानपत्री प्रगतिवादाव्यतिरिक्त साधले तरी काय? या संबंधात एक पुढारलेल्या देशातील नियतकालिकाची आजच्या लंडनसंबंधी साक्ष मोठी बोलकी आहे. ते नियतकालिक म्हणते—

"Since girls were driven off the streets four years ago, they have taken to advertising their services in shopwindows as "masseuses" "models" or "French teachers" London's booming strip-tease Parlours offer some of the crudest live pornography to be seen publicly in Europe. Its parks in summer are pre-empted by couples who aren' just necking."

या उताऱ्याने येथे शब्दशः भाषांतर देणे मी अनेक कारणांनी टाळतो. पण त्याचा मतलब असा सांगता येईल की, वेश्याव्यवसाय बंद केल्यावर त्याच स्त्रिया दुकानातून 'मसाज' अथवा मर्दन करणाऱ्या परिचारिका म्हणून किंवा चित्रकारांच्या मॉडेल म्हणून किंवा फ्रेंच शिक्षिका म्हणून आपली जाहिरात करू लागल्या. लंडनमधील नग्नप्राय सुंदरीनी गजबजलेल्या क्लबज्इतकी चालती बोलती ग्राम्य लैंगिक चित्रे साऱ्या युरोपात अन्यत्र दिसणार नाहीत. उन्हाळ्यात लंडनमधील पार्कस् प्रेमी युगुलांनी आधीच 'रिझर्व्ह' केलेले असतात—आणि ती युगुले केवळ चुंबनालिंगनावर थांबतात असेही नव्हे!

अर्थात हे सर्व 'लंदनरहस्य' अमेरिकेन साप्ताहिकात आलेले असल्याने, त्यातून 'अतिशयोक्ती' म्हणून काही टक्के बाद केले पाहिजेत. प्रत्येक देश दुसऱ्या देशाची नीतिमत्ता शिथिल आहे असे मानतो, हे आपण आपल्याकडेही पहातो. या सोवळ्या अहंकाराबद्दल अथवा "Prudery" बद्दल इंग्लंडची विशेषच ख्याती असल्यामुळे, इंग्लंडच्या अब्रूत छिद्र सापडले की, इतर राष्ट्रे त्याच्यावर तुटून पडणे स्वाभाविक आहे. तथापि ज्या इंग्रजी सभ्येतेच्या धसक्याने आमच्याकडील सुधारकांनी स्त्री-पुरुषांच्या पिंढऱ्या झाकण्याची तरतूद करण्यापासून ते सक्तीने एकपत्नीकत्व लादण्यापर्यंत सर्व धावपळ केली; त्या इंग्रजी सभ्यतेची हकीकत एकंदरीत आधी म्हटल्याप्रमाणे आहे!

पण इंग्लंडच्या आजच्या लैंगिक नीतीबद्दल चुकीचा ग्रह निर्माण केला जाऊ नये म्हणून एक गोष्ट सांगितली पाहिजे. 'दुरुस्त वर्तनाबद्दलचा' इंग्लंडचा तोरा जसा वृथा होता, तसा अलीकडेच इंग्लंडच्या प्रधानमंडळातील एका महत्त्वाच्या पदाधिकाऱ्याबद्दल चारी खंडाच्या वृत्तपत्रांनी केलेला गवगवाही वृथाच होता. लॉर्ड मेकॉले याने बायरन्‌संबंधाने लिहिताना तऱ्हेवाईक थट्टा केली आहे. तो म्हणतो, मोठमोठाल्या अनैतिक भानगडींच्या वेळी झोपून राहून, मध्येच एखाद्या क्षुल्लक वैयक्तिक प्रमादाची जाहीर धिंड काढणे, हा इंग्रजी नीतीचा रिवाजच आहे. इंग्लंडच्या मिनिस्ट्रीमधील एका अँग्लो-इटालियन लॉर्डने, 'मॉडेल' म्हणून चित्रकारापुढे हव्या त्या वस्त्रात (वा वस्त्राविरहित!) बसणाऱ्या एका पोरसवदा स्त्रीशी रंग केला, ही गोष्ट मोठीशी अघटित आहे असे नव्हे. कोणत्याही देशातील श्रीमंत आणि सुखवस्तु वर्ग कोणत्या ना कोणत्या चैनबाजीत गुरफटतोच. लॉर्ड प्रोफ्यूमोच्या प्रकरणात ब्रिटिश प्रधान मंडळांतीलच एकाने म्हटल्याप्रमाणे "It is harder for the rich or the relatively secure to be pure." अशा स्थितीत १९६३ मध्ये आपले उद्योग व आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून शिवाय एखादी कामिनी सांभाळणाऱ्या एका

तलवारबहाद्दर लॉर्डच्या खाजगी जीवनाची चर्चा जगातील सर्वात ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित लोक-प्रतिनिधी सभेत होण्याचे कारण काय? पण या प्रेमप्रकरणाची वा शृंगारप्रकरणाची चर्चा केवळ त्या देशाच्या पार्लमेंटमध्ये होऊन थांबली नाही. इंग्लंडच्या व अमेरिकेच्या वृत्तपत्रांनी हा जणू राजकीय क्रान्तिकारकाचा खटला असल्याप्रमाणे त्याची तपशीलवार सचित्र हकीकत छापून, सूक्ष्म धर्माधर्म व कर्माकर्म चर्चा केली! आणि त्याहूनही मूर्खपणाचा आणि गुलामी अनुकरणाचा प्रकार म्हणजे, आमच्या भारतीय-इंग्रजी व देशभाषीय-वृत्तपत्रांनी पाच हजार मैलावरील देशात प्रायः वेश्यागृहातच घडलेल्या या भानगडीला जणू स्वतःच्या देशातील राज्यक्रान्तीइतके महत्त्व दिले!

इंग्लंडमधील या लॉर्डाच्या व्यभिचारी चैनबाजीबद्दल ओरडा करण्याचा अधिकार फार तर दोघांनाच होता. एक म्हणजे त्या लॉर्डची पत्नी; आणि दुसरा म्हणजे ज्या मिनिस्ट्रीत लॉर्ड प्रोफ्यूमो होता त्या मिनिस्ट्रीचा प्रमुख. पण मॅकमिलनचा तरी संबंध या भानगडीमुळे राजकारणाची जबाबदारी टाळली गेली तरच! वा राजकारणाचा दर्जा खालावला तरच! लॉर्ड प्रोफ्यूमोची पत्नी—मूळची एक नटी या प्रकरणात फारच संयमाने वागलेली दिसते. अर्थात संभाव्य 'फिर्यादी' व्यक्तीपैकी एका व्यक्तीचा प्रश्न मिटला. मुख्यमंत्र्याने लॉर्ड प्रोफ्यूमोच्या ढिल्या वर्तनाची दखल घेणे आणखीही एक कारणाने अत्यंत जरूर होते हे प्रसिद्धच आहे. या प्रकरणात अनेकांना भोवलेल्या क्रिस्टाइन कीलरशी आणखी एका परकीय वकिलांतीतील अधिकाऱ्यांचाही संबंध होता. अर्थात इंग्लंडसारख्या तालेवार राष्ट्राचा युद्धमंत्री केवळ शीलभ्रष्ट स्त्रियांच्या संपर्कातच गुरफटला होता असे नव्हे, तर राजकीयदृष्ट्या तो गाफील आणि अजागळ (Naive and negligent) होता. कोणत्याही मंत्र्याने किंवा मुत्सद्याचे कामजीवन राष्ट्रीय सुरक्षिततेला छिद्रे पाडू लागले, तर ते त्याच्या खाजगी मालकीचे राहू शकत नाही. आणि म्हणूनच ब्रिटनच्या युद्धमंत्र्याला मुख्यप्रधान कानपिचक्या, वा अर्धचंद्र देत नाही, असे पाहिल्यावर विरोधी पक्षाच्या हॅरोल्ड विल्सनला या कुंटणखान्यात डोकवावे लागले. आणि मग जी गोष्ट मंत्रिमंडळाच्या दारे लावलेल्या खोलीतच निस्तरली जाण्यासारखी होती, ती चवाठ्यावर आली.

इंग्लंडमध्ये नुकत्याच गाजलेल्या या अनंगरंग प्रकारचा उल्लेख या लेखात करण्याचे कारण आता सांगितले पाहिजे. ज्या गोष्टी कोणत्याही देशातील श्रीमंत व सत्ताधारी वर्गाच्या बाबतीत नवीनही नाहीत की अपवादात्मकही नाहीत त्या जणू जगाच्या इतिहासात प्रथमच घडल्याइतका त्यांचा बोभाटा केला जावा, याचे इंगित काय? याचे इंगित हे की, जुन्या जमान्यात राजेरजवाड्यांची चैनबाजी राजेरजवाड्यांसारखीच चालत असल्याने, तिचा चवाठा होत नसे. राजांच्या आणि लॉर्डांच्या रक्षा त्यानी बांधून दिलेल्या वाड्यात, प्रायः उपस्त्रियांसारख्या रहात. त्यांच्याकडे स्वदेशातील प्रतिपक्षाचा मनुष्यही येणे कठीण, मग परराष्ट्रांच्या वकिलांतील माणूस फिरकेल कसा? या प्रकरणात ब्रिटनच्या मंत्रिमंडळातील एक लॉर्ड मुंबईच्या किंवा न्यूयॉर्कच्या एखाद्या शेटियाप्रमाणे फाटक्या लोकांच्या बाहेरख्यालीत सामील झाला, ही गोष्ट 'नवीन' आहे. इंग्लंडमधील एका वृत्तपत्रातील स्तंभ लेखिकेने यासंबंधात हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. लॉर्ड प्रोफ्यूमोचे प्रकरण नैतिक व रहाता राजकीय काझाले, हे सहज कळू शकते; परंतु अशा नाजूक राजकीय प्रकरणाला एखाद्या सिनेमा नटीचे प्रेमप्रकरण समजून त्याची जाहिरात आणि त्यातून प्राप्ती करण्याचे इंग्रजी वृत्तपत्रांनी का ठरविले, हे मात्र कळत नाही. "आमचे लॉर्ड आणि आमचे मंत्री एरव्ही सोवळे आहेत" असे सूचित करण्याकरिता या एकुलत्या एका प्रकरणाचा बोभाटा केला, असे तर नाही ना? पण परिणाम मात्र उलट झाला! आणि इंग्लंडमधील अनेक बड्या धेंडांच्या भानगडींची जाहीर उजळणी झाली.

अनुक्रमणिका

"प्रोफ्यूमोच्या प्रकरणासारखी प्रकरणे ही अपवादात्मक होत; इंग्रज जनतेच्या मनाला त्यामुळे धक्का बसतो" हे सोंग इंग्रजी वृत्तपत्रांना का करावे लागले; हे पहाण्यासारखे आहे. आम्ही एकपत्नीकत्व हेच तेवढे नैतिक समजतो, बहुपत्नीकत्व हे पाप मानतो हे पहिले ढोंग; चार्लस् द सेकण्डच्या काळात लोकसम्मत असलेली रक्षापद्धती ही मागासलेल्या समाजाची पद्धत होय; आजच्या पुढारलेल्या जगात 'रक्षा' उर्फ 'मिस्ट्रेस' ठेवणे हे आम्ही भयंकर मानतो, हे दुसरे ढोंग. आजच्या समाजात वेश्यांना स्थान नाही; हे तिसरे ढोंग होय. आणि लॉर्ड आणि कॉमनर हा भेद आजच्या इंग्लंडमध्ये नष्ट झाला आहे, हे चौथे ढोंग होय. ही सर्व ढोंगे सांभाळण्याचा परिणाम झाला की, पिढीजाद मुत्सद्दी म्हणून गाजलेल्या ब्रिटनच्या युद्धमंत्र्यांची अर्धशैय्या भोगणाऱ्या स्त्रीकडे हवा तो मनुष्य पैशाच्या जोरावर येऊ शकला! असा प्रकार फक्त 'पुढारलेल्या' राष्ट्रातच होऊ शकेल. मागासलेल्या राष्ट्रात श्रीमंतांची चैनबाजी लपविण्याची गरजच नसल्याने, श्रीमंत लोकांच्या उघड रक्षा असत. आणि त्या उघडपणे त्यांच्या असल्याने 'रक्षा'च असत, 'वारयोषिता' बनत नसत; व त्या यजमानाच्या आणि राष्ट्राच्या जिवावर उठण्याचा संभव नसे.

पहिल्या बाजीरावापासून बहुतेक सर्व पेशव्यांच्या रक्षा होत्या. इतकेच काय पण नानाच्या वेळेला पुण्यात बरेच दिवस राहिलेल्या अविवाहित इंग्रज वकिलाने (मॅलेट साहबाने) एक मुसलमान बाई ठेवलेली होती. स्वतः नाना फडणवीसाचेही विवाहबाह्य प्रेमसंबंध होते अशा वदंता आहेत. परंतु जुन्या आणि मागासलेल्या मराठेशाहीतील या सर्व कामजीवनाचा बाजार झालेला दिसत नाही. नानासारख्या पाताळयंत्री माणसाला स्त्रियांच्या द्वारे इंग्रजांचा वा निजामाचा घरभेद करता आल्याचे नमूद नाही. उलट रक्षांच्या आणि कलावंतिणींच्या यजमाननिष्ठेच्याच नव्हेत, तर राष्ट्रनिष्ठेच्याही हकीकती नमूद आहेत.

सवाई माधवरावाच्या लग्नात (की मुंजीत स्मरत नाही!) निजामाकडील एक प्रख्यात नर्तकी नृत्याकरिता पुण्यात आली होती. तिचे नृत्य चालू असता नाना फडणविसासह सर्व दरबारी, मानकरी, मुत्सद्दी हजर होते. नृत्याच्या आवेशात तिच्या गळ्यातील बहुमोल मोत्याचे पेंडे सुटून त्यातील मोती खाली ओघळले. प्रेक्षकातील कोणा सरदाराने त्या गोष्टीकडे या हैद्राबादी कलावंतिणीचे लक्ष वेधल्यावर, ते मोती वेचण्याऐवजी तिने केलेले उत्तर पहाण्यासारखे आहे. "आमच्या राज्यात खाली पडलेले मोती वेचण्याची रीत नाही"! असे ती म्हणाली! तिने केलेला हा 'स्टंट' पूर्वनियोजितही असेल. पण पेशवे दरबार आणि निजामाचा दरबार यांच्यामध्ये असलेल्या स्वाभिमानयुक्त स्पर्धेची कदर, जिला आज आपण 'वेश्या' म्हणू, अशी नर्तकीही किती करीत होती, हे पहाण्यासारखे आहे. तिच्या हैद्राबादमधील 'कोठी'त गोविंदराव काळे किंवा अन्य कोणी पुणेरी मुत्सदी जाऊन निजामाचा भेद काढील, अशी काय प्रज्ञा लागून गेली होती?

यजमानाबरोबर सत्ती जाणाऱ्या, स्वतःच्या राज्याचा लौकिक वाढविण्याकरिता मूल्यवान मौक्तिकहारही न उचलता तसाच पडू देणाऱ्या, रक्षा व कलावंतिणी ज्या जमान्यात होत्या, त्या जमान्याला मागासलेला म्हणून आपण आज खुशाल नाक मुरडावे, पण बाजीरावाची मस्तानी आणि ही हैद्राबादी नायकीण, या कायमच्या गेल्या; पण त्यांची जागा कडक एकपत्नीव्रताने भरून काढली, असे मात्र दिसत नाही! लंडन काय किंवा दिल्ली काय, सर्व पुढारलेल्या राजधान्यात, आज इमानी कलावंतिणींची जागा जर बेइमान 'कुलीन' स्त्रियांनी घेतलेली असेल, तर आजचे युग पुढारलेले म्हणणे मला तरी कठीण वाटते. 'बेइमान कुलस्त्रिया' या शब्दसंहितेचा अर्थ स्पष्ट केला नाही, तर माझे पुरोगामी मित्र रागावतील, म्हणून थोडा खुलासा करतो. मिस् कीलर ही देखील 'आपण वेश्या नाही' हे त्वेषाने सांगते, आणि 'ती वेश्या आहे' असे कोर्टात सिद्ध झालेलेही दिसत नाही. म्हणून तिला कुलस्त्री म्हणणे प्राप्त आहे. अन् तिच्याकडे परराष्ट्राच्या वकिलातीतील मुत्सद्दीही येऊ शकत असल्याने. निदान पेशवाई आणि निजामशाहीत तरी ती

इमानी ठरली नसती! म्हणून या दोन जमान्यांतल्या विवाहबाह्य संबंधाच्या स्त्रियांना मी अनुक्रमे ‘इमानी कलावन्तिणी’ आणि ‘बेइमान कुलस्त्रिया’ असे दोन शब्द वापरले!

वेश्याव्यवसायाचे उच्चाटन करून सर्व वेश्यांची लग्ने लावून देण्याची उमेद बाळगणारे आमचे पाश्यात्यशिष्य सुधारक काहीही म्हणोत, मला तर असे वाटते की, समाजाला धोका उघड आणि समाजमान्य वारयोषितांपेक्षा संशयित कुलीनतेच्या कीलरसदृश्य स्त्रियांकडूनच अधिक आहे. तसेच व्यक्तीला आणि धर्माला शीलाचे केवढेही महत्त्व असले, तरी समाजाला महत्त्व शीलापेक्षा अब्रूचे अधिक आहे. जुन्या श्रीमंतांचे शील निष्कलंक नसूनही ते अब्रूदार असत. याचे कारण त्यांचा ज्या वारांगनांशी वा रक्षांसी संबंध येई, त्यानीही कुलीनता सोडलेली असली तरी लाज आणि अब्रू सोडलेली नसे. इंग्लंडमधील आजच्या विलासगृहाच्या ज्या हकीकती वृत्तपत्रांतून आल्या आहेत, त्यावरून असे दिसले की, त्यात रमणाऱ्या स्त्री-पुरुषांनी अब्रूही सोडली होती. अशी विलासगृहे ज्या पाश्चात देशात नव्याने स्थापन होतात त्या देशांनी वेश्याव्यवसायाचे उच्चाटन केल्याची आणि एकपत्नीत्वाचा कायदा असल्याची बढाई मारणे कितपत समर्थनीय आहे हा एक प्रश्नच आहे. आणि अशा देशांचे कायदे डोळे मिटून पत्करणाऱ्या भारताच्या प्रगतीची ग्वाही कितपत देता येईल हाही एक प्रश्नच आहे.

प्रभा

दिवाळी १९६३, पृ. २५ ते २९, ३६

अनुक्रमणिका

७

# नवी नीती कोण स्थापू शकेल?

**ज्या**ची ‘नवीन’ ठरण्याची धडपड आहे आणि ज्याला ‘जुने’ ठरण्याची भयंकर धास्ती वाटत आहे, अशा कोणाही लेखकाशी थोडा वेळ संभाषण करा, ‘जुनी मूल्ये ढासळत आहेत’ हे त्याच्या श्रद्धेचे पहिले सूत्र आहे, असे आढळून येईल. अर्थात मूल्य म्हणजे काय, आणि ती ढासळतात म्हणजे काय होते, हे त्याला सांगता येईल असे नाही पण सामान्यपणे जुने आचारविषयक निर्बंध त्याला अर्थशून्य वाटत आहेत, असे त्याच्याशी थोडे अधिक बोलणे केल्यावर आढळून येईल. सामाजिक निर्बंध म्हणजे मुख्यतः दोनच क्षेत्रात आढळतात. एक क्षेत्र स्त्री-पुरुषविषयक नीतीचे आणि दुसरे म्हणजे समाजातील उच्चनीच भावाचे. या दोन्ही क्षेत्रातले निर्बंध भांडवलशाहीमुळे तकलुपी झाले आहेत आणि ‘महायुद्धामुळे उघडे पडले आहेत’ असेही तो प्रतिपादील. पण एक लक्षात ठेवा! दोन महायुद्धे होऊन गेली आहेत! मध्येच धमकावणीच्या सुरात तो तुम्हाला बजावील!

वास्तविक मराठी वाङ्मयात मूल्यांशी जी झटापट झालेली दिसते तिचा संबंध महायुद्धाशी काडीचाही नसून फ्रॉईड आणि रसेल याच्या लैंगिक विषयावरील लिखाणाशी आहे. या दोघांची मते सारखी आहेत असे नव्हे; पण मराठीत प्रथमतः अशा विषयावर तळमळीने लिहिणारे कै. र. धों. कर्वे यांच्यावर या दोघांच्याही मतांचा खराखुरा व खोल संस्कार होता. समाजाने लादलेला वा व्यक्तीने स्वीकारलेला संयम ढोंगीपणाचाही होय आणि हानिकारकही होय, हे कर्व्यांचे पालुपद असे. अर्थात लैंगिक स्वैराचार हा सदगुण होय, असे कर्वेही म्हणू धजत नव्हते. मग रसेल, फ्रॉईड आणि र. धों. कर्वे यांच्या शास्त्रात सदगुण तरी कोणते मानलेले आहेत? अर्थात लैंगिक विचार व वर्तन यांच्या क्षेत्रातही हे लोक प्रामाणिकपणा हाच सर्वात मोठा सदगुण मानतात.

पण प्रामाणिक कोण आणि अप्रामाणिक कोण हे ठरविण्याचा हक्क मात्र हे ‘प्रामाणिक’लोक स्वतःकडे घेतात! अर्थात जो कोणी संयमाच्या गोष्टी करील तो ढोंगी होय असा निदान कर्वे यांचा तरी सिद्धांत होता. प्रामाणिकपणाच्या या सपाट्यात त्यांनी विवेकानंद आणि गांधी यांनाही लैंगिक संयमाच्या बाबतीत ढोंगी ठरवून टाकले होते! संयमाच्या अशक्यतेबद्दलची कर्व्यांची ही दुर्दम्य श्रद्धा पाहून एक ऐतिहासिक प्रसंग आठवतो. लैलाच्या प्रेमाने पागल झालेल्या मजनूची आणि त्याच्या मुलखाच्या शहाची गाठ पडली. तेव्हा तो शहा त्याला म्हणाला, ‘अरे नादान, लैलाबद्दल तुझी जेवढी निष्ठा आहे तेवढी जर खुदाबद्दल असती तर ‘बशर क्या? फरिस्तोसे भी तेरा दर्जा बडा होता!’ (माणसाच्या कथा काय? देवदूताहुनही तुझा दर्जा मोठा झाला असता!) कै. कर्वे यांच्या लैंगिक स्वैरतेबद्दलच्या निष्ठेसंबंधीही मला हेच म्हणावेसे वाटते!

फ्रॉईड संप्रदायाने वाङ्मयात मनोविश्लेषणाच्या रूपाने काय नवीन आले असेल ते असो; तरुण व्यक्तीच्या मनात मात्र अराजक माजवले खास! तात्त्विकदृष्ट्या त्यांना आचारावरील निर्बंध खोटे आणि व्यर्थ वाटतात. पण व्यावहारिकदृष्ट्या मात्र त्यांना तेच निर्बंध पाळावे लागतात. यामुळे जे निर्बंध पाळणे मागच्या पिढीला एक स्पृहणीय ध्येय वाटत असे. तेच निर्बंध आजच्या पिढीला एक निरर्थक अडगळ म्हणून पाळावे लागतात. (अप्रिय गोष्टीची चीड यापेक्षा प्रिय गोष्टीवरील प्रेम महत्त्वाचे. कारण अशा प्रेमातूनच व उदारपणाच्याच वृत्तीतून नवनिर्मिती होऊ शकते.) या परिस्थितीत हे लोक वाङ्मयाच्या रूपाने सामाजिक

बंडाची व अराजकाची भाषा बोलू लागले, तर नवल नाही. अशा लोकांनाच 'संतप्त पिढी' (Angry generation), 'बीटनिक', इ. नावे प्राप्त झाली आहेत. हे लोक नव्या नीतीच्याही गोष्टी कधी कधी करतात. किंबहुना 'नवनीती' हा शब्द मराठीत तरी 'नवकाव्य' या शब्दाहूनही जुना आहे. पण हे लोक 'नवी नीती' निर्माण करू शकतील काय?

मला तरी वाटते, ते 'नवी नीती' निर्माण करू शकणार नाहीत! नवकाव्य निर्माण करतानाही ज्यांच्या नाकी 'नव' आले ते नव नीती कसची निर्माण करतात! पण हा प्रश्न केवळ या नव्या 'संतप्त पिढी'च्या बकवासाचा आहे असे नव्हे. यातला तात्त्विक भाग अधिक महत्त्वाचा आहे. कुणी राजकीय बंड करो की वाङ्मयीन बंड करो. मी त्याचा वकूब एका प्रश्नावरूनच ठरवीत असतो. तो बंडवाला कशावर आणि किती चिडला आहे, यावरून त्याचे बळ ठरणार नाही; तर तो कशावर प्रेम करतो, कशाकरिता तो मरायला तयार आहे, यावर त्याचे बळ ठरत असते. निर्बंधावर चिडणारे लोक 'नवी नीती' निर्माण करू शकणार नाहीत. कारण जोपर्यंत ते समाजात आहेत तोवर त्यांना चडफडत का होईना निर्बंध पाळावे लागतील. पण त्यांना काही प्रिय आहे की नाही हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. नवकवी असोत, की नवनीतिवादी असोत, ते बिचारे कधी आपल्या प्रिय गोष्टीसंबंधी प्रेमाने बोलताना मला आढळलेच नाहीत! अप्रिय गोष्टीसंबंधी चडफडतानाच काय ते आढळले. पण त्याच्या तत्त्वज्ञानात प्रेम हे मूल्य मानलेले नसले, तरी आपण मात्र त्यांना समजावून घेताना प्रेमाचाच वापर केला पाहिजे! अन् अगदी प्रेमाने या मंडळींना समजावून घ्यायचे ठरवले, तर यांच्या या आक्रोशात काही 'धनमूल्ये' काही (positive values) सापडतात का?

स्वातंत्र्य आणि प्रामाणिकपणा ही त्यांना मान्य असलेली दोन मूल्ये असावीत, असे मी भीतभीतच म्हणतो! पण ही सुद्धा माझ्या मते 'ऋण मूल्ये' किंवा 'Negative' मूल्येच आहेत. माझ्या मनात दुष्ट विचार आला आणि मी तो मोकळेपणाने कबूल केला; मी दुसऱ्याची हानी किंवा हिंसा केली, आणि दुसऱ्यालाही तसे करण्याचे स्वातंत्र्य आहे असे म्हटले, तर यातून फळ काय? स्वतंत्र आणि प्रामाणिक अशा मूर्खांची हाणामारी आणि आत्मनाश एवढेच फळ मला तरी दिसते.

जुन्या कृत्रिम आणि बंधनात्मक नीतीला धक्का देणाऱ्या लोकांनी त्यापेक्षा काही तरी श्रेष्ठ मूल्ये आणली तरच ते नवी नीती स्थापू शकतील. नैतिक उदारपणा, मनाचा थोरपणा हे ते श्रेष्ठ मूल्य होय. पण नवकाव्य आणि नवनीती यांचा झेंडा उभारणारांजवळ या मूल्याचा थेंबही नाही! त्यांच्या इतके असहिष्णु, संकुचित आणि अनुदार लोक जुन्या सोवळ्या लोकांतही सापडणे कठीण. खरे म्हणजे या मंडळांनी नवी सांप्रदायिकता आणि नवा सोवळेपणा उत्पन्न केला. बंडखोरी, द्वेष हे श्रेष्ठ गुण नव्हेत, कारण त्या गुणांत नवी रचना करण्याचे सामर्थ्य नाही. प्रेम आणि उदारपणा हे श्रेष्ठ गुण होत, तेच नवी निर्मिती करू शकतात.

ॲरिस्टॉटलने 'magnanimity' हा सर्वात श्रेष्ठ सद्‌गुण मानला तो उगीच नव्हे. ज्यांच्याजवळ अधिक औदार्य तेच नवी नीती स्थापू शकतील, आणि ज्यांच्या अंगी प्रेम करण्याची श्रेष्ठतर शक्ती असेल तेच नवकाव्य निर्माण करू शकतील!

केसरी<br>२७ फेब्रुवारी १९६६ पृ. ४

अनुक्रमणिका

## ८
# चित्रपटांतील चुंबन

**सु**मारे पंचवीस वर्षापूर्वीची हकीकत. 'राक्षसविवाह' ही माझी कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली होती, माझे एक संपादक-मित्र मुंबईच्या प्रवासात ती वाचीत बसले होते. साहित्य आणि साहित्यिक यांच्याकडे संशयी नजरेने पाहणारा एक अर्धशिक्षित प्रवासी, त्या संपादकाच्या समोरच्याच सीटवर बसला होता. 'रा-क्ष-स-वि-वा-ह!' हे शब्द वाचताच, थर्डक्लासच्या प्रवासाने आधीच थोडे चढलेले त्याचे पित्त आणखीच भडकले, संपादकांच्या हातातील पुस्तक परवानगीशिवाय हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत प्रवाशाने विचारले-

'राक्षसविवाह?-म्हणजे हो काय? काही कादंबरी आहे वाटत?'

संपादक सोयीचे पडेल तेव्हा घुमेपणाने पांघरूण घेणारे होते. ते पुस्तकातून डोके न काढताच म्हणाले, 'हूं कादंबरी!'

'अहो पण 'राक्षस'-विवाह म्हणजे काय? एवढे काय झाले काय?'

'तसे काही विशेष नाही. परस्परांशी ज्यांचा भरपूर परिचय नाही, अशा वधूवरांनी एकमेकांना शरीर अर्पण करणे म्हणजे रानटीपणा आहे, असे या कादंबरीत रंगवले आहे', संपादकानी मुद्दाम खिजवण्याच्या हेतूने मनमोकळा खुलासा केला.

तुम्ही काहीही म्हणा साहेब! पण तुम्हा साहित्यिकांची डोकी काही तिरपीच चालतात बघा! कसला परिचय, अन् कसले शरीर अर्पण? अहो मला आता चार-पाच मुले आहेत—पण तुम्हा कादंबरीकारांच्या व्याख्येप्रमाणे आम्हा नवराबायकोचा 'पुरता परिचय' कुठे आहे?.... असे म्हणून तो प्रवासी थोड्या खवचटपणे हसला, अन् समोरच्या बाकावरच्या संपादकाच्या तोंडाजवळ तोंड नेऊन अगदी हलक्या आवाजात म्हणाला, 'अहो! आम्हाला मुलबाळे झाली, संसार छान चाललाय, पण तुम्ही कादंबरीत ज्यांची वर्णने करता ते 'चुंबन' की कायसे ते आम्हाला अजून माहीत नाही!'

भारतीय चित्रपट क्षेत्रात अलीकडे 'चुंबना' संबंधी जो फेरविचार चालू आहे, तो पाहून मला ही पंचवीस वर्षापूर्वीची सत्यकथा आठवली. आपल्या चित्रपटात चुंबनांना जागा करून देण्यापूर्वी आमच्या 'डायरेक्टर' मंडळींनी आमच्या जीवनातली चुंबनाची जागा प्रथम थोडी तपासून पाहावी. कारण जी चुंबने जीवनात दिसत नाहीत, ती चित्रपटात रंगवणे म्हणजे जीवन आणि सिनेमा यात आधीच असलेले अंतर वाढण्यासारखे नव्हे का?

अन् त्या दृष्टीने मला हे नजरेला आणायचे आहे की मुंबईच्या गाडीतला तो रुक्ष प्रवासी मानीत होता तशी, चुंबने म्हणजे केवळ कादंबरीतली चीज जरी नसली, तरी या देशातल्या चुंबनविषयक परंपरा वेगळ्या आहेत, यात शंका नाही. पाश्चात्य देशात चुंबनासंबंधीचे सामाजिक धोरण बरेच उदार आहे, हे त्याचे चित्रपट पाहिल्याने आता आमच्यांतील अशिक्षितांनाही ठाऊक झालेले आहे. अर्थात ओष्ठस्पर्श आणि चुंबन

अनुक्रमणिका

यात ते लोक फरक करतात. गालाला ओठांनी केवळ स्पर्श करणे. हे त्यांच्याकडे प्रायः आशीर्वादवजा मानतात. गालाचे चुंबन घेण्यात शृंगाराचा संबंध नाही, असे ते लोक मानतात. सुदैवाने म्हणा की दुर्दैवाने म्हणा आपल्याकडे हे आशीर्वादवजा चुंबन रूढ नाही. त्यामुळे प्रौढ व्यक्तीच्या चुंबनाचा आपण एकच अर्थ घेतो व म्हणून जेथे शृंगाराचे नाव नाही, तेथे आपल्या समाजात चुंबनाची चाल नाही.

पण चुंबनाचाच विषय चालू आहे, तेव्हा त्यासंबंधीचा आणखीही एक निर्बंध आठवला तो सांगून टाकतो. वास्तविक लहान मुलांच्या चुंबनावर एखाद्या देशात निर्बंध असेल अशी कुणाला शंका येईल का? ज्यात संकोच नाही, निर्बंध नाही, असे मनमोकळे चुंबन म्हणजे लहान मुलांचे. पण पुण्याच्या एका विदुषींनी जर्मनीतील आपला अनुभव लिहून ठेवला आहे, तो थोडा अजब आहे. तेथील एका कुटुंबाशी घनिष्ट परिचय झाल्यावर त्यांनी त्यांतल्या एका गोऱ्यापान गुटगुटीत बालकाचा मुका घेतला. तेव्हा त्या मुलाच्या आईने गंभीर चेहरा करुन त्या भारतीय विदुषीला सांगितले "लहान मुलांचे मुके घेणे आम्ही अशास्त्रीय व आरोग्यविघातक समजतो. अगदी अपरिहार्यच असेल तर मुलांच्या गालाचे मुके घ्यायचे; तुमच्या हिंदुस्थानातल्या सारखे इथे तोंडात तोंड घालून मुके घ्यायचे नसतात!"

प्रौढ स्त्री-पुरुषांच्या चुंबनाबाबत आमचे सुधारलेले पाश्चात्य लोक हे आरोग्यविषयक निर्बंध कितपत पाळतात, हे कळायला मार्ग नाही! चित्रपटांवरूनच सांगायचे झाले तर चुंबनापुरती तरी या सुधारलेल्या पाश्चात्यांना विज्ञानाची विस्मृति होते, असे दिसते! वैज्ञानिक जीवनावर फारशी श्रद्धा नसलेल्या माझ्यासारख्या काव्यभक्त प्रेक्षकाला अर्थातच हे पाहून समाधान वाटते!

पण चुंबनासंबंधीचे हे विचित्र विधिनिषेध तूर्त बाजूला ठेवले, तरी चित्रपटसृष्टीत सुरू झालेल्या या नव्या चळवळीचे काय? चुंबनदृश्यावर आज भारतीय चित्रपटांपुरती बंदी आहे; पण पाश्चात चित्रपटांत सर्रास दाखविली जाणारी चुंबने मात्र सेन्सॉरना मंजूर आहेत, हा विपरित न्याय नव्हे का? हा न्याय. माझ्या मते, बाह्यतः वाटतो तितका विपरित नाही. पाश्चात्य लोकांच्या रोजच्या जीवनात जी दृश्ये दिसतात, ती त्यांच्या चित्रपटांत दाखविली तर गैर नाही. पण आपल्या जीवनात जी दृश्ये एकान्तातही दुर्मिळ आहेत, ती चित्रपटांत दाखविली तर कलेचे त्यात नुकसान कसले? अशी बहुधा विद्वान सेन्सॉर मंडळींची कल्पना असावी.

ज्यांना चित्रपटांत चुंबने हवी आहेत, त्यांना तरी ती जीवनाचे प्रामाणिक चित्र म्हणून हवी आहेत का? की चित्रपटाच्या बाजारात चढाओढ म्हणून हवी आहेत? इंग्रजी चित्रपटांत चुंबने असतात, हे एक त्याचे वरचढ अंग ठरते, म्हणून आमच्या निर्मात्यांना चित्रपटांत चुंबने घालून ते अधिक चविष्ट करायचे आहेत—असे तर नाही? पण ज्या समाजात चुंबने सवंग नाहीत, त्या समाजाच्या चित्रपटांत चुंबनाची दृश्ये घालणे सोपे नाही, हे निर्मात्यानी लक्षात ठेवावे. नाही तर दर चित्रपटांत अकरा गाणी,—पाच गाणी 'मध्यांतरा' आधी अन् सहा गाणी मध्यांतरानंतर! त्यातलाच प्रकार चुंबनाचा व्हायचा!

मी ही अतिशयोक्ती करीत नाही. कारण पाश्चात्य चित्रपटांत माझ्या दृष्टीने आजच चुंबनाचे स्थान कलात्मक राहिलेले नसून बाजारी झालेले आहे. म्हणजे काय? आमच्या चित्रपटांत कुठेना कुठेतरी एखाद्या बागेचा किंवा समुद्रकाठचा 'सीक्वेन्स्' घालून नायक नायिकारूपी घोडवधूवरांची पाठशिवणी दाखविलीच पाहिजे, असे 'टेक्निक' ठरून गेले आहे. तशीच स्थिती पाश्चात्य चित्रपटांत चुंबनाची झालेली

दिसते. फार कशाला? सध्या गाजत असलेल्या क्लिओपाट्रा या चित्रपटातली ‘दहा सेकंदी’ चुंबने देखील या वर्गातच मोडतील! नुसता अभिनय स्वाभाविक असून भागत नाही! प्रसंगही स्वाभाविक लागतात.

चित्रपटांतील चुंबनात मला आणखीही एक अडचण दिसते. निर्माते, सेन्सॉर आणि प्रेक्षक यांची एकमुखी मागणी आहे, अशी कल्पना केली तरी आमच्या कुलीन नटी या प्रकाराला तयार होतील काय?

अर्थातच या प्रश्नाचे उत्तर नटीवर्गाकडूनच मागवावे लागेल. मला तर आपले असे वाटते की, याबाबतीत पुरुष नटांनाही काही घरगुती अडचणी येणे शक्य आहे!

केसरी
१७ एप्रिल १९६६ पृ. ७

## ९

# या बहुपत्नीकत्वाचे मूळ आहे तरी कशात?

**सु**मारे पंचवीस वर्षापूर्वी एका विद्वानाचा द्वितीय संबंध पुण्यात गाजला होता. वधूवर दोघेही प्रौढ, पदवीधर, व साहित्यिक होते. त्या वेळी त्या विवाहाने फारच काहूर माजले होते. पण त्या काहुराचे कारण मात्र मला समजत नव्हते. सनातनी लोकांना त्या विवाहाविरुद्ध बोलायला तोंड नव्हते, कारण आपल्या धर्मात व रीतिरिवाजात एक बायको जिवंत असता दुसरी बायको करण्याला मुळीच प्रतिबंध नाही. सुधारकांनाही त्या विवाहाविरुद्ध बोलायला जागा नव्हती; कारण ते व्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते म्हणवतात. एक पत्नी हयात असताना दुसरी करण्याला सुशिक्षित लोक अलीकडे जो विरोध करु लागले आहेत व ज्याचे पर्यवसान अखेर कायद्यात झाले; त्याचे मूळ पाश्चात्य ख्रिस्ती विचारसरणीच्या आंधळ्या स्वीकारात आहे. असे मला तेव्हापासून वाटत आले आहे.

ह्या गोष्टीचे पुन्हा स्मरण होण्याचे कारण अलीकडेच काही मुसलमान स्त्रियांनी आपल्या समाजालाही एकपत्नीकत्वाचा कायदा लागू व्हावा, अशी मागणी केल्याची वार्ता प्रसिद्ध झाली आहे. हिंदुसमाजाकरिता एकपत्नीकत्वचा कायदा करून मुसलमान समाज मात्र त्या कायद्यातून वगळण्यात आमच्या सरकारने आपले दौर्बल्य प्रकट केले होते, यात शंका नाही. आता मुसलमान समाजाकडून मागणी आल्यावरही लगेच त्या समाजाकरिता कायदा होईल असे मला वाटत नाही. कारण हा कायदा नको असलेल्या लोकांची संख्या त्या समाजात बरीच असल्यामुळे सरकार हा कायदा करू धजेल असे नव्हे. पण हिंदु समाजाकरिता हा कायदा आधीच झाला आहे त्यावरून हिंदु समाजातील बहुसंख्य लोकांना बहुपत्नीकत्वाची सवलत नष्ट करावीशी वाटत होती, असा अर्थ घ्यायचा काय? बहुपत्नीकत्वविरोधी कायद्याला विरोध केला तर आपण मागासलेले ठरू एवढीच त्यावेळच्या मुंबई कायदेमंडळातील बहुसंख्य सभासदांनी कल्पना करून घेतली असावी!

या बाबतीतील खरी तर्कशुद्ध भूमिका कोणती असावी? कायद्याने बहुपत्नीकत्व बंद केल्यास त्यामुळे सर्व फायदेच होतील, की काही तोटेही होतील? वस्तुतः जेव्हा कायदा नव्हता तेव्हाही हिंदुंतील सर्व लोक एकाहून अधिक विवाह करीत असत असे नव्हे. हिंदू समाजात बहुपत्नीकत्वाची 'चाल' होती. हे म्हणणे भोंगळपणाचे आहे; ख्रिस्ती लोकांप्रमाणे हिंदु लोकात 'बहुपत्नीकत्वाला कायद्याने बंदी नव्हती' एवढीच खरी स्थिती आहे. तसेच ख्रिस्ती लोकात रामासारखे एकपत्नीव्रत जारी होते, ही कल्पनाही चूक आहे.

एक पत्नी हयात असता अन्य स्त्रीविषयी इच्छादेखील न करणे आणि ती निवर्तल्यावरही पुन्हा विवाह न करणे याला एकपत्नीत्वाचे 'व्रत' म्हणतात.

पाश्चात्य ख्रिस्ती लोकात या कडक अर्थाने एकपत्नीव्रत नव्हते; इतकेच नव्हे, तर एका पत्नीला कायद्याप्रमाणे सोडचिठ्ठी दिल्यावर ती जिवंत असूनही त्यांना दुसरी करता येत असे. सारांश बहुपत्नीकत्वाबद्दल जो कायदा झाला, त्याच्यामुळे आपण आपल्याकडे अगदी क्वचित दिसणाऱ्या बहुपत्नीकत्वाचा बंदोबस्त केला खरा पण त्याबरोबर आपल्या उच्चवर्णीयांत अगदी क्वचितच दिसणाऱ्या घटस्फोटाला खूप मोठी जागा करून दिली! कारण या ख्रिस्ती वळणाच्या कायद्यापूर्वी एखाद्याने दुसरी

बायको केलीच तर त्याला लगेच पहिलीला घराबाहेर काढण्याची आवश्यकता नसे. आज दुसरी बायको करणारा मनुष्य पहिलीला घटस्फोट देऊन बाहेर काढण्याची कायदेशीर कारवाई करतो!

पाकिस्तानचे एके काळचे पंतप्रधान महंमद अलीखान इंग्लंडमध्ये गेले होते, तेव्हा त्यांनी नुकतीच आपल्या लेबॅनीज प्रायव्हेट सेक्रेटरीशी आणखी एक शादी केली होती. 'विवाहित', प्रसिद्ध माणसाचे आणखी एक लग्न म्हणून त्यावर इंग्लंडमधील वृत्तपत्रातही चर्चा चालू होती. महंमदअलीना पाश्चात्य ख्रिस्ती नीतीचा बोगसपणा चांगलाच ठाऊक असल्याने ते वृत्तपत्राच्या वार्ताहरांना म्हणाले, "मी जर नवी बीबी करून आणताना माझ्या पहिल्या बिब्यांना निष्ठुरपणे काडीमोड दिली असती, तर तुम्हा इंग्रजांना ते सुधारलेपणाचे लक्षण वाटले असते. पण माझ्या पूर्वीच्या बायकांशी पहिल्याइतक्याच प्रेमाने वागतो, हे मात्र तुम्हाला मागासलेल्या मुस्लिम संस्कृतीचे लक्षण वाटते! ब्रिटिश लोकांच्या ढोंगी सामाजिक नीतीविषयी मी आजवर नुसते ऐकत होतो. आज मला त्याचा अनुभव आला!"

पर्ल बक् या लेखिकेच्या एका चीनविषयक कादंबरीचा प्रारंभ एकपत्नीकत्वाच्या इंग्रजी कल्पनांना चांगलाच धक्का देणारा आहे. चाळीस वर्षांची एक सुसंस्कृत चिनी गृहिणी, लग्नाच्या वाढदिवसानिमित्त आहेर म्हणून आपल्या पतीला एक अंगवस्त्र (Concubine) पाहून देते, असा तो आरंभ आहे! सर्वच स्त्रिया संसारात सवत इतक्या सहजपणे येऊ देतील असे मला म्हणायचे नाही. पण वैवाहिक सुखासंबंधी आणि नीतिसंबंधाबाबत इंग्रज सांगेल तीच कल्पना वेदवाक्य म्हणून डोक्यावर घेणारांनी केवळ पुस्तकातील स्त्रिया आणि पुस्तकातील संसार पहाण्याऐवजी डोळे उघडून स्वतःच्या समाजाकडे पाहावे. आपल्याकडे बहुपत्नीकत्व हा 'रिवाज' नव्हता, तसाच एकपत्नीत्व हा 'नियम' ही नव्हता. एकपत्नीत्व हा एक शेवटचा आदर्श होता. एकपत्नीत्व हे भारतीय पतीचे सार्वत्रिक लक्षण असते, तर रामाच्या एकपत्नीत्वाचे कौतुक करण्याचे कारणच नव्हते!

बहुपत्नीकत्वाचे मूळ सत्ता आणि संपत्ती यांत आहे. ज्याच्याजवळ संपत्ती आणि सत्ता आहे, त्याला कायद्याने एका पत्नीशी बांधून ठेवणे, म्हणजे बिचाऱ्या पत्नीचीच केवळ नव्हे, तर कायद्याचीही वंचना आहे! अशा बाबतीत बायकांच्या डोळ्यात धूळ फेकणे अशक्य असते. कारण अस्सल एकनिष्ठ नवऱ्याबद्दलही त्या वेळ आली तर संशय घ्यायला सोडीत नाहीत. बिचारा कायदा मात्र दोन्ही डोळ्यांनी आंधळा आहे! 'एकपत्नीकत्वाच्या कायद्याचे राज्य अबाधित चालले आहे' असे म्हणून तो झोपी जातो!

या बाबतीत मनुष्य स्वभाव व न्याय दोन्ही लक्षात घेणे जरूर आहे. जोपर्यंत आपण उघड्या डोळ्यांनी पुरुषांना अधिक सत्ता दिली आहे. तोपर्यंत कायद्याने सर्व काही साधेल असे नाही. पण पहिल्या बायकोकडे कोणताही दोष नसता, पुरुषाने नवी बायको आणली, तर पहिलीला पोटगी, फारकत व घटस्फोट या तिन्ही वाटा मोकळ्या व सुलभ ठेवणे एवढेच या बाबतीत करता येण्यासारखे आहे.

कधी कधी ती 'घटस्फोटापेक्षा सवत बरी' असे म्हणणेही शक्य आहे! एकपत्नीकत्वाच्या कायद्याचे क्षेत्र मुसलमानांपर्यंत वाढविण्याआधी तो कायदा अधिक स्वाभाविक आणि अधिक स्वदेशी करण्याची गरज आहे. मग तो आमच्या पाश्चात्य गुरूंना थोडा मागासलेला वाटला तरी हरकत नाही!

केसरी
२४ एप्रिल १९६६

## संदर्भ

पूरक संदर्भ :
(१) क्षीरसागर श्री. के. सपत्नीकांच्या द्वितीय विवाहाचे अभिनंदन
किर्लोस्कर, सप्टेंबर १९४३, पृ. ७९-८१
(२) सपत्नीकांचे द्वितीय विवाह आणि आगरकरी सुधारक, समीक्षक, एप्रिल १९४४,
पृ. १७-२० हे दोनही लेख खालील ग्रंथामध्ये समाविष्ट आहेत.
क्षीरसागर. श्री. के. स्त्रीजीवन आणि विवाहविषयक लेखसंग्रह
मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९९२
पृ. १५१-१५५ व १५६-१६३

# १०
# पावित्र्य आणि स्त्री-पुरुष संबंध

**भा**रतीयांच्या पावित्र्यकल्पनांत अतिरेक आहे हे मलाही मान्य आहे पण भारतीयांनी सर्वच ध्येयकल्पना हास्यास्पद अतिरेकाला पोचविलेल्या दिसतील. युरोपात कोणत्याही युगात स्त्रीला हीन लेखलेले नव्हते, हे लोहियाचे मत छाननीत टिकणारे नाही. बहुपत्नीकत्वाला बंदी असणे हे स्त्री-पुरुष समानतेचे पुरेसे लक्षण लोहिया मानतात. पण एकपत्नीक समाजातही पुरुष स्त्रीला गुलामाप्रमाणे वागवू शकतो. रखेल्या ठेवण्याला वा विवाहबाह्य भानगडींना एकपत्नीक समाजात अधिकच अवसर असतो व अधिक कारणही मिळते.

स्त्रियांच्या पावित्र्याला सर्व देशांतच महत्त्व दिले गेले आहे, हे लोहियाही मान्य करतात. पण त्याचे मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय मूळ शोधीत नाहीत. कुटुंबसंस्थेची आणि पुरुषाच्या आधाराची गरज स्त्रीला अधिक असल्याने, पुरुषांनीच केवळ नव्हे तर स्त्रियांनीही पावित्र्यकल्पनेची सर्व युगात जाहिरात केलेलीच आढळेल. पावित्र्यकल्पना स्त्रीशरीराभोवती व त्यातल्या त्यात स्त्रीशरीराच्या एका लहानशा भागाभोवती घोटाळावी, याचे लोहियांना जे आश्चर्य वाटते, तेही मानवी स्वभावापेक्षा तर्कशास्त्रात घुटमळल्यामुळेच होय. कान, नाक, डोके यांच्यापेक्षा स्त्रीच्या योनीचा व इतर कामसंबद्ध भागाचा संबंध मनाशी अधिक आहे. जे स्त्री-पुरुष लैंगिकदृष्ट्या एकमेकापासून दूर वा अन्य व्यक्तीच्या कक्षेत गेले ते मनानेही एकमेकापासून दूर जातात, म्हणून योनिशुचितेकरता सर्वच स्त्री-पुरुष धडपडत असतात.

पण शुचितेला महत्त्व वेगळे आणि अनुदार, असहिष्णु असणे वेगळे. प्रौढविवाह आले की विवाहपूर्व प्रेम आलेच; विवाहपूर्व प्रेम आले की तरुणतरुणीच्या विवाहपूर्व संबंधाचा संभव आलाच. अशा स्थितीत विवाहपूर्व संततीचा धोका (लोहियांच्या भाषेत) 'स्वतःचे लग्न जमविण्याच्या या प्रयत्नात चुकून तिला मूल झाले तरी ती घटना स्त्री-पुरुषामधील योग्य संबंध प्रस्थापित करून घेण्याच्या मार्गातला एक भाग म्हणूनच' मान्य करावा, हे मतही क्रमप्राप्त व योग्यच आहे. पण अशा अपवादाकडे सहानुभूतीने पाहाणे वेगळे आणि मूळ नियमच अर्थशून्य मानणे वेगळे. स्त्री–पुरुषसमानतेच्या तुलनेने पाहता पावित्र्याला काडीची किंमत नाही, हा लोहियांचा सिद्धांत भारतीयांच्या पावित्र्यपूजनाइतकाच अतिरेकी आहे.

रजस्वला स्त्री अपवित्र मानण्याचाही लोहियांनी उपहास केला आहे. पुरुषाच्याही शरीरात मलमूत्रादी स्राव वा मल आहेत. मग पुरुषाने बाजूला का बसू नये? रजस्वला अवस्थेत स्त्रीला आजारी किंवा अस्पर्श मानण्याने तिला विश्रांती मिळून तिचाच फायदा होईल. जुने निर्बंध न पाळणारी आजची स्त्री व आजचे डॉक्टर लोक, जुन्या खुळ्या कल्पनांनी मिळणारी ही विश्रांती अधिक पसंत करतील असे वाटते.

स्त्रीलाही अनेकदा प्रेम करण्याला मुभा असावी असे लोहिया प्रतिपादितात. हा प्रश्न 'मुभा' देण्याचा नसून 'मान्यता' देण्याचा आहे. अनेक प्रेमांना मुभा दिल्यावरही एकनिष्ठ प्रेमाला अधिक मान्यता मिळत राहणार नाही का? की जितक्या वेळा घटस्फोट घेतला असेल तितक्या पटीने लोहियांच्या आगामी समाजात स्त्री अधिक मान्य ठरेल? शिवाय अनेक प्रेमांना मुभा देणारे तुम्ही – आम्ही कोण? निसर्ग ती ओढ–नैतिक असो की अनैतिक असो–स्त्रीच्याही मनात पेरुन गेलाच आहे. भारतीय समाज असो, अरबी समाज असो की अमेरिकन समाज असो, एकनिष्ठ प्रेमाच्या कथाइतक्याच त्यात व्यभिचारी प्रेमाच्या कथा

अनुक्रमणिका

लोकप्रिय झालेल्या आहेत. 'ड कॅमेरॉन टेल्स', 'अरबियन नाईटस्', 'कोकिला पस्तिशी', यात काही सीतासावित्रीची चित्रे खास नाहीत! स्त्रियांच्या अनेकपुरुषपरतेला लोहियांना फक्त 'मुभा' हवी आहे की मान्यता हवी आहे? एकनिष्ठा हा जसा मानवी प्रवृत्तीचा एक अंश आहे. तसाच व्यभिचार हाही एक अंश आहे, पतिव्रत्याची स्तोत्रे गाणारा भारतही या नियमाला अपवाद नाही. डॉ. लोहिया यांना आणखी काय हवे?

बालविवाह हा पावित्र्याकरताच रूढ झाला असे नव्हे, आणि बालविवाहाने विवाहपूर्व संभोग टाळता आला, तरी विवाहबाह्य संभोग कसा टाळता येईल? अर्थात बालविवाह आणि पावित्र्यकल्पना यांचा लोहिया जो संबंध जोडतात तो काल्पनिक आहे. बालविवाह शेतकरी—कामकरी जातीत अधिक रूढ आहे. आणि तरी या जातीतील स्त्रिया मनाने व शरीराने दुबळ्या नाहीत हे लोहियाही मान्य करतात.

सीतेच्या त्यागाबद्दल प्रत्येक भारतीयाला रामाचा राग येतो. मलाही राग येतो. (लोहियांना मात्र त्यात रामाचे लोकशाही प्रेम दिसते!) आठव्या एडवर्डप्रमाणे राज्यत्याग करणे एवढाच त्याला पर्याय होता असे मात्र मला वाटत नाही. आपल्या क्षेत्रापुरते कर्तव्य करायचे सोडून सर्वांगीण लोकप्रियतेच्यामागे लागायचे हा आमच्या आदर्श पुरुषांचा छंद प्रसिद्धच आहे. धर्मराज, गांधी हे आमचे नेते आदर्श ठरण्याच्या नादात स्वजनांचा बळी देत, हेही प्रसिद्ध आहे. या सर्व लोकधार्जिण्या पुरुषांचा मूळपुरुष राम आहे! त्याने राज्याचा नव्हे तर खोट्या लोकप्रियतेचा त्याग करायला हवा होता.

शेवटी लिंगायत 'परमहंसी' महादेवी हिच्यासंबंधी. ती 'स्त्री' म्हणून उपेक्षित राहिली असे लोहिया कोणत्या आधारावर म्हणतात? अनेक शूर आणि वेदान्ती स्त्रियांची भारताने पूजा बांधलेली नाही का? मला वाटते, लोहियांना तिच्या अध्यात्मापेक्षा तिचा नग्नसंप्रदाय (रूढिभंजक म्हणून) अधिक प्रिय आहे!

किर्लोस्कर मासिक
ऑक्टोबर १९६७
पृ. ६२-६३

---

**संदर्भ**

'किर्लोस्कर' मासिकात सप्टेंबर १९६७ च्या अंकात डॉ. राम मनोहर लोहिया यांचा 'पावित्र्य आणि स्त्री-पुरुष संबंध' हा लेख प्रकाशित झाला होता. त्या लेखावर श्री. के. क्षीरसागर यांच्याप्रमाणे पु. भा. भावे, दि. के. बेडेकर आणि मालतीबाई बेडेकर यांचीही मते 'किर्लोस्कर' च्या संपादकांनी मागवली होती. त्या सर्वांची मते किर्लोस्करच्या ऑक्टोबर १९६७ च्या अंकामध्ये पृ. ६२ ते ६७ वर प्रकाशित झाली आहेत.

# ११
# चित्रपटांतील चुंबन

'**से**न्सॉरशिप एन्क्वायरी कमिटी' म्हणून एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीसंबंधी सध्या चित्रपटांच्या दुनियेत खळबळ माजून राहिली आहे. समितीचा अहवाल साडेतीनशे पानांचा आहे. अर्थात त्यात माहिती आणि तत्त्व यांच्यादृष्टीने महत्त्वाचा भाग पुष्कळच असणार; पण चर्चा होत आहे ती त्यातल्या आठव्या प्रकरणातील 'शालीनता व नैतिकता' यासंबंधीच्या भागावरच होत आहे. एखाद्या कथानकात 'उत्कट चुंबन' किंवा नग्न शरीर दाखवणे कलादृष्ट्या व सुसंबद्धतेच्या दृष्टीने अपरिहार्य असेल, तर ... 'There is no question of excluding the shot ...' अशी या समितीची शिफारस आहे. अर्थात या चुंबनचित्रणाला वा नग्न शरीरदर्शनाला कमिटीची बिनशर्त मोकळीक आहे, असे नव्हे. तर "... provided the theme is handled with delicacy and feeling ... avoiding all suggestion of prurience or lasciviousness" (म्हणजे कथेतील विषय मात्र हळुवारपणे हाताळलेला पाहिजे, त्यांत वैषयिक वखवख सूचित होऊ नये.)

तत्त्व म्हणून या सूचना उच्च कलेला संरक्षण व स्वातंत्र्य देणाऱ्याच आहेत. पण जी कला केवळ तज्ज्ञांना नव्हे, तर 'घटकाभर गम्मत' म्हणून तिकीट घेऊन येणाऱ्या गल्लाभरु गर्दीला 'पेश' करायची असते, जी एकाच कलावन्ताने निर्माण केलेली नसून शेकडो नटनटी, तंत्रज्ञ व यंत्र यांच्यातून साकार झालेली असते, तिजमध्ये श्री. खोसला यांनी सहज लीलया अपेक्षिलेली 'हळुवार हाताळणी' (handling with delicacy) कितपत शक्य होईल, हा मुख्य प्रश्न आहे. प्रेक्षकांची गाठ कलेतल्या हेतूशी वा प्रामाणिक प्रयत्नांशी नसून, परिणामाशी असते. सती अनसूयेच्या नग्न शरीराचा परिणाम बाल ब्रम्हाविष्णुमहेशावर जो झाला असेल, तोच अंधारात खारेदाणे खात, पुढच्या रांगेवरील स्त्रियांच्या 'लो कट' ब्लाऊझकडे पाहात, चित्रपट पाहणाऱ्या सामान्य प्रेक्षकांवरही होण्याइतकी चित्रपटाची कला नाजूक हवी, ही श्री. खोसला यांची अपेक्षा! पण उद्देश उच्च असूनही चुंबन आणि नग्न शरीर यांचा परिणाम उत्तान होत आहे असे दिसले तर? तर काय? पंचवीस लक्ष रुपये खर्च करून काढलेला चित्रपट सेन्सॉरमहाशय फेकून द्यायला लावू शकतील! निदान त्याला आपली कलाशून्य, कायदेबाज कात्री लावू शकतील! एवढा धोका पत्करून आज रूढ वा मंजूर नसलेली दृश्ये चित्रपटात आणून सोडण्याचे पुण्य श्री. खोसलाजी का जोडीत आहेत? अर्थात कला-स्वातंत्र्य आणि पुरोगामित्व या कल्पनांचा पगडा दुर्निवार आहे हेच याचे कारण!

पण या चुंबनस्वातंत्र्याचा अन् नग्नतास्वातंत्र्याचा परिणाम फक्त प्रेक्षकांवरच होणार आहे अशी तर श्री. खोसला यांच्यासारख्या विद्वानांची कल्पना नाही? वास्तविक या नव्या कलात्मक लैंगिक स्वातंत्र्याचा परिणाम प्रथम जर कोणाला भोवणार असेल तर तो आमच्या नट्यांना होय! नर्गिस, वहिदा रहमान, आशा पारेख, नंदा, मौशुमी चटर्जी यांसारख्या प्रमुख चित्रपट नटींचा, चुंबनाभिनय करण्याला, 'सख्त' विरोध आहे. त्यातील एक (मौशुमी चटर्जी) तर—'पर्दे मे नग्न आनेके बजाय मै मर जाना अच्छा समझूंगी'—असे म्हणण्यापर्यंत सात्त्विक संताप व्यक्त करीत आहे. (बिचारीवर तो प्रसंग येणार नाही अशी आशा करू या.) आशा पारेख या सुंदर नटीने म्हटले आहे 'मै कभी और किसी भी शर्तपर चुंबन के लिये तैयार नही हो पाउंगी।' आमच्या प्रमुख पुरुषनटांचा मात्र चुंबनाला फारसा विरोध दिसत नाही! पण या एकतर्फी 'अविरोधा'ने खोसला समितीच्या उदार कलास्वातंत्र्याचे चीज कसे होणार? लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट

म्हणजे, प्रसिद्ध मुरब्बी डायरेक्टर—मंडळी चुंबन चित्रणाला अनुकूल नाहीत! इतकेच नव्हे, तर श्री. व्ही. शांताराम, विजय भट्ट, बी. आर. चोपडा,रामानंद सागर यांसारखे विख्यात कलानिपुण डायरेक्टर, खोसला कमिटीच्या शिफारशी सरकारने मान्य करू नयेत, असे जोराने सांगत आहेत. सत्यजित राय सारखे पुरोगामी कुशल डायरेक्टर तत्त्वतः चुंबनस्वातंत्र्याचे समर्थन करतात, पण 'चांगला चित्रपट काढायचा म्हटला की त्यांत चुंबन दाखवणे अपरिहार्य आहे' असे मात्र मुळीच मानीत नाहीत.

नग्नतेच्या प्रदर्शनाला तर इतपतही समर्थन नाही. प्रत्यक्ष जीवनात प्रौढ स्त्री—पुरुषांना नग्न पाहाण्याचे प्रसंग आपल्याला कितीसे येतात? मग चित्रपटातील घटनाच तेवढ्या नग्नतेच्या प्रदर्शनासाठी का आडून राहाव्या? उलट, चित्रपटात नग्न शरीर दाखवायचेच असे ठरवून मुद्दाम तसे प्रसंग कथानकात दाखवावे लागतील. त्यात समाधान, समग्र अन् निरपवाद वास्तवता दाखवल्याचा दावा सांगता येईल, एवढेच! सौंदर्याला वा 'कलात्मक अपरिहार्यते'ला त्या नग्नतेची गरज असेलच, असे नाही. नग्न शरीर जास्त सुंदर, की वस्त्रावृत शरीर जास्त सुंदर. याचे उत्तर ज्याचे त्याने स्वतःशी द्यावे. जर नग्न शरीर अधिक सुंदर असते, तर शीतोष्णापासून संरक्षणापुरतेच कपडे वापरून उन्हाळ्यात तरी स्त्री—पुरुष कपड्याशिवाय फिरले असते. संपूर्ण अनावरणात सौंदर्य नसून, ईषत् 'आवरण' आणि ईषत्- 'अनावरण' यात सौंदर्य आहे. चित्रपटात काय, की रंगभूमीवर काय, नग्न शरीराच्या प्रदर्शनाला अडथळा (काही लोक मानतात त्याप्रमाणे) नीतीचा नाही, तर सौंदर्य दृष्टीचाच आहे. अर्थात चुंबनाप्रमाणे नग्नतेलाही पहिला विरोध नटीवर्गच करील. पण जर नट्यांचाच विरोध आहे अन प्रमुख डायरेक्टरही अनुकूल नाहीत, तर चित्रपटातील नग्नतेचे आज भयच नाही! मग त्याची चर्चा तरी कशाला?

पण हा प्रश्न इतका साधा नाही. पाश्चात्य देशांत आज पूर्ण नग्न नटनटीकडून करून घेतलेली नाटके रंगभूमीवर येत आहेत. "Oh Calcutta" हे नग्ननाट्य एका अमेरिकन 'प्रोड्यूसर'ने रंगभूमीवर आणल्याचे अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे. त्यांची छायाचित्रे आपल्या इंग्रजी साप्ताहिकांतूनही पाहायला मिळतात. अर्थात ही लाट आपल्याकडे येणे अशक्य नाही! पण नट्यांच्या विरोधाचे काय? आज नाट्य व चित्रपटव्यवसायांतल्या बहुतेक नट्यांना चांगला सामाजिक दर्जा आहे. उद्या सामाजिक दर्जा नसलेली किंवा परदेशातून आलेली एखादी नटी प्रथम कॅमेऱ्यापुढे आणि नंतर नाटकाच्या जिवंत प्रेक्षकांपुढे पैशाच्या मोहाने चुंबनदृष्याला वा नग्नदृष्याला तयार झाली, तर विषम आणि अनैतिक स्पर्धेला प्रारंभ होईल आणि दर्जा असलेल्या नट्या या नव्या बिनदर्जाच्या नटीच्या मागे पडतील. नग्नतेला आज सामाजिक मान्यता नाही. हे उघड आहे. पण आज कलाही किफायतशीर असेल तरच जगते, हे विसरून चालणार नाही. "Oh Calcutta" हे नग्ननाट्य, दोन—दोनशे रुपयांपर्यंतची तिकीटे लावून रंगभूमीवर आणणारा अमेरिकन प्रोड्यूसरदेखील नीतिविचाराला पारखा आहे, असे नाही. तो म्हणतो—

"I feel that Sex explosion and pornography are destructive to civilization. When a society gets to the point where it is eating its own entrails ..... it immediately returns to the expression of sexuality as the only thing left to somehow titillate and excite"

(कलेतील लैंगिकतेचा भडका मानवी संस्कृतीचा घात करणारा आहे. जेव्हा एखाद्या समाजाची अवस्था स्वतःची आतडी खाण्यापर्यंत पोहोचलेली असते, तेव्हा तो लगेच लैंगिकतेकडे वळतो. कारण लोकांना उत्तेजित आणि क्षुब्ध करण्याचे तेच एक साधन उरलेले असते.) म्हणूनच हा प्रश्न केवळ सेन्सॉरशिपच्या उदारतेचा नाही. आज पाश्चात्य नाटककार आणि निर्माते यांच्या डोक्यातच काही वेगळे वारे

वाहत आहेत. एक प्रसिद्ध इंग्रज नाट्यतज्ज्ञ खास मुलाखतीत म्हणतो—"Sex and nudity are marvellous. We have broken down conventions" — (Times of India, August 1969).

पण एकदा 'रुढी मोडणे हाच कलेचा दिग्विजय' असे ठरले म्हणजे नुसत्या नग्नतेवर वा नुसत्या लैंगिकतेवर भागत नाही. तोच आंग्ल नाट्याचार्य पुढे म्हणतो— "Homosexuality and lesbianism are important subjects. **A whole host of great men must have been homosexuals**. Anything that is part of life is all right for the stage. (*Emphasis mine*)

(पुरुषा-पुरुषांतील कामुक आकर्षण व स्त्रिया-स्त्रियांतील कामुकता हे महत्त्वाचे नाट्यविषय आहेत. इतिहासप्रसिद्ध पुरुषापैंकी खूप लोक 'होमसेक्शुल' (समसंभोगी) असले पाहिजेत. जो जो म्हणून प्रत्यक्षात जीवनाचा भाग आहे. तो तो रंगभूमीवर योग्यच म्हटला पाहिजे.)

एका इंग्रजी नाट्याचार्याचे हे लैंगिक औदार्य पाहिले, म्हणजे खोसला—कमिटीच्या शिफारशी अगदी नेमस्त मवाळच ठरतात! पण खोसला कमिटीने दाखविलेल्या नेमस्त औदार्यानेही आज चित्रपटाच्या दुनियेत अनेक वाद उद्भवले आहेत. काहीनी 'चुंबना'ची प्रथा भारतीय नाही' असे म्हटल्याने 'फेमिना' या स्त्रियांच्या साप्ताहिकाने एका अमेरिकन विदुषीच्या चुंबनाविषयक संशोधनाचा हवाला दिला आहे. माउंटव्हनॉन (U.S.A.) येथील या विदुषीने चुंबनाची चाल भारतातच इसवी सनापूर्वी दोन हजार वर्षामागे निघाली असे म्हटले आहे. उलट एका हिंदुत्वानिष्ठ इंग्रजी साप्ताहिकाने ही चाल रोमन लोकात प्रथम निघाली असे म्हणून चुंबनाला परदेशी मालात ढकलले आहे!

मला या सर्व संशोधकांची कीव येते. उद्या लहान बालकाचे आपण चुंबन घेतो त्याचावरही एखादी विदुषी किंवा एखादा हिंदुत्वानिष्ठ विद्वान संशोधन करील आणि ते भारतीय वा अभारतीय ठरवील! ते मुळात प्रेममूलक नव्हते असे सिद्ध करील! बालकाचे काय, की स्त्री-पुरुषांचे काय, चुंबन ही सहजप्रवृत्ती आहे, अन ती सनातन आहे. वाद पुरुषांनी स्त्रियांचे, स्त्रियांनी पुरुषांचे चुंबन घ्यावे की नाही हा नसून. ते थिएटरमधील प्रेक्षकांपुढे घ्यावे की नाही एवढाच आहे! पण विद्वान संशोधक मुद्दाम नेमका विसरतात!

आणखी एक आक्षेप घेतला जात आहे. लक्षाधीशांकरिता असलेल्या हॉटेलांतून चालणाऱ्या कॅबरे नृत्यात सुंदर स्त्रिया नग्न होऊनच नाचतात ना? मग ज्या नग्नतेचा आस्वाद श्रीमान लोक घेतात तिचाच आस्वाद गरिबांनी सिनेमाच्या दरात का घेऊ नये? हा कम्युनिस्ट युक्तिवाद ऐकून आपण तर बुवा अगदी निरूत्तरच झालो! आता अडचण काय ती नर्गिस, आशा पारेख, वहिदा रेहमान यासारख्या विख्यात नट्यांचे मन वळविण्याचीच राहिली म्हणायची! कम्युनिस्ट राजवटीत त्याचीही काही शासकीय व्यवस्था होऊ शकणार नाही असे नव्हे!

पण या कलास्वातंत्र्यवाद्यांनी हे लक्षात ठेवावे की, तिकीट लावून 'प्रेक्षकांसमोर चुंबन आणि प्रेक्षकांसमोर नग्नता' हा कलास्वातंत्र्यांतला 'शेवटचा घास' (eating its own entrails) होय. एकदा तोही शिळा झाल्यावर पुढे काय?

केसरी
१२ ऑक्टोबर, १९६९
पृ. ८

अनुक्रमणिका

## १२
# लैंगिक नीती आणि समाज

**का**ही आधुनिकांचे असे मत आहे की, नीती ही चीज केवळ सामाजिक आहे. त्यांच्या मते एखाद्या निर्जन बेटावर मनुष्य राहू लागेल, तर नीती–अनीतीचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. मला स्वतःला हे मत बरोबर वाटत नाही. 'दुसऱ्याला उपद्रव' हा जसा अनीतीचा एक अर्थ आहे, तसाच स्वतःला घृणा येणे हाही आहे. म्हणूनच मानवी दुर्वर्तनात, स्वतःचा अधःपात, दुसऱ्याचे नुकसान, सरकारी कायद्याचा भंग, स्वतः पत्करलेल्या बंधनांचा भंग, असे अनेक प्रकार संभवतात.

सरकारी कायदा मात्र, ज्या वर्तनाने दुसऱ्या नागरिकांचे किंवा सरकारचे नुकसान होईल, अशा वर्तनाला दुर्वर्तन असे मानतो, पण ही कायद्याची कल्पना किती अर्धवट आहे, ते इंग्लंडमध्ये अलीकडेच झालेल्या नव्या कायद्यावरून दिसून येईल. 'समसंभोग' हा आजवर इंग्लंडमध्ये शिक्षापात्र (Penal) गुन्हा होता. पण या कायद्यात सुधारणा करून आता तो सौम्य केला आहे. यामागची भूमिका कोणती? तर खून, चोरी यासारखी, समसंभोग ही दुसऱ्याचे नुकसान करणारी कृती नव्हे! त्यामुळे पाश्चात्य देशात आता समसंभोग हे 'नॉर्मल' वर्तन समजण्याकडे कल आहे. अर्थात पाश्चात्यांना सर्वज्ञ मानणाऱ्या आमच्या नवसाहित्यिकांनी लगेच आपल्या कथावाङ्मयात समसंभोगी नायक रंगवायला प्रांरभ केला आहे! नीती ही केवळ 'सामाजिक' बाब होय, या व्याख्येचाच हा स्वाभाविक परिपाक आहे असे मला तरी वाटते.

पण आज मला समाजाच्या दुसऱ्याच एका प्रवृत्तीबद्दल बोलायचे आहे. अनीतीकडे एक खेदजनक गोष्ट म्हणून पाहाण्यापेक्षा, एक 'मनोरंजक घटना' म्हणून पाहाण्याचीच समाजाची प्रवृत्ती का दिसावी? पण तशी दिसते खरी! जोपर्यंत एखाद्या गुन्ह्यामुळे खुद्द आपले नुकसान झालेले नाही, तोपर्यंत त्याकडे आपण एक 'चमचमीत हकीकत' एवढ्याच दृष्टीने पाहातो. समाजाच्या या 'चमचमीत–प्रियते' मुळे खोटे बोलणे, खोटी साक्ष देणे, लाच देणे. खोटे भत्ते मिळवणे या वर्तनाला दुर्वर्तनांच्या यादीच अगदीच किरकोळ स्थान मिळते; तर उलट, विवाहबाह्य अशा स्त्रीपुरुषसंबंधाला भलतेच महत्त्व येते. एखाद्या तरुणाने मुंबई ते पुणे हा प्रवास तिसऱ्या वर्गाचे तिकीट असून पहिल्या वर्गातून केला वा दुसऱ्या एकाने परीक्षकाशी घसट करून परीक्षेपूर्वीच परीक्षेतील काही प्रश्‍न मिळविले, या वार्ता तुम्ही पदवीधरांच्या एखाद्या बैठकीत सांगा, कुणालाच त्यात लक्ष घालावेसे वाटणार नाही. जणू या गोष्टी केवळ उपेक्षणीय, नव्हे थोड्याफार हुशारीच्या द्योतक होत, असा भाव श्रोत्यांच्या चर्येवर दिसेल. पण त्यातलाच एक तरुण एका तरुणीबरोबर सिनेमागृहात दिसला या गोष्टीचा तुम्ही त्याच बैठकीत निर्देश केला, तर श्रोते लगेच कान टवकारून ऐकू लागतील. कुणी त्यातच ऐकीव तिखट–मिठाची भर घालतील. हीच हकीकत वा 'स्कँडल' त्या बैठकीतील एखाद्याच्या नोकरीतील प्रतिस्पर्ध्याची असेल, तर तो लगेच तिचा उपयोग भांडवल म्हणून करण्याच्या मार्गाला लागेल.

'युद्धस्य कथा रम्याः' अशी म्हण आहे. तशीच 'कामस्यकथा रम्याः' अशीही म्हण बनवण्यास हरकत नाही. या दोन्ही प्रवृत्तीत मनुष्यस्वभावाची दिसणारी बाजू थोडीफार क्षम्यच आहे, असे सुद्धा म्हणता येईल. स्वतःला दगदग न पडता वेगाने फेरफटका मारता येतो, म्हणून आपल्याला मोटारीतून फेरफटका करणे आवडते. तसेच स्वतःवर न बेतता जर कुणाच्या प्राणावर वा अब्रूवर बेतल्याने घरबसल्या ऐकता आले, तर आपल्याला आनंद होतो, असा प्रकार असावा!

‘What is the latest scandal?’ असे गप्पांच्या बैठकीत नवीन आलेल्या माणसाला विचारण्याची इंग्रजांत एक औपरोधिक (cynical) रूढीच आहे. पण या सामान्यतः निरुपद्रवी अशा लोकापवादप्रियतेचे दुष्परिणाम नाहीत, असे मात्र नाही.

करमणुकीकरता दुसऱ्याच्या दुर्वर्तनाबद्दलची वार्ता ऐकणे, अन् करमणुकीकरताच तिचा तिसऱ्यापुढे उच्चार करणे, इथपर्यंत क्षम्य, मानवी मनोदौर्बल्य म्हणता येईल. पण त्या ऐकीव वार्तेचा स्वार्थाकरता उपयोग करणे हा त्याच्या पुढचा प्रकार क्षम्य नव्हे. अन् हा प्रकार यशस्वी होऊ लागला की, त्याच्या पुढचा प्रकारही समाजात वाढीला लागतो. तो म्हणजे अफवात भर घालणे किंबहुना हेतुपुरस्सर कंड्या पिकवणे! प्रतिस्पर्धी वाटेतून बाजूला करण्याकरता अथवा ‘इलेक्शन’मध्ये पाडण्याकरता, राजकारणात या शस्त्राचा उपयोग करण्याची रूढी इतिहासप्रसिद्ध आहे. गव्हर्नरच्या जागेकरिता होणाऱ्या निवडणुकीतून आपण आपले नाव मागे का घेतले, या विषयावर प्रसिद्ध विनोदी लेखक मार्क ट्वेन याचा एक लेख आहे. तो म्हणतो "माझ्यावर खोटे बोलण्याचे, पैसे खाण्याचे, सर्व प्रकारचे आरोप विरुद्ध पक्षाच्या उमेदवारांनी केले तरी मी डगमगलो नाही, अखेर रस्त्यावरील माझ्या एका प्रचारसभेत शेजारच्या वेश्यांच्या गल्लीतील दोन तीन घाणेरडी पोरे माझ्या प्लॅटफॉर्मवर चढून ‘बाबा बाबा’? म्हणून माझ्या अंगाला बिलगली तेव्हा माझा धीर सुटला! मी माझे नाव निवडणुकीतून मागे घेतले! "

ज्या प्रकारच्या वर्तनाच्या वार्ता सहज पिकविता येतात. ज्यावर लोकांचा सहज विश्वास बसतो व ज्याचा परिणामही विशिष्ट परिस्थितीत भयंकर होऊ शकतो, त्या वर्तनासंबंधी समाजाचे विचार सुस्पष्ट असणे जरूर आहे. तसेच त्याबाबतीतली समाजाची वृत्ती पोक्त हवी, अपक्व असून उपयोगी नाही. सामाजिक पोक्तपणाचे अथवा ‘मॅच्युरिटी’चे पहिले लक्षण म्हणजे एखाद्यासंबंधीची खुसखुशीत कंडी ऐकूनही मन निर्लेप ठेवणे. म्हणजे ती खोटीच मानावी असे नव्हे. पण त्या कंडीच्या विरुद्ध कोणी हकीकत सांगितली, तर (अर्थात ती तितकी खमंग नसूनही!) तीही खरी असू शकेल, असे मानण्याइतकी मनाची तयारी ठेवणे. गोष्ट साधी आहे, पण दुर्दैवाने दुर्मिळ आहे! म्हणूनच भवभूतीला म्हणावे लागले की, काव्य आणि स्त्रिया यासंबंधी बरे बोलणाऱ्यापेक्षां वाईट बोलणारेच अधिक! People believe because they like to believe; and not because there is reason to believe.

दुसरी गोष्ट आहे, ती विश्वास ठेवण्याचीच केवळ नसून त्यावरून निष्कर्ष काढण्याची आहे. एखाद्या वार्तेवरून एकच निष्कर्ष काढण्याकडे कल असणे, हे पुन्हा अपक्वपणाचेच किंवा Immaturity चेच लक्षण आहे. एका राजाची प्राचीन कथा प्रसिद्ध आहे. बऱ्याच वर्षांनी तो परमुलखातून घरी परत आला. रात्रीच्या वेळी राणीच्या पलंगावर एक तरुण निजलेला पाहून त्याने तलवार उपसली. तो त्याचाच, त्याच्या प्रवासकाळात वयात आलेला मुलगा होता! पण आणखीही एक गोष्ट दुसऱ्याच्या वर्तनावर मत देताना लक्षात ठेवण्यासारखी आहे. मत देताना ते नुसत्या घडलेल्या कृतीवर द्यायचे नसून विशिष्ट परिस्थितीतील व्यक्तीवर द्यायचे असते. ‘एकच प्याल्यात’ली तीन माणसे दारूच्या आहारी दाखविली आहेत. दारूबाजी हा दोष एकच; पण ते तिघे मानवाच्या वा ईश्वराच्या दृष्टीने सारखेच दोषी नव्हते. सुधाकराचे मद्यपान आणि तळीरामाचे मद्यपान जो मनुष्य एकच समजेल तो दुसऱ्याच्या वर्तनावर मत द्यायला अपात्र समजला पाहिजे. पण समाजातले बहुसंख्य लोक या वर्गातच पडतात असे दिसून येईल.

जी गोष्ट मद्यपानाची, तीच स्त्री-पुरुषसंबंधाची. जुन्या काळात एखादी विधवा सून आणि सासरा यांचा वाईट संबंध दिसला तर दोघांनाही एकच विशेषण लावून कुत्सितपणे आनंद मानणारे लोक कमी नसत. पण त्या दोघातील एक व्यक्ती 'बळी' (Victom) आणि दुसरी व्यक्ती 'बलात्कारी' असणेही शक्य असे. पण तिची असहायता लक्षात न घेता 'तीही त्यातलीच', नव्हे 'तीच वाईट' असे मानणारे लोक कमी नसत. कारण त्यात त्यांना अधिक आनंद असे!

कधीकधी गुप्त, पण अधिक गंभीर, गैरवर्तन टाळण्याकरिता उघड बदनामी स्वेच्छेने पत्करल्याची उदाहरणेही दिसतात. ब्रिटिश साम्राज्याचा माजी बादशाहा आठवा एडवर्ड याने 'A King's Story' या आपल्या आत्मचरित्रात, आपल्या प्रौढ. संयमी शैलीत या संबंधात मोठे विदारक उद्गार काढलेले स्मरतात. तो म्हणतो, 'मी जर जुन्या राजघराण्यातल्या लोकांप्रमाणे माझ्या मैत्रिणीला (आजच्या 'डचेस् ऑफ विंडसर'ला) एखाद्या जुन्या गढीत 'मिस्ट्रेस्' (अंगवस्त्र) म्हणून ठेवले असते किंवा राजवाड्याच्याच बगीच्याच्या मागच्या फाटकाची किल्ली तिजजवळ देऊन ठेवली असती तर ख्रिस्ती धर्म किंवा इंग्लिश कायदा या दोहोतूनही मी निसटू शकलो असतो व साम्राज्याच्या सिंहासनावर जन्मभर राहू शकलो असतो. मी तिच्याशी उघड लग्न करण्याचे धैर्य दाखवले, म्हणून मी इंग्रजांच्या ढोंगी नीतीपुढे गुन्हेगार ठरलो!

सुंदर इंग्रजीत लिहिलेली ड्यूक ऑफ विंडसरची ही आत्मकथा वाचल्यावर आपण त्याला राज्यत्याग करणारा वीर समजतो. कित्येक 'नीतिवादी' महाराष्ट्रीय त्याचा फोटोही दिवाणखान्यात लावतात! पण तो उदारपणा सिंहासनाचे धनी नसलेल्या लोकांच्या वाट्याला मात्र येत नाही! पण अशा प्रकरणात मनाचा तोल रहाण्याच्या आड जर काही येत असेल, तर माणसाचे 'स्कँडल्' बद्दलचे जन्मजात प्रेमच येते. चांगल्यापेक्षा वाईटावर विश्वास ठेवण्याची घाई, इतर दुर्वर्तनापेक्षा लैंगिक दुर्वर्तनाबद्दलच्या हकीकतीची आवड यांमुळे माणसाचा तोल सुटतो, अन् याचा फायदा स्वार्थी लोक तर घेतातच, पण निःस्वार्थी लोकही घेतात! कारण. अशा प्रकरणात निःस्वार्थीपणे लक्ष घालणारे लोकही कमी नसतात!

समाजात कुणाचे नुकसान कुणाच्या शत्रूंनी केले, तर त्याच्याशी इथे कर्तव्य नाही. कारण मनुष्य आहे. तोवर शत्रुत्वही असणार. जगातला दुष्टपणा नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेणे व्यर्थ आहे. पण सामाजिक अपक्कपणा कमी करणे शक्य आहे असे मला वाटते.

नव्हे, 'सांस्कृतिक टीकाकार' म्हणवणाराची मूलभूत श्रद्धांच मुळी ती असायला हवी, असे निदान मी तरी समजतो.

लोकसत्ता<br>दिवाळी ११९६९,<br>पृ. २० व २२

अनुक्रमणिका

## १३
# लैंगिक स्वातंत्र्याचा ‘बंडखोर’ प्रयोग

**दो**न-तीन आठवड्यापूर्वी मी इंदूर येथे गेलो असता वृत्तपत्रातले माझे सामाजिक विषयावरचे लिखाण वाचून एक—दोन तरुण ॲडव्होकेट माझ्याशी चर्चा करण्याकरिता आले होते. विवाहसंस्था आता निरुपयोगी ठरत असल्याने, ‘गटविवाहां’, (Group-marriages) चा प्रयोग करावा काय, ही त्या तरुण बुद्धिमान वकिलांनी माझ्यापुढे मांडलेली समस्या होती. त्यांची दुसरी एक समस्या अशी होती : "आमचे एक ख्रिश्चन मित्र आहेत. त्यांची तेरा—चौदा वर्षांची बहीण कुटुंबसंस्थेत आपली कुंचबणा होत आहे या कारणाने घर सोडून जायचे म्हणत आहे. तिची समजूत कोणत्या ‘अर्ग्युमेन्ट’ने करावी, हे मिस्टर डेव्हिड यांना समजेनासे झाले आहे."

"त्या मुलीच्या एक मुस्काटात देऊन पाहिले का त्यांनी?" मी सहजस्फूर्तीने विचारले. त्या बैठकीत बसलेल्या स्त्री—पुरुषांना माझी कल्पना मनातून पटत होती, पण ती त्या पालकाला युक्तिवादाने कशी पटवावी हे कळत नव्हते म्हणून त्यांना एकदम हसू लोटले. मी मात्र ती थट्टेने सुचविलेली नव्हती.

त्यानंतर पुण्यास परत आल्यावर एका सभेत एका समाजवादी पुढाऱ्यांनी अशीच नव्या समस्यांची चर्चा करताना म्हटलेले ऐकले "संततिनियमनाच्या एका गोळीने ‘अख्खी’ मनुस्मृती संपुष्टात येणार आहे!" वास्तविक मनुस्मृती म्हणजे प्लेटोच्या आदर्श समाजाप्रमाणे एक आदर्श आहे. हरघटकेला आपण मनुस्मृती गुंडाळून ठेवीतच आहोत! त्यात संततिनियमनाच्या गोळीने विशेष ते काय होणार? पण आमच्या ‘साथी’ महाशयांनी त्या नव्या साधनावरची श्रद्धा दांडगी एवढे मात्र खरे!

पाश्चात देशात, विशेषतः अमेरिकेत, Permissive society किंवा ‘विधिनिषेधहीन समाज’ हा शब्दप्रयोग आजकाल बराच फैलावलेला आहे. आणि तो फैलावण्याचे कारण सहज समजण्यासारखे आहे. व्यक्तीला ‘अमुक कर’, ‘अमुक करता कामा नये’ असे सांगण्याचा अधिकार जुन्या युगात धर्माकडे असे. निधर्मी युगात हे विधिनिषेध नियम संपुष्टात येणे साहजिक आहे. अर्थात दुसऱ्या व्यक्तीचे आर्थिक नुकसान किंवा दुसऱ्यास शारीरिक इजा केल्यास न्यायालयामार्फत दंड होण्याची व्यवस्था निधर्मी समाजातही असतेच. पण हे अगदी ढोबळ विधिनिषेध झाले. सूक्ष्म वैयक्तिक जीवनात ‘सरकार’ ही निधर्मी संस्था हात घालीत नाही.

आजच्या युगाचे आणखीही एक लक्षण म्हणून सांगता येईल. आजचे युग ‘प्रयोग’ करण्याचे युग आहे. राज्यव्यवस्थेचे प्रयोग, समाजव्यवस्थेचे प्रयोग, कुटुंबव्यवस्थेचे प्रयोग, लग्नसंबंधविषयक प्रयोग, नीतिविषयक प्रयोग सर्व प्रकारचे ‘प्रयोग’ करण्याला आजच्या युगात मुभा आहे. ‘परमिसिव्ह’ समाज म्हणजेच सर्व प्रकारची ‘मुभा’ देणारा समाज होय. आज स्त्री-पुरुष संबंधात किंवा लैंगिक नीतीच्या क्षेत्रात ‘मुभा’ आणि प्रयोग याची भाषा पाश्चात्य देशात जोरात चालू आहे. विवाहोत्तर पातिव्रत्य, विवाहपूर्व ‘पावित्र्य’ यांचा आज पाश्चात्यांनीही ‘निकाल’ (Liquidation) लावला आहे, अशातला भाग नाही. पण हे विषय आता स्वातंत्र्याच्या किंवा Permissiveness च्या कक्षेत आले असल्याने, प्रयोगोत्सुक तरुणांना त्या प्रयोगातले धोके पटविणे आवश्यक होऊन बसले आहे. धर्म आणि रूढी यांनी घालून ठेवलेले ‘Taboo’ किंवा ‘निषेध’ आजच्या तरुणांना भिववू शकत नाहीत उलट चेववितात!

"What then are the intrinsic values that make the case for chastity". (पावित्र्याची आणि शीलाची बाजू सजवू शकतील अशी मूलभूत मूल्ये कोणती?) असे एक पाश्चात्य लेखिका गंभीरपणे विचारते.

आपल्या देशातली नैतिक क्षेत्रातले बंडखोर कमी नाहीत. पहिले बंड माझे एकेकाळचे गणिताचे गुरू प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी केले. 'पातिव्रत्य हा सद्‌गुण काल्पनिक आहे,' 'विवाहापूर्वी पुरुषांनाच केवळ नव्हे, तर स्त्रियांनाही संभोगाचा अनुभव असणे हिताचे आहे'. या प्रकारची आपली मते ते आपल्या छोट्या मासिकातून आग्रहाने मांडीत असत. त्यांचे स्वतःचे जीवन निरपवाद होते. ते आपल्या रुग्ण पत्नीची परिचर्या मनोभावाने करताना मी पाहिलेले होते. आपल्या या विचित्र नीतिसिद्धांतांकरिता ते धोका आणि आर्थिक तोटाही सोशीत असत! त्यानंतर अलीकडे महाबुद्धिमान समाजवादी नेते डॉ. लोहिया यांनी 'योनिशुचिता' हा धाडसी शब्दप्रयोग शोधून काढला होता. त्यांच्या मते आपला समाज पातिव्रत्य आणि विवाहपूर्व पावित्र्य (अर्थात स्त्रियांचे!) यांना फाजील महत्त्व देतो. पातिव्रत्याऐवजी त्यांनी 'योनिशुचिता' हा जालीम शब्द शोधून काढून पातिव्रत्य कल्पनेचा फुगा फोडल्याचा आनंद मिळवला होता!

'लैंगिक पावित्र्याने कुणाचाच फायदा नाही' 'लैंगिक स्वातंत्र्यात, किंबहुना स्वैरतेत तोटा असलाच तर काल्पनिक आहे.' या कर्वे आणि लोहिया यांच्या कल्पना खऱ्या असतील काय? पाश्चात देशातल्या लोकंना आज 'Case for chastity' उभी करणे जितके अवघड वाटत आहे, तितके अवघड आहे का? मला वाटते बर्ट्रांड रसेल, र. धों. कर्वे, डॉ. लोहिया यांसारखे लोक 'लैंगिक संबंध' म्हणजे केवळ शरीरसंबंध आहे अन तोही केवळ क्षणात संपणारा संबंध आहे, असे मानण्याची चूक करतात. असामान्य बुद्धिमान असूनही त्यांच्या हातून अशी चूक होण्याचे कारण जुन्या विधिनिषेधांच्या कैचीची त्यांना आलेली चीड हेच होय. गळ्यात बांधलेल्या दाव्याला हिसडे देणारे ढोर, 'दावे तोडणे' एवढी एकच गोष्ट जाणते तशी स्थिती 'taboo' (निषेध) या शब्दाने पिसाळलेल्या बुद्धिमन्तांची होत असते.

केवळ दावे तोडण्याचा विचार बाजूला सोडून स्त्री-पुरुषसंबंधाचा खोल विचार केला, तर इतर कितीतरी गोष्टी लक्षात आल्याशिवाय राहणार नाहीत. लैंगिक संबंध हा शरीरदृष्ट्या क्षणिक संबंध असला तरी, मानसिकदृष्ट्या तो केवळ क्षणिक संबंध नसतो. विशेषतः स्त्रीला पहिला लैंगिक संबंध हा एक किरकोळ प्रसंग (Casual Incident) मानणे शक्य नसते. तिच्या केवळ सौंदर्यभावनाच त्यात गुंतून राहतात असे नव्हे, तर व्यक्तिपूजेची भावनाही प्रथमसंबंधात गुंतून राहते. भावनात्मकदृष्ट्या इतका खोल जाऊन पोहोचणारा संबंध विवाहबंधनाच्या अभावी 'क्षणिक' मानण्याची, नव्हे विसरण्याची अन् लपविण्याची आवश्यकता जेव्हा उत्पन्न होते, तेव्हा तिच्या मनावर विपरित परिणाम झाल्याशिवाय राहत नाही.

हे धोके स्वातंत्र्यवादी बुद्धिमन्तांना कसे दिसत नाहीत कोण जाणे. मला वाटते, फ्रॉईडच्या शोधातून ते एकच सिद्धांत उचलतात. तो म्हणजे "लैंगिक वासनेचा अवरोध (Repression) वाईट" एवढाच. पण कामाकर्षणरूपी नाजूक आणि लहरी भावनेला सर्वांनीच पूर्ण वाव द्यायचा ठरविला तर कोणत्या सामाजिक आपत्ती येतील, याचा स्वातंत्र्यवाद्यांनी विचार केलेला असतो असे वाटत नाही. लैंगिक स्वातंत्र्याला अडचण आहे, ती नुसत्या रूढ नीतिनियमांची आहे, अशी यांची कल्पना दिसते! पण कामपूर्तीला दोन व्यक्तींची गरज असते. म्हणून नीतिनियमांतून सुटका करून घेतल्यावरही "Repression" ची (अवरोधाची) आपत्ती येणार नाहीच असे नव्हे. केवळ 'नैतिक अवरोध' टाळण्याने सर्व लैंगिक प्रश्न सुटतील असे नव्हे.

अनुक्रमणिका

लैंगिक विधिनिषेधमागची ही गुंतागुंतीची मानसशास्त्रीय पार्श्वभूमी, डॉ. लोहियांसारखे लोक तरुणांना समजावून देत नाहीत. केवळ जुन्याविरुद्ध बंडाचा आदेश दिला म्हणजे पुरे अशी त्यांची कल्पना असते!

कदाचित बंड आणि जुन्यांची मोडतोड यांच्या चिन्तनात त्यांना नाजूक मानवी मनोरचनेचा विचार करायला फुरसत होत नसेल!

तरुण भारत<br>
२२ एप्रिल १९७०,<br>
पृ. २

# १४
# कॅबरे नृत्य व भारतीय स्त्री

**का**ही महिन्यापूर्वी पुण्याच्या एका दैनिकात एका त्रस्त महिलेचे एक पत्र प्रसिद्ध झाले होते. महिला परिषदेच्या की अन्य एका स्त्रीसंस्थेच्या कार्यक्रमात एका भारतीय तरुणीने 'कॅबरे' नृत्य करून दाखविले. ही तिची तक्रार होती. वास्तविक कॅबरेचा मुळचा अर्थ मोठ्या हॉटेलने खास आपल्या गिऱ्हाइकांकरिता ठेवलेला 'डान्स' एवढाच आहे. सार्वजनिक 'थिएटर'मध्ये होणाऱ्या नृत्यावर कायद्याची बंधने पडतात, तर हॉटेलच्या चैनी रहिवाश्यांकरिता केलेल्या कार्यक्रमात मन मानेल त्याप्रकारचे नृत्य करून दाखविता येते ही कल्पना हळूहळू प्रसार पावली व त्यातूनच 'कॅबरे' नृत्याला 'नग्न—प्राय स्त्रियांनी केलेले नृत्य' हा अर्थ प्राप्त झाला. महाराष्ट्र सरकार आता हॉटेलांतील नग्न नृत्यावर बंदी घालण्याचा विचार करीत आहे म्हणे!

अशा नृत्यांच्या संदर्भात आणखी एका प्रकारचा उल्लेख होत असतो. तो म्हणजे 'स्ट्रिप-टीज' चा प्रकार होय. 'स्ट्रिप' म्हणजे 'कपडे काढणे,' 'विवस्त्र होणे, किंवा करणे, आणि 'टीज' म्हणजे 'त्रस्त करणे, खिजवणे'. रंगमंचावर नर्तिकेने अंगावरचा एक एक कपडा काढून टाकणे व अखेर केवळ कायद्याने जरूर तेवढे कपडे शिल्लक ठेवणे हा 'स्ट्रिप' चा अर्थ झाला. सार्वजनिक नग्नताविरोधी कायद्याप्रमाणे स्त्रीला किती कपडे आवश्यक? तर एक लंगोटी कमरेला अन् दुसरी चिंधी स्तनभागाला बांधलेली! अन कायद्याची ही किमान कैचीदेखील सैल करण्याकरिता, हॉटेलाच्या सुरक्षित आवारात नृत्य! मुंबईच्या बड्या हॉटेलात या दोन लज्जारक्षक लंगोट्या फेडून Strip करून केलेल नृत्य पाहावयास मिळते व ते भारतीय स्त्री—पुरुष, दांपत्येदेखील खुशाल पाहातात, अशी माहिती बरेच दिवस कानावर आहे. आता सरकार जागे होऊन काही हालचाल करू लागले आहे.

अर्थात इतर सर्व विषयांप्रमाणे याही विषयात आमच्या पश्चिमाभिमुख शहाण्यांत दोन मते आहेतच! नग्नतेत वाईट ते काय? कायदे करणारे पार्लमेंट—मेंबर आणि त्यावर हुकुम, शिक्षा देणारे सन्मान्य न्यायाधीश हे सर्व वस्त्राआड नग्नच आहेत! 'वस्त्राआड जग नागवे' इ. इ. वेदान्त सांगणारे पुरोगामी विद्वान गावोगावी पसरलेलेच आहेत. 'भारतीय चित्रपटात चुंबन आणि नग्नताही प्रसंगानुसार असण्याला हरकत नाही' अशी शिफारस करण्याचे पुरोगामी 'कदम' खोसला कमिशनने टाकलेच आहे. त्या वेळी जी चुंबन चर्चा झाली, तिच्यामुळेच की काय कोण जाणे, मुंबईच्या नव्हे 'आशियाच्या' एका सचित्र इंग्रजी साप्ताहिकाला कौपीनधारी वा कौपीनविहीनही नटींची आणि नृत्यांगनाची छायाचित्रे दर आठवड्याला छापण्याला अवसान चढले आहे! अगदी अलीकडेच त्या साप्ताहिकाने मुंबईच्या बड्या हॉटेलातील एका पाहुण्याच्या मांडीवर एक कौपीनधारी लठ्ठ स्त्री निर्धास्तपणे बसलेली दाखविली होती. फोटो रंगीत होता. एका प्रौढ पाहुण्याच्या मांडीवर बुड तर दुसऱ्याच्या मांडीवर पाय, अशा थाटात ती स्त्री बसलेली होती!

याखेरीज हिप्पी स्त्रियांचे नग्न फोटो, 'ओ कॅलकटा' या कुप्रसिद्ध नाटकातल्या नग्न स्त्री-पुरुष नटांचे फोटो असा या संभावित साप्ताहिकाने तडाखा चालविला आहे. एकेकाळी ॲग्लोइंडियन ऑफिसरांच्या रिकामटेकड्या बायकांची दुपारची करमणूक म्हणून खपणाऱ्या या साप्ताहिकाने, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय भांडवलवाल्यांच्या मालकीचे झाल्यावर, ज्या नग्नक्रिडा चालविल्या आहेत, त्यांचे त्याच्या सभ्य सुखवस्तू वाचकानांही नवल वाटत आहे, असे वाचकांच्या पत्रावरून दिसते. अशा या नग्नतेच्या जमान्यात कायद्याने कार्य कितपत साधणार हा एक प्रश्नच आहे.

आजचे युग हे 'अनुमतियुग' किंवा 'Permissive Age' आहे. बंधने, वर्जावर्ज Taboos याचे त्या युगाला वावडे आहे. म्हणजे हे युग स्वैर किंवा 'रावबाजीचे' युग आहे असेही नव्हे. 'रंगेलपणा' हे त्याचे ब्रीद नसून 'रूढनिर्बंधभंग' हे त्याचे ब्रीद आहे! कायद्याच्या नव्या निर्बंधामुळे त्याचे निर्बंधविरोधी पुढारी अधिकच फुशारून जाण्याचा संभव आहे. जे चोरुन करमणुकीखातर चालते, त्याला हक्करक्षणाच्या लढाईचे स्वरूप येण्याचा संभव आहे. दारूबंदीसंबंधीच्या उलट सुलट कायद्यांचा 'रोख' (net) परिणाम कोणता? तर दारूसंबंधीची भारतीय सुसंस्कृत लोकांची लाज नष्ट झाली! उघडपणे दारूच्या दुकानात जाणे, दारूचे परमिट काढणे ही आज आमच्या महाराष्ट्रात देखील सुखवस्तूपणाची खूण ठरत आहे! महाराष्ट्रातले जे ब्राह्मण, वैश्यादीवर्ग शतकानुशतके कट्टे निवृत्तमांस (Vegetarian) आहेत, त्यांना "आपण व्हेजिटेरियन आहोत" हे सांगताना अलीकडे ओशाळल्यागत वाटत असते! ही 'प्रगती' आमच्या पिढीच्या डोळ्यादेखत झाली. तशीच 'प्रगती' आता आपण 'ड्रिंक' वगैरे घेता की नाही? हा प्रश्न उच्चवर्णीय हिंदूंना उघडपणे विचारण्यातही होत आहे. वस्तुतः सार्वजनिक नग्नतेने आपणा सर्वांनाच किळस येते. पण. वाङ्मयातल्या वा रंगमंचावरल्या नग्नतेला विरोध करण्याची भाषा कुणी काढली तर आम्हाला लगेच व्यक्तिस्वातंत्र्याची आठवण होते!

नग्नतेला व्यक्तिशः किंवा कायद्याने विरोध करणे हे आज 'फॅशनेबल' ठरत नाही. मागासलेपणाचे, खेडवळपणाचे ठरते. अशा स्थितीत 'कॅबरे'नृत्याला कायद्याने कशी बंदी घालायची, हा प्रश्न मुख्य नसून नग्नतेसंबंधी आपल्या समाजात पाश्चात्यांच्या अनुयायित्वामुळे जी अनुज्ञावृत्ती (Permissisveness) उदय पावत आहे. ती कशी नष्ट करावयाची हा मुख्य प्रश्न आहे. या वृत्तीमुळे 'तरुण' बिघडतील की काय' हा जुना घाबरट प्रश्न माझ्या मनात मुळीच नाही. विवस्त्रतेला समाजात स्थान देण्या न देण्याचा संबंध नीतिमत्तेपेक्षा सभ्यतेशी आहे. लैंगिक नीतिमत्ता हा मनुष्याचा खाजगी प्रश्न होऊ शकेल, पण 'लैंगिक सभ्यता' हा सामाजिक प्रश्न आहे.

आपल्या सामाजिक सभ्यतेत वा संस्कृतीत स्त्रियांचा एक आदर्श किंवा 'Pattern' गृहीत धरलेला आहे. आपल्याकडील जुन्या कलावंतिणी वा नायकिणीही सलज्जतेत गरती स्त्रियाचे अनुकरण करीत. आपल्या नर्तकीही शरीर शक्य तेवढे आच्छादून घेत. विनयात आणि लज्जेत केवळ सभ्यताच नव्हे, तर आकर्षकताही आहे, असे आपण भारतीय लोक मानतो. जुना युरोपियन समाजही तसेच मानीत असे. जास्तीत जास्त शरीर उघड टाकण्याची प्रथा पाश्चात्य स्त्रियांनी अलीकडेच चालू केली आहे. पोषाखापुरत्या आपल्या सभ्य स्त्रिया त्या प्रथेला बळी पडत आहेत तर नृत्याच्या क्षेत्रात तीच प्रथा 'स्ट्रिपटीज' चे रुप घेत आहे. विवस्त्र होणे, हा कलेचा भाग समजण्याइतकी गावंढळपणाची दुसरी कोणतीच कल्पना नसेल! ती केवळ हॉटेलातील परदेशी मुशाफिरांपुरती मर्यादित न राहता महिला परिषदेच्या कार्यक्रमात शिरणे ही बिनडोक अनुकरणाची परमावधी होय!

आणखी एका वेडगळ अनुकरणाचा वेळीच प्रतिकार केला पाहिजे. 'फॅशन शो' किंवा फॅशन परेडच्या नावाखाली सभ्य मुलींना रंगमंचावर एखाद्या कंपनीच्या मालाबरोबर स्वतःच्या पुरोभागाचे, पार्श्वभागाचे, प्रदर्शन करायला लावण्यात शुद्ध बाजारीपणा आहे. स्त्रियांच्या एका बक्षीस समारंभाकरिता पाहुणा म्हणून काही वर्षांपूर्वी मुंबईस गेलो असता मी 'फॅशन शो' प्रथम पाहिला. सिंधी, पंजाबी, पारशी, अँग्लोइंडियन मुलींनी वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या नेसून स्टेजवर स्वशरीराचे भाग दाखवणे एवढाच कार्यक्रम! परवा पुण्यात असाच कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिरात झाला. मागे एका 'हेअर ऑइल' कंपनीने

पुण्यातल्या अनेक सभ्य मुलींना जाहीर 'आंबाडे प्रदर्शना'ला जुपले होते! अनुकरण प्रवृत्ती आणि वर्तमानपत्री प्रसिद्धी यांच्यापुढे आम्ही आपली सभ्यता चुटकीसरशी गुंडाळून ठेवायला प्रवृत्त होतो, हे पाहून नवल वाटते, आपली मूल्ये पक्की असतील, तर 'कॅबरे' काय, किंवा किंवा 'फॅशन परेड' काय, आपल्या सभ्यतेत बसत नाहीत, हे आमच्या स्त्रियांनी सहज ओळखले असते.

तरूण भारत
२८ जून १९७०
पृ. २

अनुक्रमणिका

१५

# नवलकथा की शोककथा?

**आ**मदार नवलकर यांची मुलाखत 'तरुण भारत' मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून पुण्याच्या विचारी लोकांत एक प्रकारची खळबळ माजली आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात वेश्याव्यवसाय व विलासाची इतर साधने धनिकांना पूर्वीपासून उपलब्ध आहेत. नवलकरांनी जी शोचनीय नवलकथा सांगितली, ती विलासांची नव्हे, ती आहे विलासांपायी सुरू झालेल्या कुलीन मुलींच्या देहविक्रयाची. नवलकरांनी या वाढत्या रोगाचा उघडपणे उच्चार केला व 'तरुण भारत' ने निर्भयपणे त्याला प्रसिद्धी दिली, ही गोष्ट फार चांगली झाली. पण कुलीन मुलींच्या गुप्त देहविक्रयाची हे कथी तितकीशी नवीन नाही. तिच्यासंबंधी शोधपूर्वक उघड बोलणे, हाच काय तो यातील 'नवला'चा भाग आहे. कारण या गुप्त व्यवहारासंबंधी मुंबईत गेली वीस वर्षे लोक एकमेकांच्या कानांत कुजबुजत आहेत. त्या संबंधातील माझी एक आठवण नमुना म्हणून सांगतो.

मला वाटते मी नागपूरला की इंदोरला कुठेतरी चाललो होतो. माझ्या डब्यात दुसरे एक (मुंबईकर) साहित्यिक होते. मुंबईला अलीकडे आलेल्या बकाली स्वरूपाबद्दल आम्हा साहित्यकांचे बोलणे वरवर आणि गैरमाहितपणे चालू होते. ते ऐकून आमच्या डोक्यावरील 'बर्थ' वर अर्धवट जागा असलेला एक परप्रांतीय मुंबईकर प्रवासी अस्वस्थ झाला. त्याने आमच्या अर्धवट आणि 'सेकंडहँड' ज्ञानाची कीव करून आपला स्वतःचा अनुभव सांगण्यास प्रारंभ केला. तो म्हणाला, "दादरमधील उत्तम वस्तीत माझा फ्लॅट आहे मी धंद्यानिमित्त दिवसभर बाहेर असतो, हे माझ्या शेजाऱ्यांना माहीत आहे. एक दिवस थोडे बरे नसल्याने अवेळी म्हणजे भर दुपारी मी घरी आलो. कुलूप उघडले आणि सरळ बेडरूममध्ये जाऊन, घामाने डबडबलेले कपडे भिरकावून, कॉटवर अंग टाकले. तो माझ्या अंगाखाली काहीतरी मऊमऊ लागत आहे असे वाटल्याने मी कॉटवरील कपड्यांचा ढीग बाजूला करण्याचा प्रयत्न केला. तो कपड्यांचा ढीग नसून त्या कपड्यांत एक तरुणी झोपलेली आहे असे मला आढळले. मी 'शॉक' होऊन कॉटखाली उतरलो आणि तिच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली."

त्या प्रवाशाने सांगितलेला सर्व तपशील येथे सांगण्याची गरज नाही. समाजसंरक्षणाच्या दृष्टीने अवश्य तेवढाच भाग सांगायचा झाला, तर तो असा. सदर गृहस्थाच्या कुलपाला दुसरी किल्ली चालवून त्याच इमारतीतील  किंवा अन्य ठिकाणच्या कोणीतरी त्या जागेचा उपयोग दुपारपुरता कुंटणखान्यासारखा करण्यास प्रारंभ केला होता. "तुम यहाँ कैसी?" असा प्रश्न त्या मुलीला त्या जागेच्या त्या हक्कदार भाडेकरून केल्यावर "मै हररोज दोपहर यहाँ ऐसीही आती रहती हूँ" असे तिने उत्तर केले.

असे म्हणतात की, हे प्रकार दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस व पाकिस्तानी दंगलीनंतर सुरू झाले. मुंबईत झालेली विपदग्रस्तांची गर्दी हे यांचे कारण, असेही म्हटले जाते. पण मुंबईच्या 'ब्लिटझ्' (इंग्रजी) पत्रासारखी पत्रे दिल्लीतील कुलीन सुशिक्षित मुलींच्या तनुविक्रयाचीही वर्णने छापतात. एकेकाळी मुंबई हे विलासाचे केंद्र होते. अलीकडे तो 'मान' दिल्लीकडे गेला आहे. जे स्वातंत्र्योत्तर दिल्लीत होत होते ते आता मुंबईस होऊ लागले आहे. वेश्याव्यवसाय हा मानवी संस्कृती इतका जुना आहे. कुंटणव्यवसायही जवळ जवळ तितकाच जुना आहे. आता त्याच्या भरीला पाश्चात्यांनी पावन केलेले भयानक मादक पदार्थही आले आहेत. पण 'एल. एस. डी.' वगैरे मादक पदार्थ काहीच नव्हेत, इतके भयानक व चार्वाकालाही लाजविणारे

तत्त्वज्ञान त्याच्याच जोडीला आले आहे. आणि ते तत्त्वज्ञान पसरविण्याचे कार्य शरमेची गोष्ट म्हणजे आमचे पुरोगामी साहित्यिक करीत आहेत!

नवलकरांनी ज्या 'डान्सिंग स्कूल्स' मधील अनाचाराच्या हकीकती सांगितल्या, ती कसली स्कूल्स आहेत, किंबहुना ती 'स्कूल्स' तरी आहेत का याची मला कल्पना नाही. परंतु 'कुलीन स्त्रियांनी नृत्य शिकण्यात गैर काही नाही', किंबहुना 'नृत्यकला राखण्याची जबाबदारी कुलीन स्त्रियांवरच आहे! ही विचारसरणी पुरोगामी लेखकांनीच प्रसृत केली. पुरोगाम्यांनी पसरविलेली दुसरी घातक विचारसरणी म्हणजे पाश्चात लोक जे जे करतात, ते ते आपण बिनधोक करावे, नव्हे या पाश्चात्यीकरणातच प्रगती आहे, आधुनिकता आहे. 'Modernization' आहे. हे आमच्या पुरोगामी साहित्यिकांचे पालुपद आहे. आपल्याकडील नृत्य ही एक क्लिष्ट कला आहे. शिवाय आजवर तरी ती कला सांभाळणाऱ्या स्त्रियांचा वर्ग स्वतंत्र होता. पण ज्याला सामाजिक नृत्य म्हणता येईल, अशा स्त्री-पुरुष संमिश्रनृत्याचे माहात्म्य पश्चिमेत मोठे आहे. नवलकरांनी उल्लेखिलेल्या 'नृत्यशाळा' या अशा संमिश्रनृत्याच्या असणार. आपल्याकडे महाराष्ट्रात तरी कुलीन समाजात संमिश्रनृत्य रूढ नाही, तेव्हा तसे नृत्य केल्यास खळबळ उडेल. पण केवळ पाश्चात्य लोक परस्त्रीच्या कमरेभोवती हात घालून 'सामाजिक समारंभ' म्हणून नाचतात, एवढ्यामुळे आमच्यातील पुरोगामी लोकांनी त्याला पावनत्व दिले असावे! नाही तर मुंबईसारख्या महाराष्ट्रीय शहरात या शाळा चालतात कशा? पुण्यातही लष्करभागात अशा काही शाळा पूर्वीपासून आहेत असे कळते. पण त्या केवळ 'शाळा' आहेत. नवलकर म्हणतात तसा बोभाटा त्यांच्या संबंधी कधीच ऐकू येत नाही. पण स्त्री-पुरुषांनी संमिश्रनृत्य करण्याची प्रथा मंजूर मानण्यानेच नवलकरांनी सांगितलेल्या गैरप्रकारांना दरवाजा खुला झाला, असे म्हणावे लागेल. अनीती प्राचीन आहे. पण अनीतीला प्रतिष्ठित रूप देण्याचा प्रकार हा अर्वाचीन आहे. मद्यपान या देशातही लपूनछपून होते पण त्याला प्रतिष्ठा मात्र काही लोक अलीकडेच प्राप्त करून देत आहेत. व्यसनांना आणि व्यभिचाराला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या तत्त्वज्ञानाला आत्मविश्वासाने व कसून विरोध केला पाहिजे.

या मूर्खपणाच्या तत्त्वज्ञानाचा प्रवेश तरुणवर्गात जितका सहज होतो, तितका अन्य वर्गात होत नाही. ललित वाङ्मय आणि शिक्षणसंस्था यांच्याद्वारे काही घातुक आणि मूर्खपणाच्या प्रथा आपल्या समाजात शिरत आहेत. नवलकरांनी मुंबईच्या कॉलेजांत चालणाऱ्या 'Twist' डान्सचा उल्लेख केला आहे. मला स्वतःला हे नृत्य पहाण्याचाही प्रसंग आलेला नाही. पण काही दिवसांपूर्वी येथील 'सोबत' साप्ताहिकात मुंबईच्या कॉलेजातील असल्या प्रकारावर प्रकाशझोत टाकणारे प्रक्षोभक लेख आले होते. त्यावरून मला थोडीफार कल्पना आली. आपली कॉलेजे इंग्रजीतून ज्ञान देतात अथवा त्यांना इंग्रजीतून ज्ञान द्यावे लागते एवढ्यावरून तेथे सर्व इंग्रजी रीतीरिवाज व सामाजिक उत्सव शिरणे जरूर आहे, अशी कित्येकांनी पूर्वीपासून समजूत करून घेतली आहे! या समजुतीचा उद्रेक विशेषतः कॉलेजांच्या वार्षिक सम्मेलनांत होतो. मुलामुलींचे संमिश्र नाटक, संमिश्र नृत्य, 'फिशपॉंड'च्या रूपाने थट्टामस्करी, हे सर्व प्रकार कॉलेज म्हटले की त्यात असलेच पाहिजेत, अशी आमच्या विद्यार्थ्यांनीच नव्हेत, तर प्रोफेसरांनीही समजूत करून घेतलेली दिसते, कॉलेज इलेक्शन आणि वार्षिक सम्मेलन हे दोन आम्ही पाश्चात्यांकडून घेतलेले होलिकोत्सवच बनले आहेत! मागे काही वेळा कॉलेजांच्या यूथ फेस्टीव्हलमध्ये परीक्षक म्हणून जाण्याच्या मला प्रसंग येत असे. त्यात 'फोक् डान्स'च्या नावाखाली पुण्यातील एका प्रसिद्ध कॉलेजने तरुणतरुणींच्या फुगड्या सादर केल्या होत्या. 'फुगड्या' महाराष्ट्रीय आहेत; पण तरुणतरुणींच्या फुगड्या मात्र महाराष्ट्रीय नाहीत! पण आज, आंतरभारतीय, आंतरराष्ट्रीय 'कल्चर' च्या निमित्ताने असे सांस्कृतिक कार्यक्रम मान्यता पावत आहेत.

एकदा, औचित्याच्या रूढ कल्पना धुडकावून लावण्यातच बहाद्दरी आहे असे ठरले म्हणजे समाज कोठपर्यंत घसरत जातो, ते नवलकरांनी सादर केलेल्या मुंबईच्या भेसूर चित्रावरून दिसून येते. ही गटारगंगा रोखून धरण्याची पहिली जबाबदारी राष्ट्रवादी साहित्यिकांची आहे. त्यांच्या खालोखाल जबाबदारी कॉलेजच्या प्रमुखांची आहे. पण आज कॉलेचजे 'प्रमुख' कोण आहेत? प्राचार्य की विद्यार्थी? कॉलेजप्रमुखांनी घाबरटपणा सोडला की चांगल्या विद्यार्थ्यांचा तरी त्यांनी पाठिंबाच मिळेल.

तरुण भारत<br>
२१ मे १९७२,<br>
पृ. २

अनुक्रमणिका

१६

## हे कसले रोमिओ?

**दि**ल्ली येथे गेल्या महिन्याच्या अखेरीस एक चर्चा घडवून आणली होती. तिचा विषय "स्त्रीच्या दृष्टीने कायदा आणि सुव्यवस्था" हा होता. त्यात पाच अविवाहित सुशिक्षित तरूणींनी भाग घेतला होता. "नोकरी करणारी स्त्री दिल्लीसारख्या शहरात संध्याकाळनंतर असुरक्षित असते," हा त्या चर्चेचा निष्कर्ष होता!

दिल्लीत रस्त्यांतील किंवा बसमधील स्त्रियांशी वागण्याचे कोणते नवीन 'पुरोगामी' रिवाज तयार होत आहेत. याची मला कल्पना नाही. पण पुण्या—मुंबईतील रिवाजांपेक्षा ते रिवाज थोडे "पुढे गेलेले" आहेत असे दिसते. पुण्या—मुंबईतीलही सार्वजनिक जागीचे वर्तन संपूर्णतया श्लाघ्य असते असे नव्हे. परंतु दिल्लीच्या स्त्रियांनी केलेल्या तक्रारीकडे पाहिल्यास पुण्या—मुंबईतील स्त्रीविषयक वर्तन बरेच सभ्य ठरेल असे वाटते. तरुण स्त्रियांकडे अधाशीपणाने पहाणे, 'बेल' नसलेली सायकल स्त्रियांच्या जवळून नेताना बेलच्या आवाजाऐवजी नाना प्रकारचे आवाज तोंडातून काढणे, शिट्टया मारणे इत्यादी 'सभ्य' चाळे पुण्यातही होतात एकट्यादुकट्या स्त्रीची प्रतिकारशक्ती अंदाजून यापेक्षाही पुढचे चाळे होतात, हे बहुतेकाना ठाऊक असेल, पण दिल्लीतील सभ्यता याच्याही पुढे गेली आहे, असे दिसते. दिल्लीतील चर्चेत एका तरुण स्त्रीने सांगितले : आम्हाला असभ्य लोकांकडून होणाऱ्या उपद्रवापेक्षा जनतेची याबाबतीतील उदासीनता अधिक अक्षम्य आहे. काही लोक असे प्रकार पाहून न पाहिल्यासारखे करतात, काहीना तर उघड आनंद होतो! आणि पोलीसही मध्ये न पडण्याचे ठरवतात! मिस् इस्माइल या मुसलमान तरुणीने सुचविले, "स्त्रियांना होणारा त्रास चुकविण्याचा एक मार्ग म्हणजे कमी भडक पोषाख करणे. "

अर्थात या तक्रारी आणि त्यावर सुचविलेले इलाज नवीन आहेत असे नव्हे पण या बाबतीत सभातून वा मासिकांतून वेळोवेळी होणाऱ्या चर्चा वाचून मला एक सामान्य निष्कर्ष काढावासा वाटतो. पाश्चात्य शिक्षण आले, पाश्चात्य पोषाख आले, पाश्चात्य संचार-स्वातंत्र्य आले, तर अद्याप पाश्चात्य सार्वजनिक सभ्यता मात्र आमच्या मोठ्या शहरात आली नाही. आणि आमच्याकडे मुळात असलेला विनय तर आता जुनाट म्हणून टाकाऊ ठरवण्यात आला आहे!

या नव्या असभ्यतेसंबंधी वापरली जाणारी पाश्चात्य भाषाच मुळी आमच्या भारतीय कानांना कटू लागणारी आहे. दिल्लीच्या चर्चेत मिस् मसानी नावाच्या स्त्रीने या असभ्यतेला ('Eve-teasing') हा खुसखुशीत आणि चहाटळ शब्द वापला, परस्त्रीशी केलेल्या अतिप्रसंगाबद्दल हा शब्द वापरणे म्हणजे स्त्रियांशी केलेल्या अतिप्रसंगाने आपल्याला किळस वाटत नाही, हे सिद्ध करणे होय. हा शब्द पुरुष तरी स्त्रीची प्रछन्न अवहेलना करण्याकरताच वापरतात. कारण जिच्या वर्तनाने आदिमानव पुण्यलोकातून पापलोकात आला, ती 'आदिकामिनी' म्हणजे (ख्रिश्चन पुराण कल्पनांप्रमाणे) 'Eve' होय! स्त्रीविषयीची आपली कल्पना याहून उच्चतर आहे आणि म्हणूनच रस्त्यातील स्त्रीला उपद्रव देण्यासंबंधी आपल्या हिंदी मनात जन्मजात घृणा आहे. सामाजिकदृष्ट्या आम्ही स्त्री ही 'कामिनी' मानत नाही. तर भगिनी मानतो; पाश्चात्य शिक्षणाने प्रत्येक स्त्रीला आम्ही कामिनी मानू लागलो व Flirting चा (लघाळपणाचा) अंतर्भाव क्षम्य रसिकतेत करू लागलो!

अनुक्रमणिका

रस्त्यात लघाळपणा करणाऱ्याना आणखी एक इंग्रजी शब्द लावण्यात येतो व त्याचाही मला उबग येतो. तो शब्द म्हणजे 'Road-side Romeos' हा होय. हा शब्द गांधीजींनीही आपल्या साप्ताहिकात वापरल्याचे मला स्मरते. अनोळखी मुलीशी लाज सोडून फाजीलपणा करणारे, हे 'रोमिओ' कसले? 'रोमिओ' हा शेक्सपियरच्या अमरनाट्यकृतीमुळे उत्कट आणि अचल प्रेमाचे अखिल वाङ्मयात प्रतीक बनला आहे. रस्त्यातील 'लोफर्सना' (मवाल्यांना) 'रोमिओ' म्हणणे, म्हणजे मवाल्यांचा सन्मान करणे होय. भाषेच्या असल्या गबाळ उपयोगाने आपल्या नैतिक मूल्यांतही गोंधळ होतो. ज्या वर्तनासंबंधी तिरस्कार वाटायला हवा, त्यासंबंधी केवळ इंग्रजी वाक्प्रचारांच्या अनुकरणाने आमची वृत्तपत्रे थट्टामस्करीची भाषा वापरतात. पण हा भाषिक मिथ्याचार परिणामी घातुक ठरणारा आहे.

हा सार्वजनिक ठिकाणचा असभ्यपणा इकडे शिक्षण वाढत असता वाढीला का लागावा? दिल्लीतील चर्चेत कु. वीणा आगरवाल या तरुणीने सांगितले की, "१९७२ मध्ये दिल्लीत स्त्रियांशी असभ्यपणा करण्याच्या पाचशे केसेसचा 'रिपोर्ट' होता, तर १९७३ मध्ये तेच प्रकार चौदाशेवर आले आणि पोलिसांपर्यंत किंवा वृत्तपत्रांपर्यंत न आलेले प्रकार असतील ते वेगळेच."

असभ्यतेतील या वाढीची मीमांसा करणे अवघड नाही. रस्त्यातील असभ्यतेचे मूळ वाङ्मयातील असभ्यतेत आहे, यात शंका नाही. अनोळखी स्त्रीशी असभ्यपणा करण्याने जुन्या समाजात माणसाशी अब्रू जात असे. चार लोकांना ते समजल्यास असा रस्त्यावरील 'रोमिओ' मारही खात असे. आज दिल्लीत तेच असभ्य वर्तन थट्टेचा किंवा उपेक्षेचा विषय ठरले आहे. याचे कारण हा असभ्यपणा, चित्रपट आणि दरमहा जन्म पावणारी 'कॉमिक्' नाटके यांचा हुकमी कमाईचा विषय ठरला आहे. ज्यांना जीवनाचे खोल अर्थपूर्ण चित्र रंगविण्याची ताकद नाही, ते नाटककार आणि चित्रपटकार लाज सोडणाऱ्या स्त्री-पुरुषांची दृश्ये दाखवून हशाटाळ्याचे पीक काढीत आहेत. परिणामी म्हणजे, ही एक क्षम्य इतकेच नव्हे तर लोकप्रिय सामाजिक करमणूक आहे, अशी निर्बुद्ध आणि निरंकुश तरुणांची समजूत होत आहे. अशा उद्योगाने आपली अब्रू जाईल किंबहुना कंबरडे मोडेल, अशी त्यांस आता भीती उरलेली नाही.

त्यातच पोषाख आणि स्त्रीपुरुष संबंध याबाबतीत बेछूट असणाऱ्या हिप्पींचा अलीकडे हिंदुस्थानात मुक्त संचार चालू झाला आहे. जुन्याला नाक मुरडून जे जे परदेशातून आलेले ते ते पुरोगामी म्हणून कवटाळणारे आमचे तरुण आज हिप्पींचे अनुकरण करण्यात धन्यता मानीत आहेत. बैराग्यासारखे मानेपर्यंत लोंबणारे केस, गालावरून खाली पोहोचलेल्या दाभणकाठी मिशा, हा अवतार, पूर्वी आमच्या तरुणांनी फाशीच्या शिक्षेचे भय दाखविले असते तरी पत्करला नसता. गेल्या वर्षाभरात तोच अजागळ अवतार पवित्र मानून ही मंडळी सभ्य वस्तीतून बैराग्यांच्या मेळ्याप्रमाणे भटकत आहेत. मुलींचा पोषाख तर मुलांच्या पोषाखापेक्षाही विदूषकी बनलेला आहे. अगदी जवळून निरखून पाहीपर्यंत ही खरोखरीची मुलगी आहे की एखाद्या लोकनाट्यातील स्त्रीपार्टी आहे, हे कळण्याला मार्ग नसतो. अशा या 'विदूषकीणींशी' असभ्य वर्तन करण्यात सामाजिक धोका नाही, अशी असभ्य तरुणांची कल्पना झाल्यास नवल नाही. दिल्लीच्या चर्चेतील कु. इस्माइल हिने हेच सत्य सौम्य भाषेत सांगितले आहे. "One way of avoiding teasing was to dress modestly." या प्रकरणी इंग्रजी वृत्तपत्रे वापरतात तो 'Teasing' हा शब्दही आपल्या सामाजिक मूल्यांच्या दृष्टीने दिशाभूल करणारा आहे. रस्त्यातील सभ्य स्त्रीशी असभ्य भाषेत बोलणे किंवा तिच्याकडे पाहून अनुचित हावभाव करणे, किंबहुना तिच्याकडे मर्यादा सोडून पाहणेदेखील भारतीच सामाजिक कल्पनांप्रमाणे पाहता नुसते 'त्रास देणे' कसे म्हणता येईल? शाळकरी मुले वर्गातील समवयस्क आणि परिचित मुलींना जो उपद्रव देतात, त्याला 'Teasing' म्हणता येईल. कारण त्या मुलामुलींचे नाते

अनुक्रमणिका

पूर्वपरिचयाचे आणि बरोबरीचे असते. रस्त्यात भेटणाऱ्या तरुणतरुणींचे नाते तेच असते का? त्यांना दिलेला उपद्रव म्हणजे परपुरुषाने कुलीन स्त्रीचा केलेला 'उपमर्द' होय. त्याला 'स्त्रीचा उपमर्द' किंवा 'विनयभंग' हेच नाव दिले पाहिजे.

आज रस्त्यातील तरुण स्त्रियांचे व आपले नाते थट्टामस्करीचे, अंगचटी येण्याचे आहे, असे जर पाश्चात्य संप्रदायी तरुण समजत असतील. तर त्यांची ती समजूत समाजातील इतर थरांनी व स्वतः तरुण स्त्रियांनी दूर केली पाहिजे. समाजाने या हिप्पी संप्रदायी तरुणांचे रस्त्यात मानगुट पकडले पाहिजे आणि स्वतः तरुण स्त्रियांनी "Dress modestly" हा कु. इस्माइलचा सल्ला आचरणात आणला पाहिजे.

तरुण भारत
६ मे १९७३
पृ. २

१७

# मंत्र्यांच्या शीलाचा प्रश्न

**गे**ल्या पंधरा दिवसांत ब्रिटिश कॅबिनेटमधील एकदोन मंत्र्यांच्या खाजगी वर्तनाचा प्रश्न देशी परदेशी वृत्तपत्रांत गाजून राहिला आहे. लॉर्ड लॅम्टन हे परावापर्यन्त ब्रिटनच्या विमानदलाचे उपमंत्री होते. एका वेश्येशी आणि तिच्या मैत्रिणीशी लॅम्टन यांचा संबंध होता. ही गोष्ट बाहेर फुटली. त्या वेश्येच्या नवऱ्यानेच म्हणे वेश्या 'बेट्टी', तिचे गिऱ्हाइक लॅम्टन आणि तिची एक युरोपियनेतर मैत्रिण यांचा विवस्त्रावस्थेत फोटो घेतला. तो फोटो वृत्तपत्रांना विकण्याचा या पतिराजांचा विचार होता पण वृत्तपत्र संपादकाने तो सौदा करण्याऐवजी पोलिसात खबर दिल्याने, हे प्रकरण बाहेर फुटले. दुसरे एक लॉर्ड जेलिको हे लॅम्टनपेक्षा फार मोठ्या हुद्यावर होते. 'लॉर्ड प्रिव्ही सील' हा त्यांचा हुद्दा होता. पण त्यांच्याही नावाशी असेच प्रकरण चिकटत होते. या दोन्हीही उमरावांनी ताबडतोब मंत्रिपदाचे राजीनामे दिले.

हे सर्वच प्रकरण आपणा हिंदुस्थानवासीयांना विचित्र वाटण्यासारखे आहे. कोणत्याही देशातील 'लॉर्ड लोक' जहागिरदार लोक प्रभुरामचंद्राप्रमाणे एकपत्नीव्रत पाळणारे असतील अशी अपेक्षा वेडसर माणसाखेरीज किंवा ढोंगी माणसाखेरीज कोणीच करणार नाही, असे असता, एक 'कॉलगर्लच्या' बिछान्यावर हे लॉर्ड सापडले, एवढ्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा, ही गोष्ट आम्हा भारतवासीयांना तरी अद्‌भुतच वाटेल. यातही, पुन्हा 'वेश्येकडे' जाण्याने हा मंत्री अपात्र ठरला, की वेश्येकडे सापडल्याने अपात्र ठरला, हाही प्रश्नच पडतो. यांत नीतीची चाड अधिक की राजनीतीची अधिक हाही एक प्रश्नच आहे. बरे, नीतीची एवढी चाड असलेल्या या देशात मोठ्या पदावर असलेल्या एका लॉर्डच्या चारित्र्यावर बारीक नजर कोणाची? सरकारची नव्हे, तर बायकोच्या जारकर्माचे फोटो विकून पैसे मिळविणाऱ्या नवरोबाची! या सर्व पापमालिकेत सर्वात प्रथम आणि सर्वात कडक शिक्षा जर कोणाला हवी असेल तर ती या नवऱ्याला द्यायला हवी. आमच्या जुन्या मराठेशाहीत वा मोगलाईत अशा लोकोत्तर पतिराजांची धिंड गाढवावरुन काढण्यात आली असती. पण पाश्चात्य लोकांची सर्वच तऱ्हा वेगळी. प्रसिद्धीच्या झगझगीत प्रकाशात चमकत असलेल्या मंत्र्यांना पहिले सचैल प्रायश्चित देणे त्यांना आवश्यक वाटले.

ज्या आधुनिक पाश्चात्य जगातील वेश्यांना पती असतात व जे वेश्यापती गुप्त कॅमेरे, टेपरेकॉर्डर वापरण्याइतके पुढे गेलेले असतात त्या आधुनिक जगात मंत्र्याकडून मात्र रामायणकालीन शीलाची अपेक्षा केली जावी, ही गोष्ट अघटित वाटते. एका परदेशी वार्ताहराने तर म्हटले आहे—

"Surprise is expressed that a wealthy and handsome aristocrat like Lord Lambton should have a resort to prostitutes in this permissive age of wife-swapping parties and group sex."

लॉर्ड लॅम्टनसारख्या एका धनाढ्य आणि देखण्या लॉर्डला आजच्या सामुदायिक संभोगाच्या आणि बायकांची अदलाबदल करण्याच्या 'पर्मिसिव्ह' युगात वेश्यागमानाची वाट धरावी लागावी याबद्दल (इंग्लंडमध्ये) आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दुसऱ्या एका बातमीदाराने लॉर्ड लॅम्टन यांची बायको सुंदर असूनही त्यांनी वेश्येची माडी चढावी, यांचे नवल केले आहे. यात लॅम्टनच्या वर्तनाचे आश्चर्य करावे, की आश्चर्य करणाऱ्या मंडळीच्या भाबड्या मनोविज्ञानाचे आश्चर्य करावे हा एक प्रश्नच आहे.

मला मात्र तिसऱ्याच एका गोष्टीचे नवल वाटते. ज्या तऱ्हेचा व्यभिचार सर्वच देशातील धनवान आणि सत्तावान करतात, त्या तऱ्हेच्या व्यभिचाराचे सार्वजनिक श्राद्ध करण्यात इंग्लंड, अमेरिकेसारखे देश काय मिळवितात? घाण झालेले स्वतःचे कपडे उघड्यावर धुवू नयेत, अशा अर्थाची इंग्रजीतील म्हण सुप्रसिद्ध आहे. पण अर्वाचीन लोकशाहीत सर्वच विधी उघड्यावर करायचे असतात! आपण आपल्या मंत्र्यांची अब्रू चव्हाट्यावर आणली नाही, तर विरुद्ध पक्ष ती आणणार, आणि निदान रस्त्यावर ओरडत फिरून पैसे मिळविणारी वृत्तपत्रे तर फोटोही छापणार! आपल्या देशातील वृत्तपत्रांनी मौन पाळले तरी इतर देशातील वृत्तपत्रे त्याचा परिस्फोट करणार! अमेरिका तर इंग्रजीतच हे वृत्त छापणार. लोकशाहीतील या बेअब्रू करण्याच्या स्पर्धेमुळे सरकारला सर्वाआधी स्वतःचीच बेअब्रू करणे प्राप्त होते. आणि तरी एक प्रश्न उरतोच. प्रतिपक्षाची बेअब्रू करण्याच्या व ती दुसऱ्याच दिवशीच्या वृत्तपत्रात सर्वाआधी छापण्याच्या या स्पर्धेत देश कर्तबगार माणसांना मुकतो त्याचे काय? ज्यांची कुलंगडी बाहेर आली नाहीत अशा माणसांची देशाला अधिक गरज, की कर्तबगार माणसांची अधिक गरज? आजही इंग्लंडमधील जाणते लोक एक हळहळ व्यक्त करीत आहेत.

"Can we" it is asked "really afford to discard men of talent, wit, authority and patriotism simply because their personal lives fall short of blameless purity?"

(बुद्धिमान, चातुर्यवान, अधिकारी आणि देशाभिमानी व्यक्तींना केवळ त्यांचे खाजगी चरित्र प्रभुरामचंद्राइतके नाही, एवढ्यावरून घालवून देणे देशाला परवडेल काय असा प्रश्न विचारला जात आहे.)

यात आणखी एक प्रश्न असा पडतो की सार्वजनिक क्षेत्रातील एवढ्या मोठ्या व्यक्ती केवळ 'ब्लॅकमेल'च्या भीतीने (म्हणजे बेअब्रू करण्याच्या धमकीने) राष्ट्रीय महत्त्वाची गुपिते बदफैली स्त्रियांच्या एजंटना सांगतील काय? लॅम्टन आणि जेलिको हे राष्ट्रीय गुपितांच्या खात्यांचे धनी असले तरी त्यांच्या प्रकरणात फक्त हलक्या स्त्रियांचाच संबंध आलेला दिसतो. दहा वर्षापूर्वीच्या 'प्रोफ्युमो' प्रकरणाप्रमाणे परकीय गुप्तहेरांचा संबंध दिसत नाही. प्रोफ्युमांचा संबंध ज्या विख्यात क्रिस्टाइन किलरशी होता. तिच्याशीच रशियाच्या गुप्तहेर खात्यातील एका अधिकाऱ्याचाही संबंध होता. आणि तरी यातील एकाही प्रकरणात ब्रिटिश मंत्र्याने आपल्या सरकारशी वा देशाशी बेइमानी केल्याचे सिद्ध झाले नव्हते.

आणि एखादा तालेवार मुत्सद्दी एखाद्या बिनअब्रूच्या स्त्रीच्या बाहुपाशातच काय तो देशाशी बेइमान होऊ शकेल, ही कल्पनाही थोडी व्यवहारशून्यतेचीच म्हटली पाहिजे. पोक्त वयाचा राजकारणी माणूस भाडोत्री स्त्रीच्या सहवासात अधिक पागल बनेल की दारूच्या बाटल्या झोकल्याने अधिक पागल बनेल? पाश्चात्य राजकीय पक्ष वा वृत्तपत्रे आपल्या मंत्र्यांना मद्यपानाबद्दल जाब विचारताना तर कधीच दिसणार नाहीत! म्हणजे राजकीय गुपितांच्या रक्षणाची काळजी, हेही कारण असल्या प्रकरणाच्या मुळाशी दिसत नाही. एखाद्या चंमचमीत लैंगिक कथेच्या परिस्फोटाने जी खळबळ माजते, तिचा राजकीय स्पर्धेसाठी फायदा उठविणे, हेच या बाह्यतः चारित्र्यप्रेम भासणाऱ्या प्रकरणाच्या मुळाशी असते. किंबहुना राजकीय प्रतिस्पर्ध्यांना मारण्याचा 'ब्लॅकमेल' हा एक रामबाण इलाजच होऊ शकेल. आणि या रामबाणाच्या भीतीनेच ब्रिटिश लोकशाहीतील मंत्रिमंडळे आपल्या व्यवसाय बंधूंचे बळी देण्यास घाईघाईने प्रवृत्त होतात.

या बाबतीत काही निकोप चारित्र्यविषयक धोरण प्रस्थापित होणे आवश्यक आहे. त्या धोरणाचाही उच्चार आजकाल इंग्लंडमध्ये होत आहें, असे परदेशी वृत्तपत्रांवरून दिसते. "पुढाऱ्यांच्या खाजगी वर्तनाचा संबंध त्यांच्या सार्वजनिक कृतींशी येत असेल तरच त्या खाजगी वर्तनाची छाननी व्हावी. एरवी होऊ नये" हेच ते नवे धोरण होय. ब्रिटिश राजकारणातील हा विचित्र सोवळेपणा फक्त राजकीय शत्रूच्याच पथ्यावर पडणारा आहे. उलट पाश्चात्य समाजात तर आज लैंगिक सोवळेपणाऐवजी कमालीच्या 'ओवळेपणाचीच' लाट आहे. कुमारिकांचे विवाहपूर्व संबंध, सौभाग्यवतींचे विवाहबाह्य संबंध, कुमारिका आणि विधवा यांचे गर्भपात हे सर्व प्रकार अनुंज्ञापक नीतीच्या (Premissiveness) च्या कक्षेत आजकाल येत आहे. इतकेच नवहे तर स्त्रिया–स्त्रियामंधील आणि पुरुषा–पुरुषांमधील समसंभोगही आता इंग्लिश कायद्याने क्षम्य ठरविला आहे. नव्हे पुरोगामी इंग्लिश समाजाने मान्य ठरवला आहे. अशा 'अनुज्ञापक' वातावरणात मंत्रिमंडळातील लॉर्डाच्या रात्रीच्या कार्यक्रमांना मात्र हिंदू विधवांचे नीतीनियम लागू करणे हा राजकीय ढोंगीपणा तर नव्हे?

तरुण भारत<br>
३ जून १९७३, पृ. २<br>
लोकसत्ता<br>
१० जून १९७३, पृ. ३

अनुक्रमणिका

# १८
# यंत्रयुगातील लैंगिक नीती

**मं**त्र्याच्या शीलाचा प्रश्न 'हे माझे 'हितगुज' प्रसिद्ध झाल्यावर काही चांगल्या बुद्धिमान लोकांनी पत्राद्वारे व समक्ष मला त्या संबंधीची माझी भूमिका स्पष्ट करण्याची सूचना केली. माझे ते लिहिणे फार 'सूत्रमय' होते, अशी त्यांची तक्रार आहे. 'इंग्लंडच्या कॅबिनेटमधील बड्या लोकांचा बदफैलीपणा क्षम्य समजावा' असे तुमचे म्हणणे आहे का? की तो क्षम्य नसला तरी 'गुप्त ठेवावा' अशी तुमची सूचना आहे? 'प्रभात' दैनिकातील कृष्णद्वैपायनांनी म्हटल्याप्रमाणे, 'मोठ्या पदावर आणि अधिकारावर असलेल्या व्यक्ती शुद्ध आचरणाच्याच असल्या पाहिजेत, असे तुम्हाला वाटत नाही का? या प्रश्नांच्या दृष्टीने मी लैंगिक नीतीसंबंधीची माझी मते अधिक सविस्तर मांडावी असे त्या वाचकांचे म्हणणे आहे.

ज्यांच्या हातात पैसा आहे व सत्ता आहे त्यांचे लैंगिक वर्तन स्वैर बनणे साहजिकच आहे. ज्यांच्या हाती ही दोन्ही आहेत, त्यांनी चारित्र्याविषयक पावित्र्य राखावे, असे म्हणणे प्रायः व्यर्थ आहे. इंग्लंडसारख्या देशात अशा वर्तनाबद्दल कधी कधी जो प्रचंड गवगवा झालेला दिसतो तो लैंगिक आचारासंबंधीच्या उच्च कल्पनांमुळे नव्हे, तर त्या आचारांमुळे सरकारी गुपिते-विशेषतः लष्करी गुपिते-परराष्ट्रात फुटू नयेत, एवढ्यामुळेच होय. पण आजच्या पाश्चात्य स्वैराचारात केवळ सत्तेचा आणि पैशाचाच संबंध आहे असे नव्हे. आजच्या पाश्चात्य स्वैराचारावर आपण भारतीय लोक पुष्कळदा चुरचुरीत लिहून भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व सूचित करतो, पण पाश्चात्य धनिकांचा आजचा लैंगिक आचार काही दृष्टींनी भारतीय धनिकांच्या आणि उच्चपदस्थांच्या आचारापेक्षा कमी गर्ह्य आहे असे दिसून येईल. एखाद्या उच्चपदस्थ लॉर्डाने एखाद्या गरीबाची बायको पळविली, वा हाताखालच्या स्त्रीच्या असहायतेचा फायदा घेतला, अशा वर्तनाचा गवगवा वेगळा, आणि लॉर्ड लॅम्प्टन यांच्यासारख्याच्या वेश्यागमनाचा बोभाटा वेगळा. यातील पहिल्या प्रकारचा दुराचार पाश्चात्य देशापेक्षा आपल्या देशातच अधिक भेटेल. म्हणून पाश्चात्य धनिक लोक लैंगिकबाबतीत आपल्या धनिकांपेक्षा खालच्या पातळीवर आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरेल.

पण दुसऱ्या दृष्टीने पाहता पाश्चात्यांची लैंगिक नीती आज अधिक हीन दर्जाला पोहोचली आहे. पाश्चात्य समाजात आज स्वैराचाराची, वेश्यागमनाची आणि व्यभिचाराची लाज वाटेनाशी झाली आहे. ही गोष्ट अधिक भयावह आहे आणि या लैंगिक लज्जाहीनतेला कारण आजकालचे साहित्यिक आणि मानसशास्त्रज्ञ आहेत. विवाहपूर्वसंबंध, विवाहबाह्य संबंध आणि ज्याला 'Exclusive Prostitution' असे नाव दिले जाते, ते 'खास दर्जाचे वेश्यागमन' या गोष्टी तिकडील समाजात आज प्रायः प्रतिष्ठित झाल्या आहेत! याचे मूळ धर्मबंधन कमी होण्यात आहे, असे निदान आज तिकडे काही विचारवंत करीत आहेत.

'धर्मबंधन' म्हणजे परस्त्रीशी संबंध ठेवण्यात पापपुण्याच्या कल्पना मनात येणे. 'पापपुण्या'शी परलोककल्पनेचा संबंध असल्याने, आजच्या बुद्धिवादी ............ त्या कल्पनांना फाटा दिलेला आहे. नव्हे, त्या कल्पनांचा उच्चार करणे म्हणजे 'मागसलेपणा', असे ठरविलेले आहे. त्याऐवजी केवळ नीती अनीतीच्या कल्पना शिल्लक ठेवण्यात आल्या. म्हणजे आधुनिक पाश्चात्य मनुष्य (आणि अर्थात त्यावा सुशिक्षित हिंदु अनुचर) ऐहिक नीती मानतो, पारलौकिक पुण्य वा पाप मानीत नाही. त्यातही तो, 'नीती सामाजिक चीज आहे' असे मानतो. चोरी करणे हे समाजविरोधी कृत्य आहे, म्हणून अनैतिक आहे पण

विवाहपूर्व संभोग, वेश्यागमन, समसंभोग यात या आधुनिक स्मृतिकारांना समाजविरोधी (Antisocial) असे काही सापडत नाही!

म्हणून तर इंग्लंडच्या कायद्याने अलीकडे 'समसंभोग' (पुरुषा-पुरुषांमधील लैंगिकता वा दोन स्त्रियांमधील लैंगिकता) हा गुन्हा नाही असे ठरवले आहे. वेश्यागमन हा तर कुठल्याच देशात गुन्हा मानलेला नाही. पण, गुन्हा, पाप, अनीती आणि लज्जात्याग हे दुराचाराचे वेगवेगळे टप्पे मानले पाहिजेत. स्वतःच्या घरी दारू पिण्यात समाजाचे आपण काही नुकसान करीत नाही, हे क्षणभर गृहीत धरले, तरी एखाद्या समाजात दारू पिण्याने अब्रू जाते, की प्रतिष्ठा प्राप्त होते, हा प्रश्न पुन्हा उरतोच.

पाश्चात्य देशात दारू पिण्याने अब्रूला धक्का कोणत्याच युगात लागत नसे. पण आता विवाहबाह्य संबंधालाही प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. असे म्हणण्याची वेळ आली आहे. ब्रिटिश कॅबिनेटमधल्या एका उमद्या उमरावाला परवा राजीनामा द्यावा लागला, तेव्हा इंग्लंडमधील वृत्तपत्रांना जे खेद वाटला तो याच नमुन्याचा होता. लॉर्ड लॅम्टन वेश्यकडे गेला हा त्याचा दोष, की तो तिथे फोटोग्राफरला सापडला हा दोष असा प्रश्न वृत्तपत्रांनी विचारला. तो वेश्येकडे गेला हा अपराध ठरला. तो प्रतिष्ठित धनिक स्त्रीकडे गेला असता तर ते गुप्तही राहिले असते आणि समाजमान्यही झाले असते, असा कोटिक्रम केला जावा यातच आजची नैतिक विचारसरणी दिसून येते.

या सर्व प्रकारावरून एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. शरीरसुखाचे पूजन करणारा समाज खऱ्या अर्थाने नीतिमान राहू शकेल काय? मनुष्य मूलतः शरीरसुखाचा भोक्ता आहे. पण 'शरीरसुखापलीकडे ज्यांची वांच्छा धरावी असे काही नाही', हे खास यंत्रयुगाचे ब्रीदवाक्य आहे. अशा युगात स्त्री-पुरुष संबंधालाही बाजारी देवाणघेवाणाचे स्वरूप आले तर नवल नाही. चोरी, नफेबाजी, परदेशावर आक्रमण हे गुन्हे आजच्या यंत्रयुगाला मान्य आहेत! पण स्वैरसंभोग हा गुन्हा तितकासा मान्य नाही. "दोन माणसांनी परस्पर सम्मतीने शरीरसुख घेण्यात Antisocial (समाजविरोधी) काहीच नाही" अशी विचारसरणी पाश्चात्य देशात गुप्तपणे मान्यता पावत आहे!

नीती ही चीज वैयक्तिक आहे की सामाजिक? त्रिकालाबाधित की कालसापेक्ष? या प्रश्नांना आजच्या जडवादी युगाची काही ठराविक उत्तरे आहेत. ज्यात समाजाचे नुकसान असेल तेवढेच अनैतिक हे आजचे पहिले उत्तर होय आणि त्रिकालाबाधित अशी कोणतीच नीतितत्वे नाहीत हे दुसऱ्या प्रश्नांचे उत्तर होय. अशा 'बुद्धिवादी' वातावरणात मद्यपान आणि परदारागमन या दोन मोहमार्गावर गर्दी झाली तर नवल नाही! इंग्लंड आणि अमेरिका या देशात आज दुःखविस्मृतीकरिता, आत्मविस्मृतीकरिता मिळेत ते औषध (Drug) घेण्याचा सपाटा चालू आहे. ज्या 'डोस'ने बेहोषी येईल, चिंता, भीती यांचा विसर पडेल. तो घेण्याकडे नव्या पिढीचा कल आहे. स्त्रीसुख अर्थात परस्त्रीसुख हा असाच विस्मृतीचा मार्ग मानण्यात येत आहे. लंडन, पॅरिस, न्युयॉर्क यासारख्या ठिकाणी आजकाल खास बड्या लोकाकरता (Exclusive) विलासगृहे स्थापन झाली आहेत. परदेशातून येणारे Diplomats आणि Tycoons (मुत्सद्दी आणि उद्योगपती) अशा गुप्त विलासगृहांचे प्रमुख आश्रयदाते असतात. राजकारणाचा ताण आणि व्यापाराच्या काळज्या विसरण्याचा हा एक राजमार्ग मानण्यात येतो.

समाजातील राज्यकर्ता पुरुषवर्ग आणि तनुविक्रय करणारा स्त्रीवर्ग यांची गुप्त अलीशान फ्लॅटमध्ये होणारी ही गाठभेट, देशाचे संरक्षण धोक्यात आणील की काय हा प्रश्न तिकडील राज्यकर्त्यावर्गाला

सतावून सोडीत आहे. नीती-अनीतीचा प्रश्न नव्हे! उत्पादन आणि ‘स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग’ एवढ्या दोनच गोष्टींचा विचार करणाऱ्या या युगात ‘देशरक्षणाच्या आड न येणारा व्यभिचार क्षम्य होय!’ अशी ‘नवी नीती’ पुढे आली तर नवल नाही! भरमसाट सुखसाधने आणि बेछूट ‘नवसाहित्य’ या नव्या नीतीला इंधनच पुरवीत आहेत!

तरुण भारत
१७ जून १९७३, पृ. २

अनुक्रमणिका

१९

# इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे प्रेमजीवन!

**अ**लिकडेच थोरल्या बाजीरावसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त तरुण इतिहासाभ्यासक श्री. म. श्री. दीक्षित यांनी बाजीराव आणि मस्तानी हा विषय व्याख्यानाकरता निवडला होता. इतिहास संशोधक मंडळासारख्या गंभीर आणि प्रायः नीरस वास्तूत, इतिहासात शिवाजी महाराजांच्या खालोखाल पराक्रमी गणल्या गेलेल्या, पुरुषाच्या प्रेमप्रकरणाची चर्चा व्हावी ही गोष्ट गंभीर संशोधक मंडळींना कशी वाटली हे प्रत्यक्ष पाहण्यास दुर्दैवाने मी हजर नव्हतो. पण आश्चर्याची गोष्ट अशी की दैनिक प्रभातचे विख्यात आणि रसिक स्तंभलेखक श्री. कृष्णद्वैपायन यांना हा प्रकार विसंगत वाटला आहे! (त्यांचे विचार याच अंकात अन्यत्र आढळतील.)

अशा प्रकरणात मुख्य प्रश्न उपस्थित होतो तो वेगळाच आहे. पराक्रमी पुरुषांच्या खाजगी जीवनात संशोधकांनी कितपत डोकवावे? आणि त्यातूनही त्यांच्या गुप्त प्रेमात निदान समाजाला असंमत असलेल्या प्रेमात कितपत डोकवावे? आणखीही एक प्रश्न दीक्षितांनीच केलेल्या प्रतिपादनामुळे कृष्णद्वैपायन यांनी खोडकर थट्टेकरता वापरला आहे. दीक्षित म्हणतात पराक्रमी पुरुषाला पत्नीपेक्षाही उपस्त्री किंवा अंगवस्त्र म्हणून बाळगलेली स्त्री अधिक स्फूर्ति देते. इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या चरित्र्यावरून हे खरे ठरत नाही असे कृष्णद्वैपायन यांनी उलट्या सुलट्या तर्कशास्त्राने सिद्ध करून दाखविले आहे.

प्रथम, पुण्यतिथीच्या दिवशी संशोधक मंडळात या विषयांची चर्चा व्हावी की नाही या प्रश्नाचा निकाल लावणे बरे. खुद्द बाजीरावसाहेबांच्यावेळीही या गुप्त संबंधावर पडदा टाकण्याचे पथ्य पुणेकरांनी पाळलेले नव्हते. स्वतः बाजीरावसाहेबांनीही, विसाव्या शतकातील शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या एखाद्या पुणेकराइतके, या गोष्टीत गुप्ततेचे पथ्य पाळलेले नव्हते. अंगवस्त्र ठेवणे ही गोष्ट त्या काळी श्रीमंतांच्याबाबतीत तरी समाजसंमत होती. धर्मपत्नी सती गेल्या नाहीत पण रक्षा मात्र सती गेल्या अशी उदाहरणे इतिहासात वाचायला सापडतात. बाजीरावांखेरीज अन्य पेशव्यांनी आणि त्यांच्या सरदारांनी अंगवस्त्र ठेवल्याचे प्रसिद्ध आहे. पण बाजीरावांच्या अंगवस्त्राचीच चर्चा सर्वात अधिक झाली ही गोष्ट मात्र खोटी नाही. हे एक कारणदेखील दीक्षितांसारख्या तरुण वक्त्याने पुण्यतिथीच्या मुहूर्तावर तो विषय निवडण्याला पुरेसे आहे. बाजीरावांचेच अंगवस्त्र इतिहासात का गाजले? त्याचे एक किरकोळ पण रोमँटिक कारण म्हणजे बाजीरावाने जवळ केलेली रक्षा परप्रांतीय तर होतीच पण परधर्मीयही होती. ती असाधारण सुंदर असल्याचे उल्लेख आढळतात. सुंदर स्त्रियासंबंधी अकारण-सकारण, प्रस्तुत-अप्रस्तुत चर्चा करणे हा मनुष्य स्वभाव आहे. पुणेरी माणसाचा तर तो खास स्वभाव आहे.

पण बाजीरावसाहेब एवढ्यावर थांबले नव्हते. त्यांच्या बेदरकारपणाचे आणि सौंदर्यमूलक स्फूर्तीचे पुरावे वेगळेच आहेत. त्यांनी तिला स्वतःच्या वाड्यात आणून स्थापन केली होती. इतर ठिकाणीही महाल बांधून दिले होते. म्हणजे थोडक्यात तिला ब्राह्मणवीराने अर्धांगीचे स्टेटस दिले होते. मला वाटते यातूनच मत्सराची ठिणगी पडली असावी आणि मत्सराइतके कल्पनाशक्ती प्रज्वलित करणारे दुसरे काय असू शकेल? मुळात हसण्या, खेळण्यापलीकडे काहीच नसता माधवराव पटवर्धनांच्या स्नेह प्रकरणाला त्यांच्या शत्रुमित्रांनी केवढे रंजक आणि दाहक स्वरुप दिले होते ते प्रसिद्धच आहे. अद्यापही डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या विद्वान संशोधकांना ते 'रोमँटिक' प्रकरण व्याख्यानाला खाद्य पुरवीत आहे. मग

बाजीरावसाहेबांनी सनातनी ब्राह्मणांच्या त्या सुगीच्या काळात एक मुसलमान नर्तकी शनवारवाड्यात आणून ठेवल्यावर पुणेकर बुद्धिमंतांना कल्पितकथांना केवढा विषय मिळाला असेल ते सांगायला नको.

पत्नीपेक्षा अंगवस्त्राच्या संगतीत वीरपुरुषांना स्फूर्ती अधिक मिळते. हे दीक्षित यांचे मतही सामान्यतः निरपवाद आहे. कृष्णद्वैपायन यांनी या मताचा व्यत्यास (कॉनव्हर्स) देखील दीक्षितांना अभिप्रेत आहे. असे मिष्किलपणे गृहीत धरून बरीच गंमत उडविली आहे. एका मस्तानीच्या स्फूर्तीमुळे बाजीरावसाहेब जर दिल्ली गाठतात आणि निजामाला धूळ चारतात तर असंख्य बेगमांनी भरलेले जनानखाने बाळगणाऱ्या बहादुरशहाने (शेवटच्या नामधारी बादशहाने) इंग्रजांना धूळ चारून १८५७ चे बंड यशस्वी का करू नये? शेवटच्या निजामाच्या जनानखान्यातही असंख्य पऱ्या होत्या पण आमचे जनरल चौधरी रणगाडे घेऊन आपल्या राज्यात शिरत आहेत असे समजताच निजामाने शरणागती पत्करली ती का? उत्तर सोपे आहे. सुंदर स्त्रियांच्या प्रेमामुळे वीर पुरुषांच्या शौर्याला उधाण येते. भेकड लोक अप्सरेच्या सहवासातदेखील शूर बनत नाहीत. येवढेच कृष्णद्वैपायन यांच्या आक्षेपाचे उत्तर आहे. पण बाजीरावसाहेबांचे हे नुसते प्रेमप्रकरण नव्हते. त्यांनी जवळ केलेले अंगवस्त्र सामान्य अंगवस्त्र नव्हते. ज्या अंगवस्त्राच्या प्रेमाखातर बाजीरावसारखा जबाबदार आणि अब्रूदार पंतप्रधान लोकमत धुडकावू धजतो असे ते अंगवस्त्र होते. मस्तानीपासून झालेल्या पुत्राची इतर विवाहित स्त्रियापासून झालेल्या पुत्राप्रमाणे मुंज करावी असेही बाजीरावाच्या मनात होते असे म्हणतात. पुण्यातील ब्रह्मवृंद खवळण्याला तेही एक कारण असेल. पण याखेरीज नमूद कारण वेगळेच आहे. मस्तानीच्या संगतीत बाजीरावसाहेब ब्राह्मण असून मद्यमांसाचाही आस्वाद घेऊ लागले होते असा बोभाटा होता. असा पत्रव्यवहारही आढळतो. या बाबतीतील आपली म्हणजे ब्राह्मणीमूल्ये लक्षात घेण्यासारखी आहेत. एखाद्या माणसाने ब्राह्मणाने अगर मराठ्याने रक्षा ठेवणे यात काहीच गैर समजले जात नसे पण आहाराच्याबाबतीतील नियम मोडले तर ते मात्र गहर्य समजले जात असे. बाजीरावसाहेबांनी मस्तानीच्या संमतीने मद्यमांसाचा आस्वाद घेतला की नाही कोण जाणे. पण हे सर्व करून पुन्हा मुसलमान रक्षेच्या पोटी झालेल्या पुत्राला द्विजाचा दर्जा देण्याचा त्यांचा विचार होता या गोष्टीमुळे पुणेरी ब्राह्मण खवळले निदान खवळण्याचा आव आणण्याची त्यांना नामी संधी मिळाली. ज्या श्रीमंतानी मुसलमान अंगवस्त्र ठेवले, ज्यांनी ब्राह्मणी आहाराचे कडक नियमही मोडले, त्यांच्या वाड्यात होमहवनादी विधीकरता जाणे ही त्यावेळच्या ब्राह्मणांना नामुष्कीची गोष्ट वाटत होती.

खुद्द पेशव्यांच्या कुटुंबातही धार्मिकवृत्तीच्या टोचणीपेक्षा मत्सराग्नीची धगच अधिक तापदायक होत असावी असे काही तत्कालीन उल्लेखावरून वाटते. हे प्रकरण जेव्हा शांतिब्रह्म शाहू महाराजांच्या कानावर गेले तेव्हा त्यांनी दिलेला निर्णय पुण्यातील ब्रह्मवृंदाच्या जळफळाटापेक्षा फार वेगळा होता. मस्तानीला अटकेत टाकावे असे पेशव्यांच्या घरातीलच काही व्यक्तींचे मत होते. अखेर तिला बंदीत ठेवलीही होती. उमद्या वृत्तीच्या बाजीरावाला स्वतःच्या कुटुंबीयांनी केलेल्या या उपद्व्यापाचाच मनस्ताप विशेष झाला असेही एक मत आहे. या प्रकरणात शाहू महाराजांनी सांगितले, "बाईला अटकेत ठेवण्याने काही साधणार नाही ज्याचे माणूस त्याला द्यावे."

एकंदरीत हे प्रकरण व्यक्तिशः बाजीरावाच्या दृष्टीने शोचनीयच झाले. ट्रॅजिक झाले. ब्राह्मण समाजाखेरीज अन्य समाजात या केवळ मनुष्य स्वभावाला धरून असलेल्या गोष्टीला इतके घातक वळण लागले नसते. पण या गोष्टीला दुसरीही बाजू आहे. मस्तानीच्या पुत्राला समशेर बहाद्दराला जवळजवळ पेशव्यांच्या औरस पुत्राइतकी स्टेटस मिळाल्याचे दिसते. आजच्या काळात स्वतःला लिबरलपक्षाचे म्हणविणारे लोकही हे औदार्य दाखवतील की नाही याची शंकाच आहे. मस्तानी पुत्र समशेर बहाद्दरही

अनुक्रमणिका

पानिपतात हिंदूवीरांच्या खांद्याला खांदा लावून अबदालीच्या फौजेशी लढला. पेशवेकालीन सोवळेपणाप्रमाणेच पेशवे काळातल्या वारयोषितांतही जे इमान होते ते विसरता येत नाही. बाजीराव-मस्तानी प्रकरणाला जे महत्त्व आले ते केवळ एक चोरटे विवाहबाह्य प्रेम एवढ्यामुळे आहे असे नव्हे. त्या काळातील रखेल्यांच्या अंगीही जे इमान होते ते आजच्या काळात दुर्मिळ आहे.

बाजीरावसाहेबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने या असाधारण प्रेमप्रकरणाचे स्मरण करणे म्हणजे मोठ्या माणसाच्या छोट्या व्यसनाचे स्मरण उगाळणे होय हा कृष्णद्वैपायन यांचा आरोप मला तरी मान्य नाही, अशा प्रसंगांच्या निमित्ताने या असामान्य प्रेम प्रकरणाचे आणखी संशोधन झाले तरी हवेच आहे!

तेजस्वी
४ मे १९७५,
पृ. २ व ११

## २०

## बाजीराव मस्तानी आणि ढोंगी युरोपीय एकपत्नीत्व

**आ**जचे एक इतिहासाभ्यासक श्री. म. श्री. दीक्षित यांनी इतिहास संशोधक मंडळात बाजीराव-मस्तानी या विषयावर निबंध वाचल्यापासून या विषयाला अनेक फाटे फुटले आहेत. प्रथम 'प्रभात' च्या कृष्णद्वैपायनांनी (वि. श्री. मोडक यांनी) या विषयाच्या व तो हाताळण्याच्या प्रसंगाच्या औचित्यावर जोरदार हल्ला चढविला नंतर माझ्यासारख्या इतरानीही मत प्रदर्शन केले. इतिहास संशोधक मंडळात असल्या 'चावट' विषयावर चर्चा व्हावी का? आधी हा विषय गंभीरपणे चर्चिण्याइतका महत्त्वाचा आहे का? यासारखे कित्येक आक्षेप घेण्यात आले.

पहिली गोष्ट म्हणजे दोन काळांतील फरक ही होय. आजच्या नैतिक कल्पना बाजीरावसाहेबांच्या काळाला लावणे हास्यास्पद होय. याचा अर्थ आज आपण अधिक नैतिक झालो आहोत असा नव्हे, तर आपण ख्रिस्ती नैतिक कल्पना आणि ख्रिस्ती कायदे आंधळेपणाने गळ्यात घेतले आहेत! या देशात एकपत्नीत्व हा सद्‌गुण खास मानलेला होता पण एकाहून अधिक बायका करणे हा दोष मानलेला नव्हता. उलट तो रिवाजच होता. प्रभु रामचंद्राचे एकपत्नीत्व एवढे गाजले, याचा अर्थ त्या काळी एकपत्नीत्व औषधालाही मिळत नव्हते, हाच नव्हे का? त्याबरोबरच आणखीही एक रिवाज या देशात प्रशंसनीय नसला, तरी समाजमान्य समजला गेलेला होता. तो रिवाज म्हणजे अंगवस्त्र बाळगण्याचा, किंवा सोप्या भाषेत 'बाई ठेवण्याचा,' 'एका वेळी एकाहून अधिक बायका करणे हे धर्माच्या, कायद्याच्याविरुद्ध आहे,' ही कल्पना हिंदूंचीही नाही, की मुसलमानांचीही नाही. ती आहे ख्रिस्त्यांची कल्पना! या 'ख्रिस्त्यांवर' किंवा 'ख्रिस्तीपणा' वर कै. र. धो. कर्वे आणि ज्ञानकोशकार केतकर यांनी अनेकदा कोरडे ओढलेले आहेत.

युरोपमध्ये एकपत्नीत्वाचा कायदा पूर्वीपासून आहे. याचा अर्थ युरोपियन लोक वैवाहिकबाबतीत आम्हा भारतीयांच्यापेक्षा अधिक नीतिमान आहेत असा मुळीच नव्हे. कायद्याने एकपत्नीत्व लादल्याने आणि अंगवस्त्र (Mistress) ठेवण्यालाही आधुनिक काळात प्रतिष्ठा नसल्याने, युरोपात व्यभिचाराची वाढ मात्र झाली आहे! आपल्याकडे बाजीरावाच्याकाळी अंगवस्त्र ठेवण्याने माणसाची बेअब्रू होत नसे. पण दुसऱ्याच्या बायकोशी लघळपणा करण्याने मात्र तसे करणारा मनुष्य असभ्य आणि नादान ठरत असे. उलट युरोपमध्ये मित्राच्या, पाहुण्याच्या किंवा अपरिचित बायकोशी लघळपणा करणे हे 'बहादूरी' चे किंवा 'Gallantry' चे लक्षण मानण्यात येते! आज आमच्या सुशिक्षितांनी युरोपातील हा 'शिष्टाचार' खुळेपणाने पत्करला आहे! आणि त्या भूमिकेवरूनच पुष्कळदा ते जुन्या पिढीतील लोकांची नीती पारखत आहेत! बाजीरावसाहेबांच्याकाळी राजेरजवाडे तर सोडाच. पण साधे सुखवस्तू लोकही उघडपणे अंगवस्त्र ठेवीत. असे असून बाजीरावाने मस्तानीला जवळ करताच एवढा गिल्ला का व्हावा? बाजीरावाचा बाप बाळाजी विश्वनाथ त्यांच्या लैंगिक जीवनाची मला माहिती नाही. किंबहुना इतिहासात ते कोठे नमूद झाल्याचे माझ्या पाहण्यात नाही. पण बाजीरावाचे बाकीचे आप्त, त्याचे स्वामी शाहूमहाराज, त्याचे सहकारी आणि आश्रित सरदार, या सर्वांनी अंगस्त्र ठेवल्याचे प्रसिद्ध आहे. पण मुख्य मुद्दा तो नाही. त्यांनी अंगवस्त्रे ठेवल्यामुळे यत्किंचित गवगवाही झाल्याचे नमूद नाही!

नानासाहेब पेशव्यांच्या रक्षा असल्याचे नमूद आहे. (असे असून त्याने बापाला नीती शिकविण्याचा आव आणला होता याची मौज वाटते) त्यांचा भाऊ रघुनाथराव हा तर स्त्रियांच्याबाबतीत पुरताच नादान

अनुक्रमणिका

होता. त्याने कुणबिणी तर ठेवलेल्या होत्याच. पण इंग्रजांच्या जिवावर गुजराथेत भटकत असता त्याने असहाय गुजराथी कुलीन स्त्रियांवर हात टाकल्याच्या तक्रारी इंग्रजाकडे गेलेल्या होत्या. पण अशा नालायक माणसांच्या गोष्टी सोडल्या, तरी अगदी प्रतिष्ठित उदाहरणे कमी नाहीत. शाहू महाराजांच्या पश्चात त्यांची पत्नी सती गेली नाही, पण रक्षा सती गेल्या असे नमूद आहे. फार कशाला? प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या वडिलांची अंगवस्त्रे होती हे प्रसिद्ध आहे. हिरोजी फर्जंद हा अशा नात्याने शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ व दिसण्यात थेट त्यांच्यासारखा होता. महाराजांच्या आग्र्यातील कारावासात शहाजीराजांच्या या 'फर्जंदा'ने जीव धोक्यात घालून महाराजांचे सोंग कसे वठविले ते प्रसिद्धच आहे. तो केवळ शेवटच्या दिवशी महाराजांच्या जागी झोपून राहिला एवढेच, नव्हे तर महाराज निसटल्यावर कर्दनकाळ औरंगजेबाच्या क्रोधाग्नीला आणि लाडीगोडीला त्याने सारख्याच खंबीरपणे तोंड दिले. बाजीरावाच्या 'फर्जंदा'ने म्हणजे समशेरबहाद्दराने पानिपतच्या युद्धात मराठ्यांच्या खांद्याला खांदा लावून, लढून ऐन जवानीत धारातीर्थी मरण पत्करले.

या सर्व प्रकारात चोरटेपणाचा मामला कोठेच दिसत नाही. रक्षापुत्रांनाही औरसपुत्रांच्या खालोखाल स्थान दिलेले दिसते. श्रीमंत आणि सत्तावान पुरुष जेव्हा उपस्त्रिया बाळगतात, तेव्हा त्यांना कशाचीच चोरी बाळगण्याचे कारण नसते. निदान जुन्या काळी तसे कारण नव्हते. प्रत्यक्ष अशा पुरुषांच्या स्त्रिया आपल्या पतीने बाळगलेल्या उपस्त्रियांना 'स्टेटस्' देणे शक्य नसेल तरी खेळीमेळीने वागवीत,– सांभाळून घेत, 'Tolerate' करीत. त्या स्त्रियांची ही भूमिका आजच्या टीकाकारासारखी पुस्तकी आणि ख्रिस्ताळलेली नसली, तरी वास्तववादी आणि व्यवहारी होती. आपला जबरदस्त पती जे चोरून केल्याशिवाय सोडणार नाही ते त्यास उघडपणे करू देणे यातच शहाणपणा आहे. हे त्या सुज्ञ स्त्रियांना समजत होते! आजच्या काळात पाश्चात्य ख्रिस्ती कल्पनांचे उसने बळ अंगी बाणवून जुन्या पिढीच्या लोकांना दोष देणे वास्तवताशून्य आणि हास्यास्पद आहे. आज कायद्याच्या सक्तीमुळे रामचंद्राचा आव आणणारे लोक त्या काळच्या धनवान आणि बलवान लोकात असते, तर त्यांनी अंगवस्त्रे बाळगण्याखेरीज दुसरे काय केले असते? उर्दू कवी सौदा म्हणतो–

"अरे नीतिबाज कर्मठा! शराब, नित्रस्त जागा, आणि खुबसूरत प्रेमपात्र एवढी सामग्री तुला मिळती, तर तुला शपथ आहे, (त्या लोकांच्या जागी) तू असतास तर याहून दुसरे काय केले असतेस?"

"गर हो शराब व खिल्वत व महबूब खूबरू जाहिद तुझे कसम है जो तू हो, तो क्या करे?"

पण तरी एक प्रश्न उरतोच. त्या काळी अंगवस्त्र आणि त्यांची संतती यांना जर विशिष्ट सामाजिक दर्जा होता, तर बाजीरावाच्याबाबतीतच एवढा गवगवा का झाला? प्रथमदर्शनी असे वाटते की या तरुण ब्राह्मण पंतप्रधानाची उपस्त्री मुसलमान होती व त्यामुळे हा गवगवा झाला असावा. पण या कल्पनेतही फारसा अर्थ नाही. कलावंतिणीत पूर्वीपासूनच मुसलमान स्त्रियांचा भरणा आहे. त्यातील कित्येकजणी हिंदू कलावंतिणींच्यामानाने अधिक म्हणजे नृत्यगाननिपुण आणि सुसंस्कृत असतात. 'सुसंस्कृत' हा शब्द या ठिकाणी सुशिक्षित किंवा नीतिमान या अर्थाने वापरला नाही. त्यांच्या अंगी 'एक प्रकारचा दरबारीपणा' असे. लखनौकडे तर अद्यापही 'एटिकेट' (दरबारी आदब) शिकण्याकरता चांगल्या घराण्यातील तरुण मुलांना कलावंतिणीच्या बैठकीत मुद्दाम धाडतात, असे मी त्रयस्थाकडून ऐकले आहे. बाजीरावसाहेबासारखा उमदा ब्राह्मण वीर जातगोत विसरून एका मुसलमान कलावंतिणीच्या इतका आहारी गेला, याला कारणही हेच

असावे. आपल्या भागातील कोणत्याही नायकिणीच्या सहवासात त्याला ही दरबारी आदब आढळणे अशक्य होते!

पण त्याहूनही बलवत्तर कारण म्हणजे बाजीरावाने या कलावंतिणीची स्थापना प्रत्यक्ष शनवारवाड्यात केली, हे होय. श्रीमंतांच्या या धाडसी आचारामुळे ब्राह्मणांचे प्रस्थ शनवारवाड्यात तरी कमी होण्याचा संभव होता. आधीच या बाजीरावाला ब्राह्मणभोजने, होमहवन आणि ब्राह्मण दक्षिणा यांचे स्तोम माजवणे फारसे प्रिय नव्हते. लोकहितवादींनी एके ठिकाणी म्हटले आहे. "आजचे इंग्रज राज्यकर्ते जर भिक्षुक ब्राह्मणांना भरपूर वार्षिक दक्षिणा सुरू करतील तर ते इंग्रजी राज्य 'यावच्चंद्रदिवाकरौ' टिको असा आशीर्वाद देतील."

पण आमच्या पहिल्या बाजीरावाचा खाक्या काही वेगळाच होता! शनवारवाड्याच्या वास्तुशांतीनिमित्त एकंदर किती दक्षिणा खर्ची पडली असेल? फक्त सोळा रुपये आठ आणे! अशा तरुण पेशव्याने त्याच वाड्यात एक बुंदेलखंडी यवनसुंदरी आणून ठेवल्यावर पुण्यातील ब्राह्मण मंडळींना धर्माची का आठवण होऊ नये? त्या मुसलमान सुंदरीच्या निमित्ताने छपन्न अतिरंजित वावड्या सोडण्यात आल्या. "ब्राह्मणाचे हात तोडले.... कलावंतिणी राखल्या, दारू पितात ... धुंद जहाले... म्हणून महाराजांनी ऐकले होते, परंतु सर्व शोध बारकाईने घेतला... अगदी बाष्फळ!.... तेव्हा महाराज बोलले की, लवंडीचे लोक भलतेच सांगतात! सर्व लटके! "

पराचा कावळा म्हणतात त्याचे हे खास उदाहरण आहे. पेशवेदप्तरातील एका पत्रात बाजीरावाने एका मुक्कामात तेथील पाटलाजवळ 'चागल्या कोंबड्या कुठे मिळतील का, अशी चौकशी केल्याचा उल्लेख आहे. पुण्यातील ब्रह्मवृन्दांस याहून काय पाहिजे? त्यांनी, 'श्रीमंत' कोंबड्या खाऊ लागले, त्याचा हा पुरावा का मानू नये? पण पत्रातील उल्लेख साधार मानला तरी, 'बाजीरावाने' कोंबड्यांची चौकशी केली,' एवढेच त्यावरुन सिद्ध होते. त्या कोंबड्या मस्तानीकरता हव्या होत्या की त्यांच्या स्वतःकरता हव्या होत्या हे या ब्रह्मवृन्दाला कुणी सांगितले? म्हणूनच शाहू महाराज म्हणतात, "लवंडीचे लोक भलतेच सांगतात!"

म्हणून या संबंधात दोन—तीन गोष्टी लक्षात ठेवणे जरुर आहे—

(१) मस्तानीचे असामान्य रूप आणि गुण (२) बाजीरावसाहेबांचा मोकळा आणि निधडा स्वभाव (३) मस्तानीची शनवारवाड्यातच स्थापना.

म्हणजे बाजीरावसाहेबांनी तिला पत्नीच मानली होती यात शंका नाही. बाजीरावांच्या पश्चात ती जगली नाही, आणि तिच्या पुत्राला बाजीरावाच्या पश्चात जणू पेशवे कुटुंबात स्थान होते. या दोन गोष्टींनीही हेच सिद्ध होत नाही का? समशेरबहादुराची मुंज करण्याच्या गोष्टीही निघाल्या होत्या म्हणतात.

त्या काळात एखादे सावरकर किंवा निदान एखादे मसूरकर महाराज असते तर ब्रह्मवृन्दाचा कोलाहल थंड झाला असता. पण आजच्या पुण्यातही सावरकरांच्या आवाजापेक्षा भिक्षुकी पंथाचा आवाजच अधिक प्रमाणात ऐकू येतो हेच या मस्तानीवादावरून दिसून येत नाही का?

अनुक्रमणिका

शौर्याला वा प्रतिभेला प्रेयसीच स्फूर्ती देऊ शकते काय हा विषय मात्र स्वतंत्रपणे हाताळला पाहिजे. तेही मी लवकरच करणार आहे.

तेजस्वी<br>२५ मे १९७५,<br>पृ. २ व ८

२१
# प्रेयसी, पत्नी आणि स्फूर्ती

**म**स्तानी आणि बाजीराव यांच्या वादात काहीशा वादप्रियतेने भलतेच मुद्दे धरून श्री. कृष्णद्वैपायन आणि इतर यांनी वाद केला अशी माझी समजूत आहे. वाद चांगलाच रंगला पण महत्त्वाचे मुद्दे मात्र दुर्लक्षिले गेले. बाजीरावांच्या शौर्याचे मूळ मस्तानी होती अशी प्रतिपक्षाची भूमिका त्राग्याने गृहीत धरली गेली. म्हणजे जो शूर नव्हता, त्याला त्याच्या सौंदर्यवती प्रेयसीने शूर बनविले असे एक मत उगीचच गृहीत धरण्यात आले. तूर्त बाजीराव आणि मस्तानी ही ऐतिहासिक पात्रे बाजूला ठेवून प्रेयसी आणि शौर्याला व लेखनाला स्फूर्ती एवढ्याच कल्पनेचा विचार करू या. त्याचबरोबर स्फूर्तीला विवाहबाह्य प्रेयसीचीच गरज असते की, विवाहित पत्नीही चालू शकते याचाही विचार करू. तसेच प्रेयसीचा रोल स्फूर्ती देण्याचा असतो की कौतुक करण्याचा आणि विरंगुळा देण्याचा, याचाही विचार केला पाहिजे.

हा विचार आपण शुद्ध मानसशास्त्रीय वस्तुस्थितीच्यादृष्टीने केलेला बरा. म्हणजे काय असावे यापेक्षा काय असते याचा विचार करणे बरे. तो विचार करताना अंगवस्त्र किंवा विवाहबाह्य प्रेमस्थान मानसशास्त्रदृष्ट्या कोणती गरज भागविते याचा थोडा विचार केला पाहिजे. सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने पत्नीला जे स्थान दिले आहे आणि पती-पत्नीवर जी बंधने घातली आहेत ती योग्यच आहेत. पण या नात्याचा मुख्य पाया गृहस्वास्थ्य, वंशवर्धन आणि अपत्यसंगोपन हा आहे. मनुष्याच्या कार्याचा अवाका तेवढाच असता तर पती-पत्नीचे नाते आदर्श ठरले असते पण कर्तृत्ववान पुरुषाच्या कार्यशक्तीवर यापेक्षा फारच मोठ्या आणि वेगळ्या जबाबदाऱ्या पडतात. पराक्रमी पुरुषाला प्रत्यक्ष प्राण तृणसमान मानून, रणांगणावर जावे लागते. प्रतिभावान लेखकाला प्रत्यक्ष जग विसरून काल्पनिक जग निर्माण करावे लागते. त्याच्या मानसिक शक्तीला पडणारे ते ताण एवढे मोठे असतात की त्यातून बाहेर पडल्यानंतर साधी विश्रांती घेणेही त्याला अशक्य होते. लढाई अथवा लेखन संपल्यानंतरही तो त्या प्राणांतिक ताणाच्या अवस्थेतच काही काळ जगत असतो. हा ताण कमी करावयाचा हा त्याच्यापुढे प्रश्न असतो. पत्नीच्या आणि अपत्यांच्या सात्त्विक प्रेमाने तो ताण लगेच कमी होण्यासारखा नसतो.

हे म्हणणे काहींना बरेच अप्रिय वाटेल. यात पत्नीच्या नात्याचा अवमान आहे असेही वाटेल. व्यक्तीशः मलादेखील तसे वाटते. पण प्रिय काय आणि अप्रिय काय यापेक्षा वस्तुस्थिती काय आहे, हे आपणाला पहावयाचे आहे. शूरावर किंवा प्रतिभावंतावर पडणारा असाधारण ताण क्षणात नाहीसा करण्याचे सामर्थ्य पत्नीत असू शकेल? अनेक कर्तृत्ववान पुरुषांच्या विवाहबाह्य प्रेमाचा विचार करताना आपणाला या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल, स्त्रीसुखाचे किंवा अन्य कोणत्याही सुखाचे उद्दिष्ट जर श्रमांची किंवा चिंतांची विस्मृती हे असेल तर पत्नीपेक्षा विवाहबाह्य प्रेयसीच ते कार्य अधिक परिणामकारकरीतीने करू शकेल असे मानसशास्त्राचे निःसंदिग्ध उत्तर येईल. पती-पत्नीच्या नात्यात बराच सहवास आणि संसार झाल्यानंतर केवळ स्त्री-पुरुषांचे नाते उरलेले नसते. ती एक व्यावहारिक भागिदारी बनलेली असते. बऱ्याच दिवसांनी दोघे एकत्र येताच शरीरापेक्षाही जबाबदाऱ्यांचे विचार त्यांच्या मनात प्रथम गर्दी करू लागतात. ते अमक्याचे पत्र आले का? वसंताची प्रकृती आता कशी आहे? जयश्रीला देवी काढावयाच्या होत्या, त्याचे काय झाले. इ. प्रश्न पती-पत्नीच्या फार दिवसानंतरच्या भेटीत निघणे अपरिहार्य आहे. म्हणजे स्त्रीसहवासाचा उद्देश जर मनावरील ताण कमी करणे हा असेल, तर संसारातील सहचारिणीचा सहवास ते कार्य करू शकणार

अनुक्रमणिका

नाही. उलट त्या पुरुषाला आगीतून उठून फुफाट्यात गेल्यासारखे वाटण्याचाच संभव अधिक असे मला वाटते. जुन्या जमान्यातील अंगवस्त्र बाळगण्याच्या चालीचे मूळ या वस्तुस्थितीत असावे. एका क्षणात ताण आणि जबाबदाऱ्या विसरायला लावण्याचे सामर्थ्य दोनच वस्तूत आहे. एक म्हणजे स्त्री संपर्क आणि दुसरी म्हणजे दारू. या दोन गोष्टींची पकड त्यांच्या विस्मृतिदायकतेत आहे. चालू जबाबदाऱ्या क्षणभर विसरावयाला लावण्यात आहे.

या संदर्भात आमच्या एका मित्राने सांगितलेली जुन्या अंगवस्त्राच्या जमान्यातील एक गोष्ट आठवते, एक गृहस्थ आपल्या कामावरून परत येताना सायंकाळी नित्यनियमाने आपल्या अंगवस्त्राकडे जाऊन बसे. हा बऱ्याच दिवसांचा नियम पाहिल्यावर साहजिकच त्या स्त्रीने त्यांना म्हटले, आपण जर इतक्या नियमाने माझ्याकडे येता, तर मग माझ्याशी लग्नच का लावून टाकत नाही?

त्यावर त्या गृहस्थाने दिलेले उत्तर मानसशास्त्रदृष्ट्या मासलेवाईक होते. तो म्हणाला, ‘तुझ्याशी लग्न लावल्यानंतर मग मी रोज संध्याकाळी कुणाकडे जाऊन वेळ घालवू?’ या जुन्या काळाच्या उत्तरात नवीन काळचे मानसशास्त्र आले आहे. प्रेयसीचे उद्दिष्ट आणि पत्नीचे उद्दिष्ट ही दोन अगदी भिन्न आहेत. पत्नी ही भागीदारी आणि जबाबदारी आहे. समाजधारणेच्यादृष्टीने ती कितीही आवश्यक असली तरी ती जबाबदारीच आहे. ती क्षणिक विस्मृती, भुरळ किंवा धुंदी नव्हे. जीवनात फार मोठ्या जबाबदाऱ्या आणि फार मोठे धोके पत्करणाऱ्या लोकानाच अशा विस्मृतीची आणि धुंदीची गरज विशेष असते. बाजीरावाला ती किती होती हे इतिहासतज्ज्ञांना सांगावयाला नकोच. रणांगणावरची बेहोशी आणि धोके, शनवारवाड्यातली कारस्थाने, साताऱ्यात शाहू महाराजांच्या कानाशी लागणारी पंतप्रतिनिधींसारखी जुनाट मंडळी या सर्वांचा बुजबुजाट डोक्यात असल्यावर काशीबाईसारखी ब्राह्मणी संस्कृतीतली स्त्री त्याला त्वरित विस्मृतीचे सुख कितपत देऊ शकली असती हा एक प्रश्नच आहे. क्षत्रियांना आणि राजे लोकांना आपल्या धर्माने आणि परंपरेनेच उपस्त्रियांची सवलत ठेवली होती. याचे कारण कोणते ते यावरून कळते.

आणि याच परिस्थितीमुळे युरोप-अमेरिकेत बायबलप्रणित मोनॉगमीची (एकपत्नीत्वाची) थट्टा उडालेली दिसते. सुमारे बारा वर्षापूर्वी गाजलेले लॉर्ड प्रोफ्युमो आणि प्रायः वेश्येचे जीवन जगणारी क्रिस्टाईन कीलर यांचे प्रकरण इंग्लंडमधील बड्या लोकांच्या एकपत्नीव्रतावर भेसूर प्रकाश टाकणारा एक इतिहासच होय. या क्रिस्टाईन कीलरचे मित्र आणि आश्रयदाते ज्या खाजगी तळ्यात जलक्रीडा करीत त्यांचे वर्णन वृत्तपत्रांत आणि पुस्तकांतही येऊन गेले आहे. तेथे येणाऱ्या मुली पाश्चात्य देशात ‘मॉडेल’ म्हणून व्यवसाय करणाऱ्या, सुंदरीपैकी असत. पुढे प्रोफ्युमो प्रकरणात गाजलेली मिस कीलर ही त्या निःसंकोच सुंदरींपैकी प्रमुख होती. तिच्या तळ्यात पोहावयाला जाणाऱ्या मंडळीत पाकिस्तानचे भूतपूर्व अध्यक्ष फील्ड मार्शल आयुबखान यांचेही नाव आढळते! इंग्लंडमधील इतरही अनेक लॉर्डस तेथे जलक्रीडेकरता येत असत. त्यातील कित्येक तर सहकुटुंब येत असत! या सर्व प्रकाराचा अर्थ मोठमोठाल्या राजकीय जबाबदाऱ्या क्षणात विसरावयाला लावण्याचे सामर्थ्य प्रेयसीच्या सहवासातच आहे, हाच काढावयाला लागत नाही का? या विस्मृतीने पुन्हा ताजेतवाने होऊन हे लोक फिरून आपल्या असाधारण ताणाच्या विश्वात प्रवेश करीत.

मला वाटते, मस्तानीचे बाजीरावाच्या जीवनातील स्थान स्फूर्तिदायीपेक्षाही त्वरित विस्मृतिदायीचे असावे.

अनुक्रमणिका

माझ्या या विवेचनाचा उद्देश जुन्या वा नव्या विवाहबाह्य प्रेयसीचे समर्थन करण्याचा नसून केवळ मानसशास्त्रीय स्पष्टीकरण करण्याचा आहे हे मुद्दाम सांगण्याचा आहे.

तेजस्वी
८ जून १९७५, पृ. २

---

**संदर्भ**

पूरक संदर्भ : क्षीरसागर श्री. के. 'कलावंताचे चारित्र्य'
नवयुग, दिवाळी १९६१, पृ. २३-२७ शिवाय समाविष्ट
श्री. के. क्षी. वाङ्मयीन लेखसंग्रह
मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८४, पृ. ६४-७२

# २२
# गाडीखाना दवाखान्यातले आकडे काय कामाचे?

**अ**लीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका मेडिकल रिपोर्टमुळे पुण्यातील विद्यार्थ्यांच्या वर्तनाकडे आणि आरोग्याकडे वृत्तपत्रांचे फिरून एक वेळ लक्ष वेधले गेले आहे. लहान वयाच्या विद्यार्थ्यांतही संसर्गजन्य अथवा संभोगजन्य रोगांचे प्रमाण वाढते आढळल्याने, शिक्षक, डॉक्टर, पालक आणि समाजसेवक यांच्या वर्तुळात वावटळ उठली आहे! विद्यार्थ्यांच्या मनाला आणि शरीराला जडत असलेला रोग जुनाच आहे. त्याचे प्रमाण पाहून संबंधित लोकांना धक्काच बसला आहे एवढेच! डॉक्टर लोक आपसात जे कुजबुजत, त्याकडे कान देणाऱ्यांना या गोष्टी या पूर्वीही कळत असत.

संसर्गजन्य रोग पोरांत असो की थोरांत असो, केवळ एकाच पिढीला नव्हे अनेक पिढ्यांना तो धोक्याचाच म्हटला पाहिजे. विद्यार्थ्यांचे वय हे शरीर सुधारण्याचे व ज्ञान मिळवण्याचे वय असल्याने, त्या वयातच त्यांना असल्या घाणेरड्या सवयी आणि असले घाणेरडे रोग जडल्याने समाजधुरीणांना भय वाटणे साहजिकच आहे. पण याच्या मुळाशी केवळ अपक्व वयातील अनावर विषयवासना आहे, असे म्हणणे चूक होय. या रोगाचा छडा लावताना आजच्या विद्यार्थी जगताचीच नव्हे, तर केवळ आजच्या संपूर्ण शहरी जीवनाची छाननी करावी लागेल. 'पुण्याचे' विद्यार्थी म्हणजे केवळ पुण्याचे विद्यार्थी कधीच नसत. पूर्वीही ते अखिल महाराष्ट्रातून वऱ्हाड, नागपूर, हैद्राबाद वगैरे भागातूनही पुण्यात गोळा होत. पूर्वी तर मुलाला कॉलेजात धाडणे म्हणजे जणू इंग्लंड अमेरिकेला धाडण्याइतके भावी, यशाचे गमक मानले जाई.

पण दोन पिढ्यांपूर्वी फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजात येणारे विद्यार्थी बहुधा विवाहित असत किंवा कॉलेजचे एखादे वर्ष होताच विवाहित होत. ते बहुधा पुण्याबाहेरील पण लहानमोठ्या शहरातूनच आलेले असत. त्यातील बहुसंख्य पांढरपेशा वर्गातीलही असत. त्यामुळे त्यांच्या जीवनात एकदम फरक पडल्यासारखे होत नसे. आज खेड्यापाड्यातूनही विद्यार्थ्यांची कॉलेजांकडे रीघ लागलेली असते. आज लहान गावातही कॉलेजेस आहेत ही गोष्ट खरी. पण नव्या कूळकायद्यामुळे आणि धान्याच्या नव्या दरामुळे शेतकऱ्यांजवळ पूर्वी कधी नव्हता एवढा पैसा झाला आहे. अशा शेतकऱ्यांची मुले लहान गावातील कॉलेज टाळून मुद्दाम पुण्याच्या प्रसिद्ध कॉलेजात येण्याचा प्रयत्न करतात.

'कॉलेज लाईफ एन्जॉय करणे' हा शब्दप्रयोग आजकालचा नसून तीन-चार पिढ्या पूर्वीचा आहे. जी श्रीमंतींची मुले पूर्वीच्या डेक्कन कॉलेजात येऊन दाखल होत, ती तर एन्जॉय करण्याकरताच दाखल होत, असे दिसून येई. विद्यार्थी दशेसंबंधी जुन्या भारतीय कल्पना आणि आधुनिक इंग्रजी कल्पना, यात महदंतर होते. आपल्याकडे 'व्रता'च्या कल्पनेचा पगडा होता, तर त्यांच्या कॉलेज जीवनात क्रिकेट, बोटिंग, हायकिंग, क्लब लाईफ, निवडणुका यांचे प्रस्थ होते. म्हणजे त्यांचे विद्यार्थी व्यासंग करीत नसत असे नव्हे. त्यांच्याकडून व्यासंग करून घेण्याचीही अधिक चांगली योजना इंग्लंड-अमेरिकेत असलेली आढळते. पण 'ब्रह्मचर्य' या शब्दाचा समानार्थी शब्द त्यांच्या डिसिप्लिनच्या कल्पनात आढळणार नाही आणि असे असले तरी अगदी अलीकडेपर्यंत त्यांचे लोकमत 'कोएज्युकेशनला' अनुकूल नव्हते.

आपल्याकडे मात्र पाश्चात्यांच्या सर्व सुधारणा जणू एकदमच येऊन धडकल्या! मुलामुलींचे एकत्र शिक्षण ही त्यापैकीच एक होय. 'कॉलेज लाईफ' एन्जॉय करण्याच्या कल्पनेत 'कोएज्युकेशन'मुळे कोणती

अनुक्रमणिका

भर पडली असेल ते सांगायला नकोच. ज्यांना सांगितल्याशिवाय समजणार नाही, त्यांनी मुलांच्या छोट्या छोट्या गटात 'मुली' वा 'पोरी' या विषयाला कोणते आणि केवढे स्थान असते, ते कान देऊन ऐकल्यास त्यांनाही ते कळेल. ज्या वयात पूर्वीच्या काळी घराण्याची परंपरा, वडील माणसांचा धाक, आणि बालविवाहित वधूची माजघरातील चाहूल, यांचा मनावर पकडा असे, त्या वयात आज बऱ्यावाईट प्रोफेसरांच्या कंटाळवाण्या लेक्चरातून आणि पावणेदोनशे मुलांच्या वर्गातून दृष्टीस पडणाऱ्या रंगीबेरंगी मुलींचा पगडा असतो! त्यातच कागदीबाण, नयनबाण इत्यादींना परिणामकारक बंदी क्वचितच घातली गेलेली असते. सायन्सच्या वर्गापेक्षाही आर्ट्स आणि कॉमर्सच्या वर्गात मनाच्या या चळणुकीला अधिक अवसर असतो. सालस आणि अभ्यासू मुलांचेही मन वर्गातील रेडिओसदृश निर्विकार भाषणौघाकडे लागणे मुष्कील असते. मग जी मुले अभ्यासू नाहीत, त्यांना कॉलेजात तास, 'श्रवणा' करता नसून हुल्लडबाजीकरता आहेत, असे वाटले तर नवल नाही.

पण पुण्यासारख्या शहरात मुलामुलींचे एकत्र शिक्षण एवढेच काय ते मन चळण्याला कारण असते असे नव्हे. दिवसेंदिवस अधिकाधिक उत्तान होत चाललेले स्त्रियांचे पोषाख आणि वस्त्र लपेटून घेण्याच्या पूर्वीच्या रिवाजाऐवजी शरीर अधिकाधिक अनावृत्त ठेवण्याचा नवीन रिवाज याचाही परिणाम, खेड्यातील बाळबोध वातावरणातून पुण्यात आलेल्या मुलांच्या मनावर झाला तर नवल नाही.

पण तरुण विद्यार्थ्यांचे मन चळण्याची कारणे शोधायला एवढे संशोधन करण्याचीही गरज नाही. केवळ तारुण्य आणि ध्येयशून्यता एवढ्या दोन कारणांनीही तरुण वयात मन बहकणे अगदी स्वाभाविक असते. त्यासंबंधीची जबाबदारी मुलांपेक्षा पालकांवर आणि विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षणसंस्था चालकांवरच अधिक पडते. 'मुले काय करतात', या पेक्षा 'पालक आणि संस्थाचालक काय करतात' याचेच अधिक संशोधन व्हायला पाहिजे. विद्यार्थी आणि प्रोफेसर यांचे परस्परांशी वर्गात वा वर्गाबाहेर बोलण्याचे प्रसंग किती येतात! प्रोफेसर मंडळी आपल्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात आदर वा आपुलकी कितपत निर्माण करू शकतात हा प्रश्न आहे. आणि कोणत्याही कॉलेजच्या वर्गातदेखील नको, केवळ आवारात पाऊल टाकले तरी वरील प्रश्नाचे उत्तर मिळण्यासारखे आहे. गॅदरिंग आणि जिमखाना यांच्या निवडणुकांच्या निमित्ताने पोसले जाणारे जल्लोष या अनादराच्या वातावरणात भरच घालतात.

तरुण विद्यार्थ्यांच्या मनातील विचारांवर आणि प्रत्यक्ष आचारांवर नजर ठेवणे हे काम सोपे नसते. पण वसतिगृहासह कॉलेज चालविणाऱ्या लोकांवर ती जबाबदारी येऊन पडते. हे मात्र खास! आजच्या तुडुंब विद्यार्थीसंख्येच्या जमान्यात कॉलेज चालक ही जबाबदारी कितपत पार पाडू शकतात हा एक प्रश्नच आहे. मुलांचे तर राहोच, पण मुलींचीही रात्रीची उपस्थिती वसतीगृहात नक्की आहे की नाही यासंबंधी बेपर्वाई झाल्याची उदाहरणे दुर्मिळ नाहीत. धंदेवाईक भटजी जितपत धांदलीने आणि बेपर्वाईने श्राद्ध, पक्ष, श्रावण्या, इ. विधी उरकतो त्याच धांदलीत आणि बेपर्वाईत आजच्या गजबजलेल्या कॉलेजांची कामे उरकणे आमच्या कॉलेज चालकांना अपरिहार्य होत असावे. पण पूर्वीच्या काळी कॉलेज चालकांची वृत्ती यापेक्षा वेगळी होती, याचे एक उदाहरण मी ऐकलेले आहे.

जुन्या डेक्कन कॉलेजात शिकत असलेल्या एका नबाबपुत्राने रात्रीच्या वेळी आपल्या खोलीत कोणाला तरी आणले असावे अशी शंका त्यावेळच्या युरोपियन प्राचार्यांना आली. पण तशी शंका तरी का आली? अधूनमधून रात्री एक-दोनच्या सुमाराला हे साहेब मुलांच्या वसतिगृहाभोवती एक फेरी मारून येत. अभ्यासासंबंधी बेदरकार असलेल्या एका नबाबपुत्राच्या खोलीत रात्री दोन वाजता दिवा पाहून

साहेबबहाद्दूर बुटांचा आवाज न करता त्याच्या दाराशी गेले व हातातील सार्जंटकेनने त्यांनी दारावर सौम्यसे टॅपिंग केले. नंतरच्या दृश्याचा येथे विस्तार करत नाही. त्या हुशार नबाबपुत्राने एका क्षणात आपली खोली निर्मनुष्य केली—म्हणजे आपल्याखेरीज तेथे कोणी दिसणार नाही अशी व्यवस्था केली आणि खानदानी अदबीने आपल्या 'सरां'च्या करता दरवाजा उघडला. साहेबबहाद्दूर हे त्या धनिकबाळाचे बारसे जेवलेले होते! त्यांनी आपल्या हातातील केन विशेष जोर न वापरता कॉटखालून फिरविली. परिणामतः कॉटखालून बांगड्यांचा आवाज आणि स्त्रैण धडपड ऐकू आली. पुढील हकीकतही हृद्य आहे. पण ती येथे सांगत बसत नाही. त्या इंग्रज माणसाने खोलीवर गणिकाकन्या आणणाऱ्या त्या धनिकपुत्राला कोणती शिक्षा केली असेल? कडक शिस्तीच्या सामान्य कल्पनाप्रमाणे म्हणजे त्या छडीने त्या बाळाची पाठ सडकून काढणे किंवा दुसरे दिवशी सकाळी त्याला खोली खाली करायला लावणे, याच शिक्षा मनात येतील. तरुणांना शिस्त लावण्यासंबधीच्या इंग्रज माणसांच्या कल्पना वेगळ्या दिसतात! त्याने त्या स्खलनशील धनिकपुत्राला दुसरे दिवसापासून आपल्या बंगल्यातीलच एक खोली रहायला दिली आणि आपल्या नजरेखाली आपल्या घरातील मुलाप्रमाणे वागविले.

आजच्या गजबजलेल्या कॉलेजच्या काळात एवढी देखरेख आणि एवढे पितृवात्सल्य तर अपेक्षिताच येत नाही. पण देशाच्या दुर्दैवाने त्यात आणखी एक भर पडली आहे. दारूच्या विक्रीला आणि व्यसनाला आज आम्ही प्रतिष्ठा देण्यात धन्यता मानीत आहोत! याचा सर्वात वाईट परिणाम कॉलेजच्या मुलांवर होत आहे. तरुण वयात मन जसे मोहाला बळी पडते, तसेच ते खोट्या फुशारकीच्या अथवा 'ब्रॅव्हडो' च्या आहारी सहज जाते. दारू म्हणजे काही श्रीखंड किंवा मध नव्हे. ती घेणारा मनुष्य प्रथम तोंड वाईट करूनच ती घेतो. पण एकाने घेऊन 'किक्' आल्याचा बहाणा केला की पोरवयात दुसऱ्यालाही झिंगण्यात आणि झिंगून अद्वातद्वा बरळण्यात शौर्य आहे असे वाटू लागले. वेश्यागमन करणाऱ्या मुलांच्या ज्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत त्यावरूनही त्यात मोहवशतेपेक्षा फुशारकीचाच भाग अधिक आहे असे दिसून येईल. दारू पिण्यात आणि वेश्येची माडी चढण्यात कसलीही बहाद्दुरी नाही! आपल्या घराची अब्रू घालविणेच आहे. असे मुलांना वाटायला लावण्याजोगे वातावरणच निर्माण करण्याची जबाबदारी पालक, संस्थाचालक आणि सांस्कृतिक पुढारी यांच्यावर आहे.

नुसते गाडीखान्याच्या दवाखान्यातील आकडे गोळा करून अथवा वेश्यांच्या अड्ड्यावर वृत्तपत्रांचे वार्ताहर धाडून उपयोग काय होणार?

तेजस्वी
६ जुलै १९७५, पृ. २

अनुक्रमणिका

# २३
# लैंगिक वास्तववाद आणि अंगवस्त्र परंपरा

**आ**धुनिक काळात अधूनमधून लैंगिक स्वातंत्र्याचा जाहीर पुरस्कार होतो आणि मग त्यावर वाद होतात. लैंगिक स्वातंत्र्याचेच एक अंग म्हणून कलावंत आणि प्रज्ञावंत पुरुषांना इतरांचे नीतिनियम लागू नसावेत, असेही प्रतिपादन कित्येकदा केले जाते. वास्तविक आज हिंदू समाजात सामाजिक बंधनाच्या बाबतीत एवढे अराजक आहे की कोणालाही कोणतेही नियम लागू करण्याचे सामर्थ्य समाजात नाही. प्रज्ञावंत पुरुषच काय, पण मठ्ठ पुरुषही हवे तेवढे स्वातंत्र्य घेऊ शकतात. प्रश्न आहे तो अब्रू टिकण्याचा किंवा गमावण्याचा. अशा बाबतीत काही नियम करणे, किंवा 'आहेत' असे मानणे म्हणजे काल्पनिक राज्यात रमणे होय! वस्तुस्थिती कोणती आहे तिची जाणीव राखणे हे, नियम करण्यापेक्षा वा मोडण्यापेक्षा अधिक उपयुक्त होय.

या बाबतीत आपणा तथाकथित आधुनिकांपेक्षा, जुने मागासलेले आणि सनातनी लोक, अधिक वास्तववादी होते असे दिसून येईल. जुन्या काळात अंगवस्त्र ठेवणे अथवा बाई ठेवणे हे सुखवस्तू माणसाच्या बाबतीत स्वाभाविक आणि उपेक्षणीय समजले जाई. म्हणजे रखेली ठेवणाऱ्या माणसासंबंधी लोक गौरवाने वा उघडपणे बोलत, असा अर्थ नव्हे. त्याच्यासंबंधी एक प्रकराचे 'स्कॅंडल्' किंवा लोकापवाद होतच असे. पण आजच्याप्रमाणे त्या 'स्कॅंडल्' चा फायदा घेऊन व्यवसायाच्या क्षेत्रात त्याचे नुकसान करणे कुणाला शक्य होत नसे. प्रश्न 'प्रज्ञावंतांना विवाहबाह्य संबंध ठेवण्याचे स्वातंत्र्य असावे की नसावे', हा नसून जे लोक ते स्वातंत्र्य घेतात त्यांच्यासंबंधी इतरांची वृत्ती कोणती असावी हा आहे. विवाहबाह्य संबंधाबरोबर बहुपत्नीकत्वाचाही प्रश्न विचारात घेणे जरूर आहे. आज कायद्याने त्याला बंदी आहे म्हणजे आपल्या समाजात त्याला सदैव बंदी होती असा अर्थ नव्हे. अंगवंस्त्र ठेवण्याला गौणत्व तरी होते; पण बहुपत्नीकत्वाला गौणत्व देखील नव्हते, संपूर्ण समाजमान्यता होती. एक बायको हयात असताना दुसरी करणाऱ्या साहित्यिकाच्या नावाने वृत्तपत्रातून पांचजन्य करण्याची आधुनिक प्रवृत्ती म्हणजे केवळ इंग्रजांच्या ख्रिस्ती नीतीचे अनुकरण होय! आपल्याकडे एकपत्नीव्रताचा अर्थातच गौरव होई; पण 'व्रत' म्हणजे कायदा नव्हे. कायद्याने एकपत्नीव्रत लादण्याची ख्रिस्ती कल्पना हास्यास्पद आहे!

कायद्याने गोम्यासोम्यालाही प्रभू रामचंद्राचे कडक एकपत्नीव्रत आचरायला लावण्याचा परिणाम पाश्चात्य देशात तरी नीतिवर्धक झालेला नाही. दुसरी बायको करण्यालाही परवानगी नाही, आणि अंगवस्त्र ठेवण्यालाही समाजमान्यता नाही. यामुळे पाश्चात्य देशात जिला 'सोसायटी' म्हणतात. त्या उच्च वर्गात कुलीन स्त्रियांशी 'फ्लर्टिंग' म्हणजे लघळपणा करण्याची प्रथा मान्यता पावली! म्हणजे एकीकडून द्वितीय विवाहाला देखील बंदी झाली, तर दुसरीकडून स्त्रियांशी वागण्यातील सभ्यतेचे आणि नैतिकतेचे 'स्टॅंडर्ड'च खालावले. परस्त्रीशी लघळपणा करणे हे मर्दुमकीचे किंवा 'Gallantry'चे लक्षण समजण्यात येऊ लागले! पूर्वी इंग्लंडं फ्रान्समधील राजेरजवाडेही प्रसिद्धपणे 'मिस्ट्रसेस' ठेवीत. आता तोच व्यवहार करावयाचा झाल्यास त्यात चोरटेपणा आल्याने, रखेली व तिचा यजमान या दोघांनाही मानसिक अधःपात आणि चोरटेपणा पत्करावा लागतो. या परिस्थितीत सामान्य मनुष्याला स्वतंत्र अंगवस्त्र परवडणे शक्य नसल्याने वेश्याव्यवसाय आणि वेश्यागमन यांची पॅरीस, लंडन सारख्या शहरात बेसुमार वाढ झाली. 'अंगवस्त्र ठेवणे' आणि 'मिळेल त्या वेश्येकडे जाणे' यात आरोग्यदृष्ट्या तर महदंतर आहेच, पण मानसिकदृष्ट्याही महदंतर आहे.

या बाबतीत साहित्यिकांना आणि प्रज्ञावंतांनाच काही विशेष सवलत हवी आहे, असे मानण्याचे कारण नाही. त्यांच्या भावना उत्कट असल्याने त्यांचा विवाहबाह्य संबंध जुळून आल्यास तो अधिक उत्कट, अधिक रोमँटिक आणि (कलानिर्मितीच्या दृष्टीने) अधिक फलदायी असू शकेल हे खरे; पण म्हणजे कलावंत नसलेल्या माणसावर एकपत्नीत्वाची कायद्याने सक्ती करणे अधिक संयुक्तिक वा क्षम्य ठरते. असा मात्र अर्थ नव्हे. स्वाभाविक गोष्ट ती ही आहे की, 'पुरुषांत' 'बहुगामी' (Polygamous) वृत्ती स्त्रियांपेक्षा अधिक आहे; तर स्त्रियांच्या जीवनात स्थैर्याची आणि सुरक्षिततेची गरज सर्वात अधिक आहे. 'त्यामुळे पुरुष करतात ते खेळ करणे स्त्रियांना स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेच परवडणारे नाही.' याचा अर्थ स्त्रियांनी एकनिष्ठ रहावे आणि पुरुषांनी मात्र एकाहून अधिक भार्या कराव्या अथवा अंगवस्त्रे ठेवावी. हे स्त्रियांना मान्य होईल असे नव्हे. पण ख्रिस्ती नमुन्यावर झालेल्या आपल्या कायद्याच्या जोरावर स्त्रियांनी पुरुषांकडून भलत्या अपेक्षा केल्यास पदरी दुःख येण्याचाच संभव अधिक आहे.

कायदे करण्यापेक्षा किंवा स्त्रियांच्या डोक्यात निसर्गविरोधी समानता भरविण्यापेक्षा स्त्री-पुरुषांनी दोघांनीही वस्तुस्थिती पत्करायला शिकणे अधिक महत्त्वाचे आहे. वस्तुस्थिती पत्करण्याच्या बाबतीत आपले अल्पशिक्षित पूर्वज आपणा 'पुढारलेल्या' आधुनिकांपेक्षा अधिक पुढे होते. जुन्या संस्थानिकांत आणि सरदार लोकांत मुलगा वयात येताच, त्याच्याकडे कुणबिणीपैकी कोणी धाडण्याची पद्धत होती, असे मी ऐकले आहे. (इंग्रज वकील सर टॉमस रो याने आपल्या कडक शीलाने जहाँगीर बादशहावर इंप्रेशन मारले आहे असे दिसताच सम्राज्ञी नूरजहान हिला त्याची परीक्षा पाहण्याचा मोह आवरला नाही. तिने या सोवळ्या इंग्रज पाहुण्याच्या खोलीत रात्री एक सुंदर दासी सेवेकरिता धाडून दिली! ती सुमारे चाळीस वर्षांनी बाई असल्यामुळेच 'सर टॉमस रो' ला आपले मन आवरणे अवघड गेले नाही असे तो म्हणतो!!) हेतू एवढाच की, त्याने अपरिचित बाजारी स्त्रियांच्या नादी लागून रोग जडवून घेऊ नयेत. दुसरा बाजीराव तेरा वर्षांचा असताच त्याला स्त्रीसंसर्गजन्य रोग जडले होते अशी तक्रार आनंदीबाईच्या रोजनिशीत नमूद आहे. सुखवस्तू आणि थोडीफार सत्ता हाती असणाऱ्या पुरुषांवर एकपत्नीत्व लादणे, म्हणजे व्यसनांना आणि व्यभिचाराला निमंत्रण देणे होय. राजेरजवाडयांना इतरांहून अधिक मुभा आहे, असे गृहीत धरले जाई ते यामुळेच.

जी गोष्ट राजेरजवाड्यांची तीच साहित्यिक आणि प्रज्ञावंत यांची होय. बुद्धिमत्ता, प्रतिमा, रसिकता हे सर्व राजसत्तेसारख्या 'जादा सामर्थ्या'चेच प्रकार होत. श्रीमंतीमुळे, सत्तेमुळे किंवा शरीरसौष्ठवामुळे, ज्या माणसाजवळ अधिक सामर्थ्य असेल, 'Extra energy' असेल, तो एक प्रकारे राजेरजवाड्यांचेच अधिकार वापरु लागतो, अथवा आपल्या कामविकाराच्या अधिक आहारी जातो. रूपवंती स्त्रियांनी नटावे की नटू नये, मुरडावे की मुरडू नये, हा वाद जसा 'फुजूल' होय. तसाच प्रतिभावंतांना आणि शूरांना अधिक लैंगिक स्वातंत्र्य असावे की नसावे, हा प्रश्न 'फुजूल' होय. त्यांना लैंगिक सवलती कोणी 'द्याव्यात' असेही नाही, आणि कोणी 'नाकाराव्यात' असेही नाही. समाजाचे आणि त्यांच्या इष्ट मित्रांचे काम, त्यांना समजून घेणे, एवढेच आहे. मस्तानीच्या बाबतीत वास्तविक त्रागा करण्याचा अधिकारही एकट्या काशीबाईला, म्हणजे बाजीरावाच्या पत्नीलाच होता. कारण काहीही म्हटले तरी, ती एकटीच काय ती त्या प्रकरणी 'Aggrieved Party' होती. त्रागा करणारे आणि सोवळेपणाचे स्तोम माजविणारे, शनवारवाड्यातील आणि शनवारवाड्याबाहेरील इतर लोक केवळ उपटसुंभ होते. बाजीरावाचा जाणता मुलगा नाना, याला तर आपल्या वडिलांना शहाणपणा शिकविण्याचा काडीमात्र अधिकार नव्हता. वडिलंना नीतिमानतेच्या मार्गावर आणू पहाणाऱ्या या दिवट्याने पुढे स्वतःच रखेल्या ठेवल्याचे नमूद आहे. आणि खुद्द मस्तानीवर त्याने वाईट

नजर ठेवल्याच्याही बोभाटा होताच. कुणाच्या विवाहबाहय संबंधाचा गवगवा होतो आणि कुणाचा होत नाही, याचेही एक शास्त्र आहे! जो दिलदारपणाने परस्त्रीच्या आहारी जातो, त्याच्याबद्दल ओरड करणे हा सोवळ्या लोकांचा आवडता उद्योगच असतो! यामुळेच इंग्लंडचा ' आठवा एडवर्ड' इंग्लीश लोकांच्या ढोंगी नीतीवर चिडून म्हणला होता.

'याच मिसेस् सिम्पसन्ला मी रोज रात्री मागच्या बागेच्या दाराने घरी आणून पहाटे गुपचूप परत धाडली असती तर वृत्तपत्रांनी गवगवाही केला नसता, आणि राजपदासंबंधी पेचप्रसंगही निर्माण झाला नसता. पण मी तिच्यासंबंधीचे माझे प्रेम लपवायला तयार नसल्यामुळेच सोवळेपणाचे प्रदर्शन करणारा आमचा देश, आपल्या मनमोकळ्या राजावर चरफडत आहे!' मस्तानीमुळे पुण्यातील भिक्षुक मंडळींनी उठविलेल्या वादळात तत्कालीन पुढाऱ्यांत फक्त एकजणच व्यवहारी आणि वास्तववादी दृष्टीचा होता. तो म्हणजे सातारचा शाहू महाराज होय. त्याचा सल्ला असा होता की, 'मस्तानीला बंदीत टाकण्याने हा पेच सुटणार नाही, ज्याची वस्तु त्याला द्यावी' याचा अर्थ बाजीरावाच्या शौर्याला उधाण यावे म्हणून शाहू महाराजांनी त्याला एखादी मस्तीनी मुद्दाम आणून दिली असती असा नव्हे. पण बाजीरावासारख्या सरळ दिलदार शिपाईगड्याच्या मनात एकदा प्रेमाची ठिणगी पडल्यावर ती फुंकण्याने विझेल असे समजण्याइतके शाहू महाराज वेडे नव्हते!

इश्कपर जोर नहीं, ये है वो आतिश, गालिब! ॥
के लगाये न लगे, और बुझाये न बने! ॥

हे मिर्झा गालिबचे तत्त्वज्ञान, शाहू महाराज, बादशहाकन्या झीनतुन्निसा हिच्या. छत्राखाली असताना शिकले असावेत!

वीरपुरुष अथवा प्रतिभावंत यांना कोणी सवलत द्यायचीही नसते, की बंदी घालायचीही नसते. कारण ही आग विझवल्याने अधिकच पेट घेते. पण हृदयशून्य इतरेजनांना त्याचे सोयरसुतक काहीच नसते. आग पेटून भडका झाला, तरी जळणारे वेगळेच असतात. बाजीरावाच्या या बाबतीच अखेर तेच झाले. ज्यांना गुणीजनांची कदर असेल तेच याबाबतीतील पथ्य पाळू शकतात. नर्तकी मुन्ना आणि बीनकार बंदेअल्लीखाँ, गौहरबाई आणि बालगंधर्व यांच्या कथा प्रसिद्धच आहेत. त्या कथा नैतिक की अनैतिक हा प्रश्न अप्रस्तुत आहे. त्या हकीकती टाळून टाळता येण्यासारख्या नव्हत्या ही त्यातील मुख्य गोष्ट आहे. ती एक 'विधिघटना' असते, ती एक 'Fatality' असते! तीत सापडलेले जीव स्वतः यातना सहन करीतच असतात, शिक्षा भोगीतच असतात म्हणा हवे तर, त्यात इतरेजनांना नैतिक लुडबुड करायला जागा नसते.

हाँ! एका व्यक्तीला मात्र त्यात हात घालण्याला अवसर असतो. नव्हे हात घालण्याखेरीज इलाज नसतो. जो कलावंत किंवा वीरपुरुष असल्या विधिलिखित (fatal) प्रेमाच्या आहारी जातो, त्याच्या पत्नीला त्या प्रकरणात काही स्थान, काही 'Locus standi' असते की नाही? होय! कायदेशीर स्थान जरूर असते, पण त्याचा वापरही चातुर्याने करावा लागतो, संयमाने करावा लागतो. आपले माणूस गमावण्याची तयारी असेल, तर खुशाल हक्काची आणि कायद्याची भाषा बोलावी. आज 'डायव्होर्स'ची सोय आहे; पण 'डायव्होर्स' हा मागणाराचाही पराभव असतो, आणि देणाराचाही पराभव असतो, (महंमद पैगंबरांनी म्हटले आहे :- 'The Thing which is lawful, but disliked by Allah is divorce' शास्त्रसम्मत असून परमेश्वराला न आवडणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती डायव्होर्स) त्यातल्या त्यात विजय, खुद्द शनवारवाड्यात

आपल्या पतीची मुसलमान प्रेयसी स्वतंत्र महालात येऊन राहिल्यावर शांत रहाणाऱ्या, काशीबाईसारख्या हिंदू पत्नीचाच होतो!

या संदर्भात सौ. लीला देशपांडे यांच्या 'यांत्रिक' या नवीन (सत्यकथात्मक) कादंबरीतील एक विलक्षण उपकथानक, ती कादंबरी वाचणाऱ्यांना आठवेल. सौ. लीला देशपांडे यांनी एका मालगुजार कुटुंबाची व त्याच्या शाखा-उपशाखांची कहाणी सांगताना, मुंबईच्या एका विख्यात डॉक्टरच्या विवाहबाह्य प्रेमाची हकीकत सांगितली आहे. डॉक्टरांचे पहिले लग्न इंग्लंडला जाण्यापूर्वीच झाले होते. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांचे आणि एका अत्यंत रूपवान महाराष्ट्रीय डॉक्टरणीचे प्रेम जमले. हिंदुस्थानात आल्यावर, ती मुंबईत डॉक्टरांच्या घरीच राहू लागली. या सर्व वनवासातून त्या रूपवान पण बाळबोध वळणाच्या पहिल्या पत्नीने मोठ्या संयमाने मार्गक्रमण केले. अखेर त्या 'इंग्लंड-रिटर्नड्' डॉक्टरणीला त्या डॉक्टरशी लग्न केल्याशिवाय रहाणे अशक्य वाटू लागले. डॉक्टर लग्नालाही तयार झाले. पण एकदा हक्काची बायको झाल्यावर, त्या आधुनिक डॉक्टरणीला पहिली सवत घरातही नको होती! तिला पोटगी देऊन घराबाहेर घालविली तरच लग्न करणे शक्य आहे, असे ती इंग्लीश वातावरणात वाढलेली, डॉक्टरीण म्हणू लागली. ते डॉक्टर, त्या सौंदर्यवती डॉक्टरणीच्या पूर्ण आहारी गेले असले तरी, पहिल्या बायकोला पोटगी देऊन बाहेर काढण्याला तयार झाले नाहीत. केवळ कामांध वृत्तीचा माणूस आणि सात्त्विक वृत्ती शाबूत असलेला माणूस यांच्यातील फरक दाखविणारी ही 'टेस्ट केस' आहे! सात्त्विक वृत्तीचा माणूस देखील अन्य स्त्रीच्या बाबतीत पाघळेल. पण म्हणून स्वस्त्रीच्या बाबतीत अकारण निर्दय बनणार नाही.

याच 'केस'चा बायकोच्या बाजूनेही विचार करण्यासारखा आहे. आधुनिक विचाराची स्त्री या परिस्थितीत 'डायव्होर्स'ची भाषा बोलू लागली असती. जणू काय 'डायव्होर्स' म्हणजे सर्व प्रकारच्या वैवाहिक दुःखातून सुटकेचा मार्गच होय! पण अहंकार आणि झगडा हेच ज्यांना प्रिय आहे, त्यांची गोष्ट वेगळी आणि ज्यांना प्रेमाची अपेक्षा आहे, त्यांची गोष्ट वेगळी. ज्यांनी एकदा प्रेम केले आहे, त्यांचे वैवाहिक दुःख 'डायव्होर्स' ने संपत नाही. तर अधिकच भडकते!

> To be wroth with thois we love,
> Doth like a madness work in the brain.

या काव्यपंक्तीत कवीने ज्या यातनांते वर्णन केले आहे, त्या यातना 'डायव्होर्स' देणाऱ्या स्त्रियांच्याही वाट्याला शतपटीने येतात. अनेक वर्षे वैतागल्यानंतर नवऱ्याला 'डायव्होर्स' देणाऱ्या स्त्रियाही 'आजारीपणात आपल्या नवऱ्याचे कसे होत असेल? त्या नव्या बाईला माझ्याप्रमाणे शुश्रूषा जमत असेल का?' अशी चिंता करीत बसलेल्या मी पाहिल्या आहेत!

हे सर्व मनात येण्याचे कारण, मी जेव्हा गुणीजनांच्या प्रेमप्रकरणाकडे उदारपणे पहाण्याची आवश्यकता प्रतिपादितो, तेव्हा कित्येक स्त्रिया (त्यात माझी पत्नीदेखील आहे!) आणि मग बायकांनीही तेच स्वातंत्र्य घेतले तर? असा तर्कवाद लढवितात. पण तसे करणे तर्कदृष्ट्या बरोबर असले, तरी सुखदुःखाच्या दृष्टीने बरोबर नाही. कारण ज्या कृतीने पुरुषाला कदाचित ओरखडाही निघणार नाही. त्या कृतीने एखादेवेळी स्त्रीचा हृदयभंग व सर्वनाशही होईल.

अनुक्रमणिका

‘म्हणजे मग तुम्ही स्त्री-पुरुषांना वेगळे नीतीनियम लावता काय? ‘Double Morality’ मानता काय? असा प्रश्न मला विचारला जातो.

‘होय! मी ‘Double Morality’ मानतो. कारण निसर्गानेच स्त्री-पुरुषांना वेगळ्या प्रकारे घडविले आहे, वेगळ्या प्रकारे वाढविले आहे!’ हे माझे त्या प्रश्नाला उत्तर आहे!

साप्ताहिक परी
दिवाळी १९७५
पृ. ६८-७०

---

**संदर्भ**

साप्ताहिक ‘परी’ ने दिवाळी १९७५ च्या अंकात “लैंगिक स्वातंत्र्य समाजाला उपकारक ठरेल?” या विषयावरचा परिसंवाद प्रकाशित केला होता त्यामध्ये श्री. के. क्षीरसागर यांच्या समवेत सहभागी झालेले अन्य विचारवंत असे आहेत.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, लीलावती भागवत, डॉ. सुरेश नाडकर्णी, सौ. उमा माडखोलकर, प्रा. नरहर कुरुंदकर.

## २४
# आधुनिक ‘लंदन-रहस्य’

**म**ला वाटते मी त्यावेळी उमरावती येथील एक वार्षिक व्याख्यानमाला गुंफण्याकरता चाललो होतो. माझ्याच समोरच्या बर्थवर मुंबईचे एक साहित्यिक होते. आमच्या गप्पा युद्धोत्तर मुंबईतील बदलत्या जीवनांवर चालल्या होत्या. गर्दी, जागेची टंचाई, यांच्याबरोबरच बदलत्या लैंगिक जीवनासंबंधीही आमच्या बोलण्यात उल्लेख येत होते. वरच्या बर्थवर धूम्रपान करीत पडलेला ‘बिझनेसमधला’ प्रवासी मुंबईचाच होता. आमच्या गप्पा, आणि नीती-अनीतीसंबंधीच्या आमच्या कल्पना फारच आळणी वाटून तो व्यापारी ताडकन खालच्या बर्थवर आमच्या जीवनचर्चेत सामील झाला. अर्धवट हिन्दी, अर्धवट इंग्रजी, अर्धवट मराठी भाषेत त्याने आपले अनुभव ऐकवायला सुरुवात केली.

आणि "ये तो साब, कुछ भी नही! आम्ही तुम्हाला एक किस्सा बयान करतो तो ऐका." असे म्हणून त्याने आपली एक हकीकत सांगायला सुरुवात केली.

आम्हाला हररोज लवकर जेवण करून धंद्यावर जावा लागतो. नऊला बाहेर पडायचा, तो संध्याकाळी सहा-सातला यायचा. एक दिवस माथा दुखतो म्हणून आम्ही मध्येच घरी आले-इथे बम्बईत मी एकटाच! मुले-माणसे मुलखात! आलो, टाळ्याला चावी लावली, दार उघडला, अंगातला शर्ट काढून हँगरला लावला, केव्हा एकदा अंग कॉटवर टाकीन असा झाला होता! अंग कॉटवर टाकला तो साला अंगाखाली काहीतरी मऊमऊ लागू लागला, म्हणून मुद्दाम लाईट लावून कॉटवरच्या चादरी वगैरे बाजूला सारून बघू लागलो, तो खाली एक छोकरी डोळे चोळीत खोलीत उठून बसली!"

त्या मुलीने त्या व्यापाऱ्यापुढे दिलेल्या जबानीवरून पहाता ती रोज दुपारी काही तास या जागेत येऊन झोपत असे. तिला ती जागा उघडून दिली जात असे. म्हणजे या माणसाच्या पश्चात त्याच्या नियमित गैरहजेरीचा फायदा घेऊन त्या जागेचा उपयोग वेश्याव्यवसायाकरता केला जात असे. या जागेचा खरा मालक कोण याचा त्या मुलीला पत्ताच नव्हता. एक बाई तिला जागा उघडून देई, तीच तिची ‘घरवाली’ अशी या मुलीची समजूत. हा धंदा आपल्या पश्चात आपल्या जागेत किती दिवस चालला आहे, याचा त्या माणसाला पत्ताच नाही. ही झाली पंधरा वर्षापूर्वीची हकीकत. आता हाच व्यवसाय आणखी कितीतरी ‘सुधारला’ असेल!

या हकीकतीच्या सुमारालाच इंग्लंडमध्ये ब्रिटिश मिनिस्ट्रीतील एक जबाबदार युद्ध मंत्री लॉर्ड प्रोफ्युमो याचे प्रकरण चार खंडात गाजत होते. क्रिस्टाईन कीलर नावाच्या अप्रकट वेश्यावृत्ती करणाऱ्या मुलीचे नाव आकस्मिकपणे पोलिसांपर्यंत गेले होते. एका गुन्ह्याच्या प्रकरणात पोलिसांना तिची साक्ष काढायची होती. पण ती पोलिसांना चुकवून इंग्लंडबाहेर जाण्यात यशस्वी झाली होती. तिचा तपास करता करता पोलिसांना जे अनेक प्रख्यात लोक तिच्याशी परिचित असल्याचे आढळून आले, त्यात इंग्लंडमधील बडी-बडी मंडळी होती. लॉर्ड प्रोफ्युमोही त्यापैकी एक होते.

एका वेश्यावृत्तीच्या मुलीबरोबर आपल्या कॅबिनेटमधील एका जबाबदार मिनिस्टरचे नाव गोवले जात आहे यामुळेच सरकार आणि वृत्तपत्रे चकीत झाली असे नव्हे, त्यात राष्ट्रीय सुरक्षिततेचाही नाजूक

प्रश्न उपस्थित झाला होता. मिस कीलर ही मुळची 'मॉडेल'. आता, ही सर्व युरोपमधल्या नव्या शहरांतील परिभाषा थोडी समजावून घेतली पाहिजे. पॅरिस, लंडन, यांसारख्या शहरात, विशेषः पॅरिसमध्ये, चित्रकलेचे बरेच प्रस्थ आहे. त्या कलेच्या महात्म्यामुळेच, सुंदर आणि ज्यांची नीती फारशी कडक नाही. अशा स्त्रियांना विनाश्रम पैसे मिळवण्याचा एक व्यवसाय मिळाला आहे. चित्रकारापुढे नग्न बसण्याला तयार असलेल्या या मुली, पुष्कळदा अप्रकट वेश्याव्यवसात दाखल होतात, उघड वेश्यांपेक्षा या गुप्त वेश्या शहरी जीवनाचे रूप पार बदलून टाकीत आहेत.

तथापि या गुप्त वेश्याव्यवसायाला तितक्याच संभावित सुत्रचालकाची अथवा मध्यस्थाची गरज लागते. एरवी चित्रकारापुढे नग्न मॉडेल म्हणून बसणारी सुंदर मुलगी आणि इंग्लंडच्या मंत्रिमंडळातील एक प्रतिष्ठित मंत्री यांची गाठ पडणार कशी? या प्रोफ्युमो प्रकरणात मिस कीलरपेक्षाही ज्याच्या नावाचा उल्लेख झाला, आणि ज्याच्यावर अखेर खटला भरला गेला तो स्टीफन वॉर्ड नावाना एक, फक्त बड्या लोकांच्याच केसेस मिळवणारा 'ऑस्टिओपाथ' अथवा हाडांचा डॉक्टर होता. या सर्व प्रोफ्युमो प्रकरणात 'मॉडेल' मुली आणि देशोदेशींचे भोगविलासी मुत्सद्दी, यांच्यापेक्षाही डॉ. वार्ड या बहुरंगी पण गूढ व्यक्तीलाच अधिक महत्त्व आले होते. कारण फार मोठ्या वर्तुळात वावरणारे, फार मोठ्या कर्तबगारीचे आणि इभ्रतीचे लोक, आणि स्वतःचा हवा तो उपयोग करू देणाऱ्या मुली, यांना एकत्र आणण्याचे विचित्र काम, हा डॉ. वॉर्ड करीत असे. तो उघड दलाल असता तर उपयोग नव्हता, तो केवळ बड्या लोकांचा डॉक्टर असूनही उपयोग नव्हता, तर तो पटाईत मानसशास्त्रज्ञ होता. आणि मित्रमैत्रीणी जोडण्यातही पराकाष्ठेचा निपुण होता! पण लक्षाधीश मंडळीत ज्याचे प्रॅक्टीस होते त्याला 'कॉर्ल गर्ल' किंवा 'घरपोच वारयोषिता' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मुलींशी सख्य जोडून काय करायचे होते? इथेच मोठ्या– मोठ्यांना गुंग करणाऱ्या मनोरहस्याचा (Psychology) प्रश्न येतो!

डॉ. वॉर्डचा इतिहास पाहिला तर त्याने अस्थिवैद्यकाचेही मोठेसे खोल अध्ययन केले होते असे दिसत नाही. तो केवळ दैवयोगाने 'बडा डॉक्टर' बनला होता. तो नशीब काढण्याकरिता लंडनमध्ये आल्यावर एका क्लिनिकमध्ये काम करीत असता अचानक एक फोन आला.

"आपण आम्हाला एखाद्या चांगल्या ऑस्टिओपाथचे नाव सुचवू शकाल काय?"

दैवाने पुढे केलेला हात झटकन ओळखण्याचे आणि पकडण्याचे चातुर्य अंगी असलेल्या डॉ. वॉर्ड याने उलट फोन केला –

"होय, प्रख्यात डॉ. वॉर्ड याचे नाव मी आपल्याला सांगू शकतो."

आणि लगेच तो उद्योगाला लागला. तोपर्यंत त्याला स्वतःची जागाही नव्हती. ती त्याने एका मित्राकडून तात्पुरती मिळवली. वर सांगितलेला फोन अमेरिकन वकिलातीतून आलेला होता! खुद्द अमेरिकेच्या वकिलालाच उपचारांची गरज होती!

येथपासून डॉ. वॉर्ड याच्या व्यवसायीन उत्कर्षाचा प्रारंभ झाला. तो इतका झपाट्याने झाली की, एक दिवस विख्यात विन्स्टन चर्चिल यांच्या अस्थिव्याधीवर उपचार करण्याची त्याला संधी मिळाली, पण –

आधी होता वाघ्या ।
दैवयोगाने झाला पाग्या ।
त्याचा येळकोट राहीना ।
मूळस्वभाव जाईना ॥

डॉ. वॉर्डचा जीवनातला मूळ नाद मुलींशी मैत्री करणे, अन त्यांची मोठ्या लोकांशी गाठ घालून देणे, हा होता आणि तोच शेवटपर्यंत राहिला! असे दिसते की, उच्च वर्तुळातील आपल्या प्रॅक्टीसचा, ओळखीचा आणि घसटीचा उपयोग डॉ. वॉर्ड हा काही वेगळ्याच कामाकरिता करू लागला होता.

इकडे मॉडेल, कॉलगर्ल आणि उघड बाजारबसव्या यांच्यातील निवडक स्त्रियांशी दोस्ती, तर तिकडे बडे-बडे लॉर्ड, मुत्सदी आणि परराष्ट्राचे वकील, यांच्याशी अंगमर्दनाच्या संधीमुळे जादा घसट, असा या हाडांच्या डॉक्टरचा उद्योग होता.

पण केवळ सलगीची संधी एवढेच त्याच्या जीवनक्रमाचे वैशिष्ट्य नव्हते. अनीतीमान असला, तरी काही बाबतीत हा पुरुष असाधारण होता. अघळपघळ नीतीच्या मुलींची पैसा आणि अधिकार भरपूर असलेल्या लोकांशी गाठ घालून देण्यात त्याचे लक्ष पैशावर मुळीच नसे. थोड्या विलक्षण वाटणाऱ्या भाषेत सांगायचे झाले तर इंग्रजीत ज्याला 'पिंप' किंवा 'पॅण्डर' म्हणतात त्याचा उद्योग करीत असून (म्हणजे ग्राम्य शब्दात सांगायचे तर 'भडवेगिरीचे' काम करीत असून) तो आपल्या कामाबद्दल 'पै'चा ही लोभ धरीत नसे!

या सर्व प्रकरणात पुढे जो खटला भरण्यात आला तो डॉ. वॉर्डवरच भरण्यात आला. वास्तविक गवगवा झाला, तो लॉर्ड प्रोफ्युमो याचे नाव या प्रकरणात गुंतलेले असल्यामुळे झाला. पण लॉर्ड प्रोफ्युमो याच्यावर त्याच्या या बदफैलीपणाबद्दल खटला भरता येत नव्हता. त्याच्यावर खटला वेगळ्याच कलमाखाली भरवा लागला असता. त्या कारणाला कायद्यात 'Security risk' असा शब्द आहे. म्हणजे राष्ट्रीय सुरक्षिततेला युद्धमंत्री प्रोफ्युमो यांच्या वर्तनाने धोका पोहचला होता काय असा प्रश्न याबाबतीत उपस्थित होत होता. हाती असलेल्या पुराव्यावरून पोलिसांना हा आरोप ठेवता येत नव्हता. डॉ. वॉर्ड याच्यावर मात्र 'वेश्येच्या पैशावर उपजिविका करणे' हा आरोपही ठेवता येत होता. आणि आपल्या विविध संपर्कानी राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका आणणे हाही आरोप ठेवण्याचा पोलिसांचा विचार होता. डॉ. वॉर्ड याच्या अनेक उद्योगांचा राष्ट्रीय सुरक्षिततेच्या भंगाशी संबंध कोणता होता?

जे अनेक परदेशी डॉ. वॉर्ड याच्या अध्वर्युत्वाखाली कीलरसारख्या मुलींशी मदनाचे खेळ खेळत होते, त्यात आयव्हॅनॉव्ह नावाचा गोरागोमटा, संभाषणचतुर रशियन अधिकारीही होता. पण या ठिकाणी डॉ. वॉर्ड याने निर्माण केलेल्या प्रतिगोकुळाची थोडी हकीकत सांगितली पाहिजे. डॉ. वॉर्ड यास त्याच्या उच्च वर्तुळातील लॉर्ड ॲस्टर याने आपली टुमदार कॉटेज नाममात्र भाड्याने दिली होती. त्याच्या शेजारी असलेल्या छोट्या तळ्यात कीलर आणि वॉर्ड यांच्या भोवताली गोळा झालेले अनेक देशीचे मुत्सद्दी जलक्रीडेकरिता येत असत. (या मंडळीत आपले शेजारी फील्ड मार्शल अयूबखान हेही होते, असा उल्लेख सापडतो!) लॉर्ड प्रोफ्युमो हा या विचित्र वर्तुळात गोवला गेला, याला कारणही हे जलक्रीडेचे स्थानच होय.

ती एक शुक्ल पक्षातील रात्र होती. चांदणे स्वच्छ पडले होते. तळ्यात पोहणाऱ्या कीलरशी डॉ. वॉर्ड क्रीडा आणि मस्ती करीत होता. तिचा बेदींगसूट पाण्यातल्या पाण्यात त्याने इतका ओढला की ती गोरीपान विवस्त्र मुलगी एखाद्या मोठ्या मासोळीप्रमाणे पाण्यात तशीच सुळकांड्या मारू लागली. अखेर तिला काठापर्यंत रेटीत नेण्यात आले. नाईलाजाने ती थंडीत कुडकुडत तळ्याच्या काठावर संपूर्ण नग्न अशी चांदण्यात येऊन उभी राहिली! त्या ठिकाणी जमलेल्या बड्या लोकांच्या बायकांपैकी एक जणीने हाती सापडला तो लहानसा टॉवेल तिच्या अंगावर फेकला आणि म्हणाली,

"बाळ! हा घे टॉवेल! तुला त्याची आता गरज आहे."

आणि नेमक्या याच अवस्थेत लॉर्ड प्रोफ्युमो आपल्या एका मित्रासह तेथे येऊन दाखल झाला.

थोडक्यात म्हणजे जिचे वस्त्र वाऱ्याने उडून गेले आहे अशी मेनका आणि ज्याचे चित्त तिच्या विवस्त्र सौंदर्याने आपल्या तपस्येवरून उडून गेले आहे असा विश्वामित्र यांचीच जणू विसाव्या शतकातली कथा! आपला सूत्रधार डॉ. वॉर्ड याला या प्रसंगाचा अहवाल देताना कीलर म्हणाली "मला वाटते लॉर्ड प्रोफ्युमोंनी माझ्या त्या अवस्थेत माझ्याकडे रोखून पाहिले! अर्थात लाज ही गोष्ट डॉ. वॉर्डच्या भोवतालच्या मुलींत दुर्मिळच होती!

"विसाव्या शतकातील लंडनमधील हे प्रकरण सर्वसामान्य श्रीमंतांच्या कामक्रीडेत मोडले असते. आणि मग त्याची जास्त शहानिशा करण्याचे कारण पडले नसते. पण ब्रिटिश मंत्रिमंडळातील एक बडा मंत्री—तोही युद्धमंत्री—या प्रकरणात गुरफटला होता व त्या गोष्टीचा बभ्राही झाला होता. यामुळे गुप्तपोलीस आणि वृत्तपत्रे यांच्या वर्तुळात हे प्रकरण चांगलेच पसरले होते. बडे लोक बाहेरख्याली असतात, हे काही गुपित नव्हे, पण त्यांच्या ख्यालीपैकी एखादी षटकर्णी झाली तर मात्र त्यासंबंधी चौकशी होऊ लागते, कारण अशा प्रकरणात श्रेष्ठ वर्गातील पुरुष आणि हलक्या दर्जाची स्त्री याचे रहस्य आहे, ही गोष्ट जगजाहीर झालेली असते. आणि या जाहीरपणात धोका असतो! मोठमोठाले मंत्री आणि मुत्सद्दी यांच्याकडील वार्ता काढण्यात अनेक क्षेत्रातील लोक टपलेले असतात. एखाद्या देशाच्या संरक्षण व्यवस्थेतील गुपित हाती लागावे म्हणून परदेशाचे राज्यकर्ते जंगजंग पछाडीत असतात. लॉर्ड प्रोफ्युमोच्या या प्रकरणातच का होईना रशियन वकिलातील एक गोरागोमटा, मुत्सद्दी आयव्हॅनॉव्ह हा डॉ. वॉर्ड यांच्याशी बुद्धिपुरस्सर सलगी करीत होता, ती उगीच नव्हे. रात्रीच्या वेळी मद्याचा चषक झोकल्यावर लॉर्डसाहेब क्रिस्टाईन कीलरसारख्या वारांगनेच्या जेव्हा गळी पडतील, तेव्हा राज्यकारभारातले एखादे तरी गुपित तिच्या कानात बरळल्याशिवाय रहाणार नाहीत, असा त्या पाताळमंत्री कम्युनिस्ट राजदूताचा हिशोब होता. समजा हा अट्टल ब्रिटिश "डिप्लोमॅट" आपण होऊन काही बोलत नसेल, तर चाणक्यनीतीचा उपयोग करून त्या तरुण वारांगनेला पढवून एखादी गुप्त तारीख वा एखादी गुप्त बैठक यांचा सुगावा लावणे, आयव्हॅनॉव्हसारख्याला अशक्य नव्हते. हे प्रत्यक्ष घडले की नाही, ही गोष्ट गौण आहे. राजकारणात 'काय घडण्यासारखे आहे' याची चिंता अधिक करायची असते. राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीने जी घातूक गोष्ट घडण्यासारखी आहे, तिलाच 'Security risk' म्हणतात आणि अशाच परिस्थितीत जर एखादे राजकीय गुपित शत्रूच्या हाती लागले, तर त्याला 'Security leak' म्हणतात.

अनुक्रमणिका

लॉर्ड प्रोफ्युमोच्या या प्रकरणात लष्करी गुपित फुटण्याचा 'धोका' होता, पण ते प्रत्यक्षात फुटलेले नव्हते. आणि तरीही जो कालच प्रत्यक्ष राजघराण्याशी हस्तांदोलन करू शके, त्याला आज राजीनामा देऊन राजधानीतून दूर जाऊन राजसंन्यास घ्यावा लागतो, हा परिणाम कशाचा?

लॉर्ड प्रोफ्युमोच्या बाबतीत राजीनाम्याचे प्रत्यक्ष कारण लष्करी गुपित फुटणे हे नव्हते, तर उच्च ब्रिटिश राजकीय परंपरेप्रमाणे आणखीच काही होते! पण त्या राजकारणाशी आपणाला कर्तव्य नाही. आपणाला एवढ्याशीच कर्तव्य आहे की, एका तालेवार मुत्सद्यावर आलेल्या या नामुष्कीच्या प्रसंगाचे कारण एक क्षुद्र वारांगणा होती! प्राचीन काळापासून राजेरजवाडे, अमीर-उमराव, हे अंगवस्त्रे ठेवीत असून १९६१ मध्ये मात्र एका वारांगनेचा संपर्क एवढा घातुक का ठरला?

जुन्या काळातील वेश्यागमन आणि विसाव्या शतकाच्या उतारार्धातील वेश्यागमन, यात पडलेले महदंतर हे त्याचे कारण होय. पूर्वीच्या वेश्या सर्वथैव आपल्या खानदानी आश्रयदात्यावर अवलंबून असत. त्यांचे राहणे, त्यांची जात, गोत्र, त्यांच्याकडे येणारे-जाणारे, या सर्वांची त्यांच्या यजमानाला माहिती असे. विसाव्या शतकातील लंडनसारख्या अफाट, बहुजातीय आणि आधुनिक यंत्रसाधनांनी युक्त अशा शहरातील वेश्यांना स्वातंत्र्य आणि साधने अधिक असतात. तर लॉर्ड प्रोफ्युमोसारख्या त्यांच्या यजमानांना त्यांच्या मित्र परिवाराची व दैनंदिन हालचालींची माहिती जवळजवळ शून्य असते. म्हणजे एका मोठ्या राष्ट्राचा राज्यशकट हाकणारा हा लॉर्ड, एका अनोळखी मदनमंजिरीच्या बाहुपाशात जाऊ लागला होता! आयव्हॅनॉव्ह या रशियन दूतावासातील तरुण देखण्या अधिकाऱ्याशीही हीच कीलर कामचेष्टा करीत असे. लॉर्ड ॲस्टर याच्या मालकीच्या जलाशयात तिच्याबरोबर इतरही अनेक देशांचे पंतप्रधान, मुत्सद्दी, राजेरजवाडे जलक्रीडा करीत होते. जुन्या काळच्या एखाद्या मुत्सद्याच्या अंगवस्त्राला हे स्वातंत्र्य आणि हा दर्जा कधीच प्राप्त झाला नसता. 'मॉडेल' म्हणून लंडनमध्ये आलेल्या मिस कीलरसारख्या सुंदरींना देखील हा दर्जा केवळ विसाव्या शतकामुळे आणि लंडनसारख्या कॉस्मॉपॉलिटन शहरामुळे प्राप्त झाला होता काय?

या प्रकरणात कालमाहात्म्याप्रमाणेच व्यक्तिमाहात्म्यही लक्षात घ्यावे लागते. ते व्यक्तिमाहात्म्य म्हणजे डॉ. स्टिफन वॉर्ड याचे होय. हा विलक्षण माणूस लॉर्ड ॲस्टर, लॉर्ड प्रोफ्युमो, विन्स्टन चर्चिल, तत्कालीन अमेरिकन ॲम्बेसेडर यांच्या पोटात जितक्या सहजतेने शिरे तितक्याच सहजतेने मिस कीलरसारख्या तरुण मुलींच्याही पोटात शिरे. द्रव्य हाही त्याचा हेतु नसल्याने त्याचा तो स्नेह निर्हेतुक वाटे, नव्हे निर्हेतुक असे आणि महाबुद्धिमान आणि मोठे सत्ताधारी असे लोक डॉ. वार्डच्या मांडीवर मान देत, पण स्टिफन वॉर्ड याची निर्हेतुक कामसेवा आणि कीलरसारख्यांची मोहिनी या गोष्टी गृहीत धरल्या तरी प्रोफ्युमो प्रकरणातील व्यक्तींचा आणि घटनांचा खुलासा होत नाही. ही सर्व नुसती विलासी वृत्ती किंवा चैनबाजी नव्हती. बुद्धिमंताच्या या पागलपणाच्या बुडाशी (ज्याला आमचे नवनीतीवाले) 'सेक्स रेव्होल्यूशन' म्हणतात ते होते.

"लैंगिक जीवनातील क्रांती म्हणजे काय?" हे 'सुधारलेल्या' आजच्या जगातील राजधान्यात राहणाऱ्या लोकांना सांगायला पाहिजे असे नव्हे. लंडन आणि पॅरिस या शहरात जेवढ्या प्रमाणात लैंगिक क्रांती आहे, तेवढ्याच प्रमाणात कलकत्ता, दिल्ली आणि मुंबई या शहरातही आहे. या लेखाच्या आरंभी मुंबईतील बदलत्या लैंगिक जीवनाचे जे उदाहरण सांगितले ते मिस कीलर आणि स्टीफन वॉर्ड यांनी निर्माण केलेल्या लैंगिक जीवनाइतके 'सोफिस्टिकेटेड' नसेल, पण त्यातही लैंगिक स्वैरतेची वाढच प्रतीत

होते. लैंगिक क्रांतीचे स्वरूप एका पाश्चात्य लेखकाने स्थूलमानाने पुढीलप्रमाणे ठरविलेले आहे. ही क्रांती साधारणतः श्रीमान आणि सत्तावान अशा छोट्या गटात मूळ धरते, त्याचीच परिणती विवाहित किंवा अविवाहित व्यक्तींना जेथे मुक्तपणे लैंगिक तृप्ती मिळवता येईल असे वातावरण निर्माण करण्यात होते. ज्या वातावरणात प्रतिष्ठित आणि फॅशनेबल स्त्रीलादेखील, "तो पुरुष कोँण आहे बरे? त्याच्यामुळे माझी कामवासना जागृत होत आहे, त्याला इकडे आणा पाहू! मला त्याच्यावाचून राहवत नाही!" असे निर्भीडपणे म्हणता येईल अशा वातावरणाची निर्मिती म्हणजे लैंगिक क्रांती! आणि म्हणजेच काही नवनीतीवाद्यांना हवी असलेली नवी नीती!

'इलस्ट्रेटेड वीकली' या इंग्रजी साप्ताहिकात देवयानी चौबळ या लेखिकेने Exchange of Wives Club या चमत्कारिक संस्थेच्या अस्तित्वाचा काही महिन्यापूर्वी निर्देश केला होता. तो खराखुरा अस्तित्वात आहे की नाही हे त्या लेखिकेलाही नक्की माहीत नाही, पण अशा ('भार्या-विनिमय') क्लबची कल्पना Sexual revolution च्या कल्पनेशी जुळते खास! केवळ पैसा, सत्ता आणि डॉ. वॉर्डसारखा चतुर मध्यस्थ, एवढ्यांनी मिस कीलरच्या भोवताली गोळा झालेल्या मदनमंडळाचा खुलासा होत नाही. त्या मंडळाच्या लैंगिक वर्तनामागे हे स्वैरतेचे तत्त्वज्ञान आहे.

या लैंगिक क्रांतीत व्यक्तीला आणि राष्ट्राला कोणकोणते धोके आहेत, याचा विचार प्रोफ्युमो प्रकरणामुळे इंग्लंडसारख्या खंबीर राष्ट्रालाही करावा लागला. तसाच एखादा नैतिक धरणीकंप दिल्लीत किंवा मुंबईत झाल्यास आपणालाही राष्ट्रीय (नीतिमत्तेचा नव्हे!) सुरक्षिततेचा विचार करावा लागेल! तसा नैतिक धरणीकंप होईपर्यंत वाट पाहायची, की आधीच जागे व्हायचे एवढाच प्रश्न आहे!

लोकसत्ता
दिवाळी १९७६, पृ. ३४, ३६, ३८

---

**संदर्भ**

जी. डब्ल्यू. एम. रेनॉल्टस् या विख्यात इंग्रजी कादंबरीकाराच्या 'मिस्टरीज ऑफ द कोर्ट ऑफ लंदन' या नावाच्या सुप्रसिद्ध कादंबरीचे मराठी भाषांतर 'लंदनरहस्य' या नावाने १८९४ मध्ये प्रकाशित झाले. पूर्वार्ध भाग १ ते ३ उत्तरार्ध भाग १ ते २ अशा भागामध्ये ते प्रकाशित झाले. पूर्वार्धाच्या पहिल्या भागाच्या भाषांतराचे काम गोविंद बल्लाळ देवळ आणि श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांनी केले. त्यानंतरच्या सर्व भागांचे भाषांतर शंकर बापूजी मुजुमदार यांनी केले.

## २५
# 'पाप' : वासना आणि कृती

**सु**मारे पंधरा वर्षापूर्वी ग्रेटब्रिटनच्या राजकीय वर्तुळात लॉर्ड प्रोफ्युमो यांच्या संबंधाने झालेले भयंकर वादळ वृत्तपत्रांच्या काही वाचकांच्या तरी लक्षात असेल, त्यावरील एक इंग्लिश पुस्तक मी परवा वाचीत होतो. ते पुस्तक अर्थातच वृत्तपत्राच्या क्षेत्रातील एका लेखकाने लिहिलेले आहे. त्या पुस्तकाचा विषय त्यावेळी, त्या प्रकरणातच गुरफटलेल्या, डॉक्टर वॉर्ड याच्यावर झालेल्या खटल्यासंबंधीचा आहे. डॉ. वॉर्ड हा एक सामान्य प्रतीचा हाडांचा डॉक्टर होता. त्याच्या पेशन्टस्‌मध्ये फार बडे बडे लोक असत. हाडे चोळण्याखेरीज त्याचा आवडता उद्योग म्हणजे बड्या, विषयलंपट लोकांची सुंदर मुलींशी ओळख करून देणे हाही होता. कुप्रसिद्ध क्रिस्टाईन् कीलर आणि लॉर्ड प्रोफ्युमो यांची ओळख डॉ. वॉर्ड याच्यामुळेच झाली. प्रोफ्युमो माफी मागून आणि राजीनामा देऊन मोकळा झाला, पण डॉ. वॉर्ड याच्यावर पोलिसांनी खटला भरला. त्याच्यावर आरोप वेश्यांच्या पैशावर जगण्याचा होता.

हे सर्व प्रकरण 'नीती-अनीती' इतकेच कायद्याच्या गुंतागुंतीकरिताही लक्षात रहाण्यासारखे आहे. लॉर्ड प्रोफ्युमोची नोकरी गेली, ती क्रिस्टाइन कीलरसारख्या 'कॉलगर्ल'शी संबंध ठेवल्यामुळे गेली नाही, तर संरक्षण-मंत्रालयातील गुपिते फुटण्यासारखी वर्तणूक केल्यामुळे व त्यासंबंधी पार्लमेंटपुढे खोटे निवेदन केल्यामुळे गेली. डॉ. वॉर्ड याच्यावर खटला भरला गेला, तो कॉलगर्लस् आणि बडे लोक यांच्या ओळखी करून देण्यामुळे भरला गेला नाही, तर त्या तरुण सुंदर स्त्रियांच्या प्राप्तीवर (अंशतः) जगण्यामुळे भरला गेला. या खटल्याच्या पुस्तकाचा कर्ता कोर्टातील दृश्याचे वर्णन करीत आहेत, तसेच डॉ. वॉर्ड यांच्या लोकविलक्षण मनोरचनेचेही वर्णन करीत आहे. 'लोकविलक्षण' म्हणण्याचे कारण वॉर्ड याला आपण काही गैरवर्तन करीत आहेत असे कधीच वाटत नसे!—त्याच्या मित्रांनी पटविले तरी पटत नसे! तो हाडांचा डॉक्टर व धंदवाईक मुलींचा मित्र होता, तसाच उत्तम चित्रकारही होता. त्याच्या बोलण्याचालण्यात अनीतीचा किंवा असभ्यतेचा वासही येत नसे. त्याचे मित्र-मैत्रिणींचे मंडळ फार मोठे होते. पण खटला भरताक्षणी त्याचा एकही प्रतिष्ठित मित्र त्याच्या बाजूने साक्ष देण्यास पुढे आला नाही. विरुद्ध साक्ष देण्यास मात्र त्याच्या काही सुंदर मैत्रिणी पोलिसांनी हजर केल्या होत्या! कोर्टात त्या नमुन्याच्या, म्हणजे सुंदर, नखरेल आणि घसरत्या वर्तनाच्या तरुण स्त्रियांची गर्दी होत असे. या दृश्याचे वर्णन करताना त्या खटल्यावरील पुस्तकाचा कर्ता म्हणतो :

"कोर्टातील प्रेक्षकांची गॅलरी सदैव भरलेली असे. त्यात बहुतेक फॅशनेबल पोषाख केलेल्या स्त्रियाच असत—I wondered, what thoughts were concealed behind those expressions of polite interest!"

कोर्टातील फॅशनेबल स्त्रियांप्रमाणे लेखकाने ज्यूरीतील—स्त्री-पुरुषांचेही वर्णन केले आहे. "ज्यूरीच्या खुर्च्यांवर अकरा पुरुष आणि एक स्त्री होती. त्यातील निम्मे पुरुष तिशीच्या आसपासच्या वयातील होते. ते आपल्या जागेवर कसे येतात, कसे बसतात आणि आरोपीच्या जीवनक्रमाऐवजी स्वतःच्या जीवनक्रमावरच कसा विचार करतात, हे मी नित्य बारकाईने पहात होतो. स्वैरता (Promiscuity) आणि वेश्याव्यवसाय यातील फरक ही तरुण मंडळी स्वानुभवाच्या आधारावर कसा काय ठरविणार? डॉ. स्टीफन वॉर्ड याचे मन कोणत्या द्रव्याचे बनले आहे हे ओळखणारा या बारा लोकांत एखादा तरी असेल काय?"

वास्तविक क्रिस्टाइन कीलर आणि डॉ. वॉर्ड यांचा वृत्तांत केवळ लैंगिक कुतूहलानेच वाचला जाण्याचा संभव फार; पण तो वाचीत असता माझ्या मनात मात्र 'मानसिक पाप' व 'कायिक पाप' यांच्यातील सीमारेषेचेच विचार अधिक आले. तसेच अनैतिक वर्तन आणि गुन्ह्यात अंतर्भूत होणारे वर्तन,. यांच्यातील सूक्ष्म फरकासंबंधीचे विचारही माझ्या मनात आले. ख्रिस्ताने म्हटले आहे, "जो मनुष्य कामुक नजरेने परस्त्रीकडे पहातो, त्याने अधिक काही केले नाही तरी व्यभिचार केला आहे, असेच समजावे." तर जर्मन महाकवी गटे याने अशा अर्थाचे उद्‌गार काढले आहेत की, 'जगात असे एकही पाप नसेल की, जे मी मनाने एकदा तरी केलेले नाही'. म्हणजे आपण सर्व सारखेच पापी आहोत काय? कृष्णाने युधिष्ठिराला एकदा विचारले होते. 'तुझ्या मनात कुंतीसंबंधी तुझ्या प्रत्यक्ष मातेसंबंधी कधी पापविचार आला होता काय?' 'सत्यभाषी युधिष्ठिराला, 'तसा विचार मनात आला होता' हे कबूल करावे लागले. मग मानसिक पाप आणि कायिक पाप यात काहीच फरक नाही काय?

'तसबीर आणि तकदीर' या माझ्या आत्मचरित्रात दोघा घटस्फोटित स्त्रियांचा उल्लेख आहे. पैकी एकीला मी सहानुभूती दाखविली, दुसरीला सहानुभूती दाखविली नाही. इतकेच नव्हे तर तिच्याशी असलेला संबंध तोडला. यावरून एका वाचक स्त्रीने 'पंक्तीभेद करण्याचे कारण काय?' असा मला जाब विचारला आहे. यावरून घटस्फोट या क्रियेचा थोडा बारकाईने विचार करणे जरूर झाले आहे. पण ते प्रत्यक्ष उदाहरणावरूनच करणे शक्य आहे. आपण दोन केसेस घेऊ. 'अ' या व्यक्तीचा काही स्त्रियांशी विवाहबाह्य स्नेह आहे, व त्यामुळेच तो आपल्या लग्नाच्या स्त्रीला घटस्फोट घ्यायला लावतो. 'ब' या व्यक्तीचेही काही स्त्रियांशी विवाहबाह्य स्नेह आहेत, पण आपल्या लग्नाच्या बायकोला केवळ आपल्या विवाहबाह्य स्नेहाकरिता घटस्फोट घ्यायला लावणे मात्र त्याच्या हातून होत नाही. म्हणजे परस्त्रीची अभिलाषा करणे हे पाप त्याच्या हातून घडते, पण स्वपत्नीला संसारातून उठविणे त्याला शक्य होत नाही. लोक 'अ' आणि 'ब' या दोघांनाही सारखेच लेखतात. उलट केवळ पाश्चात्य दृष्टीने पहाणारे माझे काही मित्र, घटस्फोट घेणाऱ्या पतीचे वर्तनच अधिक निर्दोष आहे असे मानतात. म्हणजे परस्त्रीशी प्रेम जमल्यावर स्वस्त्रीला घटस्फोट देणेच अधिक रीतसर असे मानतात. पण यातील एका केसमध्ये व्यभिचारच फक्त आहे. तर दुसऱ्या केसमध्ये व्यभिचाराच्या जोडीला त्याहूनही मोठे असे पातक आहे. आणि ते म्हणजे जिच्याशी संसार केला तिच्याशी, केवळ आपल्या स्वैर वैषयिकतेकरिता निर्दयपणाने वागणे!

सौंदर्यवादी (रोमँटिक) लोकांच्या नीतीशास्त्राप्रमाणे तर व्यभिचारापेक्षाही स्वस्त्रीशी निर्दयपणाने वागायला तयार होणे हे अधिक मोठे पाप आहे. किंबहुना निर्दयपणा हेच महापातकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. पण एक गोष्ट मात्र विसरता येत नाही. याच मार्गाने विचार केल्यास प्रोफ्युमो-प्रकरणातील डॉ. वॉर्ड देखील स्वतःच्या वर्तनाचे समर्थन करू शकेल! तो म्हणेल मी वैषयिक असेन, वैषयिकांना सहाय्य करणारा असेन, पण मी कोणाशीच निर्दयपणा केलेला नाही. डॉ. वॉर्ड याचे हे समर्थन अंशतः ग्राह्य असले तरी अन्य दृष्टीने त्याच्या वर्तनात महापातक होतेच. समाजातील एका अत्यंत नाजूक नात्याशी म्हणजे स्त्री-पुरुषांच्या लैगिक संबंधाशी त्याने बेजबाबदार खेळ चालविला होता, आणि त्याचा परिणाम अनेकांचा अधःपात, अनेकांचा संसारनाश होण्यात होणार होता.

डॉ. स्टीफन वॉर्ड याचा वृत्तांत लिहिणाऱ्या त्या पत्रकाराचे म्हणणे काही वेगळेच आहे. तो म्हणतो, ज्यूरीतील माणसांनी आपण आरोपीच्या परिस्थितीत कसे वागलो आहे; किंवा कसे वागू, याचा विचार करून खटल्याचा निर्णय द्यावा. येथे पुन्हा ख्रिस्ताच्या दुसऱ्या एका वचनाचे स्मरण होईल. त्याच्या काळात

एका व्यभिचारिणीची, लोक 'छीः थू' करीत होते. तिला दगडमार करीत होते. व्यभिचार हे घृणास्पद पातक समजत असूनही, दगडमार करणाऱ्या त्या लोकांना ख्रिस्त म्हणाला - 'He that is without sin amongst you should cast the first stone.' (तुमच्यातील ज्या कोणाचे वर्तन धुतल्या तांदळासारखे असेल, त्यानेच या स्त्रीला पहिला दगड मारावा.) म्हणजे पापपुण्याचा निर्णय करणाऱ्या माणसाने स्वतःचे वर्तन शुद्ध हवे. आता ख्रिस्ताच्या या दोन तत्त्वातील बाह्य विसंगती पाहूया. तो एकदा म्हणतो, मनाने व्यभिचार करणे हे शरीराने करण्याइतकेच वाईट आहे. तर एकदा म्हणतो पाप-पुण्य ठरविणाराने आपण स्वतः कितपत शुद्धचरित आहोत याचा विचार करावा. पण ख्रिस्ताच्या वचनातील विसंगती केवळ दर्शनी विसंगतीच आहे. स्वतःच्या वर्तनाचा विचार करताना मनुष्याने काटेतोल असावे, पण दुसऱ्याच्या वर्तनाचा विचार करताना सहृदय असावे, असा त्याच्या त्या दोन वचनातून अर्थ निघतो.

पाप आणि पुण्य या कल्पना 'नीती आणि अनीती' या कल्पनांपेक्षा सूक्ष्म आहेत. नुसत्या नीती-अनीतीचा विचार करणारे काही आधुनिक लोक, ज्यात दुसऱ्या व्यक्तीला किंवा संपूर्ण समाजाला काही अपाय नाही, नुकसान नाही, त्यात काही अनीती नाही, असे समजतात. पण आपले स्वतःचे नुकसान किंवा अधःपात करण्यातही अनीती आहे, असे सर्व धर्म मानतात; व्यक्तिशः मीही मानतो. पण गुन्हा आणि अनीती यात फरक करताना मात्र, 'एखाद्या कृतीने दुसऱ्याचे प्रत्यक्ष नुकसान किती झाले, याचाच विचार करावा लागतो.

म्हणून ज्यात अनैतिकता असून शिवाय निर्दयताही असते ते सर्वांत मोठे पातक होय, सामाजिकदृष्ट्या तो गुन्हाही होय. निर्दयतेत दुसऱ्याला इजाही असते आणि स्वतःच्या अधःपातही असतो. नुसता घटस्फोट देणे, हे धर्मदृष्ट्या अनीतीचे असेल; पण घटस्फोट घ्यायला लावताना दुसऱ्या व्यक्तीच्याबाबतीत होणाऱ्या निर्दयपणाचा विचार न करणे, ही सर्व दृष्टींनी फार मोठी अनैतिकता होय. म्हणजे अखेर निर्दयता हीच फार मोठी अनीती ठरते. या विचारसरणीप्रमाणे डॉ. वॉर्ड यांचे उद्योग कदाचित सौम्य अनीतीचे ठरतील. पण –

'परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनम्' हेच प्राचीन सूत्र अखेर खरे ठरते.

धर्मभास्कर<br>दिवाळी १९७७, पृ. १९–२०

.....................

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

अनुक्रमणिका

**वाङ्‌मयीन सन्मान-**

१९५१ बडोदे येथील १४ व्या वाङ्‌मय परिषदेचे अध्यक्षपद.

१९५९, मिरज येथे भरलेल्या ४१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड.

१९६०, जानेवारी इंदोर येथील १६ व्या शारदोत्सवाचे अध्यक्षपद.

१९६०, नोव्हेंबर ग्वाल्हेर येथील १५ व्या वाङ्‌मय परिषदेचे अध्यक्षपद.

१९६५, साहित्य ॲकॅडेमीच्या मराठी सल्लागार मंडळावर नेमणूक.

१९६५ ‘टीकाविवेक’प्रकाशित.

१९६६ टीकाविवेकला महाराष्ट्र राज्य पारितोषिक तसेच केळकर पारितोषिक प्राप्त.

१९६९ पुणे विद्यापीठाच्या ‘टागोर व्याख्यानमाले’चे व्याख्याते म्हणून निवड.

१९७६ ‘तसबीर आणि तकदीर’ या आत्मचरित्राचे प्रकाशन.

१९८४ ‘श्री. के. क्षी. वाङ्‌मयीन लेखसंग्रहा’चे प्रकाशन.

१९९२ ‘स्त्रीजीवन आणि विवाहविषयक लेख संग्रहा’चे प्रकाशन.

२००० ‘मराठी भाषा, वाढ आणि बिघाड’ प्रकाशित.

अनुक्रमणिका